म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २८३




REFBK-0003128

निबंध
२८३

स.जि.४४२

॥ श्रीसरस्वती प्रसन्न ॥

# दांपत्यमहिमा.

REFBK-0003128

लेखक

जयराम रामचंद्र चौधरी, पिंपरूडकर.

मुंबईचा मार्गदर्शक, सचित्र जोडाक्षर शिक्षक, बाल-शुद्धलेखन इत्यादि पुस्तकांचे कर्ते.

आवृत्ति पहिली ] १९२९ [ प्रति २०००

पुस्तककर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत १ रुपया.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३८२

प्रकाशक—जयराम रामचंद्र चौधरी, पिंपरूडकर
पो० फैजपूर, पूर्व खानदेश.



मुद्रक—गोपाळ बळवंत जोशी,
आनंद छापखाना, सदाशिव पेठ, पुणें.

# प्रिय वाचकांस प्रेमाची सूचना.

## पुस्तकांत स्वतःचें नांव व गांव प्रसिद्ध करून स्वार्थ व परमार्थ साधण्याची सोनेरी संधि.

प्रिय वाचकहो! आपल्या चरणांजवळ आग्रहाची नम्र विनंति आहे कीं, ज्याप्रमाणें दांपत्यमहिमा हें पुस्तक छापवून प्रसिद्ध करण्याचे कामीं कित्येक सद्गृहस्थांनीं उदार मनानें द्रव्यद्वारा मदत करून मज गरिबाचें पुस्तक प्रसिद्ध केलें; तद्वत्च आपल्या मित्र मंडळींत, आप्त-इष्ट मंडळींत अगर वाचनालयांत प्रस्तुत पुस्तकाच्या कमींत कमी ९ प्रति किंवा त्याहून अधिक प्रति जे वाचकबंधु स्वतःच्या नांवावर अगर इतरांच्या नांवावर एकदम किंवा सुटक व्ही. पी. नें मागवून उदार आश्रय मिळवून देतील त्यांचीं नांवें पुढील आवृत्तींत त्यांनीं खपविलेल्या प्रतींच्या आंकड्यासह प्रसिद्ध करण्यांत येतील व पुस्तकाचे आरंभीं त्यांचे आभार मानण्यांत येतील. तरी सर्वत्र प्रिय वाचकांनीं या कार्यास हातभार लावण्याचें मनावर घेऊन, स्वार्थ व परमार्थ साधून घेण्यास चुकूं नये. एवढें कार्य जे वाचकबंधु तडीस नेतील त्यांचा मी अत्यंत आभारी होईन.

९ प्रति एकदम मागविणारास टपाल खर्च माफ.

पत्ता—जे. आर. चौधरी, पिंपरूडकर.
पो. फैजपूर. जि० पूर्वखानदेश.

# अर्पण.

पुस्तकाचे शेवटीं आश्रयदात्यांच्या लिस्टमधील सर्वज्ञातिसमाजांतील श्रीमंत, शिक्षक व सुशिक्षित अशा बऱ्याचशा उदार व परोपकारी लोकांनीं प्रस्तुत पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या कामीं मजसारख्या गरीब व होतकरू लेखकास उत्तेजनार्थ अगदीं उल्हास वृत्तीनें व निरपेक्ष बुद्धीनें द्रव्यद्वारा यथाशक्ति मदत करून, मजविषयीं आपल्या पवित्र अंतःकरणांत वसत असलेलें प्रेम व्यक्त केलें; एवढेंच नव्हे तर माझ्या श्रमाचें योग्य सार्थक करून माझ्या भावी चरितार्थाचाही मार्ग आंखून दिला, याबद्दल त्यांनीं मला आजन्म ऋणी करून ठेविल्यामुळें, त्यांचें अभिनंदन करावें तेवढें थोडेंच होणार आहे. परंतु श्रीकृष्ण परमात्म्यानें ज्याप्रमाणें विदुराच्या कण्या व सुदामजीचे पोहे मोठ्या प्रेमानें ग्रहण केले; तद्वत्‌च दांपत्यमहिमा या पुस्तकाची प्रथमावृत्ति मी अनन्यभावानें आश्रयदात्यांच्या चरणीं अर्पण करीत आहें तिचा त्यांनीं प्रेमानें स्वीकार करून ही अल्पशी समाजसेवा गोड करून घ्यावी एवढीच त्यांना सविनय विनंति आहे.

आपला शुभचिंतक,

जयराम रामचंद्र चौधरी.

पिंपरूड.

# प्रस्तावना.

प्रस्तुत पुस्तक लिहिण्यास मूळ कारण माझ्या धर्मपत्नीचा '**सुशील स्वभाव**' हेंच होय. जिनें माझ्या सुस्थितींत अगर दुःस्थितींत आपल्या सात्त्विक मनोवृत्तींत यत्किंचित्‌ही फरक पडूं न देतां, माझें मन कोणत्याही बाबतींत जराही दुखविलें नाहीं; उलट विपन्नावस्थेंत वेळोवेळीं मला प्रोत्साहन देत जाऊन, तिनें चिंताग्रस्त व संकटव्याप्त बनलेल्या आत्म्यास आपल्या निर्व्याज प्रेमरूपी झऱ्याच्या सिंचनानें बारंवार धैर्य देत जावें; एवढेंच नव्हे तर आज जो मी पृथ्वीच्या पाठीवर बावरत असून संसारसुखाचा अलभ्य लाभ अनुभवीत आहें त्यास कारण तिचा '**प्रेमळ सहवास**' हेंच होय. या जगांत सर्व सुखांत '**संसारसुख**' श्रेष्ठ मानिलें आहे. या अत्युच्च संसारसुखाचा खरा लाभ मिळवून घेण्यासाठीं प्रत्येक दांपत्यानें आपल्या सुदैवेंकरून अगर दुर्दैवेंकरून ईश्वरानें जी स्थिति दिली असेल तींतच परमानंद मानून, आपल्या प्रेमळ सहवासानें परस्परांत परस्परांविषयीं प्रेमैक्य कसें उत्पन्न करावें? परस्परांचीं मनें लोहचुंबकाप्रमाणें आकर्षण करून घेण्यासाठीं परस्परांशीं कसें वागावें? आपल्या वर्तनक्रमांत वेळप्रसंगीं कसकसा फरक करावा? उभयतांनीं यथेच्छ संसारसुख भोगून, आपला सर्व काळ आनंदांत कसा घालवावा? आपल्या चिमुकल्या गृहराज्यांत शांतता कशी नांदवावी? उभयतांनीं आपल्या धर्माप्रमाणें वागून व आपलीं कर्तव्यें नीट बजावीत जाऊन, संसार सुरळीत कसा चालवावा? आपल्या मुलांबाळांस योग्य वळण व शिक्षण देऊन, त्यांचें पावित्र्य कसें उज्ज्वल बनवावें? त्यांचेकडून आपल्या कुळास कोणत्याही प्रकारचें लांछन न लागेल अशी खबरदारी वाहून, आपला कीर्तिध्वज या अवनीतलावर कसा फडकत ठेवावा? मुलांच्या भावी कल्याणासाठीं आईबापांनीं काय काय केलें पाहिजे?

कसकशी काळजी वाहिली पाहिजे ? ह्याविषयीं प्रत्येक पतिपत्नीस बोधामृत पाजण्याचा व त्यांचीं कर्तव्यें नीट समजावून देण्याचा थोडासा ऊहापोह या चिमुकल्या पुस्तकांत केला आहे व आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ **मनुस्मृति, महाभारतादि धर्मग्रंथांतील** आणि **अर्वाचीन इतिहासांतील** आधार देऊन, ठिकठिकाणीं मनावर उत्तम परिणाम व्हावा म्हणून उदाहरणादाखल कांहीं सुरस, बोधप्रद व मनोरंजक गोष्टीही दिल्या आहेत. सारांश, परस्परांना परस्परांची खरी योग्यता कळून यावी व तद्वत् त्यांनीं आपलें वर्तन निर्मळ ठेवून, सर्वकाळ आनंदांत घालवावा एवढ्याचसाठीं सदर पुस्तक लिहिण्याचें मी धाडस केलें आहे.

सदर पुस्तक लिहितांना मराठींत प्रसिद्ध झालेल्या **मनुस्मृति, मनोवांछित संतति, ब्रह्मचर्य हेंच जीवन, स्त्रियांची योग्यता, स्त्रियांचा कर्मयोग, सद्वर्तन, सर्वसंग्रह** वगैरे ज्या ज्या **पुस्तकांचा, मासिकांचा व वृत्तपत्रांचा** मला बराचसा उपयोग झाला त्याबद्दल मीं त्या त्या **ग्रंथकारांचा** व **प्रकाशकांचा** अत्यंत ऋणी आहे.

माझ्या अपक्व बुद्धीनें, आकुंचित ग्रंथावलोकनानें व अत्यल्प अनुभवानें या पुस्तकांत पुष्कळशा चुका व दोष असण्याचा बराच संभव आहे. परंतु माझ्या आर्यबंधुभगिनींनीं त्यांचेकडे दुर्लक्ष करून, सदर पुस्तकांतील शक्य तेच गुण ग्रहण करावे, एवढीच त्यांना सविनय विनंति आहे. तसेंच या पुस्तकापासून माझ्या आर्यबंधुभगिनींस कांहीं बोध घेतां येऊन, त्यांस आपलें कर्तव्य बजावण्याच्या कामांत उत्तेजन मिळालें व तदनुसार वर्तन ठेवण्याची सुबुद्धि झाली तर माझ्या या अल्प श्रमाचें थोडेंतरी सार्थक झालेलें पाहून मला अत्यंत समाधान होईल, एवढें कळवून व ही अल्पसेवा वाचकांपुढें ठेवून मी त्यांची रजा घेतों.

पिंपरूड<br>ता. २।११।२९

**पुस्तककर्ता.**

# लेखकाचे आभारयुक्त दोन शब्द.

'**दांपत्यमहिमा**' हें पुस्तक छापून काढण्याचा जो आज सुयोग प्राप्त झाला, तो पाहून मला अत्यंत आनंद वाटत आहे. पुस्तक बाहेर पडलें याबद्दल आनंद वाटणें साहजिक आहे, परंतु त्यापेक्षांहि जास्त आनंद माझा **लेखनकलेंत शिरकाव होण्यास व तिजविषयीं माझ्या अंतःकरणांत अभिरुचि उत्पन्न होण्यास** जें मूळ कारण घडलें त्याबद्दल वाटत आहे. तें कारण कोणतें म्हणाल तर एकदां मी मुंबईस राहात असतांना शेजारीं राहात असलेल्या एका वयस्क मुलास शिकवणीस ठेविलें व त्यास नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या इन्फंट प्रायमरवरून मूळाक्षरें सहज शिकविलीं. परंतु पुढें त्यास जोडाक्षरें शिकविण्यास बरींच अवघड जाऊं लागलीं. तेव्हांपासून मुलांना जोडाक्षरें शिकवितांना त्यांच्या आकुंचित बुद्धीस व ग्रहणशक्तीस अधिक ताण न देतां, मूळाक्षरांप्रमाणें तीं त्यांना अति सुलभ रीतीनें व मौजेनें सहज कशीं शिकवावीं ह्याविषयीं माझ्या मनांत रात्रंदिवस विचार घोळूं लागले. त्या विचारलहरींच्या भरांत मी लगेच या विषयावर इन्फंट प्रायमरच्या धर्तीवर जोडाक्षरांची रचना करून एक पुस्तक लिहिलें आणि त्यास '**सचित्र जोडाक्षरशिक्षक**' हें नांव दिलें.

पुढें कांहीं अपरिहार्य कारणामुळें मला मुंबई सोडणें भाग पडल्यामुळें मी घरीं निघून आलों. नंतर मी प्रस्तुत पुस्तकाची हस्तलिखित प्रत माझे परमप्रियमित्र **रा. रा. मंगू दामा बेंडाळे, काशीराम केशव पाटील व पुना ओंकार बेंडाळे** या तिघां शिक्षकांना दाखविली. ती त्यांना फारच आवडल्यामुळें, मला एकप्रकारचें उत्तेजन येऊन, पुढें मी तिजवर शाळाधिकाऱ्यांचे कांहीं उत्कृष्ट अभिप्रायही मिळविले. परंतु द्रव्याभावामुळें ती प्रत बरेंच दिवस तशीच पडून राहिली. कित्येक दिवस लोटल्यानंतर वरील प्रिय

मित्रांच्या सूचनेवरून मी **श्रीमंत रा. रा. प्रेमचंद इच्छाराम पाटील सावदेकर** यांचेकडे सदर पुस्तकाची हस्तलिखित प्रत घेऊन गेलों व त्यांना ती दाखवून सर्व वर्तमान इत्थंभूत निवेदन केलें. सुदैवेंकरून त्यांच्या अंतःकरणांत मज गरिबाविषयीं प्रेमोद्भव होऊन, त्यांनीं आपले वडील बंधु **वै. तोताराम इच्छाराम पाटील** यांच्या स्मरणार्थ सदय अंतःकरणानें पुस्तकाच्या छपाईकरितां देणगीदाखल मोठी रक्कम देऊन मला जें प्रोत्साहन दिलें, त्या प्रोत्साहनामुळेंच माझी लेखनकलेची अभिरुचि दिवसेंदिवस वृद्धिंगत होत जाऊन, पुढें लवकरच **मुंबईचा मार्गदर्शक अर्थात् मुंबईचा मित्र, बालशुद्धलेखन, कांहीं तालुक्यांचीं भूवर्णनें** व **दांपत्यमहिमा** हीं पुस्तकें क्रमशः लिहून काढण्याची मला जी स्फूर्ति होत गेली, त्या स्फूर्तीचें सर्व श्रेय अर्थात्‌च **श्रीमंत रा. रा. प्रेमचंद इच्छाराम पाटील** यांनाच होय. मजसारख्या गरीब व होतकरू लेखकास उत्तेजनार्थ जो यांनीं प्रथम उदार अंतःकरणानें द्रव्यद्वारा आश्रय देऊन, चरितार्थाचा मार्ग आंखून दिला त्याबद्दल त्यांनीं मला आजन्म उपकारबद्ध करून ठेविल्यामुळें, त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होणार आहेत.

तसेंच '**दांपत्यमहिमा**' हें पुस्तक कल्पनातीत वाढल्यामुळें, अखेर मी तें वर्गणीद्वारा छापाविण्याचें ठरविलें. परंतु कोणतीही वर्गणी गोळा करावयाची असतां, तींत वजनदार गृहस्थ पडल्याखेरीज अगर त्यांच्या सह्यांचें विनंतिपत्र लिहून घेतल्याखेरीज वर्गणी गोळा होऊं शकत नाहीं. सबब मी **श्रीयुत डॉक्टर भीमराव गुरुराव चिकेरूर, एम् बी. बी. एस्. व श्रीयुत लक्ष्मण शिवराम चौधरी वकील, बी. ए. एल् एल्. बी. जळगांव** यांचेकडे जाऊन त्यांची भेट घेतली व त्यांना सर्व हकीकत विदित केली. सुदैवेंकरून त्यांनीं माझ्या विनंतीस मान देऊन, स्वदस्तूरनिशीं एक विनंतिपत्र लिहून दिलें. एवढेंच नव्हे तर स्वखुषीनें आश्रयदाते या सदराखालीं आंकडे टाकून व रक्कमही लागलींच देऊन, त्यांनीं मला अत्यंत ऋणी करून ठेविलें, याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें.

**'दांपत्यमहिमा'** या पुस्तकाची हस्तलिखित प्रत अवलोकनार्थ मी ज्या विद्वज्जन गृहस्थांकडे व सुशिक्षित भगिनींकडे पाठविली, त्या सर्वांनीं ती काळजीपूर्वक अवलोकन करण्यांत जो आपला अमोलिक वेळ खर्ची घातला याबद्दल व प्रेमपूर्वक सूचना करून आपापले अभिप्राय पाठविले याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

वरील **विनंतिपत्र** व **अभिप्राय** घेऊन वर्गणी गोळा करण्यासाठीं मी ज्यांचे ज्यांचेकडे गेलों त्यांनीं त्यांनीं तें मनःपूर्वक वाचून, मला विन्मुख न पाठवितां, उल्हास वृत्तीनें व निरपेक्ष बुद्धीनें मला जी यथाशक्ति अल्पस्वल्प मदत केली त्याबद्दल मी त्या सर्वांचा फार आभारी आहें.

**आनंद** छापखान्याचे मालक **श्रीयुत रा. रा. गोपाळ बळवंत जोशी** यांनीं प्रस्तुत पुस्तक छापीत असतांना त्याचीं प्रुफें काळजीपूर्वक तपासण्याची काळजी घेऊन व प्रेमपूर्वक कांहीं सूचना करून, प्रस्तुत पुस्तक अगदीं नियमितकाळांत, अत्यंत कळकळीनें सर्वांगसुंदर छापून दिलें याबद्दल त्यांचे आभार मानण्यास मी कसा बरें विसरेन?

तसेंच प्रस्तुत पुस्तकाचे मुखपृष्ठावर जो ब्लॉक दिला आहे त्याची डिझाईन **रा. रा. रघुनाथ बाळकृष्ण केळकर, अमळनेरकर आठवले स्टुडिओ नागपूर** यांनीं अल्प मोबदला घेऊन बनवून दिली व तिजवरून प्रस्तुत ब्लॉक **श्रीयुत किर्लोस्करबंधु, किर्लोस्कर वाडी** यांनीं काळजीपूर्वक मोहक बनवून दिला याबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें.

शेवटीं ज्या जगचालक प्रभूच्या कृपाप्रसादानें सदर पुस्तक लिहिण्याची मला प्रेरणा होऊन, तें माझ्या हातून निर्विघ्नपणें पार पडलें, त्या दीन-दयाघन प्रभूस सहस्रशः प्रणाम करून मी हा लेख संपवितों.

पिंपरूड.
ता. १-१२-२९

**पुस्तककर्ता.**

# अभिप्राय १ ला.

**रा. जयराम रामचंद्र चौधरी** यांनीं लिहिलेलें '**दांपत्यमहिमा**' या नांवाचें हस्तलिखित पुस्तक मी समग्र वाचून पाहिलें. हें पुस्तक म्हणजे आमच्या सनातन धर्मरूपी सूर्याच्या आड आलेलें अभ्र नाहींसें करणारा '**प्रभंजन**,' त्रिविध तापानें तापलेल्या जीवात्म्यास शांतविणारा '**पूर्णचंद्र**,' हतदैवी बनलेल्या बुभुक्षूचें दारिद्र्य घालविणारी '**कामधेनु**,' इच्छिलेले मनोरथ पुरविणारा '**चिंतामणि** अगर **कल्पवृक्ष**,' परतंत्रता व शारीरबलसंहारक असें विषयसेवनानें दृष्टीवर वाढलेलें पटल नाहींसें करणारें '**दिव्यांजन**,' कामक्रोधादि विकारांनीं वाढलेला अज्ञानरूपी अंधःकार घालवून ज्ञानाचा उद्बोध करणारा सहस्ररश्मि '**प्रभाकर**च,' होय. फार काय सांगावें? नानातऱ्हेचे दृष्टांत देऊन इहपरलोकींचा मार्ग खुला करून दाखविणारा 'गुरुच,' होय. ह्या पुस्तकाच्या अध्ययनानें बहकत सुटलेल्या वधूवरांस संसारशकट चांगल्या रीतीनें चालविण्याचें सामर्थ्य येईल. म्हणून प्रत्येक कुटुंबांत या पुस्तकाची निदान एक तरी प्रत संग्रहीं असणें अत्यावश्यक आहे. तरी संसारयात्रा सुखकर व्हावी अशी इच्छा करणाऱ्या स्त्रीपुरुषांनीं हें पुस्तक अवश्य वाचावेंच.

| | |
|---|---|
| **भालोद.** | **तातोराम गणू झोपे, पेन्शनर हेडमास्तर,** गर्लस्कूल, भालोद. |
| ता. १२।१०।२७ | **धर्मभास्कर, आरोग्यशास्त्राचा ओ ना मा, संत मुक्ताबाई चरित्र** इ० पुस्तकांचे कर्ते. |

# अभिप्राय २ रा.

'**दांपत्यमहिमा**' या नांवाचें हस्तलिखित पुस्तक मी वाचून पाहिलें. **पुस्तकांतील विषयांची निवड व मांडणी फारच उत्तम आहे.** पुस्तक विवाहित वधुवरांसाठीं लिहिलेलें असून, त्यांतील उपदेश उभयतांना अत्यंत बोधप्रद आहे पुस्तक वाचतांना रुक्ष वाटूं नये, म्हणून ग्रंथकर्त्यानें सुरस व बोधप्रद गोष्टी देऊन मनोरंजकतेचाही स्वाद दिला आहे. **एकंदरांत पुस्तक-वाचकांस विशेषत: स्त्रीवाचकांस अत्यंत उपयुक्त असून आंतील उपदेश बहुमोल आहे यांत संशय नाहीं.**

| | |
|---|---|
| **जळगांव.** | **डॉ० भिमराव गुरुराव चिकेरूर, एम् बी. बी एस्—जळगांव. पू० खा०** |
| ता. २।११।२७ | |

पा. क्र. ...........

## अभिप्राय ३ रा.

'**दांपत्यमहिमा**' या नांवाचें हस्तलिखित पुस्तक मी पूर्णपणें वाचून पाहिलें. ग्रंथकर्त्यानें पुस्तकांतील विषय खरोखरच सरस निवडले असून, ते अत्यंत बोधप्रद आहेत, यांत शंका नाहीं. **प्रत्येक प्रकरणापासून विवाहित वधूवरांस विषयानुसार बराचसा बोध घेतां येईल, एवढेंच नव्हे, तर या पुस्तकाच्या सतत वाचनानें या अफाट दुःखमय संसारसागरांत गटांगळ्या खात असलेली आपली संसाररूपी नौका, त्यांतून सुरक्षितपणें वल्हवून नेण्याचें कामीं खात्रीनें चांगलेंच सहाय्य होईल,** असें मला वाटतें. तरी ज्या दांपत्यांस आपली संसाररूपीं नौका गुण्यागोविंदानें सुरक्षितपणें पार पाडण्याची व उभयतांचे अंतःकरणांत परस्परांविषयीं प्रेमैक्य उत्पन्न करण्याची उत्कट मनीषा असेल त्यांनीं हें पुस्तक अवश्य संग्रहीं ठेवावें.

**जळगांव** ता. २०।१२।२७ | **लक्ष्मण शिवराम चौधरी, वकील बी. ए. एल् एल्. बी. जळगांव.**

## अभिप्राय ४ था.

'**दांपत्यमहिमा**' या नांवाचें हस्तलिखित पुस्तक मी वाचून पाहिलें. **संसारसुखाचा खरा लाभ मिळावा अशी प्रत्येक वधूवरास इच्छा असते, परंतु तो पुष्कळ जोडप्यांस मिळत नसतो. त्यांत केव्हां केव्हां वधूचें, तर केव्हां केव्हां वराचें बरेंच चुकतें. या चुकण्याच्या जागा ग्रंथकर्त्यानें अचूक दाखविल्या आहेत. पौरा**णिक व ऐतिहासिक उदाहरणांशिवाय इतर उदाहरणांनीं स्त्रीपुरुषांच्या मनावर चिरस्थायी परिणाम होत नाहींत; म्हणून खात्रीखातर पौराणिक व ऐतिहासिक गोष्टी दिल्या आहेत. त्यामुळें करमणूकही चांगलीच होते. एकंदरींत विवाहित वधूवरांना वाचण्यासारखें हें पुस्तक असल्यामुळें, त्यांनीं हें पुस्तक संग्रहीं ठेवण्यास चकूं नये.

**सोलापूर** ता. १२।९।२८ | **दामोदर विनायक भोंडे, बी. ए. डेप्युटिइन्स्पेक्टर, सोलापूर.**

## अभिप्राय ५ वा.

**'पति आणि पत्नी' हे दोनच शब्द उच्चारल्याबरोबर किती तरी उच्चतर आणि पवित्र भावना अंत:करणांत उत्पन्न होतात.** यावरून संसाराच्या आनंदाचें सारसर्वस्व या दोन शब्दांत सांठविलें आहे असें वाटतें. तसेंच मानवी जीवितांतील खरा आनंद पति आणि पत्नी यांच्या शुद्ध प्रेमांत आणि पावित्र्यांतच सांठविला आहे. **एकाद्या राजघराण्यांत जन्म पावलेल्या दांपत्यांचें जीवनसुद्धां परस्परांतील शुद्ध प्रेमाच्या अभावीं स्मशानवत् बनून जातें. उलटपक्षीं अर्धपोटीं राहणारें दरिद्री जोडपें आपल्या भिकार झोपडीला देखील परस्परांतील शुद्ध प्रेमानें आनंदभुवन बनवून सोडतें!** या दरिद्री व प्रेमी जोडप्याच्या दांपत्यसुखाचें वर्णन करावें तेवढें थोडेंच होईल. हें दांपत्यसुख, हा स्वर्गीय आनंद कसा मिळवितां येईल? त्यासाठीं उभयतां पतिपत्नींनीं परस्परांशीं कसें वागायचें? याची चर्चा सदर पुस्तकांत मि. चौधरी यांनीं ठिकठिकाणीं आर्यपतिव्रता स्त्रियांचीं उदाहरणें व धार्मिक ग्रंथांतील आधार देऊन फारच चांगली केली आहे. त्यामुळें सदर पुस्तक उभयतांनाहि फारच उद्बोधक झालें आहे. **भावानें बहिणीस भाऊबिजेची ओवाळणी म्हणून व बापानें मुलीस लग्नप्रसंगीं प्रेमाची देणगी म्हणून, जर हें पुस्तक दिलें, तर ती ओवाळणी अगर देणगी, इतर मौल्यवान् ओवाळणी अगर देणगीपेक्षांही जास्त किंमतीची ठरेल असें मला वाटतें.** सारांश, हें पुस्तक प्रत्येक वधूवरांना सारखेंच संग्रहणीय व वाचनीय बनलें आहे.

जळगांव
ता. ३।१२।२८

सौ० पद्माबाई पाटील,
हेडमिस्ट्रेस गर्लस्कूल, जळगांव.

# अभिप्राय ६ वा.

'**दांपत्यमहिमा**' या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मी सबंध वाचून पाहिली. तरुण पिढीला तरी या विषयाचें महत्व खरोखरच फार आहे. पुस्तकांतील विचारपद्धति, बाळबोध व पुष्कळअंशीं पायाशुद्ध आहे. ठिकठिकाणीं पौराणिक व ऐतिहासिक उदाहरणें दिल्यानें विषयांची मांडणी सुलभ व सुबोध झाली आहे.

घराचा चिमुकला संसार समर्थ श्रीरामदासांच्या म्हणण्याप्रमाणें '**नेटका**' केल्याखेरिज '**राष्ट्रलक्ष्मी**' या नात्यानें पार पाडतां येणें कठिण आहे; व आज तर अशा राष्ट्रलक्ष्मीची आपल्या देशाला अत्यंत जरुरी आहे. अशावेळीं **प्रस्तुत पुस्तकासारख्या अनेक ग्रंथांची महाराष्ट्र वाङ्मयांत जितकी अधिक भर पडेल तितकी थोडीच आहे.**

दुसरें असें कीं, सदर पुस्तकाचें नांव '**दांपत्यमहिमा**' असें असूनही जवळ जवळ तीन चतुर्थांश भाग स्त्रीवाचकांसाठीं लिहिलेला दिसतो. गृहराज्याची स्वामिनी स्त्रीच असल्याकारणानें, तिची जबाबदारी मोठी असल्यामुळें, तिच्या कर्तव्यासंबंधींच जास्त लिहावें लागलें असेल. अथवा स्त्रीजातीच्या कल्याणाची उत्कट कळकळ लेखकाच्या मनांत वसत असल्या कारणानें असें घडलें असेल. असो. **सदुपदेश कोणत्याही कारणानें कां होईना तो जितका जास्त कानीं येईल तितका चांगलाच; या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथलेखनानें रा. चौधरी यांचा, स्त्रीवर्ग खरोखर उपकृत राहील.**

जातां जातां एक गोष्ट मात्र सांगावीशी वाटते. ती अशी–प्रस्तुत पुस्तकांत स्त्रियांच्या प्राथमिक शिक्षणाचीच विशेष तरफदारी केली आहे. प्राचीनकाळीं कदाचित् बहुश्रुतपणा आणि प्रत्यक्ष अनुभव यांच्या जोडीला स्त्रियांना प्राथमिक शिक्षण पुरें होत असेल; परंतु काळाच्या अखंड प्रवाहांत हिंदुस्थान हळु हळू जगाचा एक घटक म्हणून गणला जाणार. हिंदुस्थानाला हवें असो वा नसो, त्याचा जगांत असलेल्या सर्व खंडांतील देशांशीं जास्त जास्त संबंध येणार; राष्ट्रलक्ष्मीची जबाबदारी आजहि पौराणिक काळापेक्षां फार भिन्न आहे. ह्यावेळीं फक्त प्राथमिक शिक्षणाची महती गाणें निव्वळ अन्याय आहे. ज्ञानाचें

अखंड सेवन दुष्परिणामी होईल ही विचारसरणीच चुकीची होय. शिक्षित स्त्रियांचें गैरवर्तन कदाचित् कोठें दिसत असेल पण त्याचीं कारणें अनेक आहेत. गैरवर्तणुकीला शिक्षण जबाबदार धरणें हा परिस्थितीचा विपर्यास आहे.

जठार पेठ, अकोला. ता. १७।१।२९ } सौ० कमलाबाई सोहोनी ( 'कुठें' या सुप्रसिद्ध कादंबरीची लेखिका.) अकोला.

---

## अभिप्राय ७ वा.

मि० चौधरीकृत **'दांपत्यमहिमा'** या पुस्तकाची हस्तलिखित प्रत अवलोकनार्थ मजकडे आली, ती मी पूर्ण वाचून पाहिली. **खरोखरच या जगांत संसारसुखासारखें अनुपमेय सुख कोणतेंच नाहीं असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. हें संसारसुख प्रत्येक दांपत्यास सारखेंच मिळावें अशी लेखकाची सदिच्छा दिसते.** व तत्प्रीत्यर्थ लेखकानें प्रस्तुत पुस्तकांत उभयतांना यथायोग्य बोधामृत पाजण्याचा कसून प्रयत्न केला असून, त्यांत त्यांना बरेंच यश आलें आहे असें मला वाटतें. प्रत्येक प्रकरणापासून उभयतांस बराच बोध घेतां येईल; एवढेंच नव्हे तर त्यापासून त्यांच्या जीवनक्रमांत बराचसा फरक पडून, त्यांना योग्य वळण लागेल व तेणेंकरून त्यांची संसाररूपी नौका सुरक्षितपणें पार पडेल यांत शंका नाहीं. एकंदरींत प्रस्तुत पुस्तक स्त्रीपुरुषांना सारखेंच बोधप्रद असल्यामुळें, जिज्ञासु पतिपत्नींनीं तें अवश्य संग्रहीं ठेवावें, कळावें.

अकोला. ता. १५।२।२९ } सौ० इंदिराबाई कट्टी, मुख्य अध्यापिका लो० टिळक राष्ट्रीय कन्याशाळा, अकोला.

२९३



## अभिप्राय ८ वा.

श्रीयुत जयराम रामचंद्र चौधरी यांनीं ' दांपत्यमहिमा ' नांवाचें हस्तालिखित पुस्तक अभिप्रायार्थ मजकडे पाठविलें, तें मी समग्र वाचून पाहिलें. लेखकानें प्रस्तुत पुस्तकांत संसारांत खरें दांपत्यसुख कसें मिळावें या गोष्टींची उत्तम चर्चा केली आहे. आजकालच्या बिकट परिस्थितींत आधींच संसार कष्टमय झालेला आहे. त्यांत कौटुंबिक सुख जर नसलें तर त्या संसाराची राखरांगोळी झाल्यासारखीच राहते. अशा स्थितींत या पुस्तकांत स्त्रीपुरुषांना केलेला उपदेश अत्यंत बहुमोल आहे. पतीची अति गरिबी असतांना स्त्रीनें संसार आनंदानें कसा करावा? तसेंच पत्नी मग ती कुरूप कां असेना? पतीनें तिजवर उत्कट प्रेम कसें ठेवावें? स्त्रीवर एकादें भयंकर संकट अचानक कोसळल्यास, तिनें धैर्यानें त्यास कसें तोंड द्यावें? वगैरे मुद्दे ऐतिहासिक व पौराणिक उदाहरण देऊन समजावून दिले आहेत.

लेखकाच्या मनांत स्त्रियांविषयीं बरीच अंतःकरणपूर्वक कळकळ दिसते. पुस्तकाचा निम्मा अधिक भाग स्त्रियांनाच उद्देशून लिहिलेला आहे. स्त्रिया सुधारल्यावरच समाजाची खरी उन्नति होणार हाच लेखकाचा स्तुत्य उद्देश दिसतो व तो बरोबर आहे. एकंदरींत पुस्तक उत्तम साधलें असून, तें स्त्रीपुरुष या दोघांनींही वाचून संग्रहीं ठेवावें, इतकें तें उपयुक्त बनलें आहे. मुलांमुलींच्या शाळेंतील अभ्यासक्रमामध्यें सुरू करण्यासारखें हें पुस्तक आहे. तरी श्रीयुत चौधरी यांनीं त्या दिशेनें प्रयत्न करावा.

ताजना पेठ, अकोला. ता. २८।३।२९ } डॉक्टर गो० ह० चव्हाण. एच्. एम्. बी. एम्., आय. एच्. ए.

# विषयानुक्रमणिका.


| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| १ नरदेहांत आल्याचें सार्थक करा. ... ... ... | १ |
| २ पाणिग्रहणाचें मुख्य रहस्य. ... ... ... | १० |
| ३ स्त्रिया कशानें अधिक शोभतात ? ... ... ... | २१ |
| ४ मनुष्यास विद्येसारखें अन्य भूषण नाहीं. ... ... | २७ |
| ५ स्त्रियांचें आराध्यदैवत. ... ... ... ... | ३२ |
| ६ गृहदेवता. ... ... ... ... ... | ३७ |
| ७ पातिव्रत्यप्रभाव. ... ... ... ... | ४१ |
| ८ एकपत्नीव्रत. ... ... ... ... | ४७ |
| ९ पतिश्रद्धा. ... ... ... ... ... | ५८ |
| १० स्त्रियांची योग्यता. ... ... ... ... | ६२ |
| ११ स्त्रीधर्म. ... ... ... ... ... | ७१ |
| १२ पतिधर्म. ... ... ... ... ... | ७५ |
| १३ स्त्रीनें पतीशीं कसें वर्तन ठेवावें ? ... ... ... | ७९ |
| १४ पतीनें स्त्रीस कसें वागवावें ? ... ... ... | ८२ |
| १५ पतिपत्नीपूज्यभावना. ... ... ... ... | ८५ |
| १६ पतीस वश करण्याची गुरुकिल्ली ... ... ... | ९१ |
| १७ गृहराज्याची पट्टराणी. ... ... ... ... | ९६ |
| १८ संसाररूपी रथ. ... ... ... ... | १०३ |
| १९ स्त्रीशिक्षणाची आवश्यकता. ... ... ... | १०९ |
| २० स्त्रीशिक्षण कसें असावें व त्यापासून होणारे फायदे. ... | ११९ |
| २१ उच्च स्त्रीशिक्षणानें स्त्रियांवर होणारे दुष्परिणाम. ... | १२५ |
| २२ स्त्रीपुरुषांच्या घातक संवयी. ... ... ... | १२९ |
| २३ आईबापांची मुलांविषयीं कर्तव्यें. ... ... ... | १४६ |
| २४ स्त्रियांनीं बलात्कारप्रसंगीं आपलें शील कसें रक्षावें ? ... | १६० |
| २५ स्त्रीधर्मास उपयुक्त नियम. ... ... ... | १६८ |

सं.नि. ७४५

॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥

# दांपत्यमहिमा.

## प्रकरण १ लें.

### नरदेहांत आल्याचें सार्थक करा.

ईश्वरानें सृष्टि निर्माण करून तींत चार प्रकारचे जीव उत्पन्न केले व त्यांना '**जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज**' अशीं नांवें दिलीं. गाय, म्हैस, बैल इ० चतुष्पाद पशु व ज्यांना दोंहोंकडे दंतपंक्ति आहेत असे राक्षस, पिशाच्चें व मनुष्यें हे जरायुज प्राणी होत. जरायु म्हणजे जार, त्यांतून हे प्राणी बाहेर पडतात, म्हणून त्यांना '**जरायुज**' म्हणतात. पक्षी, सर्प, नक्र, मत्स्य, कांसवें व अशाच प्रकारचे सरडे इ० स्थलचर व शंखादि जलचर प्राणी ते '**अंडज**' होत. हे प्रथम अंड्यांत होतात व नंतर त्यांतून बाहेर निघतात, म्हणून त्यांना अंडज म्हणतात. चिलटें, उवा, माशा, ढेंकूण इ० प्राणी व तसेंच प्रत्यक्ष उष्णतेपासून होणारे मुंग्यांसारखे वगैरे प्राणी स्वेदज होत. स्वेद म्हणजे पार्थिव पदार्थास उष्णतेमुळें प्राप्त होणारा ओलसरपणा, त्याच्यापासून वरील प्राण्यांची उत्पत्ति होते, म्हणून त्यांस '**स्वेदज**' म्हणतात. वृक्षादि स्थावर पदार्थ '**उद्भिज्ज**' होत.

कारण ते बीज व भूमि ह्यांस फोडून वर येत असतात. पण ह्यांच्यांत दोन प्रकार आहेत. कांहीं बीजापासून उत्पन्न होतात व कांहीं भूमींत शाखा लावून त्यांच्यापासून होतात.

वरील चार कोटींत ईश्वरानें एकंदर चौऱ्यायशीं लक्ष योनि निर्माण केल्या आहेत. पैकीं जरायुज कोटींत नरदेह ही योनि निर्माण केली आहे. ही योनि इतर सर्व योनींपेक्षां श्रेष्ठ मानिली आहे. कारण ह्या योनींतील प्राण्यांस इतर योनींतील प्राण्यांपेक्षां ईश्वरानें ' ज्ञान ' हा गुण विशेष दिला आहे. त्यामुळें मनुष्यास धर्म म्हणजे काय व अधर्म म्हणजे काय हें उत्तम प्रकारें जाणतां येतें; तरी देखील मनुष्याच्या हातून या जन्मांत एक मोठी ' घोडचूक ' होत असते. ती कोणती म्हणाल तर ईश्वरानें दिलेल्या ज्ञानाचा सदुपयोग न करतां अधर्मरत होऊन जन्ममृत्युच्या फेऱ्यांत सांपडणें ही होय. सारासारविचार करण्याची बुद्धि ईश्वरानें फक्त मनुष्यासच दिली असल्यामुळें, त्यानें परस्परांत आईबाप, बहीणभाऊ, कन्यापुत्र, सासुसासरा वगैरे नातीं लावून घेतलीं आहेत. हीं कशामुळें ? तर धर्मामुळें. आतां ज्यांच्याशीं आपला नात्याचा जसजसा संबंध येतो; तसतसें आपण त्यांच्याशीं धर्मबंधनामुळें आपलें वर्तन ठेवितों. हीं धर्मबंधनें व नातीं यांची योग्य योजना जर आमच्या धर्मबांधवांनीं केलेली नसती, तर सर्वत्र ब्रह्मघोंटाळा होऊन, मनुष्यांत व पशुपक्ष्यांदिकांत कांहींच फरक राहिला नसता. परंतु हा फरक मनुष्यानें अद्यापपावेतों धर्मबंधनामुळें सतत चालू ठेविला आहे, म्हणूनच त्याला मनुष्य म्हणावयाचें; नाहींतर दोन पायांचा पशुच म्हटलें असतें.

परमेश्वरी लीलेचा अमृतासिंधु आजपर्यंत कोणत्याही व्यक्तीकडून शोषण करवला गेला नाहीं किंवा करवला जाणार नाहीं, इतका तो अपरंपार आहे. ईश्वरी सूत्र मोठें अगम्य आहे. तें मानवी दृष्टीला अगोचर आहे. पहा !

मुलगा एकाचा, तर मुलगी दुसऱ्याची. दोघांचाही जन्म दोन वेगवेगळ्या कुटुंबांत झालेला. परंतु परमेश्वरी लीलेमुळें हा आप्तसंबंध सहज जुळून येतो. पुढें कांहीं दिवसांनीं हें लक्ष्मीनारायणाचें जोडपें विवाहरज्जूनें बद्ध होतांच, त्यांना पतिपत्नी ही संज्ञा मिळून, तीं अगदीं जवळचीं नातलग बनतात व तेव्हांपासून तीं परस्परांवर अकृत्रिम प्रेम करूं लागतात. ह्या दोहोंच्या प्रेमांत एक प्रकारचें माधुर्य असतें. प्रेमाचे दोन प्रकार आहेत. एक शुद्धप्रेम व दुसरें स्वार्थी प्रेम. शुद्धप्रेमांत स्वार्थ मुळींच नसतो व स्वार्थी प्रेमांत तो ओतप्रोत भरलेला असतो. निःस्वार्थी प्रेम चिरकाल टिकतें. व स्वार्थप्रेरित प्रेम फक्त स्वार्थ सिद्धीस जाईपावेतों टिकतें. शुद्धप्रेमाची फेड शुद्ध प्रेमाशिवाय इतर कशानेंही होत नसते. असें अजब शुद्ध प्रेम या विवाहापासून मनुष्यास प्राप्त होतें. विवाहित स्थितीनें मनुष्य एका नवीन तेजोमय प्रदेशांत प्रवेश करितो. त्याबरोबर त्यास एक मोठी जबाबदारी अंगीकारावी लागते. विवाह म्हणजे पाशवी वृत्तिनाशाची एक भयंकर प्रतिज्ञाच होय. मनुष्याच्या स्वैरवर्तनास आळा घालण्याकरितांच कीं काय ईश्वरानें ही विवाहपद्धति लावून दिली असावी असें वाटतें.

या विवाहित स्त्रीपुरुषांपासून पुढें जी संतति होते, तिजविषयीं तें उभयतां सर्वतोपरी काळजी वाहतात. परंतु अशीच संतति शेजाऱ्याची किंवा परक्या इसमाची असली तर तिजविषयीं ते मुळींच काळजी वहात नाहींत. ह्याचें कारण हेंच कीं, त्यांचा व आपला तितका जवळचा आप्तसंबंध नसतो व ह्यामुळेंच ‘ हें माझें व तें तुझें ’ असा मतभेद साहजिकच प्रत्येक मानवव्यक्तीचे मनांत उत्पन्न होतो. ही ओळख पशुपक्ष्यादिकांत नाहीं; कारण त्यांच्यांत ज्ञानाचा अभाव आहे. परंतु मनुष्य ज्ञानी असूनही, तो स्वतःचा यत्किंचित् फायदा होण्याचा संभव दिसतांच खोटें बोलण्याचें धाडस करितो,

तसें पशुपक्ष्यांदिकांत नाहीं. मनुष्य स्वार्थापायीं अंध बनतो. स्वार्थापुढें तो सत्यासत्य कांहींएक जाणत नाहीं. मग त्याच्यापेक्षां पशु शतपट बरें ! कारण, **मनुष्यप्राणी जरा का पेंचांत सांपडला म्हणजे तो लागलींच अनीतीचा मार्ग स्वीकारतो व पदोपदीं असत्य बोलूं लागतो. असें दुतोंडीपणाचें वर्तन गरीब बिचाऱ्या अज्ञानी अशा पशूंत देखील दिसून येत नाहीं. ते बिचारे आनंदांत असले म्हणजे उड्या मारून आपलें समाधान व्यक्त करितात. त्यांचा एकाद्या-वर क्रोध झाल्यास, ते उघडपणें गुरगुरण्यासही कमी करीत नाहींत. असा त्यांचा परमेश्वराचे घरचा अगदीं साधाभोळा कारभार आहे.** ह्यास्तव स्वर्गाचे दरवाजे जर कोणाकरितां कधीं काळीं मोकळे असणें शक्य असेल तर ते अशा मुक्या व प्रामाणिक प्राणिवर्गा-करितांच होय. असत्यमय व अनीतिमय आयुष्यांत अष्टौप्रहर लोळणाऱ्या, मनोवृत्ति आणि मुखव्यक्ति ह्यांत हटकून तफावत ठेवणाऱ्या मनुष्यांसाठीं स्वर्गाचे दरवाजे मोकळे असणें केव्हांही शक्य नाहीं. ह्यासाठीं मनुष्यानें फायदा असो अगर तोटा असो, केव्हांही असत्य भाषण करूं नये. त्यानें संसारांत सर्व प्राणिमात्रांवर समभाव ठेवून, आपल्या पवित्रधर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें वागणें केव्हांही योग्य व न्याय्य आहे. मनुष्यप्राण्यानें स्वार्थांध बनून यत्किंचित् फायद्यासाठीं किंवा सुखासाठींच नव्हे, तर प्राणान्तसमयीं देखील अनीतीचा मार्ग स्वीकारूं नये. **कारण असत्य भाषण करणें व अनीतीनें वागणें म्हणजेच अधोगतीची प्राप्ति करून घेणें होय. तसेंच सत्य भाषण करणें, नीतीनें वागणें व धर्माला भिऊन चालणें म्हणजेच सद्गतीची प्राप्ति करून घेणें होय**

ईश्वरानें मनुष्यास नरयोनींत घालून त्यास ‘ ज्ञान ’ ही अजब देणगी दिली आहे. परंतु मनुष्यानें जर या ज्ञानाचा सदुपयोग न केला तर त्या-

पासून होणाऱ्या सर्व तोट्यांत मोठा व जबरदस्त तोटा म्हटला म्हणजे मनुष्यत्वाची हानि हा होय. मनुष्यत्व ज्ञानानें रक्षिलें जातें, हें कोणीही कबूल करील. आपणांस मनुष्य ही संज्ञा केवळ ज्ञानाच्या संग्रहानें प्राप्त झाली आहे. कारण

**आहारनिद्राभयमैथुनानि।**
**सामान्यमेतत्पशुभिर्नराणाम्।**
**ज्ञानं हि तेषामधिको विशेषो।**
**ज्ञानेन हीनाः पशुभिः समानाः॥ १॥**

मनुष्य ज्याप्रमाणें आहार करितो, निद्रा घेतो, भय बाळगतो व मैथुनादि विलास करितो; तद्वत् पशु देखील करितात, मग मनुष्यांत व पशूंत फरक तो कोणता ? तर मनुष्याच्या ठायीं ज्ञानसंपादन करावयाची जशी शक्ति आहे तशी पशूंत नाहीं. म्हणून मनुष्यास पशूपेक्षां श्रेष्ठत्व प्राप्त झालें आहे. नाहींतर ज्ञानविरहित प्राण्यांस पशूंतच गणिलें पाहिजे. ह्यास्तव मनुष्यप्राण्यानें मरेपावेतों ज्ञानसंपादन करीत सुटावें व आपल्या सदसद्विवेक बुद्धीस सतत जागृत ठेवून, तिजकडून अशीं कांहीं सत्कृत्यें करवून घ्यावींत कीं, त्यांचे योगानें आपण मृत्यु पावल्यावर देखील आपला कीर्तिध्वज या अवनितलावर साधुवर्य तुकाराम महाराजांप्रमाणें व देवी अहल्याबाईप्रमाणें सतत फडकत राहील, तरच या नरदेहांत आल्याचें सार्थक. कारण

**महता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया।**
**पारं दुःखोदधेर्गंतुं तर यावन्न भिद्यते॥ १॥**

ही शरीररूपीं नौका मनुष्यप्राण्यानें पुष्कळसें पुण्यरूपीं धन देऊन खरेदी केली आहे, तरी ती फुटून जात नाहीं तोंच त्यानें या दुःखरूपीं भवसागरांतून तरून जाण्याची त्वरा करावी. नाहींतर त्यास पुनः चौऱ्यायशीं लक्ष

योनींच्या फेऱ्यांत पडावें लागून, नाहक गटंगळ्या खाण्याची पाळी येईल. सबब मनुष्यप्राण्यानें अशीं कांहीं परोपकाराचीं कृत्यें करावीं कीं, त्यायोगें पुष्कळांस पोटाचे किंवा ज्ञानप्राप्तीचे मार्गास लावून स्वतःची उन्नति करून घेतां येईल. एकाद्याचा विश्वासघात करून आपल्याच पोळीवर तूप ओढण्यांत कांहीं हंशील नाहीं. कारण कावळे देखील आपापल्या चोंचीनें आपापलीं पोटें भरीत असतात. मग त्या क्षुद्र पक्ष्यांत व सृष्टिललामभूत अशा मनुष्यांत भेद तो काय ? आपल्या कुटुंबाचा चरितार्थ योग्य रीतीनें चालवून, जो दुसऱ्याचे हितार्थ आपला देह चंदनाप्रमाणें झिजवितो, तो मृत्यु पावला तरी त्याचे पश्चात् त्याच्या उपकार-ऋणांत बद्ध झालेले लोक त्याची आठवण करीत असतात; एवढेंच नव्हे तर त्यास ते आपला देव करून हृदयमंदिरांत त्याची स्थापना करून ठेवीत असतात. त्याचें स्मारक उभारतात. त्याच्या पुण्यतिथीचा महोत्सव करितात. **वित्त खर्चून जाण्यासारखें असतें; वित्त चल-चल होण्यासारखें असतें; तसेंच आयुष्य देखील घडीघडी कमी होत जातें; पण जगांत एकच वस्तु अक्षयीं टिकण्यासारखी आहे. ती वस्तु म्हटली म्हणजे 'कीर्ति' हीच होय.** एवढ्याचसाठीं सत्पुरुषांनीं म्हटलें आहे कीं, **'मरावें परी कीर्तिरूपें उरावें'** म्हणून प्रत्येक स्त्रीपुरुषानें नरदेहांत आल्याचें सार्थक करून घेण्यासाठीं, कोणतेंही कृत्य करतांना त्यांत कीर्ति संपादन करण्याचें उच्च ध्येय, सतत डोळ्यांपुढें ठेवून, तदनुरूप आपलें आचरण ठेविल्यास, ते जरी मृत्यु पावले तरी आपल्या उज्ज्वल कीर्तिरूपानें जिवंत राहतील यांत तिळमात्र शंका नाहीं.

समर्थांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, **प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ ज्यानें केला। तो नर भला भलारे भला भला ॥**

जो मनुष्य जन्मास आला त्याचे पाठीमागें प्रपंच हा लावून दिलेलाच आहे; परंतु त्यांतल्या त्यांत प्रपंचाचा गाडा सुरळीत चालवून परमार्थाचा लाभ मिळविणें हें प्रत्येक मनुष्याचें आद्य कर्तव्य होय. आपल्या भरतभूमींत प्रपंच साधून बऱ्याच विभूतींनीं परमार्थाचा लाभ मिळविला. त्यांपैकीं एकनाथ महाराजांचें चरित्र एक उत्तम आदर्श होऊन बसलें आहे. त्यांचा दिनक्रम अगदीं आंखलेला असे. ते सकाळीं उठून प्रातःस्मरण आटोपल्यावर प्रातःस्नानास गंगेवर जात असत, व सूर्योदयापूर्वीं संध्यावंदनादि विधि करीत असत. नंतर घरीं येऊन देवपूजा करून गीताभागवतादि ग्रंथांचें पारायण करीत असत. मध्याह्नसमयीं पुनरपि गंगास्नान करून, नैवेद्य, वैश्वदेव आटोपून अतीत अभ्यागतांसह भोजन करीत असत. तिसरे प्रहरीं देवळांत जाऊन गीताभागवतादि ग्रंथांवर पुराण सांगत असत. संध्याकाळीं पुनः गंगेवर संध्याविधि उरकून, घरीं आल्यावर आरती वगैरे करून भोजन करीत असत. नंतर मध्यरात्रीपर्यंत कीर्तन करण्यांत वेळ घालवून झोंपीं जात असत. ह्याप्रमाणें त्यांचा नित्यक्रम चालत असे. त्यांच्या अंतःकरणांत दया, क्षमा व शांति ह्या अद्वितीय गुणांचें पूर्ण वास्तव्य होतें. ह्याविषयीं त्यांच्या २।३ मौजेच्या आख्यायिका खालीं दिल्या आहेत, त्यावरून वाचकांस कळून येईलच.

एके दिवशीं एकनाथमहाराज मध्याह्नसमयीं गंगेवर स्नानास जात होते तेव्हां वाटेनें एक महाराचें पोर आपल्या आईमागून धांवत चाललें होतें. त्या मुलाची आई बरीच पुढें निघून गेली होती. प्रखर उन्हानें तापलेल्या वाळवंटांतून धांवतांना त्या मुलाचे पाय पोळून त्याचा प्राण कासावीस होऊं लागला. अशा स्थितींत तें मूल महाराजांच्या दृष्टीस पडतांच, त्यांच्या अंतःकरणांत दया निपजली, व तें मूल महाराचें आहे हा विचार मनांत न

आणतां त्यांनीं त्याला तत्काळ उचलून आपल्या कडेवर घेतलें व त्यास प्रथम महारवाड्यांत घेऊन गेले. महारवाड्यांत येतांच त्यानें आपलें घर तेव्हांच ओळखलें. तें मूल आईबापांच्या स्वाधीन केल्यावर एकनाथमहाराज गंगेवर स्नानासाठीं निघून गेले.

एकदां एकनाथमहाराज रामेश्वराचे यात्रेस काशीहून भागीरथीची कावड घेऊन चालले होते. ते रामेश्वरानजीक आले तोंच वाळवंटांत पाण्याविना तळमळत असलेलें एक गाढव त्यांच्या दृष्टीस पडलें. लगेच ते त्या गाढबाजवळ गेले व आपल्या कावडींतील गंगा त्या गाढवाच्या मुखांत सोडून त्यांनीं त्याची तृषा शांत केली. तृषा शांत होतांच हुशारी आल्यामुळें, तें गाढव तेथून दुसरीकडे निघून गेलें. एकनाथमहाराजांचें हें कृत्य बरोबरच्या लोकांस मुळींच आवडलें नाहीं. ते म्हणाले, "महाराज, तुम्हीं हें काय केलेंत? एवढे परिश्रम घेऊन भागीरथीचें पाणी तुम्हीं फुकट दवडिलेंत. आतां तुमची यात्रा मुळींच सफळ होणार नाहीं." तेव्हां महाराज म्हणाले, "वेड्या पिरांनो! मी चुकत नसून तुम्हींच चुकत आहां. माझ्यामतें ही कावड रामेश्वरास खास पोंचली. परमेश्वर सर्वांभूतीं वास्तव्य करीत असतो हें वारंवार ऐकून देखील तुम्हीं ऐन प्रसंगीं तें कसें विसरतां ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें!" एकनाथमहाराज लोकांना वरीलप्रमाणें भूतदयेचा जो स्तुत्य धडा घालून देत होते, त्यामुळें कित्येक लोकांना तें न आवडून, ते त्यांचा अत्यंत द्वेष करूं लागले व त्यांनीं महाराजांचा नानाप्रकारें छळ करण्याची योजना केली, पण महाराज आपल्या छळकांवर कधींही रागावले नाहींत; एवढेंच नव्हे तर एका चकार शब्दानें देखील ते छळकाचें मन दुखवीत नसत. शांतीची तर ते केवळ मूर्तिच होते! एके दिवशीं एक यवन महाराज स्नान करून घरीं येत असतां त्यांच्या अंगावर थुंकला.

मुखांतून एक ब्रही न काढतां ते परत गंगेवर गेले व त्यांनीं फिरून स्नान केलें. पण परत येत असतां फिरून तो यवन त्यांच्या अंगावर थुंकला. त्यांनीं फिरून गंगेवर जाऊन स्नान केलें. असा प्रकार सायंकाळपावेतों चालून त्या दिवशीं महाराजांना एकशें आठ वेळां स्नान करावें लागलें, तरी देखील महाराज त्या यवनावर मुळींच रागावले नाहींत. ही महाराजांची सहनशीलता पाहून तो यवन लाजून मेल्यासारखा झाला व त्यानें महाराजांचे चरण घट्ट आवळून त्यांची क्षमा मागितली. तेव्हां महाराज त्यास म्हणाले, " वेड्या ! यांत रे कसली क्षमा ! उलट तूंच मला उपकारानें बद्ध करून ठेविलें आहेस. कारण गंगेचें मला रोज दोन तीन वेळां स्नान घडत होतें, तें आज तुझ्यामुळें एकशें आठ वेळां घडलें; हे तुझे मजवर केवढे उपकार घडले ! "

मत्प्रिय बंधुभगिनींनो ! तुम्हींही एकनाथमहाराजांप्रमाणें परमार्थाचें उच्च ध्येय साधण्यासाठीं ईश्वरावर दृढश्रद्धा ठेवून त्याची मनोभावें भक्ति करा. यथाशक्ति दानधर्म व शक्य तो परोपकार करण्यास केव्हांही माघार घेऊं नका. सर्वांभूतीं परमेश्वर भरला आहे अशी भावना ठेवून, सर्व प्राणिमात्रांवर समभाव ठेवा. अंतःकरणांत भूतदया बाळगा. दुसऱ्याचें दुःख निवारण करण्यासाठीं सतत झटा. अशा तऱ्हेनें वागण्यांत आपल्या आयुष्याचा सद्व्यय केल्यास, नरदेहांत आल्याचें सार्थक होऊन, '**नर करणी करे तो नरका नारायण होय**' ह्या म्हणीप्रमाणें तुम्हींही देवपदातें पावाल यांत तिळमात्र शंका नाहीं.

## प्रकरण दुसरें.

# पाणिग्रहणाचें मुख्य रहस्य.

लग्न करून प्रपंच करणें ही सर्वांत अति महत्त्वाची बाब आहे, परंतु हल्लीं बहुतेक समाजांत बाळपणीं लग्न करण्याचा प्रघात पडला आहे. त्यामुळें लग्न कशाला म्हणतात? लग्नाचा मूळ हेतु काय असतो? ह्याचा भावार्थ वधूवरांना मुळींच समजत नाहीं. लग्न म्हणजे तीं एक प्रकारचा उत्सव समजतात. त्यामुळें तीं आनंदांत अति गर्क असतात. परंतु या उत्सवापासून आपल्या शिरावर किती महत्त्वाची जबाबदारी येऊन पडणार आहे, याची त्यांना मुळींच जाणीव नसते. ही जाणीव होऊन जर त्यांना आपलें परस्पराशीं काय नातें आहे? व तें कोणत्या अधिकाराचें आहे? आपण परस्पराशीं कसें वागलें पाहिजे? आपण लग्नप्रसंगीं देव, ब्राह्मण, अग्नि, सूर्य इत्यादिकांसमक्ष कोणकोणत्या प्रतिज्ञामंत्रांनीं बांधलें गेलों आहों? त्या न पाळल्या असतां आपलें कोणतें नुकसान होईल? इत्यादि साधकबाधक गोष्टींचा स्पष्ट अर्थ समजून आपापल्या कर्तव्याप्रमाणें जर त्यांचेकडून आचरण घडून येईल तरच या जगांत त्यांना सुख प्राप्त होईल; नाहींतर दुःखांच्या राशींच्या राशी उभयतांनाही वहाव्या लागतील. सबब लग्नप्रसंगीं उभयतांत होणाऱ्या प्रतिज्ञामंत्रांचा स्पष्टार्थ खालीं दिला आहे, तो उभयतांनीं समजावून घेऊन तद्वत् आपलें आचरण ठेवून सुखानें संसार करावा.

वधूवरांच्या पाणिग्रहणसमयीं वराचा अति पवित्र व मुख्य प्रतिज्ञामंत्र

म्हटला म्हणजे '**धर्मेच अर्थेच कामेच नातिचरामि, नातिचरामि, नातिचरामि**' हा होय. ह्याचा मुख्य भावार्थ हाच कीं, मी धर्माचें अतिक्रमण म्हणजे उल्लंघन केव्हांही करणार नाहीं. धर्माज्ञेप्रमाणें मी सदैव वागत जाऊन नीतिबाह्य वर्तन केव्हांही आचरणार नाहीं. धर्माला अनुकूल असाच क्रोध व लोभ ठेवून, या माझ्या धर्मपत्नीचें कोणत्याही स्थितींत मी योग्यप्रकारें संरक्षण करीन. तसेंच हिचें प्रेमपूर्वक व निष्कपटपूर्वक पालन-पोषण करून, हिचेशिवाय इतर सर्व स्त्रिया मी माझे आईबहिणीप्रमाणें मानीत जाईन. आम्हां दोघांचा हा जो संबंध घडून आला, त्यास देव, ब्राह्मण, अग्नि व सूर्य हे साक्षी आहेत. अशाप्रकारें पाणिग्रहणसमयीं वर मंत्रोच्चार करून आपल्या वधूचें पाणिग्रहण करितो.

तसेंच वधू प्रतिज्ञा करते तिचा भावार्थ हाच कीं, देव, ब्राह्मण, अग्नि, सूर्य इत्यादिकांसमक्ष मी तुमचें करग्रहण केलें असून, माझ्या पूर्वजन्मींच्या पुण्याईनें तुम्ही भला पति लाभले असल्यामुळें मी जिवंत आहें तोंपावेतों तुम्हीं सांगाल त्याप्रमाणें कुटुंबाचें पालन करीन. तुम्ही जेथें रहाल तेथें मीही राहून, तुमच्या घरची जी स्थिति असेल, तिंतच आनंद मानीन व तुमच्या सेवेंत रात्रंदिवस तत्पर राहीन. तुम्हांवर जीं जीं संकटें येतील त्या सर्वांना टक्कर देण्यास मी पुढाकार घेत जाईन; तसेंच तुमच्या प्रत्येक कार्यांत तुम्हांला मी मनःपूर्वक मदत करीत जाईन. ऋतुकाळीं शुचिस्नात होऊन तुमच्याशीं रममाण होत जाईन. परपुरुषाप्रत मी केव्हांही गमन करणार नाहीं. आजपासून तुमच्या शिवाय परपुरुष बंधुपित्यासमान होत. अशाप्रकारें वधू मंत्रोच्चार करून पतीची सहधर्मचारिणी बनते.

सहधर्मचारिणी या शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. आपल्या आईबापाच्या हलगर्जीपणामुळें अगर दूरदर्शीपणामुळें किंवा आपल्या दुर्दैवानें

अगर सुदैवानें ज्या स्त्रीस जो पति लाभला असेल, **तो मग सद्गुणी असो वा दुर्गुणी असो, जरठ असो वा तरुण असो, श्रीमंत असो वा दरिद्री असो, सुष्ट असो वा दुष्ट असो, स्वरूपवान् असो वा कुरूपवान् असो, तरी देखील त्यास प्रतिईश्वररूप मानून त्याच्या सुखदुःखाचे आनंदानें वांटेकरी व्हावयाचें. पति हेंच आपल्या सर्वतोपरी सुखाचें किंबहुना प्राणाचेंही आश्रम स्थान मानून रहावयाचें, आणि पतीचा व आपला विरह या जन्मींच नव्हे तर जन्मोजन्मींही न होवो अशीच ईश्वराची करुणामय प्रार्थना भाकावयाची.** हेंच पाणिग्रहणाचें मुख्य रहस्य होय.

ह्या पाणिग्रहणाच्या रहस्याच्या तत्त्वास अनुसरून, सती सावित्रीनें आपलें चरित्र उज्ज्वल करून जगाच्या प्रत्ययास आणून दिलें. तिनें म्हटलें आहे कीं,

**न कामये भर्तृविना कृतासुखम् ।**
**न कामये भर्तृविना कृताश्रियम् ॥**
**न कामये भर्तृविना कृतादिवम् ॥**
**न भर्तृविना व्यवसामि जीवितुम् ॥ १ ॥**

**पतिविना सुख नको, पतिविना वैभव नको, पतिविना स्वर्ग नको, किंबहुना पतिविना प्रत्यक्ष प्राणही नको.** असें तिनें साक्षात् यमधर्मराजास सांगून पतिव्रतेचें श्रेष्ठ ध्येय स्त्रियांपुढें ठेविलें आहे. हें उच्च ध्येय प्रत्येक आर्यस्त्रीनें आपल्या डोळ्यापुढें ठेवून, तद्वत् वागण्याचा कसून प्रयत्न करावा. म्हणजे ती सती सावित्रीप्रमाणें उभयकुळांस भूषवील; एवढेंच नव्हे, तर मेल्यावरसुद्धां कीर्तिरूपानें खास जिवंत राहील.

आजपर्यंत विवाहरज्जूनें बद्ध झालेल्या पुष्कळ दांपत्यांनीं आपल्या निःसीम प्रेमरंगांत दंग होऊन, परस्परांच्या प्रेमळ सहवासांत आपलें जीवन पूर्ण सुखमय करून सोडलें असेल, परंतु विवाहरूपानें बद्ध न होतां, केवळ

परस्परांच्या प्रेमास्तव कायावाचामनेंकरून परस्परांस जे वरून चुकले असतील व पुढें कांहीं अपरिहार्य कारणास्तव विवाहसंबंध न जुळल्यामुळें, केवळ प्रेमास्तव आजन्म कडकडीत ब्रह्मचर्य व्रत पाळून राहिले असतील, असे स्त्रीपुरुष पृथ्वीच्या पाठीवर बोटानें मोजण्याइतके तरी सांपडतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. सबब आदर्श म्हणून एका सुशील व सद्गुणशालिनी राजकुलोत्पन्न स्त्रीचें हृदयंगम चरित्र खालीं दिलें आहे.

औरंगजेबाची मुलगी झेबुन्निसा ही एका लहानशा टोळीसह पन्हाळगडावरून जात असतां, छत्रपति संभाजी महाराजांच्या लोकांच्या तावडींत सांपडून अटकेंत पडली. ती अटकेंत असतांना तिची व संभाजीची वारंवार भेट होऊं लागल्यामुळें, संभाजीचें तिजवर प्रेम जडलें. संभाजीनें तिजजवळ जेव्हां प्रेमाची मागणी केली, तेव्हां तिनें प्रथम बरेचसे आढेवेढे घेतले. परंतु पुढें तिचेही मनांत संभाजीविषयीं प्रेमभावना उत्पन्न झाली. ह्या प्रेमभावनेमुळें केव्हां केव्हां तिचे मनांत येई कीं, जर मी मराठे कुळांत किंवा संभाजी महाराज मुसलमान कुळांत जन्माला आले असते तर काय बहार झाली असती ? तिचे मनांत असेंही येई कीं, असें नसलें म्हणून काय झालें ? ते राजपुत्र आहेत तर मीं राजकन्या आहें. मग त्यांचेबरोबर विवाह करण्यास मला हरकत ती कोणती ? एके दिवशीं संभाजीनें पुनः प्रेमाची मागणी केली. तेव्हां तिनें उत्तर केलें कीं, महाराज, मी आपणास वरण्यास अगदीं एका पायावर तयार आहे, परंतु माझी एक अट आहे. ती ही कीं तुम्ही आमचा महमदी धर्म स्वीकारून माझें पाणिग्रहण करावें. ”

संभाजी—तूं म्हणतेस तें सर्व खरें आहे. परंतु तसें करण्यास किती अडचणी आहेत ह्याचा तूं स्वमनींच विचार करून पहा. मी मुसलमान होतांच माझी प्रजा मला एका क्षणांत नाहींसा करून टाकील.

झेबुन्निसा--तर मग मलाच हिंदु बनवून घ्या म्हणजे झालें. कारण आपण उभयतां एकधर्मीय असल्यावांचून आपला शरीरसंबंध घडून येणें शक्य नाहीं.

संभाजी--हा वेडे! तसें झालें असतें तर मग कांहीं पहावयास नको होतें. परंतु आमच्या धर्मशास्त्राला तसें करणें संमत नाहीं. आमचे धर्मांत हिंदूचा मुसलमान होऊं शकतो पण मुसलमानाचा हिंदु होऊं शकत नाहीं.

झेबुन्निसा--महाराज, केवळ प्रेमास्तव मी आपणास दोन उपाय सुचविले आहेत. ह्यांतून कोणताही घडून न आल्यास ईश्वराची मर्जी. मी तर आपणास मनानें वरून चुकलेंच आहें, व जर कोणत्याही उपायानें आपला शरीरसंबंध घडून आला नाहीं, तर मी आजन्म कुमारिकावस्थेंत दिवस कंठण्याचा दृढनिश्चय केला आहे.

संभाजी—ह्यावर माझ्या मतें आतां एकच उपाय आहे. तो हा कीं, लग्न न लावितां, आपण दोघेंही एकत्र राहून सर्वतोपरी सुखोपभोग भोगूं म्हणजे झालें. लग्नांतच एवढें काय आहे?

झेबुन्निसा--छे! छे! असें मुळींच होणार नाहीं. त्यापेक्षां एकाद्या कंगाल पण स्वज्ञातीयाशीं लग्न लावून त्याची धर्मपत्नी होऊन राहणें शतपट बरें! परंतु परधर्मी पुरुष मग तो सार्वभौम बादशहा कां असेना, त्याची बटीक होऊन राहणें हें हजारोंपटीनें नीच कृत्य होय.

हें तिचें निश्चयात्मक भाषण श्रवण कारतांच, संभाजी प्रत्युतर न देतां मूकवृत्तीनें तेथून निघून गेला.

पुढें औरंगजेबास झेबुन्निसा ही आपला कट्टा शत्रु जो संभाजी त्याच्या अटकेंत असल्याची बातमी लागली. तेव्हां त्यानें तिची मुक्तता करण्यासाठीं एका सरदाराजवळ निवडक सैन्य देऊन, त्यास रवाना केलें व त्यास सांगि-

तलें कीं, सांपडल्यास संभाजीसही कैद करून घेऊन ये. त्या सरदारानें युक्तीनें पन्हाळगडास वेढा दिला. ही बातमी संभाजीस लागतांच, त्यानें तत्काळ झेबुन्निसेची भेट घेऊन तिला सर्व हकीकत विदित केली. तिनें उत्तर केलें कीं, " आपण मजविषयीं मुळींच काळजी वाहूं नका. परंतु तुम्हीं जर त्या सरदाराचे तावडींत सांपडाल तर मात्र तुमची कठिण अवस्था होईल. सबब गडाला एखादी चोरवाट असल्यास तुम्ही येथून तावडतोब निघून जा. '**शिर सलामत तर पगडी पचास**' या म्हणीप्रमाणें आपलीं उभयांचीं अंतःकरणें संलग्न झालीं असल्यामुळें, आतां यापुढें कितीही अडचणी उपस्थित झाल्या तरी त्याच्यांत मतभेद होणें केव्हांही शक्य नाहीं. प्रसंगोपात् माझ्या भावाकडून मी आपणास शक्य ती मदत अवश्य करीत जाईन. मात्र आपण या गरीब दासीस केव्हांही विसरूं नये; एवढीच या चरणांजवळ आग्रहाची नम्र विनंति आहे. चला, आतां एका क्षणाचाही विलंब न करितां चोरवाटेनें निघून जा." संभाजीनें प्रसंग जाणून, एकवेळ तिचें मुखावलोकन केलें व आपण लागलींच तेथून एका सरदारासह चोरवाटेनें पसार झाला.

इकडे झेबुन्निसा औरंगजेबाजवळ सुखरूप घेऊन पोहोंचली. पुढें कांहीं दिवसांनीं संभाजी शिरक्याच्या अटकेंत असल्याची बातमी झेबुन्निसेस लागली. तेव्हां तिनें संभाजीस अभयवचन दिल्याप्रमाणें आपल्या भावाकरवीं शिरक्यांच्या अटकेंतून संभाजीची सुटका करविली. व एकदां तर प्रत्यक्ष आपल्या बापाच्या कैदेंतून मुक्तता करविली. पुनः एकदां संभाजी महाराज दारूच्या धुंदींत असतां, औरंगजेबाचा सरदार तकरीबखान याच्या तावडींत सांपडून कैदी बनले. तकरीबखानानें ही आनंदाची खुशखबर औरंगजेबास

कळवितांच, त्याचा आनंद गगनांत मावेनासा होऊन, त्यानें संभाजीस दुसरे दिवशीं दरबारांत हजर राहण्याचा हुकूम केला.

दुसरे दिवशीं हुकुमाप्रमाणें संभाजीस दरबारांत आणून बादशाही तक्तापुढें उभें केलें. तक्ताच्या पाठीमागें चिकाच्या पडद्याआड जनानखान्यास बसण्याकरितां मुद्दाम एक जागा तयार केलेली होती. तींत झेबुन्निसा बसलेली होती. संभाजी महाराजांना बघतांच तिच्या सर्वांगास डबडबून घाम सुटला व तिला कापरें भरलें. त्यायोगें तिला चक्कर येऊन ती एकदम मूर्च्छित पडली, तिच्या मूर्च्छित पडण्याचें कारण कोणासच समजलें नाहीं. तिला लागलींच तेथून दुसरीकडे नेण्यांत आलें व शुद्धीवर आणण्याचे औषधोपचार सुरू करण्यांत आले. इकडे औरंगजेब संभाजीस म्हणाला, "संभाजी तूं खानदानी मनुष्य असल्यामुळें, तुला ठार मारण्याचा माझा मुळींच हेतु नाहीं. परंतु तूं माझी एक शर्त मात्र कबूल केली पाहिजे. ती ही कीं, तूं आपला हिंदुधर्म सोडून आमचा महमदी धर्म स्वीकारल्यास, मी तुला माझ्या दरबारांत मनसबदारीची जागा देऊन, मोठा उमराव बनवितों. बोल, तुला हें माझें म्हणणें कबूल आहे किंवा नाहीं ?"

संभाजी--हे बादशहा, जरी मी दुर्दैवेंकरून तुझ्यापुढें एकाद्या गुलामाप्रमाणें उभा आहें, तरी भीतिस्तव मी माझा पवित्र हिंदुधर्म सोडण्यास केव्हांही प्रवृत्त होणार नाहीं. फार तर काय परंतु मला धर्मापेक्षां माझ्या प्रिय प्राणाची देखील पर्वा नाहीं. समजलास? आतां तूं जशी आपली शर्त सांगितलीस, तशीच माझी पण एक शर्त आहे. ती जर तुला कबूल असेल तर '**तुपासाठीं उष्टें खावें**' या म्हणीस अनुसरून तुझ्या म्हणण्याप्रमाणें महमदी धर्म स्वीकारण्यास मी तयार होईन. तुझी प्रिय मुलगी जी झेबुन्निसा ही सध्यां वयांत असून, तिचें अद्याप लग्न झालेलें नाहीं. तिजवर मी पूर्ण

आसक्त बनलों असल्यामुळें, तिच्याशीं जर तूं माझें लग्न लावून देत असलास तर केवळ तिच्यासाठीं मी धर्मांतर करावयास तयार आहें.

हे संभाजीचे कटु शब्द ऐकतांच औरंगजेबाच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन भिडली व तो क्रोधाविष्ट होऊन, कोतवालास हुकूम करता झाला कीं, " उद्यां लोखंडी सळया तापवून प्रथम ह्याच्या पापी नेत्रांच्या खांचा करा. नंतर ज्या जिव्हेनें या हरामखोरानें माझ्या प्रिय शहाजादीची मागणी केली ती जिव्हा एकदम छाटून टाका, मग हातपाय कापून मस्त हत्तीच्या पायाखालीं याचें शिर तुडवा. अशाप्रकारें हालहाल करून यास ठार करा. " एवढें बोलून त्यानें दरबार बरखास्त केला व आपण रागारागानें तेथून निघून गेला.

संभाजीचे हालहाल करून त्यास उद्यां ठार करण्यांत येणार ही हृदयविदारक बातमी जेव्हां झेबुन्निसेस समजली तेव्हां तिला अत्यंत वाईट वाटलें. ती कांहींसा विचार करून तत्क्षणींच आपल्या पित्याकडे गेली व त्यास भेटून संभाजीस मुक्त करण्याविषयीं तिनें त्याची अनेक प्रकारें विनवणी केली. आणीबाणीचा प्रसंग पाहून व आपली लज्जा कांहीं वेळ एके बाजूस सारून, तिनें एवढेंही सांगितलें कीं, ' छत्रपति संभाजी महाराजांवर माझें मन आसक्त झालें आहे. शिवाय ते जर स्वतः मुसलमान होऊन मजबरोबर विवाह करावयास तयार आहेत तर मग हरकत ती कोणती ! मी त्यांच्या अटकेंत असतांना आम्हां उभयतांमध्यें तसले करारही होऊन चुकले आहेत. ह्यास्तव आजपर्यंत लडिवाळपणानें वाढविलेल्या या तुमच्या लाडक्या कन्येकडे पाहून तरी त्यांना जीवदान द्या. ' हें तिचें करुणामय भाषण ऐकून त्या पाषाणहृदयीं बादशहाचें मन द्रवलें तर नाहींच, परंतु उलट त्याच्या क्रोधाग्नीवर तेल ओतल्यासारखें होऊन तो अधिकच चिडला व त्या संतापाच्या भरांत तिची अत्यंत निर्भर्त्सना करून, त्यानें तिला नाहीं नाहीं तशीं दुरुत्तरें केलीं. पण त्या साध्वीनें तेवढींही निमुटपणें सहन केलीं.

आपल्या पित्याचा हट्टी व दुराग्रही स्वभाव ती पूर्ण जाणून असल्यामुळें, ईश्वरावर हवाला ठेवून, कांहीं एक न बोलतां तेथून निघून गेली. दुसरें दिवशीं ठरल्याप्रमाणें संभाजीस हालहाल करून ठार मारण्यांत आलें हें निराळें सांगावयास नकोच !

संभाजीच्या मृत्यूची कर्णकठोर बातमी झेबुन्निसेस कळतांच, तिच्या मनास एकप्रकारचा धक्का बसला. व ती त्या दिवसापासून अंथरुणास खिळून राहिली. औरंगजेबानें तिजसाठीं मोठमोठे राजवैद्य आणवून बरेंचसे औषधोपचार केले, परंतु तिच्या शरीरप्रकृतीस आराम पडेना. शेवटीं एका राजवैद्यानें नाडीपरीक्षा करून सांगितलें कीं, ‘ हिला हृद्रोग जडला आहे, तरी हिला औषधानें केव्हांही गुण येणार नाहीं. हिच्या मनांतील हृद्रोग दूर झाल्याशिवाय हिच्या जीवनाची आशा बाळगणें व्यर्थ आहे. ’ तेव्हां औरंगजेब झेबुन्निसेजवळ जाऊन म्हणाला, ‘ बेटा, तुझ्या अंतःकरणांत कसला हृद्रोग जडला आहे तो तरी निवेदन कर, म्हणजे मी तो निवारण करण्याचा प्रयत्न करितों. ’ यावर झेबुन्निसा म्हणाली, ‘ बाबा, दुसरा कोणता हृद्रोग असणार ? संभाजी महाराजांस जीवदान देण्याविषयीं मी तुम्हांस परोपरीनें विनविलें असतां, माझ्या दुर्दैवेंकरून तुम्हीं त्याकडे दुर्लक्ष केलें, त्यामुळें माझी अशी स्थिति झाली. असो. गतगोष्टीचा पश्चात्ताप करून काय उपयोग ? आतां मी पुनः कांहीं वर्षांपावेतों जगावें अशी जर तुमची खरोखरच इच्छा असेल तर माझी भावी सवत येसूबाई व तिचा मुलगा शाहू ह्यांना येथें आणवून माझ्या सहवासांत ठेवा म्हणजे माझ्या भावी सवतीशीं गुजगोष्टी करण्यांत व मुलाचे कोड पुरविण्यांत माझें मनोरंजन होईल, व तेणेंकरून माझ्या जीवास बरें वाटून माझा सर्व काळ अगदीं आनंदांत जाईल. ’ औरंगजेबानें झेबुन्निसेचें म्हणणें मान्य केलें व तो त्या प्रयत्नास लागला. त्यानें आपल्या अफाट सैन्याच्या अनेक टोळ्या करून, तो महाराष्ट्रांतील किल्ले सर करीत चालला असतां, एकदां त्याच्या एका सरदारानें रायगडास

वेढा दिला. त्यावेळीं रायगडावर संभाजीची बायको येसूबाई व तिचा मुलगा शिवाजी ऊर्फ शाहू हीं होतीं. गडकऱ्यांनीं त्यास बरेंच दिवस दाद दिली नाहीं. परंतु शेवटीं सूर्याजी पिसाळ हा देशमुखीच्या आशेनें त्यास फितूर झाला. तेणेंकरून अनायासेंच येसूबाई व शाहू हीं औरंगजेबाचे हातीं सांपडलीं.

झेबुन्निसेस ही बातमी कळतांच तिला परमानंद झाला व पुत्रवात्सल्य-प्रेमामुळें तिनें त्याची भेट घेऊन येसूबाईसह त्यास आपल्या जवळ ठेवून घेतलें. शाहूस ती आपला जीव कीं प्राण समजत असे. अशा तऱ्हेनें तिनें शाहूस पोटच्या मुलाप्रमाणें मोठ्या प्रेमानें बादशाही थाटांत वागवून लहा-नाचा मोठा केला. शेवटीं पित्याकडून त्याचें राज्य त्यास परत देवविण्याचें वचन घेऊन ती मक्केस निघून गेली.

भगिनींनो! केवळ कायावाचामनेंकरून संभाजीस वरून, तो मृत्यु पावल्यावर देखील झेबुन्निसेनें आपला कृतनिश्चय ढळूं दिला नाहीं. व केवळ वचनास्तव आजन्म अविवाहित राहून नरदेहांत अत्यंत प्रिय अशा विषय-सुखाचाही त्याग केला; एवढेंच नव्हे तर स्त्रियांना अत्यंत अप्रिय अशा भावी सवतीला व तिच्या मुलाला प्रेमळपणानें वागविण्यांतच धन्यता मानून घेतली व आपल्या मनाचा थोरपणा लोकांच्या नजरेस आणून दाखविला. अहाहा! काय हा करारीपणा! केवढा हा मनाचा थोरपणा! धन्य धन्य ती सती! अशा सती स्त्रीच्या चरित्रापासून भगिनींनो, आपणांस कितीतरी बोध घेण्यासारखा आहे. ज्याप्रमाणें झेबुन्निसेनें आपलें वचन कृतीनें सत्य करून, आपली महति जगाच्या निदर्शनास आणून दिली; त्याचप्रमाणें तुम्हींही पाणिग्रहणसमयीं देव, ब्राम्हण, अग्नि, सूर्य इत्यादिकांसमक्ष केलेली प्रतिज्ञा आचरणांत कृतीनें सत्य करून दाखवाल, तर तुमचीही महति जगाच्या निदर्शनास आल्यावांचून राहणार नाहीं. जशीं आपण गत झालेल्या सती स्त्रियांचीं चरित्रें वाचून त्यांना धन्यवाद देतों; तद्वत् तुमचींही चरित्रें

भावीप्रजा वाचून तुम्हांस धन्यवाद दिल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं. सबब तुम्हींही आपली प्रतिज्ञा प्रत्यक्ष आचरणांत कृतीनें सत्य करून दाखविण्याच्या प्रयत्नास लागा. एवढीच तुमच्या चरणांजवळ नम्र विनंति आहे.

---


# मुंबईचा मार्गदर्शक
## अर्थात्
# मुंबईचा मित्र.

हें पुस्तक तुमच्याजवळ असल्यावर तुम्हांला मुंबईत गांगरून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण **केसरी** आपल्या ता० ३--३--२५ च्या अंकांत लिहितो कीं, 'व्यापारामुळें मुंबई हें लक्ष्मीचें केवळ माहेरघर असल्यानें अनेक प्रकारचे लोक तेथें नेहमीं आकर्षिले जातात. शहर अफाट, धंदेही मोठे, त्याचप्रमाणें लबाड्याही फार--अशा तडाख्यांत एकादा नवखा मनुष्य गेला असतां सहज गांगरून जावयाचा. **अशा नवख्या मनुष्याला 'मुंबईचा मित्र' मार्गदर्शकाचें काम चांगलें करील. मुंबईस जाण्यास लागणाऱ्या रेल्वेच्या माहितीपासून तों तेथील दर्शनीय ठिकाणें, दवाखाने, रस्ते, धर्मशाळा, करमणुकींचीं ठिकाणें, व्यापार वगैरेची माहिती सदर पुस्तकांत दिली असून शहर पाहण्यास जाणारांनीं कोणत्या गोष्टी विशेष लक्षांत ठेविल्या पाहिजेत** याचीही उपयुक्त अशी माहिती दिली असल्यामुळें लेखकाचा हेतु उत्तम प्रकारें सिद्धीस गेला आहे. किं. १ रुपया.

पत्ता—**जे. आर. चौधरी**, पिंपरुडकर
मु. पो. फैजपूर. पूर्वखानदेश.

## प्रकरण ३ रें.

# स्त्रिया कशानें अधिक शोभतात ?

हल्लीं बहुतेक स्त्रिया आपलें शरीरसौंदर्य विशेष खुलून दिसावें म्हणून, व लोकांनीं आपणांस श्रीमंत म्हणावें म्हणून यथाशक्ति चांदीचे, सोन्याचे व मोत्यांचे दागिने अंगावर घालीत असतात, व शृंगारिक पोषाख करून पोकळ ऐट मिरवीत असतात. परंतु ज्या स्त्रिया खरोखरच कुलीन घराण्यांत जन्म पावलेल्या असतात व ज्यांना बाळपणापासून उत्तम प्रकारचें वळण लागलेलें असतें, किंवा ज्या विचारशील व पतिव्रता असतात, त्यांना दागदागिन्यांचा व शृंगारिक पोषाख करण्याचा हव्यास मुळींच नसतो. त्यांना नेहमीं साधें व नीटनेटकें राहणेंच विशेष पसंत पडतें. वास्तविक पाहूं गेलें असतां, स्त्रीच्या साध्या रहाणींतच खरी मजा आहे. कारण आधींच स्त्री म्हटली म्हणजे केवळ मूर्तिमंत मदनज्वाला, व त्यांत पुनः कामोत्तेजक अशा वस्त्रालंकारांनीं जर ती पूर्ण नटली, तर मग काय विचारतां ! एखाद्या भयंकर आगीच्या ज्वाळेंत केरोसीन ऑइलची पूर्ण भर पडतांच ती जशी एकदम भडका घेऊन उठावयाची; तद्वत् या मूर्तिमंत रतिदेवतेला उत्तमोत्तम वस्त्रालंकारांनीं सुशोभित झालेली पाहतांच मनुष्याच्या अंतःकरणांत कामविकाराचा एकदम भडका झाल्यास, त्यांत आश्चर्य काय मानावयाचें ? आधींच मदनानें मुसमुसलेलें स्त्रियांचें दिव्य लावण्य, परपुरुषांचीं मनें लोहचुंबकाप्रमाणें आकर्षण करून मोहित करीत असतें व त्यांना भुरळ पाडून वेडेपिसें बनवीत असतें, व त्यांत पुनः कामोत्तेजक अशा शृंगाराची भर पडली म्हणजे विषयासक्त पुरुषांचीं मनोभूतें अधिकच खवळून जातात, व त्यायोगें तीं असहाय अशा स्त्रियांवर बलात्कार करावयास बगळ्यासारखीं

टपून बसतात; आणि त्यासाठीं आपल्या दुष्ट व नीच कारस्थानांची अगदीं शिकस्त करून सोडतात. असलीं बरींचशीं उदाहरणें हल्लीं मुंबई पुण्यासारख्या मोठमोठ्या शहरीं नित्यशः घडून येत असलेलीं दृष्टीस पडतात. ह्याचें मुख्य कारण म्हटलें म्हणजे शृंगार, नटवेपणा व छानछोकपणा हेंच होय. स्त्रीच्या नटवेपणानें मनुष्य अधिकच बेफाम बनून, तो अधिकाधिक विषयलंपट बनत जातो, व अकालीं नानाप्रकारच्या रोगांनीं त्रस्त बनून अचानक मृत्यूच्या जबड्यांत जाऊन पडतो. शिवाय वस्त्रालंकारांनीं पूर्ण विभूषित अशा नवतरुण बालिका दृष्टीस पडतांच, त्यांच्याकडे पापीजनांची दृष्टि हटकून वळते व त्यामुळें प्रसंगोपात् महा अनर्थ ओढवून, त्यांना नाहक प्राणास मुकावें लागतें. ह्यास्तव मत्प्रिय भगिनींनो ! प्रथम तुम्हीं ह्या शृंगारिक नटवेगिरीला पार झुगारून द्याल तर ठीक होईल; नाहींतर तिचा परिणाम फार विपरीत होऊन, एकादे प्रसंगीं तुमच्या नशीबीं कज्जा व त्याजबरोबरच त्याचें योग्य प्रायश्चित्त म्हणून त्याची जुळी बहीण जी सजा, ती दत्त म्हणून तुमच्यापुढें उभी राहिलीच हें मनांत पक्कें समजा. सबब ह्या बाह्य दिखाऊ शृंगारास न भुलतां तुम्हीं योग्य तेच दागिने व योग्य तोच साधा व नीटनेटका पोषाख धारण करण्याचा कसून प्रयत्न करा. आतां कित्येक साध्वी स्त्रियांना नटण्यामुरडण्याची मुळींच आवड नसते. परंतु हल्लींच्या कित्येक सुशिक्षित तरुणांना ही फॅशन फारच आवडते. त्यामुळें आपल्या धर्मपत्नीनें देखील असेंच फॅशनेबल रहावें अशी त्यांची साहजिक इच्छा असते. स्त्रिया ह्या पुरुषांच्या आधीन असल्यामुळें, त्यांना पतिराज सांगतील तसें वागणें भाग पडतें, हा त्यांचा दोष नसून त्यांना वागविणाऱ्या पुरुषांचा दोष होय.

आपल्यामध्यें एकाद्या स्त्रीचें अत्युच्च प्रतीचें वर्णन करणें झाल्यास, ती सोळा शृंगारांनीं युक्त आहे, म्हणजे ती सोळा शृंगारांनीं नटलेली आहे असें म्हणण्याची चाल आहे. परंतु ते सोळा शृंगार कोणते हें मात्र माझ्या

थोडक्याच भगिनींना विदित असेल. सबब प्राचीन ऋषिजनांनीं व मोठमोठ्या सत्पुरुषांनीं स्त्रीजातीचे बाह्य व अंतर्शृंगार खालीं दिल्याप्रमाणें वर्णन केले आहेत, ते माझ्या सुशील भगिनींनीं मनःपूर्वक वाचून त्यांतील अंतर्शृंगार आपल्या अंगीं जडवून घेण्याचे झटून प्रयत्न करावे.

| बाह्य शृंगार | अंतर्शृंगार. |
| --- | --- |
| १ चोळी अंगाबरोबर घालणें. | १ दया. |
| २ योग्य व बेताचे दागिने घालणें. | २ क्षमा. |
| ३ लुगडें व्यवस्थित नेसणें. | ३ शांति. |
| ४ गजगति असणें. | ४ प्रीति. |
| ५ हरिणाक्षी. | ५ नीति. |
| ६ वेणीफणी नित्य करणें. | ६ भक्ति. |
| ७ सुवासिक फुलें गुंफणें. | ७ चातुर्य. |
| ८ डोळ्यांत काजळ घालणें. | ८ धैर्य. |
| ९ कपाळीं कुंकूं लावणें. | ९ पातिव्रत्य. |
| १० सडपातळ असणें. | १० परोपकार. |
| ११ गौरवर्ण असणें. | ११ मनामिळाऊपणा. |
| १२ हंसतमुख असणें. | १२ सत्यवचन. |
| १३ थोडी निद्रा घेणें. | १३ समाधान. |
| १४ मधुर भाषण करणें. | १४ नम्रता. |
| १५ आदरातिथ्य करणें. | १५ ज्ञानलालसा. |
| १६ हात राखून खर्च करणें. | १६ सहिष्णुता. |

**सौ० सावित्री.**

प्रियभगिनींनो ! वरील बाह्य शृंगार लेण्यांत एकादे प्रसंगीं जरी तुम्हीं हलगर्जीपणा केला तरी चालेल, परंतु अंतर्शृंगार अंगीं जडवून घेण्याच्या बाबतींत तुम्हीं जराही कानाडोळा करतां कामा नये. ज्या स्त्रिया वरील

अंतर्शृंगार आपल्या अंगीं कायमचे जडवून घेण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करितील, त्यायोगें या लोकींच नव्हे तर स्वर्गलोकीं देखील पूज्य होतील. चांदी-सोन्याचे दागिने, उत्तमप्रकारचीं उंची वस्त्रें, नटण्यामुरडण्याची ऐट, नट्टापट्टयाचा चापचोपपणा, लचकदार चाल, नेत्रांची विजयशाली चमक, भ्रुकुटीचा वक्राकारपणा, पदराची बारंवार उलाढाल इत्यादि प्रकारच्या हावभावांपेक्षां **लीनता, विनय, लज्जा, धैर्य, प्रसंगावधान, पतिनिष्ठा, स्मितहास्य, संतोषवृत्ति, मर्यादा, आज्ञाधारकपणा, दक्षता, गोड स्वभाव व नीटनेटकेपणा इत्यादि सद्गुण अंगीं असले तर ते मौल्यवान् दागिन्यापेक्षांही अधिक मौल्यवान् दिसतात,** हें नेहमीं लक्षांत असूं द्या. स्त्रियांचा खरा दागिना व खरें लावण्य म्हटलें म्हणजे त्यांचें पातिव्रत्य हेंच होय. **'नारीरूपं पतिव्रतं'** या म्हणीप्रमाणें आपलें खरें रूप नष्ट होणार नाहीं, याबद्दल प्रत्येक स्त्रीनें जिवापाड मेहेनत घेतली पाहिजे. तसेंच तें रूप अधिकाधिक वाढविण्याचा दीर्घ व सतत प्रयत्न चालू ठेविला पाहिजे. कारण अशाच तेजस्वी व सती स्त्रियांच्या पोटीं खरे शीलवान्, गुणवान् व पुण्यवान् पुरुष जन्म घेत असतात. **खरे शीलवान् पुरुषच खरे रूपवान् समजावे. ज्याला शील नाहीं तो मनुष्यच नव्हे! मनुष्य बहुगुणी असून जर शीलभ्रष्ट असेल तर तो निव्वळ पशु जाणावा.** नीच कुळांत जन्म झाला असला तरी शीलाच्या सामर्थ्यावर उच्च कुळ निर्माण करितां येतें. कर्णाचा पाणउतारा व्हावा म्हणून अर्जुनानें त्याला त्याच्या हीन कुळाबद्दल एकदां हिणाविलें होतें. पण त्यानें दिवसेंदिवस श्रेष्ठपणा संपादन करून, स्वतःच्या मोठेपणानें कुळाचा हलकेपणा झांकून टाकिला. **एकादी स्त्री उच्च अशा राजघराण्यासारख्या श्रेष्ठ कुळांत जन्म पावून, जर ती कुमार्गगामी निपजली आणि एकादी स्त्री अगदीं कनिष्ठ दर्जाच्या नीच कुळांत जन्म पावली, व आपलें पातिव्रत्य अगदीं उज्ज्वल ठेवून, जर ती सद्गुणसंपन्न निपजली, तर तुम्हीं जास्त मान कोणास द्याल! हलकेपणा किंवा श्रेष्ठपणा हा कुळावर अव-**

**लंबून नसून, तो गुणांवर अवलंबून आहे. मेल्यावर कीर्तिरूपानें जिवंत राहण्यास शीलच कारण आहे.** भगिनींनो! ह्याविषयीं मी तुम्हांस एक गोष्ट सांगतों, ती तुम्हीं लक्षपूर्वक श्रवण करून तिचें पूर्ण मनन करा.

रशियांत मेरिया नांवाची एक सुप्रसिद्ध स्त्री होऊन गेली. तिचे आई-बाप खाऊनपिऊन सुखी असून सुशिक्षित होते. लहानपणीं एके दिवशीं तिनें आपला नवीन झगा, थंडीनें कुडकुडत असलेल्या एका शेतकऱ्याच्या मुलास देऊन टाकिला. अशा अविचारी स्वार्थत्यागाबद्दल तिची आई तिज-वर वारंवार रागें भरत असे. ती सोळा वर्षांची असतांनाच तिनें 'व्हॉल-टेअर, रुसो' यांचे ग्रंथ व 'फ्रान्सच्या राज्यक्रांतीचा इतिहास' वाचला होता. हा इतिहास वाचून फ्रेंच शेतकरीवर्गाबद्दल तिला अत्यंत सहानु-भूति वाटूं लागली. राजकीय चळवळीकरितां आपलें सर्व आयुष्य खर्ची घालावयाचें तिनें ठरविलें होतें. त्या निमित्तानें तिनें बराचसा प्रवास केला. राजकीय चळवळीमध्यें भाग घेण्याचा बेत तिनें आपल्या नवऱ्यास कळविला. त्याला तिचें म्हणणें पटलें, परंतु तो तसें करण्यास प्रवृत्त होईना. म्हणून तिनें त्याचा त्याग केला. आपला पोषाखही तिनें साधा व जाडाभरडा ठेव-ण्याचा निश्चय केला. शेतकरी जो पोषाख वापरीत तोच ती वापरूं लागली. ह्यांत तिनें दोन हेतु साध्य केले. एक तर तिच्या पोषाखावरून पोलिसांस कळून येत नसे. व दुसरा म्हणजे शेतकरीवर्ग तिजवर फार खूष असे. एवढेंच करून ती थांबली नाहीं. **निसर्गदत्त सौंदर्यामुळें आपल्या ध्येयप्राप्तीच्या मार्गांत अनेक अडचणी येतील, म्हणून तिनें आपल्या तोंडास ॲसिड (तेजाब) फासून तें कुरूप करून घेतलें.** केवळ साधेपणा हा स्त्रीत्वाचा बहुमोल अलंकार आहे असें समजून, अगदीं साधा पोषाख करणारी स्त्री अत्यंत विरळा आढळते. उलट नैसर्गिक सौंद-र्याची कृत्रिम नटवेषणानें शृंगार करण्यांत तिचें अर्धें आयुष्य अधिक खर्च होतें. **शारीरिक सौंदर्यापेक्षां नीतिसौंदर्य किती उच्च दर्जाचें आहे,**

हें वरील उदाहरणावरून कोणासही सहज कळून येईल. शारीरिक सौंदर्य काळाच्या कठोरगतीनें सुकून जातें. कारण तें केवळ मातीच्या चित्रावर दिलेल्या उजळयाप्रमाणें असतें. पण खरें नीतिसौंदर्य काळाच्या कराल दाढेंतून विपरीत परिस्थितीच्या अग्नींतून केवळ बावनकशी सोनेंच बाहेर पडतें. व त्याचा जय होऊन वर्तमान, भूत व भविष्य काळांतून तसेंच दुमदुमून राहतें, व इतिहासाच्या चित्रपटावर तें सोनेरी अक्षरांनीं रंगविलें जातें.

‘ स्त्रियांचा कर्मयोग. ’

ह्यासाठीं भगिनींनो! नीतिसौंदर्याचा उत्तम ठसा अंतःकरणांत कायमचा ठसावा म्हणून, तुम्हीं आमच्या धर्मग्रंथांचें व ऐतिहासिक ग्रंथांचें चांगलें मनन करा, व सद्गुणसंपन्न व्हा. तुम्हीं सद्गुणसंपन्न बनलां म्हणजे तुमच्या पोटीं निपजणारी भावीप्रजाही तुमच्याचप्रमाणें सद्गुणसंपन्न निपजेल यांत संदेह नाहीं.



## प्रकरण ४ थें.

# मनुष्यास विद्येसारखें अन्य भूषण नाहीं.

**' स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान् सर्वत्र पूज्यते. '** सार्वभौम बादशहा असला तरी त्याचा आपल्या देशांत जसा मानसन्मान केला जातो, तसा इतर देशांत मुळींच केला जात नाहीं. परंतु जो विद्वान् आहे, पंडित आहे, बहुगुणी आहे तो जरी निर्धन असला तरी आपल्या अंगच्या अलौलिक गुणांच्या तेजानें, तो कोठेंही गेला, तरी त्याचा योग्यप्रकारें मानसन्मान केला जातो. मनुष्यास मोठेपणा हा धनानें किंवा वैभवानें मिळत नसतो, तर तो त्याच्या अंगीं वसत असलेल्या गुणांनीं मिळत असतो. गुणी मनुष्याची जगांत जेवढी आवड असते, तेवढी एकाद्या धनवानाचीही कोणी करीत नसते. अज्ञानी व अशिक्षित मनुष्याचें जग म्हटलें म्हणजे त्याचें घरच होय. जगांत कोठें काय चाललें आहे ? कोठें काय होत आहे ? हें जसें कूपांत असलेल्या मंडुकास कळत नाहीं व त्याची जशी स्थिति झालेली असते, तद्वतच या अज्ञानी मनुष्याची जगांत स्थिति असते. मनुष्य कितीही कुरूप असो वा निर्धन असो, तो जर विद्वान् असेल तर त्याचे मुखश्रीवर एक प्रकारचें पाणी चमकतें, विद्यादेवीचें तेज झळकतें व लोकांवर एकप्रकारचें वजन पडतें. विद्वान् मनुष्य जगाची पर्वा बाळगीत नाहीं. एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष लक्ष्मीचीही पर्वा बाळगीत नाहीं. कारण त्याचे मस्तकावर गजाननाचा पूर्ण वरदहस्त असल्यामुळें व सरस्वती देवी मुखाग्रीं वसत असल्यामुळें, प्रत्यक्ष लक्ष्मीलाही त्याचे आधीन होऊन त्याचे पुढें हात जोडून नित्य उभें रहावें लागतें. मग इतरांनीं त्याचेपुढें लोटांगण घातल्यास काय आश्चर्य

मानावयाचें ? **‘ आधीं होता ठोंब्या मग झाला बाब्या ’** या म्हणीस अनुसरून मनुष्य आपल्या बुद्धिसामर्थ्यानें जगास कसा दीपवून सोडतो याचें प्रत्यंतर खालीं दिलेल्या उदाहरणावरून वाचकांस सहज कळून येईल.

रामशास्त्री प्रभुणे हा थोर पुरुष थोरल्या माधवराव पेशव्यांच्या दरबारीं मुख्य न्यायाधीश होता. सरळ व कांटेतोल न्याय देण्याच्या बाबतींत यांचा इतका लौकिक होता कीं, खास पेशव्यांना देखील यांचा दरारा वाटत असे. ज्यावेळीं राघोबादादा पेशव्यानें नारायणराव पेशव्यांचा सुमेरसिंग गारद्याच्या हातून खून करविला; त्यावेळीं तुम्हांला देहान्त प्रायश्चित्ताशिवाय दुसरी शिक्षा देतां येत नाहीं, असें त्यांनीं भर दरबारांत राघोबादादाच्या तोंडावर निर्भीडपणें उत्तर दिलें. हा थोर पुरुष एवढ्या नांवलौकिकास चढावयास यत्किंचित् कारण घडलें. तें असें कीं--

रामा लहानपणीं पुण्यांतील एका श्रीमंत सावकाराकडे शागीर्द म्हणून चाकरी करीत असे. एके दिवशीं यजमानांचें जेवण झाल्यावर हा नेहमींच्या परिपाठाप्रमाणें त्यांच्या हातावर पाणी घालीत होता. पण याचें लक्ष यजमानांच्या कानांत लटकत असलेल्या भिकबाळींतील पाणीदार मोत्यांच्या जोडीकडे गेल्यामुळें, यजमानांच्या हातावर पाणी बरोबर पडलें नाहीं.

यजमान रागावून म्हणाले, ‘ राम्या, तुझें लक्ष कुठें गेलें होतें ? ’

रामा समजला; पण खोटें बोलणें रामाच्या स्वप्नीं देखील येत नसे. तो हात जोडून नम्रतेनें म्हणाला, “ महाराज, धारिष्टाची माफी असावी. आपल्या कानांतील पाणीदार मोत्यांच्या जोडीकडे माझें लक्ष गेलें, व असली भीकबाळी आपल्या कानांत असावी अशी इच्छा झाली.

रामाच्या सत्य भाषणाबद्दल यजमानाला त्याचें कौतुक वाटलें, व ते म्हणाले, “ राम्या, पाणक्याला अशी मोत्यांची जोडी कशी मिळणार ! तिची योग्यता येण्याकरितां शूरवीर तरी झालें पाहिजे ! किंवा अनेक सभांतून विजयपत्रें मिळविणारा पंडित तरी झालें पाहिजे. तूं तर निवळ शागीर्द आहेस !”

यजमानाच्या भाषणानें रामाच्या हृदयांत उजेड पडला. त्यावेळीं त्यानें आपल्या मनाशीं प्रतिज्ञा केली कीं, मी विद्वान् पंडित होईन तरच नांवाचा खरा. रामा नंतर विद्याभ्यास करण्याकरितां काशीक्षेत्रीं गेला व थोड्याच दिवसांत राम्याचा रामशास्त्री झाला. मोठमोठे पंडित त्याचें ज्ञान पाहून माना डोलवूं लागले. शेवटीं तोच राम्या, त्याच पुणें शहरांत आपल्या विद्वत्तेनें पेशव्यांचा सर न्यायाधीश झाला. काय हा करारीपणा! केवढें हें विद्वत्तेचें तेज ! ! "

**मध्यभाग मराठी चौथें पुस्तक.**

पहा! राम्या हा यत्किंचित् शागीर्द होता. पण आपल्या दृढनिश्चयाच्या बळावर विद्वत्ता संपादन करून तो पेशव्यांचा सर न्यायाधीश बनला. याच प्रमाणें प्रत्येक मनुष्यानें दृढनिश्चय करून अंगीं विद्वत्ता येण्यासाठीं शक्य तेवढें ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करावा. मनुष्यास ज्ञान हें विद्याध्ययन केलें असतां प्राप्त होतें. विद्याध्ययन केल्यानें बरेंचसे फायदे होतात. विद्याध्ययनापासून मनाला परमानंद होतो. वक्तृत्वाला शोभा येते, शिवाय बुद्धि-तेज होते. एकांतवासांत व निवांतस्थळीं असतां मनाची करमणूक करण्यास विद्या हेंच मुख्य साधन होय. आपलें संभाषण खुलवून देण्यास विद्या ही फार उपयोगीं पडते. देशांतरीं विद्या ही आपल्या जिवलग मित्राप्रमाणें उपयोगीं पडते. विद्याध्ययनानें स्वाभाविक गुण पक्क होतात. व अनुभवानें विद्याध्ययन पक्क होतें. कारण उपजत बुद्धि ही आपोआप उगवलेल्या झाडाप्रमाणें होय. त्या झाडाची खच्ची करीत गेल्यानें तें जसें जामदार होतें; तद्वत् उपजत बुद्धीवर विद्येचें कलम फिरवीत गेल्यानें तीही बळकट होते.

मोत्यांची किंमत त्यांच्या पाण्यावर अवलंबून असते. जें मोतीं दोन तीन रुपयांस विकलें जातें, तेंच पाणीदार असलें तर त्याची किंमत दसपट वाढते. मोत्याप्रमाणेंच मनुष्याचेंही समजावें. मोत्याची किंमत ज्याप्रमाणें पाण्यावर अवलंबून आहे; त्याप्रमाणेंच मनुष्याची किंमतही त्याच्या ज्ञानावर अवलंबून आहे. कित्येक मनुष्यें विद्यार्जन करूनही ज्ञानांत भर टाकीत

नाहींत, त्यामुळें त्यांची किंमतही फारशी वाढत नाहीं. परंतु जे कित्येक विद्यार्जन करून ज्ञानसंपादन करितात त्यांची लोकांत मानमान्यता होते. लोकांना त्यांचा अभिमान वाटून ते त्यांचे एकसारखे गुणानुवाद गातात. पुष्कळ लोक त्यांच्या धोरणानें वागतात. त्यांचें दर्शन घेण्यास व बोधपर भाषणें ऐकण्यास फार आतुर असतात. ज्ञानी मनुष्यें मृत्यु पावलीं असतां सर्व लोक दुःखानें विव्हळ होतात. त्यांच्या स्मृतिसाठीं मोठमोठे फंड उभारण्यांत येऊन, त्यांचीं स्मारकें बांधण्यांत येतात. परंतु दुसरे कित्येक लोक—अशांची संख्या हजारांनीं किंवा लाखांनीं असावयाची—ते केव्हां जन्मतात ? कोठें राहतात ? केव्हां मरतात ? याची कोणी विचारपूस देखील करीत नाहींत. याचें कारण हेंच कीं, नुसत्या मनुष्याची मुळींच किंमत नसून त्याच्या ज्ञानाची किंमत आहे. **ज्ञानाविणा जी जी कळा, ती ती जाणावी अवकळा** ' असें जें एका कवीनें म्हटलें आहे तें यावरून सिद्ध होतें. ज्ञानाच्या योगानें कित्येक मनुष्यें देवपणा पावलीं आहेत. आपली योग्यता वाढविणें हें प्रत्येक मनुष्याच्या हातीं आहे. **मात्र स्वकष्टानें मनुष्याची जेवढी योग्यता वाढते, तेवढी दुसऱ्या कशानेंही वाढत नसते. ' नर करणी करे तो नरका नारायण होय. '** ही म्हण सुप्रसिद्धच आहे. हिची सत्यता जगांत श्रेष्ठपणा पावलेल्या सत्पुरुषांचीं सच्चरित्रें वाचलीं असतां सहज कळून येईल.

ज्ञानसंपादन करण्याचें सुलभ व उत्तम साधन म्हटलें म्हणजे वाचन हें होय. वाचनाच्या योगानें मनुष्यास जेवढें ज्ञान मिळवितां येतें तेवढें ज्ञान अन्य कोणत्याही साधनाच्या योगानें मिळवितां येत नाहीं. जें ज्ञान संपादन करण्यासाठीं पूर्वींच्या लोकांस वर्षानुवर्ष खपावें लागत असे, तें आपणांस हल्लीं सहज मिळवितां येतें. त्यांना जे ग्रंथ पाहण्यास देखील मिळत नसत, तेच अमोल ग्रंथ हल्लीं आपल्या सुदैवानें अगदीं सुलभ झाले आहेत. मात्र आपणांस वाचनाची अभिरुचि पाहिजे म्हणजे झालें. परंतु

**' आलस्यं हि मनुष्याणां शरीरस्थो महारिपुः '** मनुष्याच्या शरीराला आळस हा एक महान् रिपु आहे. व तो आमच्या लोकांच्या इतका हाडीं-मासीं खिळलेला आहे कीं, ह्या दुष्ट आळसानें आम्हांस पूर्ण ग्रासून टाकिलें आहे. परंतु पोटाची खळगी भरल्याशिवाय गत्यंतर नसल्यामुळें, आमचे लोक केवळ पोटासाठीं निरनिराळे उद्योग करीत असतात; नाहींतर त्यांनीं उद्योगच केले नसते.

कित्येक लोकांना वाटतें कीं थोडेफार शिकावें व मिळेल ती नोकरी धरावी; अगर वडिलोपार्जित चालत असलेला धंदा तसाच पुढें चालवावा. एवढें केलें म्हणजे आपली इतिकर्तव्यता संपली असें समजून, ते बाकी राहिलेला वेळ खुशाल गप्पा गोष्टींत, गंजिफा, बुद्धिबळें अगर ब्रिझिक खेळण्यांत, नाच, तमाशा, नाटकें व सिनेमा पहाण्यांत, झोंपा ठोकण्यांत अगर आळसांत विनदिक्कत घालवीत असतात. पैशापेक्षांही अमूल्य असा वेळ ते नित्यशः कितीतरी फुकट दवडीत असतात. खरोखर, आपल्या या अमोल जीवनाचा एक एक क्षण लाखों नव्हे क्रोडों मोहरांनीं पण खरेदी होऊं शकत नाहीं. एका सत्पुरुषानें म्हटलें आहे कीं, **काळ हा ईश्वर-निर्मित एक खजिना आहे. तास व घटका ह्या त्याच्या तिजोऱ्या आहेत. पळें व क्षण हीं त्याचीं मौल्यवान् हिरे आहेत,** अहाहा ! काय हें वेळेचें महत्त्व ! हें वेळेचें महत्त्व प्रत्येक मनुष्यानें सतत आपल्या डोळ्यांपुढें ठेवून, एक क्षणही व्यर्थ न घालविण्याचा कृतनिश्चय करावा. व तोच काळ त्यानें संसारांत रिकामपणाचे वेळीं कांहीं तरी एकादें सत्कृत्य करण्यांत, ईश्वरभजनांत अगर वाचनांत घालविल्यास किती तरी उत्तम होईल बरें !

---

## प्रकरण ५ वें.

# स्त्रियांचें आराध्यदैवत.

चित्रकूट पर्वतावरून रामलक्ष्मण सीतेसह प्रवास करीत असतां, अत्रि ऋषींच्या आश्रमास येऊन पोहोंचले. अत्रि ऋषि व त्यांची महातेजस्वी व परोपकारी बायको अनुसूया यांनीं त्या तिघांचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. अनुसूयेला तर आपली मुलगीच जणूं काय माहेरीं आली आहे असें वाटलें. सीतेनें नम्रपणानें सन्मानपूर्वक त्या तपस्विनी अनुसूयेला साष्टांग नमस्कार केला. तेव्हां अनुसूयेनें तिला आशीर्वाद दिला व आपल्या जवळ बसवून तिच्या पाठीवरून हात फिरवीत तिला पुढीलप्रमाणें उपदेश केला. अनुसूया म्हणाली—बाळे, तूं अल्पवयी असूनही स्त्रीधर्मास अनुसरून वागतेस, हें पाहून मला परमानंद होत आहे. मुली, **पति सदाचारशून्य असो कीं, परस्त्रीवर प्रेम करणारा असो, तो विद्वान् असो वा अशिक्षित असो, नगरांत राहणारा असो वा जंगलांत राहणारा असो, अनुकूल परिस्थितींत असो, वा प्रतिकूल परिस्थितींत असो, दुःशील असो वा सच्छील असो, श्रीमंत असो वा भिकारी असो; तरी देखील सुस्वभावी स्त्रिया त्याला प्रति-ईश्वररूप मानतात. व त्यास आपल्या प्रेमानें व भक्तीनें वश करून तो जरी दुर्वर्तनी असला तरी त्यास सद्वर्तनी बनवून सोडतात.**

स्त्रियांचें आराध्यदैवत म्हटलें म्हणजे त्यांचा पति हेंच होय. कारण स्त्रियांना सर्वांत प्रिय व अति जवळचा नातलग त्यांचा पति हाच होय. ह्यास्तव स्त्रीचा इहलोक, स्त्रीचा परलोक व स्त्रीचा मोक्षलोक ही स्त्रीची अमूल्य ठेव तिच्या पतिदैवताच्या चरणांतच सांठविलेली आहे. ती ठेव

ती पतिदैवतास अव्हेरून जर इतर दैवतास भजूं लागली तर ती तिला अन्य ठिकाणीं मुळींच मिळणार नाहीं. **स्त्री पतीच्या चरणामृतानें जशी शुद्ध होते, तशी दानधर्म अथवा शेंकडों उपवास व तीर्थाटणें करून देखील होत नाहीं.** सबब जी स्त्री पतीला प्रभुरूप मानून, आपलें आचरण पवित्र ठेविते व आपल्या पतीवर स्नेहभाव ठेवून मधुर भाषण करिते आणि सदा प्रफुल्लित मुखकमळ ठेवून आनंदाचा वर्षाव करिते; निरंतर पतिपरायण राहून पतीला हरप्रकारें प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न करिते; दुःखी घरालासुद्धां सुखी मानून घेते; ती स्त्री ह्या जगींसुद्धां पतिबरोबर स्वर्गीय सुख भोगून अंतीं मोक्षपद पावते. पतीच्या मर्जीनुरूप वागणें हाच खरा स्त्रीचा सर्वोत्तम असा अतुल सामर्थ्यसंपन्न व मोक्षदायक परमधर्म होय. **स्त्रियांना पतिदैवतासारखें अन्य श्रेष्ठ दैवत कोणतेंच नसल्यामुळें, त्यांनीं त्याच्या आज्ञेशिवाय उपोषण अगर कसलेंही व्रत करूं नये. केल्यास त्याचें कांहींच फळ लाभत नाहीं. फक्त ती आपल्या पतीची जी अनन्यभावें सेवा करिते, तिचे योगानेंच ती स्वर्गलोकीं पूज्य होते. म्हणून व्रत, नियम, जप, तप, मंत्र, तंत्र, कथा, पुराण, यात्रा, फार तर काय पण साक्षात् ईश्वरच्या मूर्ति या सर्वांपेक्षांही स्त्रीला पति-आज्ञा व पतिपूजन यांचीच किंमत अधिक श्रेष्ठपददायक आहे.** सबब जी स्त्री कायावाचामनें-करून आपल्या पतीची मनोभावें सेवा करिते ती या लोकींच नव्हे तर स्वर्गलोकीं देखील पूज्य होते. परंतु बाळे, जी स्त्री पतीस देवरूप न मानतां त्यास तुच्छ लेखते; त्याचा पदोपदीं अपमान करिते, त्याची आज्ञा न पाळतां, उलट त्यासच हुकूम फर्माविते; सौख्यसमयीं गोडगोड बोलून सुख भोगते व संकटसमयीं त्याचा तिरस्कार करून माहेरीं वास करिते; स्वतःचा सांभाळ व कल्याण करणाऱ्या पतीस कटुवचन बोलून त्याचें हृदय दुभंग करिते व जो स्वैरपणानें वागते तिच्या वांट्यास संसारांतील सर्व प्रेमसुख मुळींच येत नाहीं. शिवाय जननिंदेस पात्र होऊन ती अंतीं

रौरव नरकवास भोगते. ह्यासाठीं बाळे, तूं मनोभावें आपल्या पतीची सेवा कर, त्याचे मनास तिळभरही दुःख देऊं नकोस. त्यास प्रत्येक कार्यांत यथाशक्ति मदत करीत जा व त्याला सोडून कधींही दूर जाऊं नकोस, म्हणजे तूं सर्वांना प्रिय होशील.' हें ऐकून सीतेस परमानंद झाला व ती म्हणाली–' मातोश्री, तुम्हीं जो मला हा अमोलिक सदुपदेश केला त्याबद्दल मी आपली फार आभारी आहें. मीं आपला सदुपदेश माझ्या अंतःकरणांत सुवर्णाक्षरांनीं कोरून ठेवून त्याप्रमाणें सदैव वर्तन ठेवीत जाईन. मातोश्री, आपल्या सदुपदेशाचा थोडक्यांत सारांश म्हटला म्हणजे स्त्रीला नवरा कसाही मिळाला असला तरी तिनें त्याच्याशीं बेइमान होऊं नये. मग मला तर अनेक अलौकिक गुण अंगीं असलेले व सर्व लोकांना पूज्य, दयाळु, मनोनिग्रही, प्रेमळ व धर्मशील असे प्रभु रामचंद्र पति लाभले आहेत. तेव्हां त्यांच्यावर म्यां अत्यंत प्रेम व भक्ति ठेविली पाहिजे हें अगदीं उघड आहे. तसेंच तुम्ही जो सदुपदेश मला केलात तोच उपदेश मी वनांत जावयास निघाले असतांना माझ्या सासुबाईनीं मला केला. पुनः तोच उपदेश माझ्या मातोश्रीनें मी प्रथम सासरीं जावयास निघालें तेव्हां केला. त्यामुळें तो माझ्या अंतःकरणांत पूर्णपणें बिंबला आहे. तो मी केव्हांही बिसरणार नाहीं. मातोश्री, सती सावित्री पतिसेवा करून जशी स्वर्गामध्यें पूज्य होऊन बसली आहे, तशाच आपणही आपल्या तीव्र पतिभक्तीच्या योगानें स्वर्ग आपलासा करून ठेविला आहे.' हें सीतेचें भाषण ऐकून अनुसूयेला परमानंद झाला व तिनें शाबास म्हणून सीतेची पाठ थोपटली.

भगिनींनों ! जी स्त्री आपल्या पतीस प्रति–ईश्वररूप मानते व स्नान करून मनोभावें त्याच्या चरणोदकाचें तीर्थ नित्य प्राशन करिते; तसेंच त्याच्या आज्ञेंत राहून व इच्छेनुरूप वर्तन ठेवून त्याची एकनिष्ठपणें सेवा करिते ती आपल्या पतिभक्तीच्या बळावर कशी अतुल सामर्थ्यसंपन्न बनते ह्याविषयीं मी तुम्हांस एक गोष्ट सांगतों.

प्राचीन काळीं शर्याती नामें एक राजा होऊन गेला. त्यास सुकन्या

नामें एक सद्‌गुणसंपन्न कन्या होती. तिला बाळपणीं नीतिशिक्षण अति उत्तम मिळाल्यामुळें ती सर्वगुणसंपन्न निपजली. एके दिवशीं ती आपल्या सखीजनांसह अरण्यांत फिरत असतां, अति गर्द असलेल्या वेलींची एक मोठी गुंफा तिच्या नजरेस पडली. बारकाईनें न्याहाळून पाहतां, तींत एकादा वनचर क्रूरपशु लपलेला असावा असें वाटल्यावरून, तिनें आपल्या ह्यातांतील भाल्याचें टोंक हळुच त्या गर्द वेलींत खुपसलें. तिच्या कल्पने-प्रमाणें तें भाल्याचें टोंक रक्तानें माखून आलें, परंतु तेथें कोणत्याही प्रकारची हालचाल दिसून आली नाहीं. सबब तिला संशय येऊन तिनें आपल्या सखीजनांस त्या वेली छाटून काढण्याची आज्ञा केली. त्यांनीं त्या वेली छाटतांच, आपण लीलेखातर सहजगत्या केलेल्या गमतीमुळें, तपश्चर्येस बसलेल्या एका वृद्ध तपस्व्याच्या डोळ्यांच्या खांचा होऊन, त्यांतून रक्तस्राव होत असलेला तिच्या दृष्टीस पडला. हा विपरीत प्रकार पहातांच तिच्या छातींत एकदम धस्स झालें. व तिची कोमल तनु शापाच्या भयानें थरथर कापूं लागली. परंतु धैर्य धरून तिनें त्या तपस्व्याची योग्य शुश्रूषा केली व प्रथम त्यास शुद्धीवर आणिलें. नंतर करुणाजनक मधुर भाषणानें त्यास खरा वृत्तांत निवेदन केला. तिची भयप्रद स्थिति व निर्मळ अंतःकरण पाहून त्यास तिची दया आल्यामुळें, तो तीस कांहीं एक बोलूं शकला नाहीं. त्यायोगें सुकन्येस धीर येऊन, तिनें त्यास मेण्यांत बसवून घरीं नेलें. घरीं येतांच प्रथम तिनें आपल्या आईबापांस वंदन केलें. नंतर आपल्या हातून घडलेल्या थोर अपराधाविषयीं इत्थंभूत हकीकत निवेदन केली. शेवटीं तिनें त्याचें योग्य प्रायश्चित्त म्हणून त्या वृद्ध तपस्व्याबरोबर आपला विवाह करण्याचा हेतु प्रदर्शित केला. तो ऐकून तिच्या आईबापांस अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं तिची परोपरीनें समजूत घालून पाहिली, परंतु ती आपला दुराग्रह मुळींच सोडिना तिचा एकच आग्रह कीं, माझ्या हातून अशा वृद्धावस्थेंत यांच्या डोळ्यांच्या खांचा झाल्या असतां, त्यांना परम दुःखांत लोटून, म्यां चांडाळणीनें त्याविषयीं जराही काळजी न वाहतां, यथेच्छ

सुखोपभोग भोगावे, ह्यासारखें निंद्यकृत्य मला कोणतेंच भासत नाहीं. अशा अंधत्वाच्या दुःखांत त्यांनीं आपलें उरलेलें आयुष्य कसें बरें कंठावें ? धर्मपत्नीशिवाय त्यांची योग्य शुश्रूषा कोण बरें करूं शकेल ? सबब त्यांना झालेल्या दुःखाचें थोडें तरी परिमार्जन करून त्यांना इतर बाबतींत तरी पूर्ण सुखी करून सोडावें, एवढ्याचसाठीं मी त्यांची धर्मपत्नी होऊन स्त्रीधर्मानुसार परमपूज्य अशा पतिदैवताची मनोभावें सेवा करण्याचें मीं निश्चित केलें आहे. हा कृतनिश्चय मी प्राणान्तींही सोडणार नाहीं. असा तिचा दुराग्रह पाहून, फारसे आढेवेढे न घेतां तिच्या आईबापांनीं त्या वृद्ध तपस्व्याबरोबर तिचा यथाविधि विवाह करून दिला. तेव्हांपासून ती आपल्या पतिदैवतास जराही न विसंबतां, कायावाचामनेंकरून त्याची रात्रंदिवस सेवा करूं लागली. तिची अमर्याद पतिभक्ति पाहून कामदेव व रतिदेव हे मानवरूपानें भूलोकीं आले व त्यांनीं तिची शक्य ती कसोटी घेऊन पाहिली. ती कसोटीस पूर्ण उतरलेली पाहून त्यांना परमानंद झाला. त्यांनीं तिच्या इच्छेनुसार तिच्या पतीस दिव्य दृष्टि देऊन संतुष्ट केलें; एवढेंच नव्हे, तर तिच्या पतीस तिच्या योग्य असा तारुण्याचा व मदनाचा दिव्य पुतळा बनवून तिच्या स्वाधीन केलें. अहाहा ! काय हा पतिभक्तीचा अगाध महिमा ! काय हें पतिभक्तीचें अतुल सामर्थ्य ! धन्य धन्य ती सती सुकन्या ! जिनें राज्यसुखावरच नव्हे तर नरदेहांत अत्यंत प्रिय अशा विषयसुखावरही लाथ मारून, त्याचा त्याग केला व वृद्ध तपस्व्याबरोबर विवाह करून, आपल्या एकनिष्ठ पतिभक्तीच्या तपोबलावर देवांना प्रसन्न करून, पतिभक्तीचा अगाध महिमा जगाच्या निदर्शनास आणून दिला ! अहाहा ! खरोखर, अशा माउलीचें जेवढे गुणानुवाद गावे तेवढे थोडेंच भासतात.

ह्यास्तव प्रिय भागिनींनों ! तुम्हीं सुकन्येप्रमाणें आपलें आचरण पवित्र ठेवून, पतिभक्तीच्या तपोबलावर सामर्थ्यसंपन्न बनण्याचा प्रयत्न कराल तर तुमचीही कीर्ति दिगंतरीं पसरून, त्यायोगें तुम्हींही अजरामर कीर्तिरूपानें जिवंत रहाल यांत तिळप्राय संदेह नाहीं.

## प्रकरण ६ वें.

# गृहदेवता.

ज्याप्रमाणें स्त्रियांना पतिदैवतासारखें अन्य आराध्यदैवत कोणतेंच श्रेष्ठ नाहीं; तद्वत् मनुष्यांना आपल्या गृहदेवतेसारखा ( स्वस्त्रीसारखा ) अन्य जिवलग मित्र कोणताच नाहीं. कारण भार्या ही पतीच्या सर्व सुखदुःखांची पूर्ण वांटेकरी आहे. ह्यास्तव मनुष्यानें स्त्रीची योग्यता हलक्या दर्जाची न लेखतां तिचा आपल्या एकाद्या सन्मित्राप्रमाणें उत्तमप्रकारें मानसन्मान ठेवीत जाऊन, तिच्याशीं अगदीं निष्कपटप्रेमानें वागत जावें. मग आपल्या दैवयोगानें **ती सुशिक्षित असो वा अशिक्षित असो, काळी असो वा गोरी असो, सुरूप असो वा कुरूप असो, तरी देखील तिला आपली गृहदेवता मानावी. कारण पति हा जसा पत्नीचा देव आहे तशीच पत्नी ही आपली साक्षात् प्रतिगृहदेवता- गृहलक्ष्मीच आहे असें पतीनें कां मानूं नये?** शिवाय पाणिग्रहण- समयीं देव, ब्राह्मण, अग्नि, सूर्य इत्यादिकांसमक्ष आपण तिचें करग्रहण केलें असून, तिच्या सुखदुःखांविषयीं, पालनपोषणाविषयीं व कोणत्याही स्थितींत तिला समभावानें वागवून आनंदी ठेवण्याविषयीं जी प्रतिज्ञा केली आहे, ती कोणीही विसरतां कामा नये. '**न भार्याः परमं सुखं**' या वाक्या- वरून भार्येसारखें अनुपमेय सुख या जगांत कोणतेंच नाहीं, हें सिद्ध होतें. सबब प्रत्येक मनुष्यानें आपल्या गृहदेवतेवर अलोट व निर्व्याज प्रेम करून, प्रथम तिचें मन आपणाकडे आकर्षण करून घेण्यासाठीं, तिच्याशीं गोडी- गुलाबीनें वागून तिची प्रत्येक इच्छा तृप्त करीत जावी. स्त्रीचें अंतःकरण जात्याच कोमल असल्यामुळें, वेळप्रसंगीं तिजकडून एकादा प्रमाद घड- ल्यास, सौम्य शब्दांनीं तिची समजूत घालावी. परंतु तिच्या कोमल मनास

धक्का बसेल असें वर्तन केव्हांही करूं नये. तिच्या कोमल मनावर कठोरतेचे एकसारखे आघात करीत गेल्यास, तें साफ कोमेजून जाईल. व त्यायोगें तिच्या सदय अंतःकरणांत आपणाविषयीं वहात असलेला प्रेमाचा झरा आटून जाईल. व असें झालें म्हणजे आपल्या सुखमय संसाराची माती होऊन, तो दुःखमय झाल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं. सबब प्रत्येक मनुष्यानें स्वस्त्रीला शिवीगाळ देऊन अगर मारहाण करून तिचें कोमल मन केव्हांही दुखवूं नये, किंवा तिला कोंडून ठेवून अगर उपासमार करून अगर अन्य तऱ्हेनें तिचा छळ करून, तिचें अंतःकरण जाळूं नये.

**न कश्चिद्योषितः शक्तः प्रसह्य परिरक्षितुम् ॥**
**एतैरुपाययोगैस्तु शक्यास्ताः परिरक्षितुम् ॥** मनु. ॥

कोणताही मनुष्य बलात्कारानें स्त्रियांचें रक्षण करूं शकत नाहीं. उलट अशा प्रकारच्या गांजणुकीनें त्यांचीं कोमल मनें कलुषित होऊन, त्यांच्या सदय अंतःकरणांत पतिविषयीं वसत असलेली सद्भावना नष्ट होते. व एकदां का ही सद्भावना नष्ट होऊन, त्यांच्या पवित्र अंतःकरणांत अशा विपरीत भावना काहूर माजवूं लागल्या, म्हणजे अशा स्त्रीसमागमापासून पुरुषांस सुख मिळणें एके बाजूस राहून, उलट असह्य दुःख मात्र भोगावें लागतें. त्यापेक्षां आपल्या धर्मपत्नीचें प्रेम संपादन करण्यासाठीं पतीनें प्रसंगानुसार तिच्या रूपाची, नीटनेटकेपणाची, आवडी निवडीची खूप प्रशंसा करावी. कारण असें केल्यानें तिला खरोखरच एक प्रकारचें सुख होऊन, तिचें अंतःकरणांत आपणाविषयीं पूज्यभाव प्रगट होतो. **धर्मपत्नीशीं गोड गोड शब्द बोलण्यापासून आपणांस कांहीं खर्च येतो असें मुळींच नाहीं.** धन्यानें चाकरानें केलेल्या योग्य कामाबद्दल जर त्यास शाबासकी दिली तर त्या चाकरास केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला मिळाला असें वाटून त्याला एक प्रकारची धन्यता वाटते; तद्वत् धर्मपत्नीनें केलेल्या गृहकृत्याबद्दल पतिराजानें जर त्याचें थोडें कौतुक केलें तर गृहांतील गृहलक्ष्मीस एक प्रकारचा आनंद होऊन तिचा हुरूप द्विगुणित होतो. हा हुरूप ज्यायोगें अधिक वाढेल असे प्रसंग आले

तर ते व्यर्थ न दवडितां त्यांचा पतिराजानें अवश्य फायदा घ्यावा. तसेंच पतीनें आपल्या पत्नीस योग्य वळण लावण्यासाठीं, उभयतां आनंदांत असतांना, तिला रामायण, महाभारत, भागवत वगैरे बोधप्रद ग्रंथ अगर बोधप्रद चरित्रें स्वतः वाचून दाखवीत जावीं. अशा तऱ्हेनें पतीनें पत्नीशीं वर्तन ठेंवल्यास त्याचा परिणाम पतिपत्नींना समरस करण्यांत खात्रीनें झाल्यावांचून राहणार नाहीं.

फारच थोड्या वर्षांपूर्वीं तुकाराम महाराज म्हणून एक महान् साधुपुरुष होऊन गेला. त्याच्या स्त्रीचें नांव जिजाई असून, तिचें आपल्या पतीवर अनिवार प्रेम होतें. परंतु ती बोलून चालून महाखाष्ट स्वभावाची असल्या-मुळें, तिला आपल्या प्रिय पतीस प्रसंगानुसार नानातऱ्हेचे वाग्बाण हाण-ण्याचा प्रसंग वारंवार येई. परंतु साधुवर्य तुकाराम महाराज त्या त्या वेळीं आपली मनोवृत्ति यत्किंचितही ढळूं न देतां अगदीं शांत ठेवीत असत. मात्र तिच्या तोंडाच्या तोफेंतून निघणाऱ्या शब्दरूपीं गोळ्यांचा अनिवार भडिमार पाहून, ते किंचित् हंसत असत. व 'खुळीरे खुळी! आपण होऊन प्रपंचाचे निखारे पदरीं बांधून घेते, व मग उगीच तळमळ करीत राहते.' असें म्हणून गप्प बसत असत. परंतु ते तिजवर केव्हांही तोंडसुख घेत नसत. अगर रागावत देखील नसत. जिजाईची ही तेवढी रागाची वेळ निघून गेली, म्हणजे ती पुनः आपल्या गृहकृत्यांत दंग होऊन जाई व आपल्या संसाराचा गाडा मोठ्या धीरानें चालवी. असें करितां करितां बरेंच दिवस निघून गेले. परंतु पुढें तुकाराम महाराजांनीं आपला दिनक्रम निराळाच आंखून टाकिला. देहूच्या पश्चिमेस सुमारें तीन कोसांवर भांडार नांवाचा एक डोंगर आहे. त्या डोंगरावर जाऊन, ते एकाद्या निवांत स्थळीं वसूं लागले. तेथें देवादिकांचीं आणि संतांचीं पदें व अभंग रचण्यांत अगर ईश्वरभज-नांत आपला सर्व काळ ते घालवूं लागले. एकदां का ते आत्मचिंतनांत गर्क झाले म्हणजे पांच पांच सात सात दिवस त्यांना खाण्यापिण्याचें देखील भान रहात नसे. परंतु बिचाऱ्या जिजाईस मात्र या दिनक्रमापासून अत्यंत

कष्ट पडूं लागले; कारण पतीस भोजन घातल्याशिवाय स्वतः अन्नग्रहण करूं नये असा तिचा नित्यक्रम होता. सबब ती दररोज कांहींतरी अन्न तयार करून व शिदोरी बरोबर घेऊन, उन्हातान्हांतून, खड्याकांट्यांतून व रानावनांतून आपल्या प्रिय पतीचा माग काढीत हिंडत असे. एकदां ती आपल्या नित्यक्रमाप्रमाणें शिदोरी घेऊन जात असतां, तिच्या सकुमार पायांस करवंदीचा एक मोठा कांटा रुतला. दुपारची वेळ, तशांत भुकेनें प्राण कासावीस झालेला, चालण्याचे श्रम झालेले व पायांत आरपार कांटा बोंचलेला अशा कठिणावस्थेमुळें, तिला मूर्च्छा येऊन ती तत्काळ जमिनीवर पडली. अशा स्थितींत तिला एका वाटसरानें पाहिलें; तेव्हां त्यानें तिच्या मुखांत पाणी घालून तिला सावध केलें. नंतर कांहीं वेळानें ती शिदोरी घेऊन, आपल्या प्रिय पतीजवळ लंगडत लंगडत आली, व तिनें आपल्या प्रिय पतीस झालेलें सर्व वर्तमान इत्थंभूत कळविलें. ती हृदयविदारक हकीकत श्रवण करून व आपल्या स्त्रीस असह्य त्रास झालेला पाहून, तुकाराम महाराजांना अत्यंत वाईट वाटलें. व तेव्हांपासून त्यांनीं गांवांतच राहण्याचा कृतनिश्चय केला. पहा ! काय ही धर्मपत्नीविषयीं सहानुभूति !

खरोखर, प्रत्यक्ष आपल्या धर्मपत्नीच्या मुखांतून कर्णकठोर अशा शब्दांचा भडिमार चालू असतां, साक्रेटीस व तुकाराम महाराज यांच्याप्रमाणें ज्यांच्या मनोवृत्तींत यत्किंचितही बदल न होऊं देण्याचें मनोधैर्य असतें असे सत्पुरुष धन्य होत. तद्वतच ज्यांच्या घरांत चिमणीलाही दाणा मिळायची मोठी मारामार पडते व जेथें प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यांचें देखील खाण्यापिण्यापासून नित्यशः भयंकर हाल होतात; अशा कंगाल पतीच्या सहवासांतही स्वर्गीय सुख मानून, जिजाईप्रमाणें ज्या स्त्रिया आपलें जीवन सार्थ करून घेतात त्याच खऱ्या गृहदेवता समजाव्या.

## प्रकरण ७ वें.

# पातिव्रत्यप्रभाव.

पतिं या नाभिचरति मनोवाग्देहसंयता ॥
सा भर्तृलोकमाप्नोति सद्भिः साध्वीति चोच्यते ॥ मनु. ॥

**मन, वाणी व शरीर यांच्यायोगानें जी स्त्री कायिक, वाचिक व मानसिक क्रियांच्या योगानें आपल्या पतीस सोडून, परपुरुषाबरोबर रत होण्याची इच्छा आपल्या पवित्र मनास केव्हांही शिवूं देत नाहीं तीच खरी पतिव्रता स्त्री जाणावी.** जी स्त्री पतिव्रताधर्माप्रमाणें वागून आपल्या पतीची एकनिष्ठपणें सेवा- चाकरी बजाविते, तिचे ठिकाणीं '**कर्तुमकर्तुं अन्यथा कर्तुं**' अशी अद्वितीय शक्ति गुप्तरूपानें वास करीत असते. अग्निसूर्यापेक्षांही पतिव्रता स्त्रीचें तेज अधिक प्रखर असतें. पतिव्रता स्त्रीपुढें मोठमोठ्या योगी जनांची व तपस्वी जनांचीही मति गुंग होऊन जाते व काळही तिला थरथरां कापूं लागतो, मग इतरांचा काय पाड! पतिव्रता स्त्रीच्या पुण्यप्रभावानें पापात्मेदेखील पुण्यवान् बनून मोक्षपद पावतात. म्हणून स्त्रीला पातिव्रत्या- पेक्षां कशाचीही थोरवी कमीच आहे. व्याघ्रसिंहासारख्या क्रूर पशूंनीं शरीर- विदारण करून प्राणहानि केली असतां एकदांच काय त्या यातना होऊन इहलोकींच्या सर्व सुखदुःखांपासून एकदम सुटका होते. परंतु शील भ्रष्ट झालें असतां पतिव्रतेच्या मनास एकप्रकारचा हृद्रोग लागून, ती त्यायोगें झुरून झुरून मृत्यु पावते. ह्यास्तव पतिव्रता स्त्री आपलें शील भ्रष्ट न होऊं देण्या- विषयीं जिवापाड जपत असते.

स्त्रियांच्या पातिव्रत्यरक्षणासंबंधीं जे कांहीं नियम घालून दिले आहेत; त्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचा व लक्षांत ठेवण्याजोगा नियम म्हटला म्हणजे

**'कुलीन स्त्रीनें परपुरुषाचा शक्य तोंपावेतों आपल्या पवित्र देहास स्पर्श न होऊं देणें व त्याच्याशीं जितकें फटकून वागतां येईल तितकें वागणें हा होय.** हा नियम जी स्त्री कडक रीतीनें पाळील, तिचें कुमार्गांत चुकूनही वांकडें पाऊल पडणार नाहीं, हें नक्की समजावें. ह्या बाबतींत आर्य स्त्रियांना सीतादेवीचें उदाहरण आदर्शभूत होय. सीतादेवी लंकाधिपाति जो रावण, त्याचे बंदिखान्यांत असतांना, जेव्हां हनुमान् सीतादेवीच्या शोधार्थ अशोकवनांत आला; तेव्हां त्यानें सीतादेवीबरोबर बराच वेळ भाषण केलें. नंतर रामानें दिलेली मुद्रिका दाखवून, मी श्रीरामचंद्र प्रभूचा स्वामिभक्त दूत असल्याची सीतादेवीची पूर्ण खात्री करून दिली. सीतादेवीची शंका निरसन झालेली पाहून हनुमान् म्हणाला, 'मातोश्री, तुम्हीं माझ्या स्कंधावर आरूढ व्हा म्हणजे मी उड्डाण मारून अति अल्पकाळांतच श्रीरामचंद्र प्रभूच्या चरणांजवळ तुम्हांस नेऊन पोहोंचवितों. मी तुम्हांस यत्किंचित्ही इजा होऊं देणार नाहीं' ह्यावर सीतादेवीनें प्रत्युत्तर केलें कीं, 'तुझ्या म्हणण्याप्रमाणें वागलें असतां शत्रूच्या जाचांतून मी मुक्त होईन हें जरी उघड आहे; तरीपण कसेंही झालें तरी तूं 'परपुरुष' आहेस! परपुरुषाला मी प्राणान्तींही स्पर्श करणार नाहीं. मग तूंच सांग बरें! तुझ्या स्कंधावर मी कशी आरूढ होऊं? तूं प्रभु रामचंद्राचें कुशल वर्तमान मला कळविलेंस, एवढ्यानेंच मला परमानंद झाला आहे. आतां तूं एवढेंच कर कीं, प्रभु रामचंद्रास माझें कुशल वर्तमान कळवून, त्यांना लंकेस घेऊन ये. मग त्यांच्या करवीं दुष्ट रावणाचा संहार करवून माझी मुक्तता करीव. एवढें कार्य त्वां तडीस नेलें म्हणजे तूं आपली स्वामिसेवा उत्कृष्ट रीतीनें बजावल्यासारखें होईल.'

भागिनींनो! सीतादेवी बंदिवासाचे खडतर कष्ट सोशीत असतां, व त्यांतून बंधमुक्त व्हावयाची अनायासें सुसंधि प्राप्त झाली असतां, केवळ 'परपुरुषाचा स्पर्श' म्हणून तिनें अशी अमोल संधि व्यर्थ गमविली. ह्यावरून सीतादेवीचें पावित्र्य किती उज्ज्वल होतें हें स्पष्ट दिसून येतें.

पातिव्रत्यरक्षणासाठीं चितोडच्या राणी पद्मावतीनें व हजारों रजपूत स्त्रियांनीं धगधगणाऱ्या प्रचंड अग्निकुडांत मोठ्या आनंदानें प्रवेश करून घेतला; परंतु आपलें पातिव्रत्य दुष्ट यवनांपासून भ्रष्ट होऊं दिलें नाहीं. कित्येक स्त्रियांनीं शीलसंरक्षणासाठीं प्रसंगोपात् प्रिय बाळकांचें बळिदान दिलें आहे; तर कित्येक स्त्रियांनीं सर्वस्वावर पाणी सोडून स्वतःच्या प्राणांचे आत्मघात करून घेतले आहेत, परंतु आपल्या पवित्र शीलास बट्टा लागूं दिला नाहीं. अहाहा! काय हा अभिमान! **खरोखर, स्त्रियांनीं इतर वस्तूंचा नाहक अभिमान बाळगण्यापेक्षां पातिव्रत्याचा अभिमान बाळगणें हजारों नव्हे लाखों पटीनें श्रेष्ठ आहे. अधिक भूषणावह आहे.** पातिव्रत्याचा अभिमान होता म्हणूनच त्याचे बळावर अनुसूयेनें ब्रह्मा, विष्णु व महेश यांना तत्काळ तान्हीं बालकें बनविलीं. गांधारीनें आपल्या शापानें यदुवंशाचा लय केला. सीमंतिनीनें नराच्या नारी केल्या. सीतेला परगृहवासाचें जें दूषण लागलें होतें, त्याचें परिमार्जन करण्यासाठीं सर्वांसमक्ष तिनें जळत्या चितेंत उडी घातली, परंतु त्या चितेंत ती भस्म न होतां, उलट दिव्य कांतिसह वर आली. सावित्रीनें साक्षात् यमधर्म राजास कुंठित करून एकामागून एक असे पांच वर मागून घेतले. पहिल्या वरांत सासऱ्यास दिव्यदृष्टि, दुसऱ्या वरांत स्वतःचें नष्ट झालेलें राज्य, तिसऱ्या वरांत पित्यास बळवान् पुत्रप्राप्ति, चौथ्या वरांत युक्तीनें स्वतःस पुत्रप्राप्ति मागून घेतली. त्यामुळें पांचव्या वरांत यमास सत्यवानाला सजीव करणें भाग पडलें. तसेंच सुकन्येनें आपल्या पातिव्रत्याच्या बळावर कामदेवास प्रसन्न करून, स्वतःच्या पतीची नष्ट झालेली दिव्यदृष्टि परत मिळविली. एवढी पतिव्रता स्त्रीच्या अंगांत एकप्रकारची दिव्यशक्ति गुप्तरूपानें वास करीत असते. पतिव्रता स्त्री आपले दोन्हीं वंश पावन करिते. पतिव्रता स्त्रीच्या चरणस्पर्शानें भूदेवी स्वतःस धन्य मानते. पतिव्रता स्त्रीवर सूर्यप्रकाश पडला म्हणजे भगवान् सूर्यनारायण आपल्या प्रकाशाचें सार्थक झालेसें मानतो. पतिव्रता स्त्रीच्या स्पर्शानें वायु आपणास कृतकृत्य म्हणूं लागतो. भागीरथी-

सारखी पतितपावन गंगा पातिव्रतेच्या स्नानानें पवित्र झालीसें मानते. हा सर्व कशाचा प्रभाव बरें! हा सर्व त्यांच्या दिव्य शीलाचा प्रभाव होय. जी स्त्री जन्मास येऊन पतिव्रता नव्हे तिचें जिणें धिक् होय. ती जिवंत राहण्यापेक्षां मेलेली काय वाईट! पतिव्रता स्त्री आपल्या दिव्य शीलाच्या अद्भूत प्रभावानें प्रत्यक्ष सूर्यनारायणाचीही गति कशी कुंठित करिते हें खालीं दिलेल्या उदाहरणावरून सहज कळून येईल.

एक महान् पतिव्रता स्त्री, दुराचरणामुळें महारोगी बनलेल्या आपल्या पतीला, स्वतःच्या पाठीवरून वाहून नेत असतां, त्याचा पाय त्याच मार्गानें जाणाऱ्या एका तपस्व्यास लागला. तत्काळ तपस्व्यानें त्याला “ हे पापात्म्या! तुझी अपवित्र लाथ मला लागली, म्हणून तूं सूर्योदयापूर्वींच मरण पावशील, ” असा शाप दिला. सतीनें मागें वळून पाहिलें व नम्रपण म्हणाली, ‘महात्मन्! पाय न जाणतां लागला, अतएव क्षमा असावी.’ छे, छे, शाप अन्यथा होणार नाहीं. ’ यावर सती म्हणाली, ‘ ठीक आहे. काय, आपण सूर्योदय होण्यापूर्वीं मृत्यु येईल म्हणतां! बरें आहे मी पाहतें आतां सूर्य कसा उगवतो तें? भो भास्कर! खबरदार आहे माझे आज्ञेवांचून उगवलास तर! ’ असें म्हणून ती सती पतिसह घरीं निघून गेली. इकडे सूर्य सतीच्या शापाच्या भीतीनें खरोखरच उगवेनासा झाला. जिकडे तिकडे अंधःकार व हाहाःकार माजला. शेवटीं ब्रह्मदेव सतीजवळ येऊन नमस्कार करते झाले. आणि म्हणाले, ‘ मातोश्री, सूर्याला किमर्थ आडविलें आहे? सूर्यावांचून त्रैलोक्य फिकें व पिवळें पडत चाललें आहे. ’ सतीनें अडविण्याचें कारण सांगतांच, ब्रह्मदेव त्या तपस्व्याकडे गेले; पण तपस्वीही आपला शाप माघारी घेईना. शेवटीं ब्रह्मदेवानें सतीच्या पतीस पुनः रोगरहित व सद्गुणी अर्थात् नूतनदेही बनविण्याची तोड काढून, उभयतांचेंही समाधान केलें. आणि अशाप्रकारें सतीपासून सूर्याची सुटका करवून घेतली. अहाहा! केवढी ही सतीची सत्ता! धन्य आहे अशी माउली!

—मनोवांछित संतति

आजन्म पातिव्रत्य पाळून पतीची एकनिष्ठपणें सेवा करणाऱ्या सती स्त्रियांची थोरवी गावी तेवढी थोडीच होणार आहे ! सीता, तारा, द्रौपदी, अहल्या, अनुसूया, दमयंती, सावित्री, सुकन्या, गांधारी, राणी दुर्गावती, अर्गळची राणी, शिवाजीची माता जिजाबाई इत्यादि महान् पतिव्रता स्त्रियांचीं सच्चरित्रें किती बोधप्रद व हृदयंगम आहेत ? तीं वाचून किंवा ऐकून त्यांच्या पवित्र आचरणाचा ठसा आपल्या हृत्पटलावर कोरून, तदनुसार आचरण ठेवण्याचा प्रयत्न आमच्या आर्यभगिनींकडून झाल्यास किती उत्तम होईल बरें! परंतु अत्यंत खेदाची गोष्ट म्हटली म्हणजे वर वर्णन केलेल्या सती स्त्रियांचीं सच्चरित्रें वाचून किंवा ऐकून, त्यांपासून आपणांस घेण्यासारखा योग्य बोध कोणता ह्याचा विचार आमच्या आर्यभगिनींनीं जसा करावयास हवा तसा त्या मुळींच करीत नाहींत. त्या बहुतेक उजव्या कानानें श्रवण करितात व डाव्या कानानें सोडून देतात. शिवलीलामृतांतील सिमंतिनी व शारदाख्यान कित्येक स्त्रियांच्या इतकें मुखोद्गत झालेलें असतें कीं, स्नान होतांच त्या शिवलीलामृत हातीं घेतल्याशिवाय त्यांतील ओंव्या क्रमशः एकामागून एक भराभर म्हणत सुटतात. परंतु व्यवहारांत त्यांचें वर्तन पाहूं गेलें असतां, अगदींच विरुद्ध दिसून येतें. तरी ज्या आर्यभगिनी आपल्या भागवतादि धर्मग्रंथांत व पोथ्यापुराणांत वर्णन केलेल्या सती स्त्रियांचा आदर्शनीय कित्ता सतत डोळ्यांपुढें ठेवून, तदनुरूप आपलें वर्तन ठेवूं लागतील व आपल्या मनोहर सान्निध्यानें व मधुर भाषणानें पतीच्या चंचल वृत्तींस स्थिरावून सोडतील, त्यांनींच खरें स्त्रीकर्तव्य बजावल्याप्रमाणें होऊन, त्याच स्त्रिया 'पतिव्रता' या नांवास विशेष शोभतील.

स्त्री व पुरुष या दोघांनाही शीलाची सारखीच आवश्यकता आहे. सुशील व सुकीर्ति मिळविण्यासाठीं उभयतांनाही प्रथम बराचसा त्रास सोसावा लागतो. '**टाकीचे घाव सोसल्यावांचून देवपण प्राप्त होत नाहीं.**' असें म्हणतात तें अक्षरशः खरें आहे. कारण टाकीचे घाव बस.

नांना जर एकादी मूर्ति भंग पावली तर तिची स्थापना कोणीही करीत नाहीं.

म्हणून स्त्रीपुरुषांनीं आपलें पाऊल बांकडें पडूं न देण्याची अगदीं प्रथमपासून विशेष खबरदारी घेत जावी. कारण मनुष्यस्वभाव असा विचित्र आहे कीं, त्याचें पाऊल एकदां घसरलें म्हणजे आणखी घसरून अधोगामी होण्यासाठीं, त्याच्या मनाचीही तयारी होत जाते. अशाप्रसंगीं कुमार्गांत शिरतांना मनुष्याच्या पायास जर एकादा मोठा कांटा बोंचला तर त्याचे अंतःकरणांत विवेक जागृत होतो, आणि तो तात्पुरता मागें परतण्याचा प्रयत्न करितो. परंतु जर मध्येंच ठेंच लागली नाहीं किंवा ठेंच लागूनही शहाणपण घेतलें नाहीं, तर तो अधोमार्गाच्या थेट पायथ्यापर्यंत सारखा घसरत जातो व अखेर पश्चात्तापास कारणीभूत होतो. सबब स्त्रीपुरुषांनीं प्रथमपासूनच आपलें पावित्र्य उज्ज्वल ठेवून तें भंग न होऊं देण्याची शक्य ती काळजी घेतल्यास, त्यांना पश्चात्ताप करण्याची पाळी केव्हांही येणार नाहीं.

---


## आगीच्या विम्याचीं कामें.

आमचेकडे आगीच्या विम्याची सर्व प्रकारचीं कामें उत्तम तऱ्हेनें व स्वस्त दरांत करून देऊन शक्य तितके लवकर क्लेमचे रुपये कंपनीकडून मिळवून दिले जातात.

पत्ता—एजंट **वामन माधव सराफ.**
फैजपूर, पूर्व खानदेश.

[stamp]

# प्रकरण ८ वें.

## एकपत्नीव्रत.

स्त्रियांनीं आपलें पातिव्रत्य रक्षण करणें हें जसें त्यांचें श्रेष्ठ कर्तव्य आहे; तद्वतच पुरुषांनीं कडकडीत एकपत्नीव्रत पाळून आपल्या पवित्र देहास परस्त्रीचा स्पर्श न होऊं देणें हें त्यांचें आद्य कर्तव्य आहे. श्रीशिवाजी महाराजाप्रमाणें किंवा साधुवर्य तुकाराम महाराजांप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें एकपत्नीव्रतस्थ रहावें. एकपत्नीव्रतानें वागणाऱ्या मनुष्याचें स्वस्त्रीवर जसें वजन पडतें, तसें जे सतत परस्त्रीगमन करणारे असतात, त्यांचें वजन कधींही पडत नाहीं. ते मोठे शूर असोत, ऐश्वर्यवान् असोत, राजे असोत, महाराजे असोत; सार्वभौम बादशहा असोत वा मदनाचे दिव्य पुतळे असोत, त्यांची स्वस्त्रीजवळ नापत झाल्यावांचून केव्हांही राहात नाहीं. उघडच आहे. जसें स्त्रियांचें तसेंच पुरुषांचें. व्याभिजारिणी स्त्री कितीही रूपवती असली, मोठी गुणवती असली, तरी एकाद्या साध्या भोळ्या पण पतिव्रता स्त्रीचें जसें एक प्रकारचें तेज पडतें, तसें तिचें मुळींच पडत नाहीं. हीच स्थिति पुरुषालाही लागू होते. हल्लीं कित्येक लोक शास्त्र सांगतांना लोकांना 'पर स्त्री मातेसमान' गणावी असा सदुपदेश करीत असतात. परंतु तेच प्रसंग पडला असतां, 'पर स्त्री, पराची माता' अशी मनाची समजूत करून बेधडक जारकर्म करण्यास प्रवृत्त होतात, ह्या त्यांच्या निंद्य आचरणास काय म्हणावें हेंच समजत नाहीं. **जारकर्म करण्याचे बाबतींत स्त्रियांना दोष देण्यापेक्षां पुरुषांनाच दोष देणें अधिक श्रेयस्कर होय.** कारण स्त्रीजातीचे ठिकाणीं ईश्वरानें लज्जा ही एक अप्रतिम चीज ठेविली आहे. तिच्या योगानें स्त्रीच्या मनांत कितीही कामेच्छा प्रबळ झाली,

तरी ती आपण होऊन शरीर विटाळून घेण्यास केव्हांही तयार होत नाहीं. परंतु पुरुषांचीच कामेच्छा अनावर होऊन, त्यांचे कडून परस्त्रीशीं प्रथम बोलणें, चालणें, डोळे मिचकावणें, थट्टामस्करी करणें इत्यादि प्रकार घडून येत असतात. असे प्रकार तुम्हांला शेंकडा नव्वद गोष्टींत आढळून येतील. ह्यावरून पाहूं गेलें असतां, असें सिद्ध होतें कीं, स्त्रियांपेक्षां पुरुषांनाच जारकर्म करण्याची प्रवृत्ति विशेष होत असते. ह्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे एकतर ते स्वतंत्र असतात. शिवाय त्यांची कल्पना अशी असते कीं, पुरुषांनीं जारकर्म केलें तरी त्यांचें नाक थोडेंच नकटें होतें. ह्या भावनेमुळें ते बिनदिक्कत पापमार्गांत शिरण्यास प्रवृत्त होतात व कपट, लालूच, बळजबरी व लटकें प्रेम यांच्या योगानें स्त्रियांना वाईट मार्गानें नेऊन पापगर्तेंत सहज लोटून देतात. स्त्रियांना फसवावयास फारशी अक्कल लागते असें मुळींच नाहीं. त्या बिचाऱ्या सहज फसतात. पण फसविणारांनीं मात्र या बाबतींत दूरवर विचार करावयास नको काय? कारण आपण जें दुष्कृत्य करावयास सज्ज झालों आहों, याची गंधवार्ता जर त्या स्त्रीच्या पतीस कळली तर त्याच्या मनास किती हुरहूर वाटेल? त्याचें अंतःकरण किती तिळतिळ तुटेल? हें स्वानुभवाच्या कल्पनेवरून कोणासही कळून येईल. केवळ इंद्रियलालसेच्या क्षणिक सुखासाठीं आपण दुसऱ्याचा उभारलेला संसार मातीमोल करून सोडीत आहों याचा अशावेळीं विचार करणें अत्यंत जरूर आहे. **पशु विचारशून्य असल्यामुळें, त्यांचा व्यवहार जसा लाज सोडून होत असतो तसा विवेकसंपन्न मनुष्यांनींही करावा काय?** ईश्वरानें मनुष्यास हृदय दिलें असून, त्यांत कुमति व सुमति ह्या दोघी जुळ्या बहिणी सतत वास्तव्य करीत असतात. ज्या वेळीं मनुष्य जाणूनबुजून कुमतीला आपल्या पवित्र अंतःकरणांत आश्रय देत असतो. त्यावेळीं सुमतीची बाजू दुबळी होऊन, तिचा पराक्रम कांहीं चालूं शकत नाहीं. मनुष्याच्या मनांत नीतीनें वागण्याची इच्छा असली तरी दुर्बलतेमुळें त्याची त्या बाजूस प्रवृत्ति होत नाहीं. परंतु मनुष्याच्या कसोटीची खरी वेळ

हीच असल्यामुळें, जो अशा प्रसंगीं आपलें मनोधैर्य प्रगट करून दुर्बलतेस झुगारून देतो व कुमतीस आपल्या पवित्र अंतःकरणांत मुळींच थारा लागूं देत नाहीं तोच धन्य समजावा.

श्रीशिवाजी महाराजांनीं जेव्हां कल्याण खजिना लुटला; तेव्हां त्या लुटींतील ऐवज तपाशीत असतांना, एका पेटींत एक रूपसंपन्न तरुण बालिका सांपडली. तिचें तें अप्रतिम रूप पाहून, त्या नीच सरदारानें श्री शिवाजी महाराजांना प्रसन्न करण्याच्या हेतूनें, त्या सुंदर यवन तरुणीला श्रीशिवाजी महाराजांसमोर आणून उभें केलें व त्या अमूल्य स्त्रीरत्नाचा स्वीकार करण्याची विनंति केली.

त्या नीच सरदाराच्या मुखांतून निघालेले जालीम विषारी शब्द श्रवण करितांच, श्रीशिवाजी महाराजांच्या तळव्याची आग मस्तकास जाऊन भिडली. ते त्या नीच सरदारास म्हणाले, 'पाजी, हरामखोर! शिवाजी महाराज परस्त्रीवर सहज भाळतील इतका का तूं मला अधम समजतोस? थांब, नीचा, आतांच तुझ्या पाठीचीं चामडीं लोंबवितों.' नंतर ते त्या यवनबालिकेकडे वळून नम्रपणें म्हणाले—

**नयन झांकुनी चित्तीं स्मरती सद्गुरुचे पाय**
**नमस्कार तुज प्रेमळ भगिनी बोले तधिं शिवराय ॥ १ ॥**

अहाहा! तुझ्याप्रमाणेंच जर माझी आई सुंदर असती, अथवा तुझ्या उदरींच जर ईश्वरानें मला जन्मास घातलें असतें, तर हे मातोश्री! मी तुझ्याप्रमाणेंच किंबहुना त्याहूनही जास्त सुंदर निपजलों असतों. असें म्हणून त्या महापुरुषानें त्या यवन बालिकेला पुनः नमन केलें व बहिणीप्रमाणें तिचा योग्य सत्कार करून, तिच्या आईबापांकडे मोठ्या बंदोबस्तानें रवाना करून दिलें. नंतर लागलींच त्या नीच सरदारास कडक शिक्षा ठोठावली. त्या मुलीच्या आईबापांनीं जेव्हां हें वर्तमान प्रत्यक्ष आपल्या प्रिय कन्येच्या मुखानें ऐकिलें तेव्हां त्यांना परमानंद झाला व 'धन्य धन्य शिवाजी' असें वारंवार म्हणून त्यांनीं आनंदाश्रु ढाळले व शिवाजी महाराजांचें अखंड यश गाइलें. **( ब्रह्मचर्य हेंच जीवन )**

कित्येक पुरुष आपल्या सुशील धर्मपत्नीशीं कपटाचरण करून वेश्यागमन करीत असतात. वेश्यागमन करणें हें केव्हांही अति नीच व हलकटपणाचें कृत्य होय. वेश्यागमनानें धर्मपत्नीचें मन कलुषित बनतें. शरीराची भयंकर हानि होते. शरिरांत नानाप्रकारचे रोग उद्भवतात. नानाप्रकारचीं व्यसनें जडतात. पैशांची बेसुमार उधळपट्टी सुरू होते. अशाप्रकारें मनुष्य सर्वतोपरी नागविला जाऊन, शेवटीं त्याच्या घरादाराची राखरांगोळी होण्याची पाळी येऊन ठेपते. बरें, वेश्येचें प्रेम चिरकाल टिकणारें असतें असें म्हणावें तर तसें कोठेंच आढळून येत नाहीं. वेश्येचें प्रेम म्हणजे केवळ पैशापुरतें. **जोंपर्यंत पैसा, तोंपर्यंत बैसा, तो नसेल त्या दिवशीं, घरांतून बाहेर नीघ कैसा** ' असेंच सतत प्रत्ययास येतें. एवढेंच नव्हे तर तिला पैशांची यत्किंचित्‌ही कमतरता भासतांच, ती नानाप्रकारचीं दुरुत्तरें बोलण्यास देखील चुकत नाहीं, हें खालील उदाहरणावरून सहज लक्षांत येईल.

एके गांवीं **गणपतराव** म्हणून एक श्रीमान् गृहस्थ राहात होता. तो फार विलासी असल्यामुळें, त्यानें आपल्या सुशील व स्वरूपसुंदर धर्मपत्नीचा व प्रत्यक्ष आपल्या जन्मदात्या आईबापांचा अव्हेर करून, **राधाजी** नामें एक पात्र बाळगिलें होतें. **गणपतराव** व हा बराचसा श्रीमान् असल्यामुळें राधाजीनें त्यास आपल्या मोहजालांत पकडून पूर्ण खुळें बनवून सोडलें. त्यानेंही तिची मर्जी सांभाळण्यासाठीं घरांत होतें नव्हतें तेवढें तिच्या स्वाधीन करून दिलें. पुढें थोडेच दिवसांत गणपतराव पूर्ण कफल्लक बनला. हें वर्तमान राधाजीच्या लक्षांत येतांच, तिनें दुसऱ्याच एका तरुणास उल्लू बनवून आपला यजमान केला. एके दिवशीं हा नवीन यजमान राधाजीचे विलासमंदिरांत प्रेमरंगांत दंग असतां, बाहेरून गणपतरावांची हाक राधाजीच्या कानावर आली. त्याबरोबर प्रथम ती आपल्या मनांत फारच चपापली. परंतु ती फार धूर्त असल्यामुळें, तिनें ताबडतोब आपल्या नव्या यजमानास समजावून , मागचे बाजूस स्वयंपाकगृह होतें त्यांत लपविलें व आपण लगबगीनें येऊन जिन्याचें दार उघडून, आपल्या जुन्या यजमानास ( गणपत-

दा. क्र. ७

रावास ) वर घेऊन आली व हंसत हंसत म्हणाली—' बरेच दिवसांनी वाट चुकलां, कुठं गांवाला गेली होती वाटतं स्वारी ? '

**गणपतराव**—छे ! मी परगांवास मुळींच गेलों नव्हतों. येथेंच होतों. परंतु कांहीं कारणास्तव इकडे येणें झालें नाहीं.

**राधाजी**—हो ! कसं होईल ? मेला आम्हां बायकांचा जन्मच खोटा. परस्वाधीन जिणं. त्यांत आम्हां वेश्यांचा जन्म तर विचारूंच नका. त्यापेक्षां आमच्या सारख्यांनीं या जगांत राहूंच नये हें अधिक बरं. परंतु मेला जीव बडला वेडा ! ज्याच्या का आम्हीं नादीं लागतों, त्याचा अगदीं पिच्छा पुरवितों. खरोखर, दिसायला आम्हीं वेश्या, पण आंतून पतिव्रता म्हणजे एकावरच अवलंबून राहणाऱ्या, मग आमचा संसार असा दुःखी झाल्यास नवल तें काय ? धिक्कार असो मला ! आणि माझ्या कर्माला ! आरंभीं एकाद्यावर प्रीति करावी व मग त्यानें आठ आठ दिवस देखील ढुंकून पाहूं नये ह्यापेक्षां अधिक मूर्खपणा तो कोणता ? ( रडूं लागते ).

**गणपतराव**—या वेडेपणास काय म्हणावं बरं ? कोणत्याही गोष्टींचा पूर्ण विचार न करतां उगीच दूषण देणें हें शहाणपणाचं कृत्य वाटतं ? ( जवळ घेऊन तिची समजूत करितो ).

इकडे राधाजीचें व गणपतरावाचें जें संभाषण चाललें होतें तें स्वयंपाक-गृहांत बसून आपला नवीन यजमान स्वस्थपणें ऐकत होता. त्यावरून त्यानें ताडलें कीं, हा गृहस्थ आतां येथून लवकर निघून जाईल असा रंग मुळींच दिसत नांहीं. मग आपण तरी या अंधारकोठडींत माशा मारीत बसण्यांत अर्थ काय ? त्यापेक्षां हळुच निमुटपणें येथून निघून गेलेलें काय वाईट ? फार तर उद्यां राधाजीची भेट घेतां येईल. असा पोक्त विचार करून तो उठला व स्वयंपाकगृहाचें मागील दार हळूच उघडून पाऊल न वाजवितां जिन्याच्या पायऱ्या उतरूं लागला. त्यानें जोडा हातांत घेऊन काठी बगलेंत मारली व मोठ्या बंदोबस्तानें तो जिन्यांतून जाऊं लागला. परंतु अंधारामुळें

व जिनाही अवघड पायऱ्यांचा असल्यामुळें, पाय अडखळून तो एकदम धडधड करीत खालीं येऊन आदळला. जिन्यांतील आवाज ऐकतांच **गणपतराव** हातांत दिवा घेऊन लागलींच तेथें धांवत आला. पडलेल्या गृहस्थास बरेंच लागलें होतें. त्याचें पुणेरी पागोटें डोकीवरून वानराप्रमाणें टनकन् उडी मारून पलीकडे जाऊन उताणें पडलें होतें. तसेंच जोडा एकीकडे, तर काठी दुसरीकडे, अशी त्याची शोचनीय अवस्था झाली होती. परंतु जिन्यांत दिव्याचा प्रकाश दृष्टीस पडतांच, तो शरमेनें अर्धमेला होऊन तसाच उठून जाण्याची धडपड करूं लागला. त्याच्या थाटामाटावरून व चेहऱ्यावरून हा कोणी तरी चैनी आषक असावा व आपण येण्यापूर्वीं तो राधाजीकडे आला असावा. परंतु आपल्या अकस्मात् येण्यानें राधाजीनें ह्यास स्वयंपाकगृहांत लपविलें असावें. तेथें ह्यास फार वेळ तिष्ठत बसणें आवडलें नसावें. म्हणून राधाजीचा संकेत चुकून, अशा तऱ्हेनें ही गोष्ट उघडकीस आली. हा सर्व प्रकार गणपतरावाच्या तेव्हांच लक्षांत आला व त्यास अत्यंत खेदही झाला. राधाजीचें कपटनाटक अशाप्रकारें उघडकीस येतांच, त्याच्या मनांत भयंकर कालवाकालव सुरू होऊन तो स्वतःशींच म्हणाला—' जिच्याकरितां म्यां घरदार सोडलें, विद्याभ्यासावर पाणी सोडलें, जिच्याकरितां जन्मदात्या आईबापांचा नानाप्रकारें छळ करून, त्यांच्या डबोल्यावर हात मारण्यास मी माघार घेतली नाहीं, जिच्या नादामुळें मी उल्लू बनून, कोणताही उद्योगधंदा करण्याच्या नादांत पडलों नाहीं, जननिंदेस सर्वतोपरी पात्र होऊन, मी माझ्या बहुमोल अब्रूचीही पर्वा बाळगली नाहीं; एवढेंच करून थांवलों नाहीं, तर प्रत्यक्ष लग्नाची बायको हिच्यापेक्षां अति गुणवती, रूपवती, व सुशील असतांही, म्यां चांडाळानें तिजकडे एकदांही ढुंकून पाहिलें नाहीं, त्या राधाजीनें असा निमकहरामपणा करून माझा केसानें गळा कापावयास प्रवृत्त व्हावें काय ? अरेरे ! किती हा नीचपणा ! वेश्यांची जात किती हलकट ही ! बेशरम रांडेनें घटकेच्या अगोदर माझ्याशीं मायावी भाषण करून, आपल्या पातिव्रत्याचा केवढा आव

आणिला होता. अरेरे! कृतघ्नपणाची कमाल म्हणतात ती हीच. **राधाजी,** धन्य आहे तुझ्या मायावी भाषणाची! आजपर्यंत मी आपले ठिकाणीं शहाणपणाचा मोठा गर्व वहात होतों; परंतु त्याच गणपतरावास दीडदमडीच्या एका वेश्येनें आपल्या मोहजालांत धरून चीत करून सोडलं! धिक्कार धिक्कार असो मला!

इकडे गणपतरावास बराच उशीर झालेला पाहून, आपली मसलत फसली असावी असें वाटून, राधाजी धांवतच जिन्यांत आली; तोंच तिला आपल्या दोघांही यजमानांचा सामना चाललेला दृष्टीस पडला. तेव्हां ती गणपतरावास म्हणाली, रावसाहेब, आपण हें उपरणं कुणाचं धरिलं आहे?

**गणपतराव**—कुणाचं म्हणजे? राधाजीच्या नूतन यजमानाचं!

**राधाजी**—राधाजी कोण?

**गणपतराव**—माझ्या या मित्राची प्रिय रंभा.

**राधाजी**—पण हा मित्र कोण?

**गणपतराव**—राधाजीचा नूतन यजमान.

**राधाजी**—मला तर ह्याचा अर्थ कांहींच समजत नाहीं.

**गणपतराव**—लिंग, अर्थ व विभक्ति हीं व्याकरणावांचून समजत नाहींत.

**राधाजी**—मग व्याकरण कोठें आहे?

**गणपतराव**—तें कांहीं वेळ स्वयंपाकगृहांत हवा खात पडलें होतें. परंतु आतां तें जिन्यांत येऊन पडलें आहे. मी मोठा भाग्यवान् म्हणून तें अचूक माझ्या हातांत सांपडलें, बघ.

**राधाजी**—त्या भल्या गृहस्थाचं उपरणं सोडून मुकाट्यानें त्यास जाऊं द्या.

**गणपतराव**—काय? मुकाट्यानं जाऊं देऊं! छे! छे! तो येथें कोणाकडे, कशासाठीं व केव्हां आला होता, हें समजल्याशिवाय मी त्यास मुळींच जाऊं देणार नाहीं.

**यजमान**---म्हणजे! मी चोर आहें कीं काय?

**गणपराव**---चोर नव्हे, चोराचा मावसभाऊ. पण येथें तूं कोणाकडे आला होतास तें सांग पाहूं आधीं?

**यजमान**---राधाजीकडे. ती माझ्या परिचयाची आहे.

**गणपतराव**---येथें येऊन किती वेळ झाला?

**यजमान**--सुमारें तीन तास. मी आलों नंतर कांहीं वेळानें तुम्हीं आलांत.

**गणपतराव**---मग माझ्या हो कसे दृष्टीस पडलां नाहींत?

**यजमान**---मी स्वयंपाकगृहांत बसलों होतों.

**गणपतराव**---स्वयंपाकगृहांत पोळ्या लाटीत होतां वाटतं?

**राधाजी**---पण तुम्हांला एवढी बारीक चौकशी करण्याचं कारण काय?

**गणपतराव**---दहा हजार रुपये तुझ्या नाकावर टिचले आहेत म्हणून?

**राधाजी**--धर्म केला कीं काय मला? चाकरी केली त्याची भाकरी दिली.

**गणपतराव**---पण चाकरीचा करार असा बेइमानीपणाचा नव्हता.

**राधाजी**--लबाड मनुष्यास सारं जग लबाड दिसत असतं. हे गृहस्थ कांहीं यजमान या नात्यानें मजकडे आले नव्हते. ते बिचारे मला भावासारखे आहेत.

**गणपतराव**---हो तर! भावासारखेच हुबेहुब दिसतात. मी कुठं म्हणतों बहिणीसारखे दिसतात म्हणून. पण असं जर होतं तर त्यांना स्वयंपाकगृहांत लपवावयाचं काय कारण?

**राधाजी**---आपली भीति.

**गणपतराव**---काय माझी भीति? माझ्या भीतीनं जणुं काय तूं अगदींच वाळलीस?

**राधाजी**---बस! अधिक बोलण्याचं कारण नाहीं?

**गणपतराव**---कां! कुणाच्या बापाची भीति आहे वाटतं? दहा हजार रुपये घेतांना कसं गोड वाटलं? अधिक बोलेन एवढेंच नाहीं तर तुझ्या नरडीचा घोट घेईन. समजलीस?

**राधाजी**--गणपतराव, आतांपर्यंत तुम्हीं मला बोललांत तें मी सर्व मुकाट्यानं ऐकून घेतलं. परंतु यापुढें जर अधिक उणं बोलाल तर मात्र माझ्या पादत्राणाशीं गांठ पडेल. तुम्हांस जें कांहीं बोलावयाचें असेल तें तुम्हीं सडकेवर जाऊन बोला. माझ्या घरांत बोलाल तर बत्तिशी रंगविली जाईल? समजलांत?

**गणपतराव**--काय तूं माझी बत्तिशी रंगविणार? रंगीव पाहूं! हा बघ मी येथून हालतच नाहीं.

**राधाजी**--बऱ्याबोलानं न गेलांत तर चतुर्भुज झाल्यावर तर मुकाट्यानं जाल?

**गणपतराव**--मुकाट्यानं जाण्यास मी चोर आहें वाटतं?

**राधाजी**--तुम्हीं जर चोर नाहीं, तर मग हे गृहस्थ चोर कसे? अहो बोलून चालून आम्हीं वेश्या. आमच्या घरीं येणारे गृहस्थ मग ते गरीब असोत वा श्रीमंत असोत, रोगी असोत वा निरोगी असोत, म्हातारे असोत वा तरुण असोत, आम्हांला ते सर्व सारखेच वाटतात. एकाद्या पतिव्रता स्त्रीप्रमाणें एकाच यजमानावर जर आम्हीं तप करीत बसूं तर म्हातारपणीं हातांत नरोटी का घेऊं? आमच्या येथें घटकेकरितां जरी कोणी हत्ती बांधला तरी तो आमचा होतो. त्यावर मालकाची सत्ता मग मुळींच चालत नाहीं. आमची करणी अशीच कांहीं विचित्र आहे कीं, तिचा अंत ब्रह्मदेवास देखील लागणें दुरापास्त; मग इतरांची काय कथा? खरोखर, बोलून चालून जे नंदीबैल असतात तेच आमच्या येथें पैशांची थैली रिकामी करावयास येत असतात. शहाणे लोक आपल्या पतिव्रता व सुंदर स्त्रियांना सोडून आमच्याकडे नुसते ढुंकूनसुद्धां बघत नाहींत. आमच्या येथें येणारे व आमची बरपांगी प्रीति खरी समजून आमच्या नादीं लागणारे जितके लोक आहेत तितके सारे मूर्खांचे शिरोमणि समजावे. कारण आमच्या नादानं आजपर्यंत कुणाचेंही कल्याण झालं नाहीं व पुढें होण्याचा संभव पण नाहीं. आमचें

जवळ खरं प्रेम असतं तर आम्हीं वेश्या कां बनलों असतों ? हा एकच मुद्दा शहाण्या मनुष्यानें लक्षांत घेऊन आम्हां वेश्याजनांच्या नादीं न लागतां, ईश्वरास भिऊन पवित्र मार्गानें चालावें व आपल्या सुखदुःखाची कळकळ बाळगणाऱ्या धर्मपत्नीबरोबर निष्कपटपणानें व सुखानें कालक्रमणा करून संसार सुखमय करून सोडावा हेंच उत्तम होय. रावसाहेब ! आपण गर्भश्रीमंत आहांत असें जेव्हां मला समजलें, तेव्हां मी आपणास माझ्या नादीं लावून, तुमचा सर्व पैसा माझ्या हस्तगत करून घेतला. व तोंपर्यंतच माझं लक्ष आपणाकडे होतं. परंतु तुम्ही पूर्ण कफल्लक बनतांच तुमचा नाद सोडून मी लागलींच दुसरी शिकार गांठण्याच्या नादास लागलें. समजलांत! आतां तरी सावध व्हा, डोळे उघडा व यापुढें तुम्हास जें कांहीं करावयाचें असेल तें पूर्णपणें विचार करून करीत जा. मी तुम्हापासून जे दहा हजार रुपये घेतले आहेत त्याचा योग्य मोबदला म्हणून ही अक्कल तुम्हास बहाल करीत आहें, तिचा योग्य उपयोग करा एवढें सांगून मी आपला शेवटचा निरोप घेतें. आतां एक क्षणही येथें थांबूं नका. नाहींतर शिपायाकरवीं धक्के मारवून बाहेर घालविण्यांत येईल. " एवढें सांगून ती घरांत निघून गेली.

मत्प्रिय बंधूंनों ! वेश्यागमनानें मनुष्याचा संसार कसा मातीमोल होऊन जातो हें वरील उदाहरणावरून तुमच्या लक्षांत आलेंच असेल. खरोखर मनुष्य परस्त्रीच्या अगर वेश्येच्या कृत्रिम प्रेमास बळी पडून, पैशापरी पैसा खर्च करून जसा तिजवर निःस्सीम प्रेम करूं लागतो, तिची सर्वतोपरी काळजी वाहूं लागतो, फार तर काय परंतु तिची थुंकी देखील पवित्र समजून, ती झेलावयास तत्पर होतो; तसाच जर तो स्वस्त्रीवर निःस्सीम प्रेम करूं लागेल, तिची सर्वतोपरी काळजी वाहूं लागेल व तिची प्रत्येक इच्छा तृप्त करूं शकेल, तर त्याच्या पैशांची उधळपट्टी, शरीराची हानि व संसाराची धुळधाणी न होतां, मी खात्रीपूर्वक सांगूं शकतों कीं, त्यायोगें स्वस्त्रीपासून त्याला जें परम सुख लाभेल, तें इतरत्र कशानेंही लाभणार नाहीं. खरोखर, स्वस्त्रीसारखें अनुपमेय सुख या जगांत कोणतेंच नसल्यामुळें,

मनुष्यानें, आपली स्त्री जरी कुरूप असली तरी तीस स्वर्गीय अप्सरा समजून, तिजवर निष्कपट प्रेम करावें. आपली स्त्री कुरूप अगर वर्णहीन असली तरी देखील परस्त्रीवर आपलें मन केव्हांही जाऊं देऊं नये. कारण **ईश्वरानें जरी भिन्न भिन्न स्वरूपाच्या स्त्रिया निर्माण केल्या असल्या, तरी त्यांना 'विषय' सारखाच दिला आहे. त्यामुळें स्वस्त्री काय किंवा परस्त्री काय, सारखीच. परस्त्रीच्या ठायीं जो रस असतो, तोच रस स्वस्त्रीजवळही असतो. मात्र फरक एवढाच कीं, एकाद्या स्त्रीचे बाह्य अवयव बेढब असतात, तर एकाद्या स्त्रीचे अगदीं आंखीव असतात. तसेंच एकादी स्त्री गौरवर्ण असते तर एकादी सांवळी असते. हा फरक आपल्या अल्प समजुतीमुळें, लवकर लक्षांत येत नाहीं. व त्यामुळें आपली वस्तु उत्तम असून देखील ती आपणांस उत्तम दिसत नाहीं व परक्याची अति वाईट वस्तु देखील आपणांस उत्तम वाटूं लागते. ह्याचें मुख्य कारण आपली स्त्री नित्य आपल्या दृष्टीसमोर असते हेंच होय.** ह्याबद्दल एका पाश्चात्य विद्वानानें म्हटलें आहे कीं, परक्याची वस्तु आपणास जितकी जास्त आवडते, तितकीच किंबहुना त्याहून जास्त आपली वस्तु परक्यास अधिक आवडते. मनुष्याचा स्वभावगुणच असा आहे कीं, आपल्या घरच्या अन्नापेक्षां परक्याच्या येथलि अन्न त्यास विशेष आवडतें. वास्तविक जरी असें असलें तरी प्रत्येक मनुष्यानें परस्त्रीवर मोहांध न होतां, स्वार ज्याप्रमाणें घोड्यास आपल्या आज्ञेंत ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो, त्याप्रमाणेंच मनुष्यानेंही आपलें चंचल मन आंवरून, त्यास आपल्या ताब्यांत ठेवण्याचा प्रयत्न सतत करावा. नाहींतर एकादे प्रसंगीं तो दुःखमय गर्तेंत पडल्याबांचून केव्हांही राहणार नाहीं, हें त्यानें पूर्ण लक्षांत असूं द्यावें.

———

# प्रकरण ९ वें.

## पतिश्रद्धा.

प्राचीन काळीं आर्य स्त्रिया पति हेंच दैवत, पति हाच गुरु असें समजून, त्या पतीबरोबर दैवयोगें प्राप्त झालेलें सुखदुःख भोगावयास अगदीं मोकळ्या मनानें तयार असत. पतीला सर्वतोपरी खुश ठेवणें, हाच आपला परम धर्म समजून, पतीवर प्रसंगानुसार प्राप्त झालेल्या संकटांना टक्कर देण्यासाठीं सदा तत्पर असत. ज्यास आपल्या आईबापांनीं हातावर पाणी घालून, आपणास अर्पण केलें असेल, त्याच्या भावी सुखदुःखाचे आपण वांटेकरी आहोंत, अशी त्यांची मनोदेवता त्यांना ग्वाही देत असे. **पतीच्या विरहांत राजवैभवही प्रत्यक्ष नरकवास होय,** अशी त्यांची दृढ समजूत असल्यामुळें, त्या घरीं राजैश्वर्य पूर्ण नांदत असतांही, पतीबरोबर अरण्यांत जाण्यास देखील माघार घेत नसत. अरण्यांत मिळेल तो कंदमूलाहार सेवन करून, पतीची रात्रंदिवस सेवा करण्यांत धन्यता मानून घेत असत. त्यांत त्यांना जो आनंद वाटत असे, तो इतरत्र कशां-तही वाटत नसे. पतिसेवेंत त्या केव्हांही आळस करीत नसत. राजगृहीं दासदासी इत्यादि नोकर माणसांचा जराही तोटा नसतां, पति विश्रांति घेत असतां, त्या स्वतः वारा घालीत असत. एवढेंच नव्हे तर पतीस निद्रा येईपावेतों त्याची चरणसेवा करीत असत. पतिराज झोंपीं गेल्यानंतर त्या स्वतः झोंप घेत असत. फार लांब कशाला ? हल्लींच्या काळींही फारच थोड्या वर्षांपूर्वीं तुकाराम महाराज म्हणून एक महान् साधु पुरुष होऊन गेला. त्याची स्त्री जिजाई ही स्वभावानें महा तापट व तोंडाची अति फट-कळ होती, परंतु महापतिव्रता होती. तिची आपल्या पतीवर दृढश्रद्धा

होती. अकृत्रिम प्रेम होतें. परंतु पतीची प्रपंचाविषयीं असलेली उदासवृत्ति तिला पसंत नसल्यामुळें, या बाबतींत ती त्यांच्यावर वारंवार कठिण वाक्प्रहार करीत असे. घरांत चिमणीला दाणा मिळावयाची मोठी मारामार, मुलाबाळांचें पाठीमागें सतत रडगाऱ्हाणें, व इकडे तर जेव्हां पहावें तेव्हां पतिराज ईश्वरचिंतनांत सदा दंग, अशा विलक्षण परिस्थितीमुळें, तिचें मन त्रस्त बनत असे. ती स्वतः लहानपणापासून माहेरीं अगदीं सुखांत वाढली असल्यामुळें, जिजाईस वैताग येणें साहजिक आहे. कारण तिनें मोठ्या कष्टानें किंवा काटकसरीनें मुलाबाळांच्या पोटाकरितां, अगर आपल्या विरक्त पतीच्या अन्नपाण्याकरितां, कांहीं तरी धान्याचा संग्रह करून ठेवावा; व तो तुकाराम महाराजांनीं ऐनवेळीं एकाद्यास देऊन टाकावा. ही परिस्थिति पाहिली म्हणजे तिच्या जिवाचा क्षणैक तिळपापड व्हावा. मग त्या संतापाच्या भरांत तिनें पतीला नानातऱ्हेचीं दुरुत्तरें बोलावीं. एवढें जरी होतें तरी तिनें पतीला किंवा संसाराला विटून माहेरवास कधींही केला नाहीं. उलट अखेरपर्यंत तिनें आपल्या विरक्त पतिसमवेत राहून, त्याची मनोभावें सेवा केली. फार तर काय, परंतु पतीची स्वारी देवळांत, गांवाबाहेर किंवा रानावनांत जेथें असेल तेथें स्वतः जाऊन तपास करावा. नंतर तेथें अन्नपाणी घेऊन जाऊन त्यांना प्रथम जेऊं घालावें, नंतर स्वतः जेवावें. पतीचें जेवण झाल्यावांचून तिनें स्वतः अन्नग्रहण करूं नये, असा तिचा पूर्ण निर्धार होता. कदाचित् महाराज परगांवीं गेले असल्यास ते परत येईपावेतों ती अन्नग्रहणच नव्हे तर मुखांत पाणीसुद्धां घेत नसे. ह्यामुळें तिला वेळप्रसंगीं दोन दोन दिवस देखील उपवासी रहावयाची पाळी येत असे. एवढे दीर्घ परिश्रम घ्यावयाचें तिला काय बरें कारण ? तर तिची पतीवर असलेली दृढश्रद्धा. कोणतेंही कार्य करावयाचें मनांत योजिलें असतां तें तडीस जाईपावेतों, आपली दृढश्रद्धा त्यावर कायम राहिली तर त्या कार्यांत आपणांस हटकून यश मिळणारच. परंतु आपली दृढश्रद्धा डळमळीत असली तर त्यांत आपणांस यावें तसें यश केव्हांही येणार नाहीं; तद्वत

स्त्रियांनीं आपल्या पतींवर दृढश्रद्धा न ठेविली तर त्याचेपासून त्यांना मिळावें तसें खरें सुख केव्हांही मिळणार नाहीं, हें त्यांनीं पूर्ण लक्षांत असूं द्यावें.

प्राचीन काळीं गांधारी नामें एक महान् सती स्त्री होऊन गेली. तिचें धृतराष्ट्रावर अकृत्रिम प्रेम होतें. म्हणून तिनें तो जन्मतः अंध असतांही, त्याच्या अंगच्या अद्भुत व अद्वितीय सद्‌गुणांवर लुब्ध होऊन, जाणून बुजून त्याचे बरोबर विवाह केला. एवढेंच नव्हे तर पतीची अर्धांगी म्हणजेच पतीच्या सर्व सुखदुःखांची अर्ध वांटेकरी म्हणून तिनें स्वतःचे डोळे जन्मभर घट्ट बांधून घेतले. ते तिनें आपल्या शंभर पुत्रांपैकीं कोणत्याही पुत्राच्या शुभ व मंगल दिवशीं देखील उघडले नाहींत. प्रत्येक स्त्रीस पुत्रमुख पहाण्याची अनावर इच्छा असते. परंतु ती डोळस असतांही केवळ पतीस अंधत्वामुळें तें सुख अनुभवितां येत नाहीं म्हणून तिनें देखील आपली अनावर इच्छा अखेरपावेतों तशीच दडपून टाकिली. अहाहा ! काय ही पतिश्रद्धा ! केवढा हा मनोनिग्रह व करारीपणा ! ती वारंवार म्हणत असे कीं, पतीला जें सुख नाहीं तें सुख मी तरी कसें भोगूं ? देवाची मूर्ति सोन्याची घडलेली असो वा दगडाची घडलेली असो, त्यांत जसें भक्ताला कांहींच वैषम्य वाटत नाहीं, तो जसा दोहीं मूर्तींवरहि समभाव ठेवून, त्यांची सारखीच भक्ति करीत असतो; तद्वत् माझा पति कसाही असला तरी त्याच्या अंगच्या वैगुण्यानें माझ्या स्त्रीधर्मास मला कोणतीही अडचण भासत नाहीं.

तसेंच पुढें भारतीय युद्ध संपल्यानंतर कित्येक दिवसांनीं धृतराष्ट्रानें वानप्रस्थाश्रम घेतला. वनांत हीं उभयतां पतिपत्नी आनंदानें कालक्रमणा करीत असतां, एके दिवशीं त्यांच्या पर्णकुटिकेला एकाएकीं आग लागली. तेव्हां बाहेरील कित्येक सेवक लोक ‘ आग लागली, बाहेर या ’ म्हणून मोठमोठ्यानें आरडाओरड करूं लागले. परंतु धृतराष्ट्रास वृद्धपणामुळें उठतां येईना. म्हणून तो आपल्या प्रिय पत्नीस म्हणाला, ‘ प्रिये, माझ्यानें उठवत नाहीं, सबब तूं तरी या आगींतून बाहेर जा व आपला प्राण वांचीव. ’

प्राणपतीचे हे कळवळ्याचे शब्द ऐकतांच गांधारीस गहिंवर येऊन ती सद्गदकंठें म्हणाली—" **प्राणनाथ, ज्या अग्निनारायणासमक्ष पाणिग्रहणसमयीं आपण दोघांनीं आजन्म एकमेकांपासून दूर राहणार नाहीं अशी शपथ वाहिली त्या अग्निनारायणासमक्षच ती शपथ मीच कशी मोडूं?** " असें म्हणून तिनें उलट पतीस दृढ आलिंगन दिलें व त्याच स्थितींत त्यांनीं आपले देह अग्निनारायणास अर्पण केले. अहाहा! काय ही पतिश्रद्धा!

प्रिय भगिनींनो! गांधारीची ही निस्सीम पतिश्रद्धा पाहून, तिजबद्दल कोणाचे मनांत द्रव, आदर व पूज्यभाव उत्पन्न होणार नाहींत? आणि अशाच तऱ्हेचीं दांपत्यें जगभर निर्माण व्हावींत असें कोणास वाटणार नाहीं? भगिनींनो! आपल्या या भरतखंडांत प्राचीन काळीं जशा अनेक पतिव्रता, पतिनिष्ठ, करारी व दानशूर स्त्रिया होऊन गेल्या; तशाच अर्वाचीन काळांत देखील पतिव्रता, पतिनिष्ठ, करारी, दानशूर व रणशूर अशा स्त्रिया बऱ्याच होऊन गेल्या; त्यांपैकीं पद्मिनी व संयोगिता या उभयतां रजपूत स्त्रीरत्नांनीं राजपुतान्याचा इतिहास विभूषित केला, तर जिजाबाईसारख्या पतिनिष्ठ स्त्रीनें महाराष्ट्राचा इतिहास शिवाजीसारखें वीररत्न प्रसवून नांवलौकिकास आणिला. तसेंच अहल्याबाईसारख्या साध्वी स्त्रीनें आपल्या जीवनक्रमामुळें व दानशूरपणामुळें, आपल्या नांवाच्या पाठीमागें 'देवी' हें उच्चपद मिळवून इंदूरचें राजघराणें प्रकाशित केलें. अशा रजपूत स्त्रियांचें, राजमाता जिजाबाईचें व कौरवमाता गांधारीचें दृश्य पुढें ठेवून, जर आर्यभगिनी आपलें शील उन्नतीस नेण्याचा प्रयत्न करितील व श्रीशिवाजी महाराजांप्रमाणें परस्त्रीच्याठायीं मातेसमान पूज्यभाव ठेवून जर पुरुष आपलें चारित्र्य उज्ज्वल बनवितील, तर आजही पद्मिनी, संयोगिता, जिजाबाई, अहल्याबाई, लक्ष्मीबाई इत्यादि स्त्रियांसारखीं करारी कन्यारत्नें व श्रीशिवाजी महाराज, तुकाराम महाराज, पृथ्वीराज चव्हाण, राणाभीमदेव इत्यादि पुरुषांसारखीं धाडसी व तेजस्वी वीररत्नें चमकूं लागतील व त्यांच्या योगानें आजही या भरतखंडास अद्वितीय शोभा प्राप्त होऊन, तो जगाच्या अत्युच्च शिखरावर आरूढ झालेला तुमच्या दृष्टीस पडल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं.

---

# प्रकरण १० वें.

## स्त्रियांची योग्यता.

**जिचे हातीं पाळण्याची दोरी । तीच राष्ट्रातें उद्धरी ॥**

कित्येक पुरुषांना वाटतें कीं, स्त्रिया म्हणजे एकाद्या दासी बटकीप्रमाणें होत. त्यांना केवळ आमची सेवा चाकरी करून घेण्याकरितां, हुकूम गाजविण्याकरितां, आपली व आपल्या कुटुंबांतील माणसांची आज्ञा पालन करण्याकरितां, आपलीं मुलें बाळें सांभाळण्याकरितां, वक्तशीर स्वयंपाक करून आम्हांस जेऊं घालण्याकरितां, स्वतःच्या सुखोपभोगाकरितां व गृहकृत्यादि कामें करण्याकरितां परमेश्वरानें निर्माण करून आमच्या स्वाधीन केलें आहे. सबब स्त्रियांनीं आम्हीं हंस म्हणतांच हंसावें, ऊठ, म्हणतांच उठावें, बैस म्हणतांच बसावें, रड म्हणतांच रडावें ! थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे फोनोग्राफच्या प्लेटीप्रमाणें त्यांना आम्हीं सांगूं तेव्हां व सांगूं तेंच त्यांनीं करावें अथवा बोलावें, अशी त्यांची दृढ समजूत झालेली असते. त्यामुळें पंजांत सांपडलेल्या उंदराला मांजर जसें लीलेनें खेळवीत असतें; तसें ते आपल्या विवाहित वधूला तुटकेपणानें वागवून, केवळ सत्ताधीश म्हणून तिचा पदोपदीं अपमान करीत असतात. परंतु ही त्यांची समजूत व बर्तणूक अगदीं गैरशिस्त आहे. स्त्रियांचें महत्त्व आपणापेक्षां कमी योग्यतेचें आहे अशी हलकट भावना मनांत न आणितां, पतीनें प्रसंगानुसार एकादेवेळीं स्वतः आंघोळीस पाणी ओतून घेतलें, एकादा कपडा स्वतः धुवून घेतला, पाण्याचा घडा स्वतः भरून आणिला, किंवा स्त्रीनें प्यावयास पाणी मागितलें असतां, तें पतीनें जर तिला स्वतः नेऊन दिलें तर विशेष अन्याय होईल अथवा पतिराजांच्या हक्कांचें अतिक्रमण होईल असें मला वाटत नाहीं.

आतां स्त्रियांच्या योग्यतेकडे आपण वळूं. स्त्रियांची योग्यता जर पुरुषांपेक्षां कमी असती तर देवादिकांचीं नांवें घेतांना आपण ज्याप्रमाणें आधीं स्त्रीजातीसच विशेष महत्त्व देतों त्याप्रमाणें तें केव्हांही दिलें नसतें. परंतु राधागोविंद, राधाकृष्ण, गौरीशंकर, लक्ष्मीनारायण इत्यादि शब्दांवरून स्त्रियांचें महत्त्व श्रेष्ठ ठरतें. तसेंच नित्य व्यवहारांत देखील आपण आईबाप, बहिणभाऊ, स्त्रीपुरुष, कन्यापुत्र, वधूवर, सासुसासरा हेच शब्द वापरून स्त्रियांना श्रेष्ठपणा देत असतों. ह्यावरून पुरुषांपेक्षां स्त्रियांचें महत्त्व विशेष आहे हें सिद्ध होतें. शिवाय ज्या स्त्री–गर्भ–खाणींतून मोठमोठे विद्वान्, पंडित, शास्त्री, कवि, ज्योतिषी, महात्मे, पुढारी, मुत्सद्दी, शूरवीर, सेनापति, प्रधान, राजे, महाराजे इ० दिव्य रत्नें उत्पन्न होतात; अशा वैभवशाली स्त्रीरत्नांचा महिमा अगाध नाहीं असें कोण म्हणूं शकेल ? गडकरीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, **ज्या स्त्रिया मातारूपानें आम्हांस जन्म देतात, पत्नीरूपानें आम्हांस सुख देतात, भगिनीरूपानें आम्हांस मदत करितात व कन्यारूपानें आम्हांस अत्यानंद उपजवितात अशा स्त्रिया धन्य होत.** तसेंच साधुवर्य तुलसीदास महाराजांनीं म्हटलें आहे कीं,

**नारी निंदा मत करो, नारी रतनकी खान ॥**
**जिस नारीसे पैदा भये, राम, भीम, हनुमान ॥ १ ॥**

अहाहा! काय ही थोरवी! केवढी ही योग्यता! पहा! ज्या स्त्रियांच्या अंगीं संपूर्ण राष्ट्रेंचेंराष्ट्र उलथून पाडण्याची प्रचंड शक्ति गुप्तरूपानें वास करीत आहे व आमचा मानापमान, आमची बहुमोल अब्रू, आमची संसारयात्रा, आमचा कुलोद्धार ज्या स्त्रियांच्या सद्गुणांवर अवलंबून आहे, अशा परम भाग्यशाली स्त्रीरत्नांना पुरुषांनीं केवळ सत्ताधारी म्हणून तुसडेपणानें वागवून अभागी बनवावें, ह्यापेक्षां अधिक मूर्खपणा तो कोणता ?

‘ **गृहिणी सचिवः सखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ** , या उक्तीवरून प्राचीनकाळीं स्त्रियांना पुरुष कसे वागवीत असत ? त्यांचा

किती सन्मान करीत असत? त्यांच्या सुस्थितिवर पुरुषांचीं सुखें किती अवलंबून असत? ह्याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. प्राचीन काळच्या व हल्लींच्या परिस्थितींत भयंकर महदंतर पडलें आहे. प्राचीन काळीं आपल्या देशांत महातेजस्वी व महापराक्रमी असंख्य नारीनर होऊन गेले, व त्यांनीं कित्येक हजारों वर्षेपर्यंत या भरतखंडावर आपलें सार्वभौमत्व गाजविलें; परंतु हल्लीं आपल्या देशांत पूर्वीप्रमाणें तेजस्वी स्त्रीपुरुष निर्माण होत नाहींत. त्यामुळेंच आपल्या देशास दारिद्रता व परतंत्रता प्राप्त झाली आहे. '**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवताः** मनुस्मृतींत मनूनें सांगितलेल्या या तत्त्वानुसार हल्लीं पाश्चात्य राष्ट्रांत अशी तेजस्वी व बहुगुणी प्रजा उत्पन्न होत आहे. कारण तिकडे स्त्रियांची योग्यता जाणून त्यांचा सर्वतोपरी योग्य आदरसत्कार ठेविला जात आहे व त्यांना पुरुषांच्या बरोबरीच्या नात्यानें वागविण्यांत येत आहे; तद्वत् योग्य आदरसत्कार व पूज्यभाव आपण ठेवीत नाहीं, एवढेंच नव्हे तर त्यांचा पदोपदीं अपमान व धिक्कार करीत असतों. कित्येक नरपशु तर त्यांना आपल्या पायांतील पादत्राणांची उपमा देऊन व लाथाबुक्क्यांची लाखोली वाहून, त्यांची यथाविधि पूजा करीत असतात. मग, तुम्हींच सांगा अशा घरांत अगर देशांत तेजस्वी व बहुगुणी प्रजा कशी निर्माण व्हावी? त्यांची जशी यथाविधि पूजा केली जाते तदनुरूप लाथाबुक्क्यांचा मार खाणारी व परतंत्रानें वागणारी गुलामी प्रजा निपजल्यास, त्यांत आश्चर्य तें कोणतें?

ह्यास्तव मत्प्रिय बंधूंनो! असा अविचार न करतां '**बापसे बेटा सवाई**' या म्हणीप्रमाणें बहुगुणी प्रजा निर्माण व्हावी, एवढ्यासाठीं तरी स्त्रियांचा योग्य आदरसत्कार ठेवीत जाऊन, त्यांचे विषयीं मनांत पूज्यभाव बाळगा. स्त्रियांना पूर्ण स्वतंत्रता देऊन त्यांना स्वेच्छाचारी बनवा असें माझें मुळींच म्हणणें नाहीं. परंतु त्यांची योग्यता आपल्यापेक्षां हलक्या दर्जाची आहे अशी भावना मात्र मनांत केव्हांही बाळगूं नका. वास्तविक पाहूं जातां स्त्रियांची योग्यता पुरुषांपेक्षां केव्हांही कांकणभर अधिकच आहे. कारण

उभय कुळांचा उद्धार करावयाचा अधिकार जसा स्त्रियांना आहे, तसा पुरुषांना मुळींच नाहीं. पुरुषांनीं कितीही गर्वोक्ति वाहिली तरी त्यांना स्त्रीजातीपुढें नम्र व्हावें लागून, गर्वानें ताठलेली मान मातोश्री या नात्यानें वांकाविलीच पाहिजे. कारण मनुष्य जन्मास येतो तो स्त्रीपासूनच.

जे पुरुष पतिव्रता स्त्रियांच्या मर्जीविरुद्ध वर्तन करीत असतात, त्यांचा असह्य छळ करीत असतात, त्यांचीं कोमल मनें वारंवार दुखवीत जाऊन दुर्भंग करीत असतात. परस्त्रीवर पापदृष्टि ठेवून तिची काया भ्रष्ट करण्याच्या विचारांत सदा दंग असतात, असे पुरुष जरी सार्वभौम पदावर आरूढ झालेले असले तरी त्यांना त्यांचेपासून यत्किंचित्ही सुख प्राप्त होत नाहीं; एवढेंच नाहीं तर सतीच्या शापानें त्यांचीं मोठमोठीं राज्यें देखील क्षणांत धुळीस मिळून जातात. परंतु जे त्यांच्या मर्जीनुरूप वागून त्यांचीं कोमल मनें केव्हांही दुखवीत नाहींत, परस्त्रीवर आपलें मन केव्हांही आसक्त होऊं देत नाहींत, असे पुरुष जरी अति गरिबी स्थितींत नांदत असले तरी त्यांना सतींच्या सहवासांत गवताचे झोपडींत देखील अवर्णनीय सुख प्राप्त होतें. व त्या योगें तेथें महाभाग्यशाली व विशालज्ञानी पुरुष जन्मास येऊन, त्या झोपडींत राजवैभवाप्रमाणें अतुल संपत्ति मुद्दाम लोटांगण घालीत धांवत येते. इतकें अद्भुत सामर्थ्य पतिव्रता स्त्रियांना केवळ दुःखी व प्रसन्न ठेवण्यांत सांठवलेलें असतें. ह्यास्तव पुरुषांनीं त्यांचीं कोमल मनें केव्हांही दुखवूं नयेत.

आपणांत विशेषतः स्त्रियांचा आदरसत्कार फक्त लग्नमौंजीसारख्या मंगल प्रसंगीं व शुभकार्यप्रसंगीं केला जातो. व तोही फक्त कचींकाळीं लग्नकार्यांतून व शुभकार्यांतूनच कार्यमानपरत्वें केला जातो. बाकी नित्याचा दिनक्रम पाहूं गेलें असतां स्त्रियांना गुलामांप्रमाणें हलकट लेखण्याची प्रवृत्ति सर्वत्र आढळून येते. मात्र ज्या ज्या प्रसंगीं स्त्रियांना पुढाकार देऊन त्यांचा गौरव केला जातो, त्या त्या प्रसंगीं मोठेपणामुळें त्यांचीं मुखकमळें आनंदानें

प्रेरित होऊन पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें प्रफुल्लित दिसतात. शिवाय त्यांची रूपकांतिहि नुकत्याच फुललेल्या गुलाबाच्या फुलांप्रमाणें टवटवीत व खुलावट दिसते. अशा प्रसंगीं स्त्रियांना शक्तीच्या बाहेर जरी कामें करावीं लागलीं तरी त्या निरुत्साही न बनतां, उलट त्यांचा उत्साह दुप्पट दुणावतो. ह्यास मुख्य कारण त्यांना दिलेला मोठेपणा हेंच होय. मोठेपणा मिरवायची स्त्रियांना स्वभावतःच मोठी हौस असते. '**आधींच उल्हास, तशांत फाल्गुनमास**' या म्हणीप्रमाणें ती फलद्रूप झाली असतां त्यांच्या आनंदास पारावार उरत नाहीं. सबब पुरुषांनीं प्रत्येक गृहकार्यांत स्त्रियांना स्वतंत्रता, पुढाकार व मोठेपणा देत जाऊन, त्यांचा आदरसत्कार करीत जावा. त्यांचेकडून एकादी चुकी झाल्यास, ती शांतपणानें त्यांच्या निदर्शनास आणून द्यावी. अशाप्रकारें पुरुषांनीं स्त्रियांना सर्वतोपरी प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न केला असतां, त्या सदा खुष राहतील व पतीवर निःस्सीम प्रेम ठेवून मनांत अनेक शुभाशीर्वाद व धन्यवाद देऊं लागतील. तेणेंकरून त्या आजही प्राचीन व अर्वाचीन स्त्रियांच्या प्रतिकृति आचरणांत हुबेहूब बठवून दाखवितील. आणि त्यामुळें कुटुंबांत एकापेक्षां एक सवाई अशीं महा भाग्यशाली वीररत्नें त्या प्रसवतील यांत तिळप्राय संदेह नाहीं. इतक्या उपरही जे पुरुष याप्रमाणें आपल्या स्त्रीस वागविणार नाहींत, त्यांचे घरांत परतंत्र अशीच गुलामी प्रजा निपजत जाईल. तेणेंकरून त्या घरांत आकाबाईचा कायमचा शिरकाव होऊन, ती लवकरच त्या घरादारावर भिकेचा वरवंटा फिरवील यांत तिळमात्र शंका नाहीं.

या सर्वांवरून पाहूं जातां स्त्रियांची योग्यता किती श्रेष्ठ आहे, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. सबब पतीनें स्वस्त्रीस प्रेमादरानें व समभावानें सर्वप्रकारें सदैव संतुष्ट ठेवावें. मात्र पतीनें आपल्या स्त्रीचा सन्मान ठेवतांना ती त्यामुळें शेंफारून जाऊन, कुटुंबांतील वडील माणसांचा उपमर्द व मत्सर करणार नाहीं, अगर त्यांच्याशीं कुर्यानें किंवा तुसडेपणानें वागणार नाहीं ह्याविषयीं मात्र विशेष खबरदारी अवश्य घेत जावी.

आतां स्त्रियांनीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे ती ही कीं, आपली योग्यता पुरुषांपेक्षां जरी कांकणभर अधिक आहे, तरी त्यांनीं या फाजील गर्वोक्तीनें शेफारून जातां कामा नये. परंतु आपल्या पवित्र आचरणानें व सद्वर्तनानें जगास दीपवून आपली कीर्ति अजरामर कायम राखण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. **सुशील स्त्री ही उत्तम शिक्षण, उत्तम संस्कार, उत्तम वळण व अनुभविक व्यवहार-ज्ञान इत्यादि गोष्टींमुळें जगाला कशी वंदनीय व पूजनीय होते** हें खालीं दिलेल्या देवी अहल्याबाईच्या उदाहरणावरून माझ्या प्रिय भगि-नींना सहज कळून येईल.

अर्वाचीन काळीं अहल्याबाई या नांवाची एक महान् साध्वी स्त्री होऊन गेली. हिचा जन्म नगर जिल्ह्यांत पाथरडी येथें इ० स० १७३५ च्या सुमारास झाला. हिच्या आईबापाच्या घरची स्थिति अति गरिबीची होती. एकदां मल्हारराव होळकर सैनिकांसह पाथरडी येथें वस्तीस उतरले होते. ते दिवशीं अहल्याबाई देवदर्शनास जात असतां अचानक त्यांच्या दृष्टीस पडली. तिचा तो तेजस्वीपणा त्यांचे मनांत भरून आपल्या खंडेरावास ही वधू योग्य आहे, असें त्यांना वाटलें. लगेच त्यांनीं माणसाकरवीं त्या मुलीबद्दल चौकशी केली व एकाच बैठकींत लग्न मुक्रर करून, थोडेच दिवसांत परमे-श्वरकृपेनें व दैवयोगानें अहल्याबाईचा विवाह मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशीं मोठ्या थाटामाटानें होऊन, ती राजस्नुषा बनली. अहल्याबाईचा नवरा जरी शूर होता तरी त्याचें वर्तन अति निंद्य होतें. परंतु अहल्याबाई लहानपणापासूनच हुषार, दक्ष, पापभीरु, सन्मार्गशील आणि विकारवश व दुराग्रही लोकांवर दाब ठेवण्यांत पूर्ण बाकबगार असल्यामुळें, खंडेरावाचें निंद्य वर्तन फारसें बहकलें नाहीं. अहल्याबाईचें लग्न झालें तेव्हां ती अवघी अकरा वर्षांची होती. लग्न होऊन दहा वर्षें लोटलीं नाहींत तोंच तिजवर वैधव्याचा भयंकर दुर्धर प्रसंग ओढवला. अहल्याबाईचा पतीबरोबर सती जाण्याचा विचार होता. परंतु केवळ मल्हार-

रावांच्या शब्दाला मान देण्यासाठीं तिनें आपला बेत रहित केला. खंडेरावापासून अहल्याबाईस एक मुलगा व एक मुलगी अशीं दोनच अपत्यें झालीं होतीं. खंडेरावाच्या मृत्यूस कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच मल्हाररावही वारले. तेव्हां अहल्याबाईचा मुलगा मालेराव ह्यास पेशव्यांकडून सरदारकीचीं वस्त्रें मिळालीं. ह्याचेंही वर्तन आपल्या बापाप्रमाणें अति निंद्यच होतें. हाहि सरदारकीचीं वस्त्रें मिळाल्यानंतर आठ नऊ महिन्यांतच मरण पावला. त्यानंतर होळकरशाहीचा सर्व कारभार स्वतः अहल्याबाईच पाहूं लागली. अहल्याबाईची मुलगी मुक्ताबाई ही देखील मालेरावाच्या मृत्युनंतर लवकरच आपल्या पतीबरोबर सती गेल्यामुळें, अहल्याबाईच्या दुःखांत पुनः भर पडली. अशाप्रकारें अहल्याबाईवर जरी दुःखाचे पर्वत कोसळले तरी त्या साध्वीनें आपल्या चित्तवृत्तींत जराही फरक पडूं दिला नाहीं, किंवा आपल्या प्रजेच्या हिताबद्दल काडीचीही अनास्था दाखविली नाहीं. ती जातीनें स्त्री असतांही, तिनें आपला राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालविला आणि आपल्या तेजानें व कर्तबगारीनें सर्वांना संतुष्ट केलें.

एकदां कांहींतरी निमित्त काढून, राघोबादादा पेशवे हे स्वारी करण्याच्या हेतूनें तिजवर चाल करून आले. तेव्हां राजकार्यधुरंधर अशा अहल्याबाईनें त्यांना असा निरोप पाठविला कीं, 'मी लढाई करण्यास तयार आहें, परंतु मी तर बोलून चालून यत्किंचित् स्त्री पडलें. माझा पराभव आपल्या हातून झाल्यास, त्यांत आपणास मोठेंसें भूषण मिळणार नाहीं; पण उलट माझ्या हातून आपला पराभव झाला तर लोक आपणास काय म्हणतील, ह्याचा मात्र आपण नीट विचार करावा.' असा निरोप पोहोंचतांच राघोबादादांनीं आपला बेत रहित करून पुढें कूच केलें.

अहल्याबाई अति धर्मशील असल्यामुळें, ती आपल्या प्रजेपासून कर अगदीं बेताचा घेई. न्याय करतांना आपल्या हातून कदाचित् अन्याय घडल्यास, परमेश्वराजवळ आपणास त्याचा जाब द्यावा लागेल अशी तिची ठाम

समजूत असल्यामुळें, ती न्यायाचें बाबतींत अत्यंत दक्षपणा ठेवून रयतेच्या फिर्यादी लक्षपूर्वक ऐकून घेई व त्यांना बरोबर न्याय देई. ह्यामुळें तिची प्रजा संतुष्ट राहून, तिच्या राज्यांत सतत शांतता नांदत असे. ह्यावरून राजेलोकांशीं व आपल्या प्रजेशीं तिचें वर्तन किती सरळपणाचें होतें हें कोणासही सहज कळून येईल.

साध्वी अहल्याबाईनें जितका दानधर्म आपल्या हयातींत केला असेल तितका दानधर्म कोणत्याही राजेरजवाड्यांनीं केला नसेल. तिनें ठिकठिकाणीं देवादिकांचीं मंदिरें बांधून तलाव खोदले. मोठमोठ्या पुण्यक्षेत्राच्या ठायीं घांट बांधून काढले व गरीब लोकांकरितां ठिकठिकाणीं अन्नसत्रें घातलीं. अशा प्रकारें अठरापगड जातीच्या गोरगरीब यात्रेकरूंचें कल्याण केल्यामुळें तिचें नांव हिमालयापासून थेट रामेश्वरापर्यंत सर्वतोमुखीं झालें.

अहल्याबाईस लिहितां वाचतां येत असे व भारत, भागवत इत्यादि पुराणें वाचण्याचा आणि ऐकण्याचा तिला फार नाद असे. तसेंच व्रतें व उपवास ती फार करी. नवरा वारल्यापासून ती शुद्ध पांढरीं वस्त्रें परिधान करूं लागली. रंगीत वस्त्रांना किंवा दागिन्यांना ती मुळींच शिवली नाहीं. तारुण्य, ऐश्वर्य व अधिकार अनुकूल असतांही, तिनें आपल्या पवित्र आचरणांत कधींही बदल होऊं दिला नाहीं; फार काय, परंतु आपली नम्रवृत्ति सतत कायम ठेवून, आपल्या सद्सद्विवेक बुद्धीचे आदेश पाळणें जितकें शक्य होतें तितके तिनें पाळिले. या तिच्या बहुमोल गुणांमुळें, इतिहास तिला होळकरशाहीचेंच नव्हे, तर सर्व हिंदुस्थानचें भूषण मानितात.

'**मरावें परी कीर्तिरूपें उरावें**' ह्या समर्थांचे उक्तीप्रमाणें अहल्याबाई जरी आज बऱ्याच वर्षांपूर्वीं हें जग सोडून गेली असली तरी तिची कीर्ति अद्यापपावेतों सर्वत्र दुमदुमत आहे. यावच्चंद्रदिवाकर ह्या साध्वीच्या कीर्तीचा लोप होणें केवळ अशक्य होय. अहल्याबाई जशी उभयकुळांची दीपक झाली, तशी ती लोकदीपक व देशदीपकहि झाली. आज प्रत्येक

पुरुष व्यक्तीस व स्त्री व्यक्तीस अहल्याबाईविषयीं जो पूज्यभाव व अभिमान वाटत आहे, तो तिच्या ह्या अद्वितीय गुणांमुळेंच. बायकांची अक्कल **‘ तिखटमिठापुरती अगर चुलीचें राज्य सांभाळण्याइतकी कोती ’** नसून पुरुषांप्रमाणें जगाचा संसार सांभाळण्याची देखील त्यांच्यामध्यें शक्ति असते, हें देवी अहल्याबाईनें आपल्या उज्ज्वल चारित्र्यानें जगाच्या निदर्शनास आणून दिलें.

भगिनींनों ! जर तुम्हीं देवी अहल्याबाईचें हें उज्ज्वल चरित्र सतत आपल्या डोळ्यांपुढें ठेवून कोणत्याही संकटास न डगमगतां आपलें संसाररूपीं गृहराज्य मोठ्या दक्षतेनें चालवून दाखवाल व स्त्रियांची योग्यता पुरुषांपेक्षां खरोखरच श्रेष्ठ आहे, हें कृतीनें जगाच्या निदर्शनास आणून द्याल तर तुमचीही गणना आजपर्यंत होऊन गेलेल्या श्रेष्ठ स्त्रियांच्या मालेंत गोंवली जाईल व तेणेंकरून तुमची कीर्ति दिगंतरीं पसरून जगाच्या अंतापावेतों तुम्हीं कीर्तिरूपानें खास जिवंत रहाल हें मी खात्रीनें सांगून ठेवितों.

---


## शाळाधिकाऱ्यांनीं उत्तमोत्तम अभिप्राय दिलेलें

## आ. २ री ] सचित्र जोडाक्षर–शिक्षक [ किं. ६ आणे.

ह्यांत जोडाक्षरांची रचना इन्फंट प्रायमरप्रमाणें असल्यामुळें हवीं तशीं कठिण जोडाक्षरें अवघ्या ३ महिन्यांत मुलांमुलींना सहज लिहितां व वाचतां येतात. एक प्रत मागविणारांनीं सात आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

पत्ता—जे. आर. चौधरी. पिंपरूडकर.
पो. फैजपूर, जि. पू. खानदेश.

## प्रकरण ११ वें.

# स्त्रीधर्म.

स्त्रिचें चोज पुरविणें हा जसा पतीचा धर्म आहे; तसेंच पतीला सर्वतोपरी संतुष्ट ठेवणें हा पतिव्रता स्त्रीचा श्रेष्ठ धर्म आहे. उभयतांचा संतोष हेंच खरें संसारसुख होय. **कोणत्याही धर्मांतील व रीतिरिवाजांतील पतिव्रता स्त्रियांच्या इहपरलोकच्या सौख्याची अमूल्य ठेव म्हटली म्हणजे त्यांचें सौभाग्यवाण हें एकाच भावाचें शंभर नंबरी सोनें होय.** ह्यावरून पाहूं जातां स्त्रियांना कोणताही बहुमोल दागिना पतिदैवतापेक्षां अधिक मौल्यवान् नाहीं. म्हणून प्रत्येक स्त्रीनें आपल्या पतिदैवतास आपल्या गळ्यांतील अमोलिक कंठा समजून, त्यास आपल्या प्राणापेक्षांही अधिक जपावें व त्यास सुप्रसन्न ठेवण्यासाठीं अहर्निश झटावें. मग तो कसाही असो, त्याचे गुणदोष पाहतां कामा नये. दोष सुधारण्यासारखे असले तर मात्र ते सुधारण्याचा झटून प्रयत्न करावा, पण त्यांचा कंटाळा मात्र करूं नये. कारण जशा आपण त्यांच्या सुखाच्या सोबतिणी आहोंत, तशाच दुःखाच्या पण आहोंत हें त्यांनीं केव्हांही विसरूं नये.

विद्वान् लोकांनीं सुशील पतिपत्नीस वल्लीवृक्षाची उपमा दिली आहे, ती अगदीं अक्षरशः खरी आहे. **वृक्षास वेढून असणारी वेल तो वृक्ष जसजसा वाढत जातो तसतशी तीही जोरानें वाढूं लागते. आणि एकादे वेळीं जोराचें वादळ सुटून तो वृक्ष मुळासकट हालूं लागला म्हणजे ती त्यास न सोडतां अधिकाधिक चिकटून घट्ट धरिते. त्याचप्रमाणें सुशील स्त्री ही पतीच्या सौख्यसमयीं त्याची सुखाची वांटेकरी होते व संकटसमयीं त्याचें दुःख निवारण करण्यास व धैर्य देण्यास तयार होते. पतीची**

**नष्ट झालेली संपत्ति अथवा चलती मनांत न आणतां केवळ पतिभक्ति व स्त्रीधर्म म्हणून पतिबरोबर सुखदुःख भोगावयास तयार होते. स्त्रीची खरी परीक्षा बिकट परिस्थिति प्राप्त झाल्यावांचून होत नसते.** सबब जी स्त्री पतीच्या संकटसमयीं आपल्या स्त्रीधर्मास अनुसरून, त्या दुर्धर प्रसंगास धैर्यानें टक्कर द्यावयास तयार होते; तसेंच आपली शांत व संतोषवृत्ति यत्किंचितूही ढळूं न देतां कायम ठेविते, तीच खरी कर्तव्यदक्ष स्त्री समजावी.

प्राचीन व अर्वाचीन काळीं या भरत भूमींत पतिपरायण व कर्तव्यदक्ष अशा स्त्रिया बऱ्याच होऊन गेल्या. त्यांपैकीं प्रामुख्यानें जनक राजाची कन्या सीता ही होय. कैकेयीच्या दुराग्रहावरून पितृवचन पाळण्यासाठीं जेव्हां राम बनवासास जावयाची तयारी करूं लागले; तेव्हां अल्पवयी सीतेस ही बातमी कळतांच, तिनें स्त्रीधर्मास अनुसरून माहेरीं व सासरीं संपूर्ण राजैश्वर्य लोटांगण घालीत असतांही, श्रीरामचंद्रप्रभुबरोबर अरण्यांत जाण्याचा हट्ट धरिला. रामानें तिची परोपरीनें पुष्कळ वेळ समजूत घालून पाहिली, परंतु ती कांहीं केल्या आपला दुराग्रह सोडिना. ती श्रीरामास म्हणाली, ' महाराज, क्षत्रियांना व वीरांना असले शब्द उच्चारणें मुळींच शोभत नाहीं. **भार्या ही आपल्या पतीची जशी सुखाची वांटेकरीण आहे तशीच ती दुःखाची पण आहे.** स्त्रियांचा सर्वतोपरी आधार पति हाच असल्यामुळें, मला आपल्या सहवासांत अरण्यांत राहून जो आनंद होईल तो माझ्या पित्याच्या घरीं राहून देखील होणार नाहीं. ' तथापि राम म्हणाले, ' हे प्राणप्रिये, तूं म्हणतेस तें सर्व खरें आहे, परंतु बनवासांतील दुःखांची तुला कल्पना नाहीं. अरण्यांत सिंह, व्याघ्र, वगैरे हिंस्र पशूंचें मोठें भय असतें. मोठमोठ्या नद्या व नाले ओलांडावे लागतात व त्यांचे कांठीं इतका चिखल सांचलेला असतो कीं, त्यांतून एकाद्या मस्त हत्तीला देखील बाहेर निघणें दुस्तर होऊन जातें, मग यत्किंचित् अशा मनुष्याची ती काय कथा ? कित्येक वेळां अरण्यांत कित्येक

कोसपर्यंत पाणी मिळत नाहीं, त्यामुळें प्राण अगदीं कासावीस होऊन जातो. ठिकठिकाणीं मार्गांत भयंकर कांटे पसरलेले असतात. ते चालतांना पायांत बोंचतात, तेणेंकरून प्रवास करणें अति कठिण होऊन जातें. अरण्यांत वेळेवर मिळतील तीं कंदमुळें व फलाहार करून भूक शांत करावी लागते अगर एकादे दिवशीं उपवासी राहून देखील क्षुधा शांत करावी लागते. ऊन, वारा, थंडी, पाऊस हीं सर्व सहन करावीं लागतात. हें सर्व तुझ्यासारख्या सुकुमार स्त्रीच्या हातून होणें कठिण आहे. सबब तूं मजबरोबर येण्याचा दुराग्रह सोड व आनंदांत घरींच रहा. ' पण सीतेनें आपला दुराग्रह न सोडतां ती सद्गदित कंठें पुनः म्हणाली, ' प्राणनाथ, आपलें म्हणणें चुकीचें नसून रास्त आहे, सयुक्तिक आहे. परंतु येथें राहून मला जें आपलें विरहदुःख होणार आहे, त्यापुढें तुम्हीं हीं वर्णन केलेलीं सर्व दुःखें मी अगदीं तुच्छ समजतें. महाराज, एकादा वृक्ष वायूनें उन्मळून पडला असतां, त्याचेबरोबर त्याची छायाही लय पावते. स्त्री ही पतीची छायाच होय. आपल्या म्हणण्याप्रमाणें आपल्या सहवासांत जे जे कांटे व खडे माझ्या पायांना बोंचतील त्या त्या कांट्यांचा व खड्यांचा स्पर्श मला तापदायक न होतां, उलट तो मखमलीच्या मऊ गादीप्रमाणें अति सुखदायक होईल. तशीच आपली ही नयनमनोहर व सुंदर देहयष्टि माझ्या नेत्रांसमोर असली म्हणजे मला जें एक प्रकारचें आनंदाचें भरतें येत जाईल, त्यायोगें माझी जी खरी क्षुधाशांति होत जाईल तशी ती अयोध्येंतील अत्यंत ऐषआरामाच्या राजवाड्यांत राहून अत्युत्तम अशा पंचपक्वान्नांच्या जेवणापासून देखील तृप्त होणार नाहीं. राजवाड्यांत राहून उंची उंची लुगडीं व अंगांवर दागदागिने घालण्यापेक्षां तुमच्याबरोबर अरण्यांत राहून वल्कलें परिधान करण्यांतच मी विशेष आनंद मानीन. फार काय, परंतु आपल्या सहवासांत जें मला स्वर्गीय सुख मिळेल तें मला येथें राहून कशांतही मिळणार नाहीं. **आपला सहवास हेंच माझें स्वर्गसुख व आपला विरह हाच माझा नरकवास** असें मी समजतें. यापेक्षां अधिक

तें काय सांगूं ? ' हे सीतेचे निर्वाणीचे शब्द ऐकून व तिचे अंतःकरणांत आपणाविषयीं बसत असलेली सहानुभूति व पूज्यभाव पाहून, सीतापति रामही दिग्मूढ बनला. त्याचें अंतःकरण दयेनें उचंबळून येऊन, तो सीतेस सद्गदकंठें म्हणाला, ' हे प्राणसखि, तुला जर माझ्या वियोगानें खरोखरच एवढें असह्य दुःख होईल तर तुला बरोबर घेण्याची माझी मुळींच हरकत नाहीं. तूं जो हा मजबरोबर येण्याचा दृढनिश्चय केला आहेस, तो तुझ्या स्त्रीधर्मास व उभयकुळांस भूषणावह आहे. तुझें हें मजवर असलेलें निरतिशय व निर्व्याज प्रेम पाहून, तुझ्यापुढें स्वर्गसुख देखील मला तुच्छ वाटतें. कारण तुझ्या मनांत मजविषयीं वसत असलेली पूज्यभावना व शुद्धप्रेम पाहून तुला सोडून जाणें म्हणजे खऱ्या सुखाला आंचवणें असें मला वाटतें. असें म्हणून त्यानें सीतेस वनांत येण्याची तयारी करण्यास सांगितलें. अहाहा ! खरोखर ज्या दांपत्यांच्या अंतःकरणांत परस्परांविषयीं अशा निर्मळ पवित्र व शुद्ध प्रेमभावना वसत असतील त्यांच्या सुखापेक्षां स्वर्गसुखांत आणखी कांहीं विशेष सुख असेल असें निदान मला तरी वाटत नाहीं !



# प्रकरण १२ वें.

## पतिधर्म.

मनुष्याच्या सर्व अवयवांमध्यें शिर हें जसें प्रधान आहे, तशी प्रपंचाच्या सर्व साहित्यामध्यें पत्नी ही प्रधान मानिली आहे. मनुष्यास प्रपंचामध्यें इतर गोष्टींची कितीही कमतरता असली; परंतु दैवयोगें जर त्यास पत्नी सुस्वभावाची लाभली असली म्हणजे त्याच्या इच्छेनुरूप वर्तन करणारी असली तर त्यास इतर सर्व दुःखांचा तत्काळ विसर पडतो, आणि त्यामुळें त्याचें सुख दुणावतें. आतां पुष्कळांस त्यांच्या सुदैवानें सर्वतोपरी सुख लाभण्याइतकेंच उत्तम स्त्रीरत्न मिळालेलें असतें; परंतु इतर कांहीं स्त्रियांचें साहस व पापाचरण पाहून त्यांना आपल्या स्त्रीविषयीं संशय येऊं लागतो. कारण तारुण्याच्या भरांत स्त्रिया काय करितील याचा नेम नाहीं, अशा संशयाग्नीनें त्यांचें मन कलुषित बनतें. मग तिचें आचरण परीट घडीसारखें अगदीं स्वच्छ असलें तरी ते तिचा विनाकारण छळ करूं लागतात व त्यायोगें ते आपल्या मनाला नसतें दुःख लावून घेतात. जिला सर्व सुखाचें भांडार म्हटलें आहे, तीच स्त्री दुःखाचें मूळ आहे असें त्याला वाटतें. आपली स्त्री बाहेरून जशी सुंदर, सुशील व निर्दोष दिसते तशी ती अंतर्यामीं असेल का ? अशा संशयाग्नीनें त्यांचें मन निरंतर भ्रमण करीत असतें पण हा त्यांचा केवळ मूर्खपणा आहे. आपली स्त्री शहाणी, मर्यादशील, समजूतदार व पापभीरु असली म्हणजे पुरे आहे. शिवाय स्त्रीला सुधारणें किंवा बिघडविणें हें बहुतांशीं पतीच्या स्वाधीन असल्यामुळें, तो तिला जसें वळण लावील तसें तें तिला लागेल. एकाद्या निःस्सीम भक्ताच्या हांकेला दगडाचा देव देखील हांक देतो असें म्हणतात. मग पति जर पत्नीचा निःसीम

भक्त बनेल म्हणजे तिजवर शुद्धप्रेम करूं लागेल तर त्या हाडामांसांतल्या मूर्तींतील देवता जागृत होणार नाहीं काय ? अवश्य जागृत होईल. प्रथम निराशा होईल, पण त्या निराशेला न जुमानतां पतीनें आपला प्रेमयोग अखंड चालू ठेविल्यास त्यांत त्याला खात्रीनें यश मिळेल.

स्त्रीचा व्यर्थ छळ केला असतां ती जास्त कसोटीला उतरेल अशी कित्येकांची कल्पना असते, परंतु ती अगदींच चुकीची आहे. उलट अशा गांजणुकीपासून ती बिघडण्याचा विशेष संभव असतो, हें त्यांनीं केव्हांही विसरूं नये.

**प्रपंचांत पतीच्या अंगीं सहनशीलता असणें व पत्नीच्या अंगीं नम्रता असणें, या दोन गुणांची दोहोंना सारखीच अवश्यकता आहे.** कारण प्रपंचांत या दोहोंमध्यें वारंवार भांडणतंट्याचा प्रसंग येत असतो. अशावेळीं पतीनें अविचारपणानें क्रोधाधीन न होतां, प्रथम पत्नीचें संभाषण शांतपणें मुकाट्यानें ऐकून घ्यावें. तसेंच पत्नीनें जें काय निवेदन करावयाचें असेल तें तुसडेपणानें निवेदन न करितां अगदीं नम्रतेनें निवेदन करावें. असे गुण उभयपक्षानें धारण केले म्हणजे त्यांच्यांत कलह होण्याची भीति मुळींच उरत नाहीं. सारांश हा कीं, बलिष्ठाबलिष्ठाशीं गांठ पडली म्हणजे कलह झाल्यावांचून केव्हांही राहत नाहीं. म्हणून भांडण-प्रसंगीं दोहोंपैकीं एका पक्षानें तरी पडतें–नमतें घेतल्याखेरीज गत्यंतर नाहीं. आणि नमतें घेणें हें विशेषतः श्रेष्ठपक्षास विशेष भूषणावह आहे. सबब पतिपत्नीच्या भांडणप्रसंगीं पतीनें अंगीं सहनशीलता धरून, पत्नीस कृता-पराधाची क्षमा करावी. कारण स्त्रीपेक्षां सारासार विचार करण्याची शक्ति पुरुषांच्या अंगीं विशेष असते. सबब पतिपत्नीच्या भांडणप्रसंगीं पुरुषांनीं शांतता धारण करून, आपल्या अर्धांगीचें गोड गोड भाषणानें सांत्वन करावें. म्हणजे आपोआपच तिची बाजू लंगडी पडते व भांडणही थांबतें. पतिपत्नीचें भांडण म्हणजे केवळ प्रेमकलह होय. हा प्रेमकलह क्षणांत उद्भवतो तर क्षणांत नाहींसाही होतो. स्त्रियांनीं पतीविषयीं आपल्या अंतः-

करणांत पूज्यभाव बाळगून त्याची सर्वतोपरी सेवा करणें हें जसें त्यांचें कर्तव्य आहे; तद्वत्च पुरुषांनीं आपल्या धर्मपत्नीचें कोणत्याही बाबतींत मृदु-अंतःकरण न दुखवितां तिला सर्वतोपरी प्रेमानें वागविणें हें त्यांचें मुख्य कर्तव्य होय. अर्थात् पुरुषांनीं आपल्या सुदैवेंकरून अगर दुर्दैवेंकरून स्त्री कशीही लाभली असली, तरी तिला आपली गृहलक्ष्मी समजून, तिला कायेनें, वाचेनें, मनानें, धनानें व भूषणाच्छादनेंकरून सर्व अवस्थांमध्यें सदा आनंदित ठेवावें. व स्वतःप्रमाणें तिचा योग्य आदर करीत जाऊन तिच्या सर्व मनीच्छा शक्य तों तृप्त करणें हाच त्याचा खरा पतिधर्म होय.

स्त्रीच्या अंगीं परमेश्वरानें अशी कांहीं अद्‌भुत शक्ति ठेविली आहे कीं, ती जर मनांत आणील तर आपल्या अमोल सद्‌गुणांच्यायोगें समाजास हां हां म्हणतां उत्कर्षगिरीच्या अत्युच्च शिखरावर चढवून देईल; नाहीं तर आपल्या कवडीमोल दुर्गुणांनीं त्यास अवनतीच्या भयंकर खोल अशा भयानक खोऱ्यांत देखील लोटून देईल. स्वस्त्रीला सुधारणें किंवा बिघडविणें हें बहुतांशीं पतीच्या स्वाधीन आहे. सबब पतीनें स्वस्त्रीला योग्य वळण लावण्यासाठीं कसें वागवावें ह्याविषयीं मनूनें आपल्या स्मृतींत थोडक्यांत सांगितलें आहे कीं,

**पितृभिर्भ्रातृभिश्चैताः पतिभिर्देवरैस्तथा ॥**
**पूज्या भूषयितव्याश्च बहुकल्याणमीप्सुभिः ॥ १ ॥**
**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ॥**
**यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥ २ ॥**
**शोचन्ति जामयो यत्र विनश्यत्याशु तत्कुलम् ॥**
**न शोचन्ति तु यत्रैता वर्धते तद्धि सर्वदा ॥ ३ ॥**
**जामयो यानि गेहानि शपंत्यप्रतिपूजिताः ॥**
**तानि कृत्याहतानीव विनश्यानि समन्ततः ॥ ४ ॥**
**तस्मादेताः सदा पूज्या भूषणाच्छादनाशनैः ॥**
**भूतिकामैर्नरैर्नित्यं सत्कारेषूत्सवेषु च ॥ ५ ॥**
**प्रजनार्थं महाभागाः पूजार्हा गृहदीप्तयः ॥**
**स्त्रियः श्रियश्च गेहेषु न विशेषोऽस्ति कश्चन ॥ ६ ॥**
**उत्पादनमपत्यस्य जातस्य परिपालनम् ॥**
**प्रत्यहं लोकयात्रायाः प्रत्यक्षं स्त्रीनिबंधनम् ॥ ७ ॥**

**संतुष्टो भार्यया भर्ता भर्त्रा भार्या तथैवच ॥**
**यस्मिनेव कुले नित्यं कल्याणं तत्र वै ध्रुवम् ॥ ८॥**
**अपत्यं धर्मकार्याणि शुश्रूषा रतिरुत्तमा ॥**
**दाराधीनस्तथा स्वर्गः पितॄणामात्मनश्चह ॥ ९ ॥**

**अर्थ**— १ बहुत कल्याण इच्छिणारे असे बाप, भाऊ, पति, दीर यांनीं स्त्रियांचा योग्य मान ठेवावा व त्यांना अलंकारभूषणें द्यावीं. २ जेथें स्त्रियांची पूजा होते म्हणजे सन्मान केला जातो, तेथें देवता वास करितात व जेथें स्त्रियांचा मान ठेविला जात नाहीं, तेथें सर्व क्रिया फलद्रूप न होतां निष्फल होतात. ३ जेथें कुलीन स्त्रियांस दुःख होतें तें कुळ सत्वर नाश पावतें. व जेथें त्यांना पीडा होत नाहीं तेथें त्या कुळाची सर्वदा भरभराट होते. ४ अपमानानें असंतुष्ट होऊन कुलीन स्त्रिया ज्या घराण्याचें अहित इच्छितात; तीं घराणीं अवदसा पाठीमागें लागून सर्वप्रकारें नष्ट होतात. ५ ह्यास्तव हितेच्छु पुरुषांनीं सणवार, लग्नकार्य इत्यादि उत्सवप्रसंगीं वस्त्रालंकार व सुग्रास भोजन इत्यादिकांनीं कुलीन स्त्रियांचा मान राखावा. उत्तम स्त्रिया ही घराची शोभा होय. ६ संतति गुणवान् निपजावी एवढ्यासाठीं तरी त्यांचा योग्य आदरसत्कार करीत जावा. घरांत स्त्री व लक्ष्मी यांचेमध्यें कांहीं भेद नाहीं. ७ बालकास जन्म देणें, जन्मलेल्या बालकांचें योग्य पालनपोषण करणें, व नेहमीं अतिथि, मित्र इत्यादिकांचा भोजनादि सर्व व्यवहार प्रत्यक्ष पाहणें या सर्व सत्कृत्यांना कारण स्त्रीच होय. ८ ज्या घरांत भार्येच्या योगानें भ्रतार संतुष्ट असतो व भ्रताराच्या योगानें भार्या संतुष्ट असते, त्या कुळांत सर्वांचें अक्षय कल्याण होतें. ९ संतति, धर्मकृत्य, सेवा, सुख त्याचप्रमाणें पूर्वजांची व आपली सद्गति पण स्त्रियांच्याच स्वाधीन आहे. सारांश—

**अन्योन्यस्याव्यभीचारो भवेदामरणांतिकः ॥**
**एषधर्मः समासेन ज्ञेयः स्त्रीपुंसयोः परः ॥ १ ॥ मनु.**

विवाहित स्त्रीपुरुषानें परस्परांशीं आजन्म निष्कपटपणानें एकमतानें व सद्धर्मानें वागणें म्हणजे स्त्रीनें पातिव्रत्याचें व पुरुषानें एकपत्नीव्रताचें पूर्णपणें पालन करणें हेंच स्त्रीपुरुषांच्या परम श्रेष्ठ अशा धर्माचें थोडक्यांत लक्षण होय.

## प्रकरण १३ वें.

# स्त्रीनें पतीशीं कसें वर्तन ठेवावें ?

( १ ) स्त्रीनें सूर्योदयापूर्वी पतीचे आधीं उठावें, व त्याचे चरणांवर मस्तक ठेवून त्यास मनःपूर्वक नमस्कार करावा. नंतर हर्षयुक्त वदनानें त्याचें दर्शन घेऊन गृहकृत्यास लागावें.

( २ ) स्त्रीनें पति बाहेरून घरीं येतांच, प्रथम त्यास प्रफुल्लित मुद्रेनें सामोरें जावें. नंतर पाय धुवावयास पाणी देऊन, प्यावयास स्वच्छ व थंडगार पाणी द्यावें. मग नम्रपणें त्याचेबरोबर मधुर भाषण करावें.

( ३ ) स्त्रीनें पतीच्या आज्ञेशिवाय कोणतेंही व्रत किंवा उपवास न करितां व देवादिकांस न भजतां, पतीलाच प्रभुरूप मानून, त्याची मनोभावें सेवा करावी.

( ४ ) स्त्रीनें पतीस जे जे पदार्थ आवडत असतील ते ते करून देत जावें व आपल्या रीतिभाति पतीस आवडतील अशाच ठेवाव्या.

( ६ ) स्त्रीनें पतीस आपल्या ताब्यांत ठेवण्याचा निंद्य प्रयत्न केव्हांही करूं नये. कारण अशानें लोकांत पतीची पत व मान नाहींसा होतो.

( ६ ) स्त्रीनें पतीशीं बेबनाव होण्यासारखें वर्तन किंवा भाषण केव्हांही करूं नये. तसेंच पतीच्या मित्रमंडळीसमक्ष अगर परक्या इसमांसमक्ष पतीचे तोंडोतोंडीं येऊं नये. कारण ह्याचा वेळप्रसंगीं फार वाईट परिणाम होतो.

( ७ ) स्त्रीनें पतीच्या कोणत्याही कामांत स्वतः विचारपूस करूं नये, व असेंच करा असा दुराग्रहही धरूं नये.

( ८ ) स्त्रीनें प्रातःकाळीं मुखमार्जन व वेणीफणी करून, सौभाग्याचिन्ह जें कुंकू तें अगोदर लावावें. नंतर इतर गृहकार्यास आरंभ करावा.

( ९ ) स्त्रीनें एकादे वेळीं पतीचें म्हणणें रास्त नसल्यास ऐकूं नये, परंतु त्या विषयीं पतीची मधुर भाषणेंकरून उत्तमप्रकारें समजूत करून द्यावी.

( १० ) स्त्रीनें पतीस वक्तशीर जेऊं घालावें व आपण स्वतः तो जेवल्यावर जेवावें. तसेंच रात्रीं तो झोंपल्यावर झोंपावें. आपल्या येथें दासदासी असतांही पतीची सेवा स्वतः करीत जावी.

( ११ ) स्त्रीनें पतीच्या आज्ञेशिवाय बाहेर कोठेंही जाऊं नये, व कोणतेंही महत्त्वाचें काम करूं नये. तसेंच परगृहीं फार वेळ बसूं नये.

( १२ ) स्त्रीनें आपला पति बाहेरगांवीं गेला असल्यास, तो परत येईपावेतों अगदीं साधेपणानें रहावें, व आपलें आचरण गंगाजलाप्रमाणें अगदीं शुद्ध ठेवावें.

( १३ ) स्त्रीनें पतीच्या प्रेमरंगांत सदा दंग राहून आपला पतिव्रता धर्म प्राणान्तींही सोडूं नये. तसेंच आपल्या पवित्र शरीरास परपुरुषाचा स्पर्श न होऊं देण्याची व शरीराचा उन्नत भाग दिसूं न देण्याची विशेष खबरदारी घेत जावी.

( १४ ) स्त्रीनें पतीच्या सुखांत सुख व दुःखांत दुःख, आनंदांत आनंद, मानीत जावा व संकटसमयीं त्यास धैर्य देत जावें. तसेंच आजारीपणांत स्वतःचे आईप्रमाणें त्याची सेवा करून, त्याला तिळभरही दुःख न होईल इतकी काळजी वहात जावी.

( १५ ) स्त्रीनें पति जरी आपल्या दुर्दैवेंकरून म्हातारा, द्रव्यहीन, कुरूप व दीर्घरोगी असून सदा दुःखानें जरी तो गांजलेला असला, अगर अन्यायानें छळ करीत असला, तरी आपलें मन जराही कलुषित होऊं देऊं नये. उलट त्याची हास्यमुखानें रात्रंदिवस सेवा करीत जावी. मग स्वतःला कितीही कष्ट पडले तरी त्याची खंती बाळगूं नये.

( १६ ) पति कोणताही धंदा अगर उद्योग करीत असतां, त्यास प्रसंगानुसार कधीं कधीं अपयश किंवा तोटा येत असतो. अशावेळीं स्त्रीनें पतीस अद्वातद्वा न बोलतां किंवा दूषण न देतां मुद्दाम खर्च बेताचा ठेवावा.

( १७ ) पतीच्या उत्तम गुणांविषयीं परक्या इसमाजवळ हवी तेवढी बढाई मारावी. परंतु एकादी चूक, भांडण अगर घरांतील उणेपणा ह्याविषयीं मुखांतून एक चकार शब्दही काढूं नये.

( १८ ) प्रत्येक स्त्रीनें आपल्या पतीच्या हालचालीवर करडी नजर ठेवावी. व तो जर कुमार्गांत शिरत असला तर त्यास आपल्या मधुर भाषणेंकरून, त्या दुष्कृत्यापासून त्याचें मन परावृत्त करण्याचा सतत प्रयत्न करावा.

( १९ ) प्रत्येक स्त्रीनें सीतासावित्रीप्रमाणें आपलें पातिव्रत्य रक्षण करण्यास झटावें व परपुरुषास स्वतःच्या बंधुपित्यासमान मानीत जावें. पतीवांचून अन्य पुरुषाची अभिलाषा स्वप्नीं देखील धरूं नये.

---


## अहो, आज तुम्हीं असे डोक्यास हात लावून निराश कां बसलांत ?

काय करावें हो ! मला डोकें दुखण्याची व्यथा असल्यामुळें, कामधंदा सोडून सतत डोक्यास हात लावून बसावें लागतें. एकादें अनुभविक औषध असल्यास सांगा तरी ! हो ! हो ! अगदीं स्वानुभविक औषध आहे. कांहीं दिवसांपूर्वीं माझेंही असेंच डोकें दुखत होतें. त्यावेळीं मीं नानाप्रकारचीं औषधें लावून पाहिलीं. परंतु एकाही औषधापासून मला गुण येईना. अखेर मला एकानें सुचविलें कीं, तुम्हीं **चौधरी ब्रदर्स यांचा मोहनांजन बाम** वापरा म्हणजे तुम्हास खात्रीनें गुण येईल. त्याप्रमाणें मी **मोहनांजन बाम** मागवून तो चोळतांच मला थोड्याच वेळांत आराम वाटला. व त्याचा सतत उपयोग करीत गेल्यानें माझी डोकें दुखण्याची व्यथाही कायमची नष्ट झाली. सबब तुम्हीदेखील **मोहनांजन बाम** वापराल, तर खात्रीनें रोगमुक्त व्हाल. ( मोहनांजन बाम कोठेंही प्रसिद्ध दुकानदारांकडे मिळत असतो. )

पत्ता—**चौधरी ब्रदर्स**, फैजपूर, पूर्व खानदेश.

## प्रकरण १४ वें.

# पतीनें स्त्रीस कसें वागवावें.

( १ ) पतीनें स्त्रीचा केव्हांही अपमान करूं नये, व तिची योग्यता आपणापेक्षां कमी न लेखतां, तिचा स्वतःप्रमाणें व स्वतःच्या आईप्रमाणें बहुमान ठेवीत जावा.

( २ ) पतीनें आपल्या सुदैवेंकरून अगर दुर्दैवेंकरून स्त्री कशीही लाभली असली, तरी तिला आपली गृहलक्ष्मी—गृहदेवता मानून, तिचें योग्य पालन, पोषण, रक्षण व सन्मान करणें हेंच आपलें श्रेष्ठ कर्तव्य समजावें.

( ३ ) पतीनें स्त्रीला कोणतेंही काम सांगणें अगर बोलणें झाल्यास, हुकुमाच्या तोऱ्यानें केव्हांही सांगूं नये. कारण ती एकादी दासी, किंवा बटिक नव्हे तर आपली गृहदेवता आहे हें पूर्ण लक्षांत असूं द्यावें.

( ५ ) पतीनें स्त्रीला वयाच्या सर्व अवस्थांमध्यें सारखेंच सुख द्यावें व तिच्या सदिच्छा यथाशक्ति पूर्ण करीत जाव्या.

( ४ ) पतीनें नेहमीं श्री शिवाजी व तुकाराम महाराज यांच्याप्रमाणें कडकडीत एकपत्नीव्रत आचरावें. व परस्त्रीला स्वतःच्या आईबहिंणीप्रमाणें मानावें. आपल्या स्त्रीवांचून अन्य स्त्रीबद्दल मनानें देखील व्यभिचारकर्म करूं नये. कारण असा पापी पुरुष दारुण नरकवास भोगतो.

( ६ ) पतीनें कोणत्याही स्त्रीसमक्ष अगर मित्रमंडळीसमक्ष अगर परपुरुषांसमक्ष स्वस्त्रीला अनुचित असे अपशब्द केव्हांही उच्चारूं नयेत किंवा शिवीगाळही करूं नये. कारण ह्यायोगें तिच्या मनांत आपणाविषयीं तिरस्कार उत्पन्न होऊन मन कलुषित बनतें.

( ७ ) पतीनें स्त्रीच्या हातून एकादा मोठा अपराध घडल्यास, तिला फार तर शब्दरूपीं मार द्यावा, पण प्रत्यक्ष मारहाण केव्हांही करूं नये.

स्त्रीस मारणें हें महापाप मानिलें आहे. मारहाण अगर उपासमार केल्यानें किंवा टोंचून बोलण्यानें तिच्या मनांत आपणांविषयीं जो पूज्यभाव असतो तो नाहींसा होतो. व उलट ती कुकर्म करावयास प्रवृत्त होते. शिवाय हा पूज्यभाव तिच्या मनांतून नष्ट झाला म्हणजे ती पुढें आपला मान मुळींच ठेवीत नाहीं. ज्या घरांत पतिपत्नींत नेहमीं तंटाभांडण सुरू असतें, त्या घरांत सुखशांति व लक्ष्मी नांदत नाहीं. अशानें तें घर आनंदभुवन बनण्याऐवजीं शोकभुवन बनतें.

( ८ ) पतीनें स्त्रीला एकाद्या महदपराधाबद्दल विशेष शिक्षा करावयाची झाल्यास, मित्रांशीं अबोला हा जसा महाभयंकर मित्रदंड मानिला आहे; तद्वत् अनादर, अबोला पृथक्शयन हा महा दुस्तर नारीदंड समजावा. कारण ह्यायोगें खऱ्या कुलवंत स्त्रीस प्राणान्त वेदना होत असतात.

( ९ ) पतीनें स्त्रीचें मन दुखावेल किंवा कलुषित होईल असें बर्तन केव्हांही करूं नये. कारण स्त्री ही विशेषतः पतीवरच अवलंबून असणारी असल्यामुळें, तिला पतीवांचून अन्य गति नसते. म्हणून पतीनें स्त्रीच्या सुखाची काळजी स्वतःपेक्षांही अधिक वहात जावी.

( १० ) पतीनें कोणतेंही कार्य हातीं घेतल्यास, व त्यांत कांहीं विघ्नें आल्यास, आपली स्त्री जर शहाणी व विचारशील असली तर तिचें मत जरूर घ्यावें. पुष्कळ लोक आपल्या शहाण्या बायकोच्या सल्ल्यानें मोठमोठ्या संकटांतून मुक्त झाले आहेत, व पुष्कळ लोक आपल्या बायकोचें मत घेणें हा हलकटपणा समजून, मोठमोठ्या संकटाच्या कचाट्यांत सांपडले आहेत.

( ११ ) पतीनें जर आपली स्थिति बाईट असली तर ती आपल्या स्त्रीस मोकळ्या मनानें समजावून सांगावी. कारण ह्यायोगें ती घरखर्चांचे बाबतींत कांहीं तरी काटकसर खात्रीनें करील. पुष्कळ स्त्रिया नवऱ्याची खरी परिस्थिति न समजल्यामुळें, बाजवीपेक्षां फाजील खर्च करीत असतात.

( १२ ) पतीनें स्वस्त्रीस गृहराज्याची राणी बनवून वेताचा पैसाअडका तिच्या स्वाधीन करावा. व गृहकृत्यांविषयीं सर्व जबाबदारी तिच्या शिरावर

सोंपवून द्यावी. मात्र तिच्या प्रत्येक कृत्यावर आपली करडी नजर असूं द्यावी.

( १३ ) पतीनें स्त्रीच्या हातून काम करतांना एकादी चूक झाल्यास किंवा स्वयंपाकास वेळ लागल्यास, अगर अशाच प्रकारचा एकादा अपराध घडल्यास, तिला एकान्तीं शांतपणें योग्य तो सदुपदेश करावा; परंतु चारचौघांसमक्ष अपशब्द बोलून तिचा अपमान मात्र करूं नये.

( १४ ) पतीनें द्रव्य, वस्त्र, प्रेम, विश्वास व मधुर भाषण इत्यादिकेंकरून स्वस्त्रीला संतुष्ट ठेवावें. ज्या मनुष्यानें आपल्या धर्मपत्नीचें प्रेम संपादन केलें, त्यानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष इत्यादि चारही पुरुषार्थ संपादन केले असें म्हणण्यास हरकत नाहीं.

( १५ ) स्त्रीनें पतीचा अपमान करून व कटुवचन बोलून त्याचें अंतःकरण जाळणें आपल्या शास्त्रांत महानिंद्यकृत्य समजून, जसें महाभयंकर पाप गणिलें आहे; त्यापेक्षांही पतीनें स्त्रीचा अपमान करून व कटुवचन बोलून, तिचें हृदय विदारण करणें सहस्रपटीनें निंद्य व त्याज्य मानिलें आहे. कारण सतीच्या शापानें प्रत्यक्ष सूर्याचीही गति कुंठित होते, तर मग यत्किंचित् अशा मनुष्याच्या कुळाची गति खुंटून त्याचा नाश झाल्यास नवल तें कोणतें ?

( १६ ) स्त्री ही सत्पुरुषांची माता असल्यामुळें, ज्या कुळांत स्त्रीला अप्रसन्न ठेवण्यांत येतें, त्या कुळांत ईश्वरी कोप होऊन, त्या कोपामुळें त्या कुळांत सत्पुरुष निर्माण होण्याऐवजीं अधम पुरुष निर्माण होतात. व त्यायोगें तें कुळ सत्वर नाश पावतें. म्हणून ऐश्वर्य, सत्पुत्र, सत्कीर्ति, समृद्धि व शांति यांची इच्छा बाळगणारांनीं स्वस्त्रीस द्रव्य, अधिकार, उत्तम भोजन, शुद्ध प्रेम व मधुर भाषण इत्यादिकेंकरून नेहमीं आनंदित ठेवावें.

( १७ ) पतिपत्नीच्या कलहप्रसंगीं पतीनें आपली बाजू मुद्दाम पडती घेणें हें सोन्याहून पिंवळें होय. कारण स्त्री ही जाणूनबुजून अज्ञानी असते, हें त्यानें केव्हांही विसरूं नये.

## प्रकरण १५ वें.

# पतिपत्नी–पूज्यभावना.

पतीला देवाप्रमाणें पूज्य मानणें व त्याचे आज्ञेप्रमाणें वागणें, हल्लीं कित्येक अर्धवट इंग्रजी शिक्षण घेतलेल्या, व्यवहारज्ञान नसलेल्या व अक्षरशून्य असलेल्या स्त्रियांच्या अगदीं जिवावर येतें. परंतु त्यांनीं हें पूर्ण लक्षांत ठेवावें कीं, सुधारलेल्या राष्ट्रांत परिचयाच्या व प्रेमाच्या सबबीवर लग्नरूपी करारबंधनें होत असतात, त्यापेक्षां आपल्या लग्नांत एक लोकोत्तर बंधन असतें. आणि हें लोकोत्तर बंधन आपल्या लग्नांतील धर्मविधींत सांठवलेलें आहे. आपल्या लग्नांतील धर्मविधींत इतकीं उच्च व गंभीर तत्त्वें भरलेलीं आहेत कीं, लग्न होतांच त्या दोहोंच्या चारित्र्यांत एक विलक्षण क्रांति घडूं लागते. **परस्परांच्या अंतःकरणांत नैसर्गिक रीतीनें प्रेमाचें बीं पेरलें जातें, व त्याला पुढें हळुहळु प्रेमांकुर फुटत जाऊन परस्परांचे निकट सहवासामुळें एक वृक्ष तयार होतो. मुलांपेक्षां मुलींच्या अंतःकरणांत जडत चाललेल्या पतिभावनांमुळें ती दिवसानुदिवस मर्यादशील व लज्जाशील बनते आणि प्रेम; वात्सल्य, पूज्यभाव व सहनशीलता इत्यादि उच्च आणि कोमल भावना तिच्या पवित्र अंतःकरणांत जागृत होतात.** आतां ह्या पूज्यभावना ज्या स्त्रीच्या अंतःकरणांत उत्पन्न होत नाहींत; तिच्यांत व पशूंत यत्किंचित् देखील अंतर नाहीं. कारण या पूज्यभावनेबांचून चाललेला संसार म्हणजे निव्वळ पशूंचा संसार होय. केवळ दोन पाय व शेंपूट नाहीं एवढ्यानें कांहीं पशुपणाचा आरोप नाहींसा होणार नाहीं. **ईश्वरानें मनुष्यप्राण्यांसच ‘ज्ञान’ ही एक अजब देणगी दिली आहे. या ज्ञानाचा जर व्यवहारांत त्यानें सदुपयोग करून घेतला नाहीं**

**तर पशूंत व मनुष्यांत फरक तो कोणता ? प्रत्येक व्यवहारांतील पशूपणा पायाखालीं दडपून टाकणें हाच खरा मनुष्यपणाचा पाया होय.** सबब प्रत्येक पतिपत्नीनें परस्परांविषयीं ही पूज्यभावना आपल्या पवित्र अंतःकरणांत सतत जागृत ठेवून, अपालीं कर्तव्यें नीट बजावीत जावींत.

स्त्रीची जात स्वभावतःच भावनाप्रधान असते. **मात्र ही पूज्यभावना ज्या स्त्रीच्या अंतःकरणांत जितकी शुद्ध व ओजस्वी असेल तितकी ती अधिक तेजस्वी बनते.** ह्या पूज्यभावनेनेंच प्रेरित होऊन चितोडच्या राणी पद्मिनीनें प्रसंगावधान राखून पालखीची युक्ति लढविली व आपल्या प्रियपतीस अल्लाउद्दीनाच्या पंजांतून मोठ्या धाडसानें सोडवण्याची अजब कामगिरी बजाविली.तसेंच सावित्रीनें सत्यवानास मनानें वरून चुकल्यानंतर तिला नारदाकडून व आपल्या प्रिय पित्याकडून सत्यवान् राज्य-हीन व अल्पायुषी आहे असें समजलें तरी त्यावर तिनें निक्षून उत्तर दिलें कीं, मी कायावाचामनेंकरून सत्यवानास वरून चुकलें आहे. सबब मी प्राणान्तींही इतर पुरुषाशीं लग्न करणार नाहीं. फार काय सांगू ? सत्यवाना-खेरीज इतर पुरुष मला बंधुपित्यासमान होत. हे तिचे निर्वाणीचे शब्द ऐकून, तिचे पित्यास निरुपायास्तव सत्यवानाबरोबर तिचा विवाह करणें भाग पडलें. पुढें तिनें पतिविषयीं मनांत वसत असलेल्या पूज्यभावनेच्या बळावर सत्यवान् मृत्यु पावला असतांही साक्षात् यमधर्माशीं युक्तिवाद लढ-वून, त्याचेकडून आपल्या प्रियपतीस कसें जीवदान मागून घेतलें व आपलें मावळलेलें सौभाग्य पुनरपि कसें प्रकाशित केलें, हें माझ्या आर्यभगिनींना विदित असल्यामुळें निराळें सांगावयाची कांहीं विशेष जरूरी आहे असें मला वाटत नाहीं.

कोणत्याही मुलीचे प्रत्यक्ष जन्मदाते आईबाप देखील तिचें जन्मभर लालनपालन करूं शकत नाहींत, किंवा कोणत्याही मुलीला माहेरीं कायमचा राहिवास करून खरें प्रेमसुख मिळणें शक्य नाहीं. ह्यावरून स्त्रीचें खरें प्रेम-

सुख म्हटलें म्हणजे जे आजन्म तिचें लालनपालन करण्याची व सुखदुःखाचे वांटेकरी होण्याची हमी घेतात, अशा पतिदेवताच्या चरणांतच सांठविलेलें आहे, हें तत्त्व कोणत्याही आर्यस्त्रीनें विसरतां कामा नये. ह्या तत्वास अनुसरून ज्या प्रियभागिनी वागण्याचा दृढनिश्चय करितात; त्या पतिगृहीं नानातऱ्हेच्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या किंवा वाटेल तशी बिकट परिस्थिति प्राप्त झाली तरी आपल्या प्रियपतीस सोडून माहेरीं जाण्यास केव्हांही प्रवृत्त होत नाहींत, हें खालीं दिलेल्या उदाहरणावरून त्यांना सहज कळून येईल.

जाधवराव व शहाजीराजे हे जरी सासरेजांवई होते तरी त्यांचें कांहीं कारणावरून वैमनस्य आल्यामुळें, एकदां जाधवराव शहाजीराजांच्या पाळतिवर राहून, त्यांचा पाठलाग करीत सुटले. ह्यावेळीं त्यांचेबरोबर त्यांची प्रियपत्नी वीरमाता जिजाबाई ही असून, ती त्यावेळीं सात महिन्यांची गरोदर होती. ती गरोदर असल्यामुळें, तिची प्रकृति अगदीं नाजुक बनली होती; तरी आपला बाप मोठ्या वेगानें आपला पाठलाग करीत येत असल्यामुळें, तिलाही घोड्यावर स्वार होऊन वेगानें दौड करावी लागली. मार्गांत तिचें पोट अतिशय दुखूं लागल्यामुळें, एक पाऊलही पुढें जाण्यास तिच्या अंगांत सामर्थ्य राहिलें नाहीं. अशा बिकट परिस्थितींतही धैर्य धरून शहाजी राजांनीं एक तोड काढिली. जुन्नरास श्री निवासराव म्हणून एक स्वतंत्र सरदार रहात होता. त्याचा व शहाजीराजांचा निकट स्नेहसंबंध असल्यामुळें, तो त्यांना ह्यावेळीं चांगलाच उपयोगीं पडला. त्यांनीं जिजाबाईच्या संरक्षणासाठीं आपले कांहीं निवडक लोक जिजाबाईजवळ ठेवून तिला श्रीनिवासराव यांच्या आश्रयाखालीं शिवनेरी किल्ल्यांत ठेविलें व आपण बाकी राहिलेल्या लोकांनिशीं तसेच पुढें दौड करीत सुटले.

जाधवराव मागून मोठ्या वेगानें येत होता. तो शिवनेरी किल्ल्याजवळ येतांच त्यास शहाजीराजे पुढें निघून गेल्याची व जिजाबाईस शिवनेरी

किल्ल्यांत ठेविल्याची बातमी लागली. तेव्हां त्यांनीं स्वतः किल्ल्यांत जाऊन जिजाबाईची भेट घेतली. आपल्या मुलीची शोचनीय अवस्था पाहून त्यांचें, अंतःकरण कळवळलें. इकडे बाबास बघतांच जिजाबाईचा कोप अनावर झाला व त्याच्या ह्या दुष्कृत्याबद्दल त्याला दोष देऊन ती म्हणाली, 'बाबा, तुमचे शत्रु तर पसार झाले, परंतु त्यांच्या ऐवजीं मीच आतां तुमच्या हातीं सांपडलें आहें. सबब त्यांना जें शासन करावयाचें तुम्हीं योजिलें असेल, तेंच शासन मला करा म्हणजे अनायासें तंट्याचें मूळ नाहींसें होईल.' मुलीचे हे हृदयविदारक शब्द ऐकून जाधवरावास अत्यंत वाईट वाटलें. त्यांनीं तिला लडिवाळपणें पोटाशीं धरून म्हटलें, 'होणारासारखी बुद्धि सुचून वैमनस्य पडलें, त्याला कांहीं इलाज नाहीं. असो. आतां तुला कोठें जावयाचें आहे तें सांग, म्हणजे मी तुला तेथें नेऊन पोंचवितों. अगर शिंदखेडास तुझी येण्याची इच्छा असल्यास, तुला मी तेथें सुरक्षितपणें नेऊन पोंचाविण्याची व्यवस्था करितों!' 'मला येथेंच रहावयाचें असून माहेरीं मुळींच यावयाचें नाहीं.' असें त्या मानी व पतिनिष्ठ स्त्रीचें चोख उत्तर ऐकून, जाधवराव कांहींएक न बोलतां मुकाट्यानें तेथून चालता झाला. आपण सात महिन्यांची गरोदर तशांत आपल्या पतीचें व मोंगलांचें भयंकर वैमनस्य असल्यामुळें, त्यांच्यावर केव्हां कसा प्रसंग ओढवेल कोण जाणे, या विवंचनेंत ती रात्रंदिवस असून, शिवाय शिवनेरी किल्ल्यांत परक्याच्या आश्रयाखालीं रहावयाचें, व तशांत ही बातमी जर मोंगल सरदारांस समजली, तर आपणांवर केव्हां छापा येऊन आपण कैद होऊं व कोणकोणत्या हालअपेष्टा आपणास भोगाव्या लागतील ह्याचा मुळींच नेम नाहीं; अशा बिकट परिस्थितींत जिजाबाईनें आपला बाणा सोडला नाहीं; एवढेंच नव्हे तर यापुढें ती केव्हांही माहेरी गेली नाहीं.

इतर स्त्रीपुरुषांची गोष्ट कशीही असो; पण विवाहरज्जूनें बद्ध झालेल्या पतिपत्नीमध्यें निष्कपट प्रेम, ऐक्यभाव, सौजन्य इत्यादि सद्गुण अवश्य असले पाहिजेत. हा परस्परांचा संबंध एकमेकांच्या सुखवृद्धीस व दुःख-

निवृत्तीस साह्यभूत होत असतो. एकाचें सुख किंवा दुःख दुसऱ्याच्या सुखावर किंवा दुःखावर अवलंबून असतें. ह्यास्तव विवाहित स्त्रीपुरुषांनीं परस्परांशीं संसारांत गोडीगुलाबीनें राहणें विशेष सुखावह व जरूरीचें आहे. परंतु असा प्रकार बहुतेक ठिकाणीं आढळून येत नाहीं. प्रत्येक व्यक्तीचा स्वभाव भिन्न असल्यामुळें, ह्या जगांत अनंत तऱ्हा व अनंत प्रकारचे मासले दृष्टीस पडतात. दोघांचे स्वभाव परस्परांशीं मिळते नसतात. ह्यामुळें त्यांच्यामध्यें विळ्याभोपळ्या इतका वांकडेपणा असतो. बहुतेक पतिपत्नी-मध्यें कज्जा, फंद, फितूर, बितुष्टपणा वगैरे अनेक प्रकार आढळून येतात. आतां नेहमीं एकाच पक्षाचा गुन्हा असतो व दुसऱ्याचा मुळींच नसतो, असें केव्हांही म्हणतां येणार नाहीं. कधीं पतीकडून आगळिक झालेली असते तर कधीं पत्नीकडून मर्यादोल्लंघन झालेलें असतें. आतां तें कसेंही असलें तरी ही उभयतांमधील फूट पुष्कळवेळां संसारसुखाला हरकत करीत असते. सबब या फुटीपासून प्रत्येक पतिपत्नीनें चार पावलें दूर असणें हेंच विशेष सुखावह होय.

परमेश्वरानें या विवाहित स्त्रीपुरुषांमध्यें असाच कांहीं संबंध ठेविला आहे कीं, दोहोंपैकीं एकाची मानहानि झाली असतां, किंवा एकाला सुख-दुःख झालें असतां, त्यांत दुसऱ्यालाही वांटेकरी व्हावें लागतें. दोघांचे देह भिन्न तरी त्यांच्या सुखदुःखाचीं सूत्रें परस्परांत गुरफटलेलीं असतात. पहा ! पायाच्या तळव्याला कांटा बोचला असतां, तेथून साडेतीन हात उंचीवर आपलें मस्तक असतें; तरी देखील त्याला लागलींच तिडीक पोहोंचते. तद्वत् दांपत्यांपैकीं एकाच्या दुःखानें दुसऱ्या देहांत व्यथा होते व झाली पाहिजे. एकास आनंद झालेला पाहून दुसऱ्यासही आनंद व सुख होतें व झालेंच पाहिजे. ही भावना सतत डोळ्यापुढें ठेवून, प्रत्येकानें आपल्या जन्माच्या जोडीदारास आपल्या हातून अगर आपल्या एकाद्या दुष्कृत्या-पासून यत्किंचित्ही दुःख न होईल इतकें स्वतःचें आचरण शुद्ध ठेवावें, हें दोघांचेंही कर्तव्य होय. प्रपंचांत एकादेवेळीं दोहोंपैकीं कोणाकडून जरी

अविचाराचें कृत्य घडलें तरी त्याचीं कटुफळें दोघांनाही भोगावीं लागतात. जेथें पतिपत्नी एकमेकांवर दृढविश्वास ठेवून एकमेकांच्या विचारानें वागतात; तेथें परस्परांच्या सहवासानें दोघांनाही उत्तमोत्तम गोष्टी करण्याविषयीं उत्तेजन येतें; मग वाईट गोष्टींत मन घालण्यास त्यांना एक प्रकारची शरम वाटूं लागते. त्यामुळें त्यांचें दुःख उणावतें व आनंद दुणावतो. पतिपत्नींचे देह भिन्न असले तरी त्यांचें मन मात्र एक असलें पाहिजे. एकाच्या शरीरास पीडा झाली असतां दुसऱ्याच्या डोळ्यास तत्काळ पाणी आलें पाहिजे. असें उभयतांमधील स्वपरत्व नाहींसें करण्यासाठीं, पत्नीच्या विचारांच्या वातावरणांत पतीनें वावरण्याचा प्रयत्न करावा व पतीच्या विचाराच्या वातावरणांत पत्नीनें शिरण्याचा प्रयत्न करावा. अशाप्रकारें परस्परांना सुखी करण्याच्या पूज्यभावना ज्या पतिपत्नींच्या अंतःकरणांत दृढ बसत असतील त्याच पतिपत्नींना संसारांत खऱ्या सुखाचा लाभ मिळेल. सबब ज्या पतिपत्नींना स्वर्गीय आनंद येथेंच भोगावयाचा असेल त्यांनीं उभयतांच्या आशानिराशा, जयापजय, सुखदुःखें, नाना अडचणी व कठिण प्रसंग यांची पूर्ण जाणीव करून घेतली पाहिजे. पतीच्या वांट्यास जीं सुखदुःखें येतील तींच आपलीं सुखदुःखें, असें पत्नीनें मानिलें पाहिजे व स्त्रीच्या अडचणी त्याच आपल्याही अडचणी अशी पतीची दृढभावना झाली पाहिजे. व ह्या गोष्टी उभयतांनीं फक्त विचारांत न ठेवितां, प्रत्यक्ष आचारांत कृतीनें आणून दाखविल्या, तर त्यांचा सर्वकाळ आनंदांत गेल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं.

सारांश, पतिपत्नीनें आपल्या पवित्र अंतःकरणांत परस्परांविषयीं पूज्यभावना बाळगून, आपलें आचरण इतकें शुद्ध ठेवावें कीं, **नांवाला दोघांचे देह मात्र भिन्न असावे, परंतु आत्मा एकच असावा. एकाच मधुरतम आम्रफलाच्या त्या दोन खापा असाव्या. एकाच तेजस्वी हिऱ्याचीं तीं दोन शकलें असावीं. दोघांना एकच रुचि, एकच हव्यास, एकच आकांक्षा, तसेंच दोघांच्या अंतःकरणांत सद्गुणलोलुपता व एकसारखेंच निर्मळ व निर्व्याज प्रेम असावें.** अशा पूज्यभावना ज्या दांपत्यांच्या पवित्र हृदयमंदिरांत कायमचें निवासस्थान करून राहतील, त्या दांपत्यांची थोरवी जितकी वर्णन करावी तितकी थोडीच होईल.

## प्रकरण १६ वें.

# पतीस वश करण्याची गुरुकिल्ली.

कित्येक स्त्रिया म्हणतात कीं आमच्या नवऱ्याचं आम्हांला काडीइतकंही सुख नाहीं, मग प्रेमाचा गोड शब्द आमच्या कानीं कोठून पडणार? परंतु त्यांचें म्हणणें किती निरर्थक आहे पहा! **टाळी ही एका हातानें केव्हांही वाजत नसते. ती दोहों हातांनींच वाजवली जाते, हें कोणीही कबूल करील. तसेंच देवाला जर आपण अविचारानें प्रसन्न हो म्हणून सांगूं लागलों तर तो प्रसन्न होईल काय? केव्हांही होणार नाहीं. त्यास प्रसन्न करण्यासाठीं आपणांस त्याची एकनिष्ठपणें सेवाच केली पाहिजे. अशा एकनिष्ठ भक्तीच्या प्रभावामुळें देव प्रसन्नच काय, परंतु प्रत्यक्ष भक्तांचा बंदा गुलाम बनून त्यांच्या येथें हवीं तीं कामें करून राबल्याचीं शेंकडों उदाहरणें आपल्या पुराणांतरीं आढळून येतील.** संत सखुबाईच्या अगाध भक्तिप्रभावामुळें, देवास तिच्या येथें सर्व प्रकारचीं गृहकृत्यें करावीं लागलीं; एवढेंच नव्हे तर संत-सखुबाईच्या स्वरूपांत प्रत्यक्ष तिच्या नवऱ्याची सेवा करावी लागली. तसेंच जनाबाईच्या येथें तिच्या निःसीम भक्तिप्रभावामुळें पाणी भरणें, लुगडीं धुणें, दळण–कांडण करणें इत्यादि कामें करावीं लागलीं. द्रौपदीवस्त्रहरणाचे वेळीं द्रौपदीच्या हांकेसरशीं धांवत यावें लागून तिला गुप्तपणें नानातऱ्हेचीं उंची वस्त्रें पुरवावीं लागलीं व तिची लाज रक्षण करणें भाग पडलें. अर्जुनाच्या येथें सारथि बनावें लागून, स्वतः रथ हाकावयाचें काम करणें भाग पडलें. प्रल्हादाच्या भक्तीसाठीं त्याचे वचनास्तव निर्जीव स्तंभांत उत्पन्न व्हावें लागून हिरण्यकश्यपुचा वध करावा लागला. गोरा कुंभाराच्या येथें गाढवावर मातीच्या गोणी वहाव्या लागून, रुक्मिणीसह

स्वतः चिखल मातीचीं कामें करून, भांडीं घडावीं लागलीं. अहाहा! काय हा भक्तिप्रभाव! केवळ भक्तिप्रभावाच्या बळावर **जर तो जगच्चालक प्रभु भक्तांच्या आधीन होऊन हवीं ती कामें करूं लागतो, तर मग यत्किंचित् अशा मनुष्याची काय कथा! जगच्चालक प्रभूस वश करण्याचें 'निःसीम भक्ति' हें जसें रामबाण साधन आहे; तद्वत् प्रत्येक मानवव्यक्तीस वश करण्याची 'शुद्ध प्रेम व मधुर वाणी' ही अजब गुणकारी किल्ली परमेश्वरानें प्रत्येक मानवव्यक्तीच्या स्वाधीन केली आहे.** ह्या शुद्ध प्रेमाच्या व मधुर वाणीच्या ठायीं अशीच कांहीं दैवी आकर्षणशक्ति आहे कीं, तिच्या योगानें सिंहव्याघ्रादिकांसारखे क्रूर पशुदेखील मनुष्याच्या आधीन होऊन, हवीं तशीं कठिण कामें सर्कसमध्यें करून दाखवितांना आपण नित्य पाहतों. मग सरळ स्वभावाचा मनुष्य पतिव्रता स्त्रीच्या प्रेमाधीन होऊन तिचा प्रत्येक शब्द झेलूं लागला तर त्यांत नवल तें कोणतें?

पांडव काम्यक वनांत गेले असतां श्रीकृष्ण सत्यभामेसह त्यांना भेटावयास गेले; तेव्हां द्रौपदीनें आपल्या पांचही पतीस अगदीं मुठींत ठेवलेलें पाहून, एकेदिवशीं सत्यभामा द्रौपदीस म्हणाली, 'बाई द्रौपदी, तुम्ही आपल्या पांचही पतींना अगदीं मुठींत ठेवलेलें पाहून मला बाई मोठेंच नवल वाटतें. कारण ते तुमच्यावर केव्हांही रागावत नाहींत. असे कोणते मंत्रतंत्र तुमच्याजवळ आहेत, ते तरी मला सांगा म्हणजे मीही त्यायोगें श्रीकृष्णाला मुठींत ठेवीन.' यावर द्रौपदी सत्यभामेस म्हणाली, 'ज्या कजाग स्त्रिया असतात त्या मंत्रतंत्रादि उपायेंकरून आपल्या पतीस वश करण्याचा प्रयत्न करितात. परंतु त्यापासून त्यांना सुख न होतां उलट दुःख मात्र भोगावें लागतें. मंत्रतंत्रादि उपायेंकरून पति मुळींच वश होत नाहींत. त्यांना वश करण्याचें एक निराळेंच सुलभ साधन आहे तें मी तुला सांगतें. ऐक. अभिमान व क्रोध यांचा त्याग करून पतीस आवडत नसेल ती गोष्ट स्त्रीनें केव्हांही करूं नये. पतीला खुष ठेवण्यासाठीं स्त्रीनें निरभिमानपणानें

त्याची सतत सेवा करावी. अपशब्द बोलणें किंवा वाईट तऱ्हेनें उभें राहणें, वाईट तऱ्हेनें पाहणें किंवा अव्यवस्थित रीतीनें बसणें अगर भलभलत्याच ठिकाणीं जाणें इत्यादि गोष्टी स्त्रीनें टाळून त्याविषयीं अतिशय भीति बाळगावी. दुर्दैवेंकरून आपणास सवत असल्यास, तिजवर मनःपूर्वक प्रेम करावें. पतीच्या मनांत काय आहे हें जाणण्याची उत्कंठा स्त्रीनें केव्हांही बाळगूं नये. परपुरुषाकडे मग तो देव असो किंवा गंधर्व असो, तरुण असो वा श्रीमंत असो, कितीही सुंदर असो वा अलंकृत असो, त्याचेकडे स्त्रीनें ढुंकून सुद्धां पाहूं नये. पतीच्या पूर्वीं स्त्रीनें भोजन करूं नये, स्नान करूं नये किंवा शयन करूं नये. प्रातःकाळीं पति उठण्यापूर्वींच उठून गृहकृत्यास लागावें. पति बाहेरून घरीं येत असतां त्यास मोठ्या प्रेमानें सामोरें जावें व त्याचें हास्यमुखानें अभिनंदन करावें. नंतर पाय धुवावयास पाणी देऊन बसावयास पाट, चटई अगर एकादें आसन टाकून, थंडगार पाणी प्यावयास द्यावें. घरांतील भांडीं आंतून बाहेरून अगदीं स्वच्छ ठेवावीं. घर नित्य सारवून व वारंवार झाडून स्वच्छ ठेवावें. सासूनें सांगितलेलीं कामें वेडेंवांकडें तोंड न करतां व आळस न करतां करीत जावीं. घरांत चाकरमाणसें असल्यास, त्यांच्या कामाकडे सारखें लक्ष असूं द्यावें. पति बाहेरगांवीं गेला असतां, फुलमाळा, उटी, दागिने, शृंगार, परगृहीं जाणें इत्यादिकांचा स्त्रीनें अगदीं त्याग करावा. आपल्या मनांत कोणतीही शंका आल्यास, प्रथम पतीस तिजविषयीं विचारपूस करून उलगडा करून घ्यावा. पतीपासून कोणतीही गोष्ट लपवूं नये किंवा पतीचे मनांत शंका उत्पन्न होईल असें क्षुल्लक कामही करूं नये. कदाचित् आपल्या हातून घडून आल्यास त्याचें तत्काळ निरसन करून टाकावें. पतीवर ताबा चालविण्याचा निंद्य प्रयत्न केव्हांही करूं नये. पति जे जे पदार्थ खात नाहीं, ते ते पदार्थ आपणही खाऊं नये. जगांत आपणावर विनाकारण टीका होईल, पतीला न रुचेल किंवा परपुरुषांना भलतेंच उत्तेजन मिळेल, अशाप्रकारचें बोलणें, चालणें, हंसणें, थट्टामस्करी करणें स्त्रीनें जरूर टाळावें.

तसेंच कोणताही परपुरुष कोणत्याही निमित्तानें सलगी करूं लागल्यास, त्यास तटकन् बोलून, त्याची अमंगळ वाचा बंद करून टाकावी. तेणेंकरून पुनः तो तसलें अमंगळ भाषण करावयास केव्हांही प्रवृत्त होणार नाहीं. **स्त्रियांनीं आपलें शील पवित्र राखण्यासाठीं परपुरुषाशीं जितकें फटकून वागावें तितकें तें अधिक उत्तम समजावें.** सारांश पतिसौख्य उत्तम मिळावें अशी इच्छा बाळगणाऱ्या स्त्रीनें आपल्या पतीशीं नम्र, प्रसन्नचित्त व आर्जवी राहून त्याची सेवा जणूं काय एकाद्या रागावलेल्या भुजंगाप्रमाणें भीति बाळगून करीत जावी. व गृहकृत्यें अशा पद्धतशीर रीतीनें पार पाडावींत कीं, त्यायोगें पतीस धन्यता व जगास कौतुक वाटावें. वहिनी, अशाप्रकारें वागणारी गृहिणी पतीला अत्यंत प्रिय होऊन जगालाही पूज्य होते. मी सुद्धां ह्याच सुलभ साधनांनीं माझ्या पतींना भारून वश करून घेतलें आहे. अन्यवशीकरण मला ठाऊक देखील नाहीं. पतीच्या इच्छेप्रमाणें आपण वागलें असतां, आपल्या सर्व इच्छा पूर्ण होतात. व त्यांच्या इच्छेविरुद्ध वर्तन केलें असतां आपल्या इच्छा निष्फळ ठरतात. **कष्ट सोसले असतां सुख प्राप्त होतें. सुखानें तें केव्हांही प्राप्त होत नाहीं.** ह्यासाठीं तूं कृष्णाची मनोभावें सेवा कर. वेळप्रसंगीं दासी नसली तर तिचें काम तूं स्वतःच कर. कृष्णानें एकादी गोष्ट तुजजवळ सांगितली तर ती तूं बाहेर फोडूं नकोस. कजाग, चहाडखोर, चोरट्या व दुर्वर्तनी स्त्रियांच्या संगतींत केव्हांही उभी राहूं नको. अशाप्रकारें तूं वागलीस म्हणजे कृष्ण तुझ्या इच्छेविरुद्ध केव्हांही जाणार नाहीं हें तूं पक्कें समज.' हें द्रौपदीचें भाषण ऐकून सत्यभामेस मोठा आनंद झाला व त्याप्रमाणें वागण्याचें द्रौपदीस तिनें अभयवचन दिलें.

भगिनींनो! एकाद्या लहानग्या मुलाचे हातीं एकादी वस्तु असल्यास, दुसरा एकादा मुलगा जसा त्याच्याशीं गोड गोड बोलून ती हिरावून घेतो; तद्वत् एकाद्या पुरुषाचें मन एकादी परस्त्री देखील इच्छित कार्य साधण्या-

साठीं, तेवढ्यापुरतें लटकेंच प्रेम दाखवून सहज हिरावून घेते. हें जर व्यवहारांत आपण नित्य पहातों, तर मग **एकादी स्त्री जर आपल्या पतीवर जलवर्षावाप्रमाणें शुद्ध प्रेमाचा सारखा वर्षाव सतत करील तर या जगांत असा कोणता निर्दय पुरुष आहे कीं, त्याचें अंतःकरण आनंदलहरींनीं उचंबळून येणार नाहीं? प्रेमाचा गोड शब्द प्रेमानें ओथंबलेल्या गोड अंतःकरणांतून जर येईल, तर त्या प्रेममय मधुर शब्दरवानें कोणाचें समाधान अगर मन मोहित होणार नाहीं? भगिनींनो! विचार करा कीं, आपणांजवळ भरपूर द्रव्य असलें, आपणांजवळ राजवाड्यासारख्या भव्य व सुंदर इमारती असल्या, हवा खाण्याकरितां बागबगीच्यासारखीं पुष्कळशीं रम्य स्थानें असलीं, आपल्या तैनातीस शेंकडों नव्हे हजारों नोकरमाणसें असलीं तरी आपल्या पतीच्या गोड शब्दावांचून हें सारें वैभव व्यर्थ नव्हे काय?** ह्याचा स्वमनींच दूरवर विचार करून पहा म्हणजे तुमचें मनच तुम्हांला ग्वाही देईल. तुमच्या मनाची खात्री पटतांच, तुम्हीं द्रौपदीनें सत्यभामेस कथन केलेल्या सुलभ साधनांनीं आपल्या पतीस वश करण्याच्या उद्योगास लागाल. तुम्हीं आपला उद्योग सतत चालू ठेविल्यास, '**प्रयत्नाअंतीं परमेश्वर**' या म्हणप्रमाणें तुमच्या पतींचीं अंतःकरणें आपोआपच दयेनें उचंबळून येतील व मग तुमचा प्रत्येक शब्द मान्य करावयास ते खात्रीनें तयार होतील.

## प्रकरण १७ वें.

# गृहराज्याची पट्टराणी.

ईश्वरानें स्त्री व पुरुष ह्यांना सर्वांत श्रेष्ठ मानलेल्या अशा नरदेहांत जन्म देऊन, त्यांच्यांतील मनोभावना व सामर्थ्य ह्यांच्या भेदानुरूप त्यांच्याकडे संसारोपयोगी कांहीं कामें सोंपविलीं व त्यांची यथाशक्ति दोहोंत सारखी विभागणी करून दिली. स्त्रीपुरुषांनीं आपापल्या अधिकारानुरूप हीं सोंपविलेलीं कामें जर सुराळितपणें पार पडलीं तर त्यांच्यांत तंटाभांडण केव्हांही न होतां, संसारास एकप्रकारची विशेष शोभा येऊन, त्या घरांत लक्ष्मीचा वास होतो; परंतु ज्या गृहांत ह्या दिनक्रमांत कोणत्याही कारणानें व्यत्यय येऊन, त्याच्यांत बिघाड झाल्यास, संसाराचें सौंदर्य नष्ट होऊन त्याऐवजीं दुःख व अशांति त्यांच्या वांट्यास येते. करितां गृहराज्यांतील जीं कामें स्त्रियांच्या वांटणीस आलेलीं आहेत, तीं त्यांनीं योग्यप्रकारें व शांततेनें पार पाडावींत. हीं कामें त्यांना सुराळितपणें व शांतपणें पार पाडतां यावींत म्हणून परमेश्वरानें त्यांच्या कार्याचें क्षेत्रही शांततामय बनवून, त्यास 'गृह' असें सुंदर नामाभिधान दिलें आहे. ह्या गृहांत स्त्रियांना कोणताही व कसलाही उपद्रव होण्याचा मुळींच संभव नसतो. कारण कोणताही वीरपुरुष कितीही शौर्यवान् असला तरी तो आपलें शौर्य गृहांत मुळींच गाजवूं शकत नाहीं. तसाच एखादा अधिकारी कितीही वरिष्ठ असला तरी तो आपणाकडे सोंपविलेल्या एकाद्या राजसत्तेचा कठोर अंमल देखील गृहाच्या उंबरठ्यांत गाजवूं शकत नाहीं. त्यामुळें गृहमंदिरांतील गृहदेवता निर्धास्तपणें पाकसिद्धि, गृहव्यवस्था व शिशुसंगोपन इत्यादि सर्व कृत्यें अगदीं सुराळितपणें पार पाडीत असतात. तसेंच पुरुष बाहेरचा सर्व व्यवहार दक्षतेनें पार

पाहून, त्याची बाह्य व्यवस्था नीटनेटकी ठेवीत असतात. ह्यावरून पाहूं जातां गृह हेंच स्त्रियांचें चिमुकलें राज्य आहे असें सिद्ध होतें. स्त्रियांना या गृहराज्यपदावर आरूढ होण्याची सुसंधि जेव्हां प्राप्त होते, तेव्हां त्या गृहसम्राज्ञी हें नांव धारण करून गृहराज्यांतील सर्व लोकांवर आपली सत्ता चालवितात. परंतु ही सत्ता चालवितांना त्यांनीं लक्षांत असूं द्यावें कीं, **स्वतःची स्वतःवर सत्ता असल्याशिवाय परक्यावर आपली सत्ता चालविणें केव्हांहीं शक्य नाहीं. कारण ज्याला स्वतःचें मन आपल्या ताब्यांत ठेवितां येत नाहीं, तो परक्याला तरी आपल्या ताब्यांत कसा ठेवूं शकेल?** करितां आपल्या गृहराज्यांतील सर्व लोक आपल्या ताब्यांत असावे, अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या गृहसम्राज्ञीनें आपल्या अंतःकरणांत कुविचारांचा अल्पांशही शिरूं देतां कामा नये. सतत सद्विचारांच्या नियंत्रणाखालीं राहून, आपलें आचरण पवित्र ठेवावें व आपलीं गृहकृत्यें योग्यरीतीनें पार पाडावींत. अशा तऱ्हेनें जी गृहिणी आपलें वर्तन गंगाजलाप्रमाणें शुद्ध ठेवील, तिच्या गृहराज्यास विशेष प्रकारची बळकटी येईल व तेणेंकरून तिच्या पट्टराणीपदाचा बहुमान खात्रीनें वृद्धिंगत होत जाईल यांत तिळमात्र शंका नाहीं.

परंतु हल्लीं स्त्रीस्वतंत्रता अधिक बोकाळल्यामुळें, पुरुषांप्रमाणें आपणांसही स्वतंत्रवृत्तीनें सर्वत्र वागतां यावें अशी एक अनिष्टकारक महत्त्वाकांक्षा कित्येक सुशिक्षित स्त्रियांच्या अंतःकरणांत बाणूं लागली आहे. त्यामुळें मोठमोठ्या शहरीं कित्येक गृहराज्यांत हा राज्यकारभार सुरळीत चाललेला दिसून येत नाहीं. ह्यास मुख्य कारण पाश्चात्य लोकांचें अंधानुकरण व स्त्रियांची अल्पबुद्धि हेंच होय. स्त्रियांना पुरुषांप्रमाणें सर्वच बाबतींत स्वतंत्रता देणें केव्हांही इष्ट होणार नाहीं. परंतु हल्लीं 'स्वतंत्र' या शब्दाचा सुकाळ झालेला दिसून येत आहे. व त्याबरोबरच स्त्रीस्वातंत्र्य हाही शब्द प्रचारांत अगदीं रूढ होऊन बसला आहे. मुलींना उच्चशिक्षण ( इंग्रजी शिक्षण ) देऊन, त्यांना पुरुषांप्रमाणें स्वतंत्रतेनें वागूं देण्याबद्दल हिंदुस्थानांत जिकडेतिकडे जारीनें

प्रयत्न सुरू आहेत. व त्याप्रीत्यर्थ सामाजिक परिषदेला जोडून, स्त्रियांची 'महिला परिषद्' हि भरविण्यांत येत असते. स्त्रीपुरुषांना धर्म-नीतिशिक्षणाच्या अभावीं उच्च शिक्षण देण्यांत येतें व त्याचे दुष्परिणाम किती भयंकर होत आहेत हें धडधडीत सर्व लोकांना, विशेषतः सुधारक लोकांना स्पष्ट दिसत असतांही, त्यांनीं स्त्रीस्वतंत्रतेस पाठबळ देणें म्हणजे केवळ मूर्खपणा नव्हे काय ! '**विनाश्रये न शोभन्ते पंडिता वनिता लता**' या वाक्यावरून पाहूं जातां स्त्रियांना स्वतंत्रता देण्यास त्या मुळींच पात्र नाहींत. ज्याप्रमाणें एकादी सुंदर लता एकाद्या बळकट वृक्षाच्या अगर मंडपाच्या आश्रयानें भराभर वाढत गेल्यानें, तिची एकाद्या वनचर पशुपासून नाश पावण्याची भीति नाहींशी होत जाते, व त्यायोगें, ती अति जोरानें वाढत जाऊन कांहीं दिवसांनीं पुष्पवती बनते व तेणेंकरून ती अधिकच खुलून उठते; तशीच स्त्री ही पुरुषांच्या आधीन राहिल्यानें द्विपाद नरपशूपासून खरी सुरक्षित राहते, व त्यांतच स्त्रीची खरी स्वतंत्रता आहे. कारण मनुष्य जरी पुर्ण स्वतंत्र व स्वेच्छाचारी आहे, तरी त्याला देखील वडील माणसांची भीति ही असतेच. परंतु ही भीति ज्यांना नसते, त्यांचेवरही प्रसंगीं अनिष्ट परिणाम घडून येत असतात. मग स्वैरपणानें मनसोक्त बर्तन करणाऱ्या असहाय स्त्रियांवर काय काय अनिष्ट परिणाम घडून येतील ह्याचा भगिनींनों ! तुम्हींच आपल्या मनाशीं विचार करून पहा, म्हणजे खात्रीनें तुमची शंका निरसन होऊन, तुमची चूक तुम्हांस अचुक दिसून येईल. भगिनींनो ! मुलांमुलींच्या विवाहसमयीं म्हटल्या जाणाऱ्या वधूवरांच्या अनेक प्रतिज्ञामंत्रांपैकीं खालील प्रतिज्ञामंत्राचा भावार्थ लक्षांत घेतला असतां, पुरुषांपेक्षांही आपणास अधिक स्वतंत्रता आहे असें तुम्हांला खात्रीनें कळून येईल.

**ॐ सम्राज्ञी श्वशुरे भव । सम्राज्ञी श्वश्र्वांभव ।**
**ननान्दरि सम्राज्ञी भव । सम्राज्ञी अधिदेवृषु ॥ १ ॥**

या मंत्रांत वर आपल्या नववधूला म्हणतो कीं, 'हे भार्ये, आजपासून तूं

माझ्या गृहराज्याची स्वामिनी बनली आहेस. सबब तूं एकाद्या सार्वभौम बादशहाच्या पट्टराणीप्रमाणें पूर्ण सत्ताधारी व निःपक्षपाती हो. तसेंच कुटुं-बांतील सर्व लहानथोर मंडळीबरोबर निष्कपटप्रेमानें व मोकळ्या मनानें वाग.' या उच्च आशीर्वादाच्या गोड फळांचा मधुर स्वाद, जेव्हां वयस्क स्त्रीच्या हातांत या गृहराज्याचा संपूर्ण कारभार सोंपविण्यांत येतो व त्याची तिला पट्टराणी बनविण्यांत येतें, तेव्हां तिला तो पूर्णपणें चाखावयास मिळतो. शिवाय गृहराज्यावर पतिपेक्षां स्त्रीचीच सत्ता केव्हांही विशेष असते; एवढेंच नव्हे तर गृहराज्याचा मुख्य स्वामी जो पति, त्याचेहि अंतः-करणावर आपले हक्क गाजवून, ती त्याची हृदयस्वामिनी बनते. मग भगि-नींनो! तुम्हींच सांगा ह्यापेक्षां तुम्हांस अधिक स्वतंत्रता ती कोणती हवी? मत्प्रिय भगिनींनो! उच्च शिक्षणानें बहकून व अभिमानप्रेरित होऊन अशा देहभान बनूं नका. तुमचीं या विदेशी शिक्षणानें नीतिभ्रष्ट होत असलेलीं अंतःकरणें अगोदर नीतिशिक्षणानें सुसंस्कृत बनवा, म्हणजे पुरुषांप्रमाणें आपणांलाही स्वतंत्रता असून, आपले अधिकार पुरुषांपेक्षां अधिक उच्च दर्जाचे आहेत असें तुम्हांस सहज दिसून येईल. कल्पना करा कीं, सीता, द्रौपदी, दमयंती यांच्यासारख्या महान् पराक्रमी व वैभवशाली राजांच्या महान् सती स्त्रियांवरही त्यांच्या पतींच्या क्षणैक गैरहजेरींत मोठमोठे अनर्थ ओढवले आहेत; तर मग आपणांसारख्या यत्किंचित् पामर जनांच्या अबलांवर त्यांना पूर्ण स्वतंत्रता दिल्यास, किती भयंकर अनर्थ कोसळतील हें फक्त त्या जगन्नियंत्या परमेश्वरालाच ठाऊक!

ह्यास्तव भगिनींनो! तुम्हीं स्त्रीस्वातंत्र्याचें वेड आपल्या डोक्यांतून काढून टाका व तुम्हांस मिळालेल्या पट्टराणीपदाच्या बहुमानाची विशेष भरभराट व्हावी व आपलें गृहराज्य सुरळीत चालावें, ह्यासाठीं तुम्हीं प्रथम आपल्या गृहराज्यांतून क्रोध, गर्व मत्सर, हेवा, संशय इत्यादि कट्टया शत्रूंची एकदम हकालपट्टी करा. व त्यांचे जागीं तत्क्षणींच मधुर भाषण, प्रेम, नम्रता,

शांतता, सहनशीलता, संतोषवृत्ति इत्यादि आपल्या हितचिंतकांची नेमणूक करा. असें केल्यानें तुमच्या गृहराज्यास एकप्रकारची बळकटी येईल व त्या योगें कज्जारूपी हल्ला करण्याचें धैर्य कुटाळ व निंदाखोर लोकांस मुळींच होणार नाहीं.

आपलें गृहराज्य विशेष आनंदानें नांदावें म्हणून गृहिणीनें स्त्रीधर्मास उपयुक्त* असे कांहीं नियम करावे व लागलींच ते अमलांत आणून त्या-प्रमाणें आपलें आचरण ठेवावें. प्रसंगविशेषीं आपल्या हातून एखाद्या नियमाचें उल्लंघन होऊन अपराध घडल्यास, पश्चात्तापानें त्याची शुद्धि करावी, व पुनः आपल्या हातून अशी चूक न होऊं देण्याविषयीं विशेष काळजी बाहात जावी. लोकप्रिय होऊं इच्छिणारा राजा आपली सत्ता कायम टिकावी म्हणून ज्याप्रमाणें प्रजेची अनुमति घेतो; तद्वत् गृहिणीनें आपल्या कुटुंबांतील सर्व लोकांची कोणत्याही कार्यांत सल्ला घेणें अत्यावश्यक होय. परस्परांची सल्ला घेतल्याबांचून कोणत्याही व्यक्तीचें कार्य मनाजोगें घडून येत नसतें. अशा कडेकोट बंदोबस्तानें जी गृहिणी काळजीपूर्वक आपलें गृहराज्य चालवील, तिचा गृहसंसार निर्धारितपणें सुरळीत चालून, कुटुंबांतील माणसेंच काय परंतु शेजारीपाजारी व इतर लोक देखील तिच्या चातुर्याची, सद्-गुणांची व गोडस्वभावाची प्रशंसा करूं लागतील ह्यांत शंका नाहीं.

अशा रीतीनें प्रत्येक गृहिणीनें आपल्या गृहराज्याची घडी नीट बसवावी, व आपल्या कुटुंबांतील लहान थोर मंडळीशीं ममतेनें वागून व मधुर भाषण करून, त्यांचें प्रेम संपादन करून घ्यावें. नंतर आपल्या गृहराज्याचा मुख्य सूत्रधार जो आपला पति त्याजकडे आपला मोर्चा वळवावा, त्याच्या अंतःकरणावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठीं वर सांगितलेल्या हितचिंतकांच्या साह्यानें व निःसीम शुद्धप्रेमानें त्यास प्रेमवेडा बनवून, मुठींत आणण्याचा प्रयत्न सतत चालू ठेवावा. पाण्याच्या सतत धारेनें

* प्रकरण २५ पहा.

दा. क्र. ३०२८

**एकादा मोठा खडकसुद्धां विदीर्ण होतो किंवा प्रयत्नांत जर आपण कुचराई केली नाहीं तर देव देखील आपणास यश द्यावयास मुळींच काटकसर करीत नाहीं. मग आपल्या निःसीम पातिसेवेनें पतीचें मन कां बरें द्रवणार नाहीं?** ह्यास्तव भागिनींनो! आपल्या पतीचें प्रेम संपादन करण्यासाठीं तुमच्या अंगांत जेवढी करामत असेल तेवढी लढवा व त्याच्या अंतःकरणरूपीं किल्ल्यावर प्रेमरूपीं जादूचे हल्ल्यावर हल्ले चढवून, तो काबीज केल्याशिवाय केव्हांही माघार घेऊं नका. अशा तऱ्हेनें जी गृहिणी आपल्या पतीचें मन वश करून घेईल व उलट त्याला प्रीति करावयास भाग पाडून, त्याच्या हृदयावर हक्कानें आपलें स्वामित्व गाजवील तीच खरी सौभाग्यशाली गृहराज्याची पट्टराणी समजावी.

तसेंच पुरुषांनींही आपल्या अर्धांगीचें प्रेम संपादून घेण्याचा दीर्घ प्रयत्न करावा. तिला पशुवत् न वागवितां अर्धांगी म्हणजे आपलें अर्ध शरीर, अशी सद्भावना मनांत सतत जागृत ठेवून, तदनुसार तिचें यथायोग्य पालन, पोषण व संरक्षण करावें. स्त्री ही घरांतील प्रत्यक्ष लक्ष्मीच होय. सबब ज्या घरांत ह्या लक्ष्मीला दुःखी, कष्टी, व अप्रसन्न ठेवण्यांत येतें व ज्या घरांत पतिपत्नींत नेहमीं तंटाभांडण होत असतें; त्या घरांत जरी विपुल संपत्ति असली तरी तेथें दारिद्र्यदशा ही हटकून शिरतेच. व ज्या घरांत स्त्रीला नेहमीं सर्वतोपरी आनंदी ठेवण्यांत येतें व तिचा योग्य बहुमान ठेविला जातो, त्या घरांत लक्ष्मी म्हणजे संपत्ति नसली तरी आपोआप चालून येते. एवढी सत्ता केवळ स्त्रियांच्या दुःखी व आनंदी असण्यांत गुप्तरीतीनें वास करीत असते. असें मनुनें आपल्या मनुस्मृतींत म्हटलें आहे. सबब पुरुषांनीं स्वस्त्रियांचीं कोमल मनें केव्हांही न दुखवितां खालीं लिहिल्याप्रमाणें त्यांना खूष ठेवून, त्यांचें प्रेम संपादन करावें.

स्त्रियांचा स्वभाव जात्याच प्रेमळ, काटकसरी व ईर्ष्याखोर असा असतो. सबब पुरुषांनीं मिळविलेला पैसा व घरखर्चाचें काम त्यांचेकडे सोंपवून द्यावें. ह्यामुळें त्यांना साधारणपणें आपलें उत्पन्न किती व खर्च किती हें सहज

कळून येईल. तेणेंकरून त्या घरखर्चाचे बाबतींत पुरुषांपेक्षां केव्हांही जास्त काटकसर करितील; ह्या योगें अनायासेंच पैशांची उत्तम बचत होत जाईल, शिवाय त्यांच्या हातांत गृहकारभार सोंपविल्यामुळें, त्या नेहमीं प्रसन्न व पतिनिष्ठ राहतील. मात्र जी स्त्री सुशिक्षित नसेल तिच्या खर्चाकडे पतीनें स्वतः देखरेख ठेवीत जावी. कारण शिक्षणाच्या व व्यवहारज्ञानाच्या अभावीं, ती एकाद्या बाबतींत फसण्याचा बराच संभव असतो. अशाप्रकारें सर्व गृह-कारभार त्यांच्याकडे सोंपवून दिल्यास, त्यांना आपला अधिकार केवळ सांगकाम्या दासी किंवा बटकीप्रमाणें आहे असें न वाटतां, गृहराज्याचीं सर्व सूत्रें हातीं घेतलेल्या व त्याची अंतर्बाह्य सर्वतोपरी व्यवस्था चालविणाऱ्या पट्टराणीचा आहे हें त्यांना पूर्णपणें कळून येईल व त्यायोगें त्या आपलें घर प्रत्यक्ष स्वर्गभुवन बनवून दाखवितील यांत तिळप्राय संदेह नाहीं.

---


## बाल शुद्धलेखन.

ह्यांत पहिल्या, दुसऱ्या इयत्तेस ऱ्हस्व, दीर्घ व अनुस्वार ह्यांविषयीं अगदीं सोपे नियम देऊन भरपूर शब्दसंग्रहही दिलेला आहे. ह्यामुळें सदर पुस्तकाचे सतत वाचनानें लहान मुलांना शुद्धाशुद्ध लिहिण्याची संवय अल्प-काळांतच लागते. एक प्रत मागविणारांनीं दोन आण्याचीं तिकिटें पाठवावीं.

पत्ता–जे. आर. **चौधरी** पिंपरूडकर

फैजपूर, पूर्व खानदेश.

## प्रकरण १८ वें.

# संसाररूपीं रथ.

ईश्वरानें इतर योनींतील सर्व प्राणिमात्रापेक्षां मनुष्यप्राण्यास एक विशिष्ट प्रकारची देणगी दिली आहे. ती देणगी म्हटली म्हणजे '**सदसद्विवेक बुद्धि**' ही होय. या बुद्धीच्या बळावर त्यानें त्यास संसारभार वाहण्यासाठीं, नानाप्रकारचीं सुखदुःखें भोगण्यासाठीं व यथामति पापपुण्याचा सौदा करण्यासाठीं मृत्युलोकीं जन्मास घातलें आहे. शिवाय त्यानें मनुष्यप्राण्यांत अप्रतिम असा विवाहसंबंध लावून दिला आहे. ईश्वरानें जर हा विवाहसंबंध मनुष्यप्राण्यांत लावून दिला नसता, तर अरण्यवासी स्वतंत्र पशु ज्याप्रमाणें आपली भूक, तहान, हिंसादि कोणत्या तरी उपायानें शांत करीत असतात; त्याप्रमाणेंच मनुष्यांनींही केलें असतें. मग पशूंत व मनुष्यांत कांहींच फरक राहिला नसता; परंतु या विवाहसंबंधामुळें, मनुष्यप्राण्यांत भक्ष्याभक्ष्य, पेयापेय, वाच्यावाच्य, गम्यागम्य, कार्याकार्य, योग्यायोग्य इत्यादि विधिनिषेध उत्पन्न झाले. त्यामुळें मनुष्यास सुखप्राप्तीसाठीं व दुःखनिवृत्तीसाठीं अनेक उद्योग करावे लागतात. या उद्योगामुळें मनुष्याचें ज्ञान वाढून अनेक शास्त्रें व कला निर्माण झाल्या. या सर्व कारणांमुळें या विवाहसंबंधास विशेष महत्त्वाचें स्वरूप मिळून, त्यास सर्व धर्मांत पवित्र मानण्यांत आलें आहे.

आतां या विवाहाविषयीं सर्व धर्मांत एकच चाल नसून अनेक चाली रूढ झाल्या आहेत. कोठें एके काळीं एका पुरुषास एकच स्त्री करण्याचा अधिकार असे, तर कोठें स्वयंवराची चाल असे. कित्येक ठिकाणीं नवरा मृत्यु पावला असतां स्त्रीस आजन्म वैधव्यांत दिवस कंठावे लागतात; तर कित्येक ठिकाणीं एक स्त्री मरण पावली असतां, पतीस दुसरी बायको कर-

ण्याचा अधिकार आहे. दुसरी मेल्यावर तिसरी, तिसरी मेल्यावर चौथी याप्रमाणें अनेक स्त्रिया करण्याचा अधिकार आहे. व कित्येक ठिकाणीं तर पहिली बायको जिवंत असतांही दुसरी, तिसरी, चौथी, पांचवी इत्यादि स्त्रिया करण्याचा अधिकार आहे. ह्याप्रमाणें अनेक देशांत अनेक जातींत अनेक चाली रूढ झाल्या आहेत. ह्या सर्वांवरून पाहूं जातां, संसारांत मनुष्यास स्त्रीसुखासारखें अन्य सुख कोणतेंच श्रेष्ठ नाहीं, हें सिद्ध होतें. मात्र मनुष्यास खरें स्त्रीसुख मिळणें, हें स्त्रीच्या चांगुलपणावर अवलंबून आहे, असें कोणासही दिसून येईल. सुदैवेंकरून मनुष्यास जर बायको उत्तम स्वभावाची मिळाली असली व संसारांत मग कितीही संकटें आलीं तरी त्यांना न जुमानतां मोठ्या आनंदानें तो तीं सहन करितो; परंतु दुर्दैवेंकरून जर बायको वाईट स्वभावाची मिळाली असली व मनुष्य कितीही ऐश्वर्य-संपन्न असला तरी त्यास तिच्यापासून खरें स्त्रीसुख मिळणें शक्य नसतें. यावरून या जगांत स्त्रीच्या अंतःकरणांत अमृत व विष ईश्वरानें सारखेंच भरलें असावें असें दिसून येतें. कारण स्त्री पुरुषावर आसक्त होऊन प्रीतीचा वर्षाव करूं लागली तर तीच अमृतवल्लीप्रमाणें अति सुखकारक होते. व तीच विरक्त बनून प्रीतिशून्य बनली तर विषमंजरीसमान अति दुःख-दायक होते.

देशमुखांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, परमेश्वरानें मनुष्यास ज्या कांहीं अत्युत्तम देणग्या दिल्या आहेत, त्यांपैकीं ‘सुशील पत्नी’ ही एक उत्कृष्ट देणगी होय. तिला गृहरत्न अथवा गृहभांडार ह्या पदव्या विशेष शोभतील. सुशील पत्नीचा मधुर आवाज हेंच मनुष्याचें उत्तम संगीत व तिचें मंदस्मित हा त्याचा महदानंद होय. तिचें सान्निध्य हेंच त्याचें जीवनामृत व तिचा सतत उद्योग हेंच त्याचें उत्तम बक्षीस होय. तिचा मितव्यय हाच त्याचा उत्तम मुनीम व तिच्या मुखांतून निघणारे अमृततुल्य शब्द हेच त्याचे विश्वासु सल्लागार मित्र होत. नानाविध चिंतांनीं जड झालेल्या त्याच्या उद्विग्न मनास हलकें करण्याकरितां व त्यास पुनः ताजा हुरूप

आणण्याकरितां तिचें मृदु अंतःकरण हेंच त्याचें रम्य विश्रांतिस्थान होय. पतीच्या कल्याणार्थ परमेश्वराजवळ भाकीत असलेली करुणामय प्रार्थना त्याच्या ऐहिक व पारमार्थिक सुखासाठीं तरफदारी करणारे वकील होत.

एकूण या संसाररूपीं भवसागरांतून पार पाडण्यास स्त्री ही मनुष्यास वेगवेगळ्या रूपानें मदत करीत असते. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे मनुष्याची बरी वाईट दानत देखील स्त्रीवरच अवलंबून आहे. परमेश्वरानें हें लक्ष्मीनारायणाचें जोडपें निर्माण करून, ह्या दोहोंना अगदीं निरनिराळा मार्ग आंखून देऊन, उभयतांचे योग्यतेप्रमाणें त्यांची त्यास कामगिरी लावून दिली आहे. ही कामगिरी एकंदर मानवजातीच्या कल्याणाकरितां असून, ती उभयतांनाही परस्परांच्या सहाय्यानें व सहानुभूतीनें करावयाची असते. परमेश्वरानें निरनिराळ्या कामांची जी विभागणी करून दिली आहे, तिचा क्षणभर विचार केल्यास कोणासही आश्चर्य वाटल्यावांचून राहणार नाहीं. परमेश्वरानें पुरुषांच्या अंगीं राग दिला आहे तर स्त्रियांच्या अंगीं शांति दिली आहे. पुरुषांना विद्या तर स्त्रियांना हौस दिली आहे. पुरुषांना शक्ति तर स्त्रियांना सौंदर्य दिलें आहे. पुरुषांना धैर्य तर स्त्रियांना मर्यादा व लज्जा दिली आहे. पुरुष दुःखाचें निवारण करतात तर स्त्रिया त्याचें सांत्वन करितात. पुरुषांचें अंतःकरण कठोर असतें तर स्त्रियांचें कोमल असतें. पुरुषांचें तेज बाहेर पडतें तर स्त्रियांचें घरांत पडतें. पुरुषांच्या भाषणानें ज्ञानप्राप्ति होते तर स्त्रियांच्या भाषणानें मनोरंजन होतें. पुरुषांचें शरीर बळकट असतें तर स्त्रियांचें नाजूक असतें. पुरुषांचें मन धीट असतें तर स्त्रियांचें भीरु असतें. शौर्यानें मोठमोठीं कामें होतात; परंतु संसारांतील सर्व कामांत मार्दवाची गरज अधिक लागते. एकंदरींत दोघांचे गुण महत्त्वाचे असून, उभयतांनीं आपापल्या गुणांप्रमाणें वर्तन ठेवून, आपापली कामगिरी बिनबोभाट पार पाडल्यास, संसारास एकप्रकारची विशेष शोभा येईल.

एकाद्या सागरांतून तरून जाण्यास नाबाड्यास नौकेचें साह्य लागतें. तसेंच या संसारसागरांतून तरून जाण्यास मनुष्यास स्त्रीचें साह्य लागतें व तें अक्षरशः खरें आहे. कारण संसाररूपीं रथाचीं नवराबायको हीं दोन चाकें होत. हीं दोन्हीं चाकें उत्तम असलीं तरच तो रथ सुरळीत चालेल. नाहींतर ज्याप्रमाणें एकाद्या गाडीचें चाक मार्गांत एकाएकीं मोडल्यामुळें, गाडीवानास ती गाडी वाहून नेण्यास जसे भयंकर श्रम पडतात किंवा मोठी यातायात सोसावी लागते; त्याप्रमाणेंच ज्या पुरुषास स्त्री नाहीं किंवा असून ती कटुवचन बोलून हृदयविदारण करणारी अगर दुराचारसंपन्न असली तर त्या पुरुषास हा संसाररूपी रथ चालविण्याचे कामीं अति दुःख सहन करावें लागून भयंकर हाल भोगावे लागतात. सबब संसाररूपीं रथाला हीं दोन्हीं चाकें जोडतांना प्रत्येकानें फारच खबरदारी घेतली पाहिजे. व ज्या ज्या प्रसंगीं ह्या दोहों चाकांपैकीं कोणत्याहि एका चाकांत जो कमीपणा दिसून येत जाईल तो त्या त्या प्रसंगीं तत्क्षणींच काढून टाकीत गेलें पाहिजे. तरच प्रत्येक पतिपत्नी या दुःखरूपीं भवसागरांतून आपली जीवितयात्रा सुखानें संपवून सुरक्षितपणें पार पडतील. परंतु ज्या ठिकाणीं नवराबायकोचीं मनें शुद्ध नाहींत; एकमेकांचीं बोलणीं एकमेकांस आवडत नाहींत; एकमेकांचे मनांत एकमेकांविषयीं पूज्यभाव नाहीं; ज्यांचे स्वभाव कुत्र्याच्या शेंपटी इतके सरळ आहेत; त्या ठिकाणीं हा लक्ष्मीनारायणाचा संसाररूपीं रथ सुरक्षितपणें पार कसा पडावा?

**ह्यासाठीं संसारांत स्वर्गीय सुख भोगण्याची ज्यांना उत्कट मनीषा असेल त्यांनीं उभयतांमध्यें नेहमीं तडजोडीचा प्रकार ठेविला पाहिजे. अमुकनें आपणांशीं अमुक तऱ्हेनें वागावें अशी आपली इच्छा असल्यास आपणही त्याच्याशीं तशाच तऱ्हेचें वर्तन ठेविलें पाहिजे. एकाचें सुख तें दुसऱ्याचें सुख व एकाचें दुःख तें दुसऱ्याचें दुःख अशी भावना उभयतांच्या अंतःकरणांत उत्पन्न झाली पाहिजे. उभयतांची संवय व आवड हीं नेहमीं**

**एकसारखीं ठेविलीं पाहिजेत. उभयतांना जन्मभर एकत्र राहून व उभयतां मिळून संसार करावयाचा आहे हें लक्षांत घेऊन उभयतांनीं वेळप्रसंगीं एकमेकांच्या दोषांकडे दुर्लक्ष करीत गेलें पाहिजे. या संसारांत पतिपत्नींच्या हातून वारंवार चुका होत असतात. त्या त्या प्रसंगीं उभयतांनीं परस्परांस सांभाळूनच घेतलें पाहिजे. नाहींतर एकादेवेळीं त्या चुकीचे परिणाम भयंकर त्रासदायक होत असतात. सबब पतिपत्नींनें परस्परांवरील प्रेम चिरकाल टिकावें व उभयतांमध्यें केव्हांही वितुष्टपणा येऊं नये म्हणून आजचा राग उद्यांपर्यंत केव्हांही धुमसत ठेवूं नये. तसेंच गतगोष्टींबद्दल अगर एकाद्या चुकीबद्दल एकमेकांना टोमणे मारीत बसूं नये. हा संसार केवळ माझ्याचसाठीं आहे अशी स्वार्थी वृत्ति कोणींही बाळगूं नये. येणेंप्रमाणें परस्परांनीं वर्तन ठेविल्यास व परस्परांना प्रत्येक बाबतींत सांभाळून घेतल्यास दोहोंचा संसार सुखमय होईल यांत शंका नाहीं.**

**'अर्धं भार्या मनुष्यस्य, भार्या श्रेष्ठतमः सखा'** ही व्यासोक्ति अगदीं अक्षरशः खरी आहे. स्त्री ही पतीच्या जीवनकलहांतील जिवलग मित्रांपेक्षांही श्रेष्ठ असा एक मित्र आहे. कायमची मित्रता होण्यास दोन्हीं व्यक्तिही अगदीं समानशीलच असल्या पाहिजेत, नाहींतर दोहोंत मित्रता होणें शक्य नाहीं; आणि कदाचित् झाली तरी ती कायम टिकणें अशक्य आहे. यावरून असें वाटतें कीं, पतिपत्नी हे पूर्वजन्मींचेच अति जिवलग मित्र असावेत. कारण त्याशिवाय परक्याची कन्या आपल्या आईबापांना व बहिणीभावांना सोडून, आपल्या सुखदुःखांची वांटेकरी केव्हांही बनली नसती किंवा पतीबरोबर आजन्म एकजीव होऊन राहिलीच नसती. ह्यास्तव उभयतांनीं सेव्यसेवकभाव मनांत न आणितां अगदीं जिवलग मित्राच्या नात्यानें परस्परांशीं वागणें हें सर्वांत उत्तम होय. कारण दोन मित्र परस्परांशीं अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागत असतात. त्यांच्यांत एक

स्वतंत्र व दुसरा परतंत्र किंवा एक मोठा व दुसरा लहान असा भेदभाव मुळींच नसतो. एकाचा जितका दुसऱ्यावर ताबा असतो तितकाच दुसऱ्याचा पहिल्यावर ताबा असतो. सबब पतिपत्नीनें हा मित्रभाव आपल्या मनांत सतत जागृत ठेवावा व त्याप्रमाणें उभयतांनीं आपलें वर्तन शुद्ध असूं द्यावें.

मनूनें पतिपत्नीच्या कर्तव्याविषयीं थोडक्यांत म्हटलें आहे कीं,

**तथा नित्यं यतेयातां स्त्रीपुंसौ तु कृतक्रियौ ॥**
**यथा नाभिचरेतां तौ वियुक्ता वितरेतरम् ॥ मनु० ॥**

परस्परांची फुटाफूट म्हणजे परस्परांचा बेबनाव होऊन उभयतांना जराही त्रास होणार नाहीं, असा विवाहित स्त्रीपुरुषांनीं नेहमीं यत्न करावा व म्हणजे पतीनें प्रसंग विशेषीं कोमलपणा धारण करावा स्त्रीनें शहाणपणानें संसार करून शक्य ते गुण संपादन करण्याचा प्रयत्न करावा.

**थोर स्त्रीपुरुषांनीं रागीट पुरुष व मूर्ख स्त्री या उभयतांना भयंकर विषारी गणलें आहेत. तसेंच ज्या पुरुषाच्या अंतःकरणांत दयेचा लेशही नाहीं व ज्या स्त्रीच्या अंतःकरणांत ज्ञानाचा अंश नाहीं, असे स्त्रीपुरुष जगांत असून नसून सारखेंच होत, असें मानिलें आहे.** म्हणून उभतांनाही नीतिशिक्षण देण्याची अत्यंत जरूरी आहे. कारण गृहस्थाश्रमी पुरुषांनीं बाहेरचा सर्व व्यवहार सांभाळणें हें जसें त्यांचें कर्तव्य आहे; तसेंच गृहकृत्यें नीट चालवून योग्य तऱ्हेनें शिशुसंगोपन करणें आणि त्यांना योग्य शिक्षण व वळण देऊन त्यांच्याकडून आपल्या कुळाला भूषविणें हें स्त्रियांचें मुख्य गृहकृत्य होय. एवढी महत्त्वाची कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडण्याची जबाबदारी स्त्रियांच्या शिरीं आहे, हें लक्षांत घेऊन प्रत्येक आईबापांनीं आपल्या मुलींना बाळपणीं आवश्यक असें स्त्रीशिक्षण देण्याची जरूर व्यवस्था करावी. हल्लीं बहुतेक आईबाप आपल्या मुलांना बरेंच शिक्षण देत असतात; परंतु त्या मानानें पाहूं गेलें तर आपल्या मुलींना तें मुळींच शिक्षण देत नाहींत, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

## प्रकरण १९ वें.

# स्त्रीशिक्षणाची आवश्यकता.

आपल्या मुलांना योग्य शिक्षण देऊन, त्यांना संसार करावयास लायक करणें हें कोणताही बाप आपलें आद्यकर्तव्य समजतो; परंतु आपल्या मुली-बद्दल तो अगदींच बेफिकीर राहतो. मुलांप्रमाणें मुलींनाही संसारोपयोगी शिक्षण देऊन, त्यांना संसारास लायक करणें हेंही आपलें कर्तव्य आहे, याची त्याला मुळींच जाणीव नसते. ही त्याची भयंकर घोडचूक नव्हे काय ? कारण स्त्री व पुरुष हीं संसारांतील मुख्य दोन अंगें असल्यामुळें, तीं दोन्हींही बरोबर व एकमेकांस शोभतील अशींच असलीं पाहिजेत. परंतु हल्लीं आमच्या समाजाचें एक अंग अगदीं निरुपयोगी बनलें आहे. स्त्रीस 'गृहलक्ष्मी, गृहदेवता' असें म्हणण्याची आपल्यांत चाल आहे, परंतु विद्येचें भूषण असल्याशिवाय तिच्या अंगीं लक्ष्मीपण किंवा देवतापण येणें शक्य नाहीं. ह्यासाठीं व्यवस्था, टापटीप, स्वच्छता, उद्योग, नियमितपणा, समंजसपणा, गृहकृत्यांची पूर्ण माहिती, मितव्यय, व ईश्वरानें दिलेल्या स्थितींत संतोष मानणें इत्यादि गुण बाळपणापासून मुलींना अवश्य शिक-विले पाहिजेत. ज्या घराण्यांतील स्त्रियांमध्यें वरील गुण असतील त्याच घराण्यांतील मुलें कुळवान् निपजतील. स्त्रियांनीं जर आपलीं कामें नियमित-पणें केलीं नाहींत, तर पुरुषांच्या कामाचीही भयंकर गैरसोय होऊन, त्यांचे हातून कोणतींच कामें सुरक्षितपणें पार पडणार नाहींत. तसेंच आपलें उत्पन्न काय व खर्च काय याचा विचार न करितां जर स्त्रिया अज्ञानपणें उधळमापें खर्च करूं लागल्या, तर पुरुषांनीं कितीही द्रव्यसंपादन केलें तरी दारिद्र्य नाहींसें होणार नाहीं.

शिक्षणाच्या अभावीं मुलांच्या शरीरप्रकृतीस कसें जपावें ह्याचें स्त्रियांना अगदींच ज्ञान नसतें. कारण त्यांना आरोग्यशास्त्र व पाकशास्त्र ह्याविषयीं मुळींच शिक्षण मिळत नसल्यामुळें मुलांचे फार हाल होतात. आईच्या मूर्खपणानें मुलें आजारी पडून, कित्येक वेळां तीं प्राणासही मुकतात. कित्येक आया मुलांचे फाजील लाड करून, त्यांना शक्तीबाहेर खाऊं घालतात, शिवाय काम करूं देत नाहींत. परंतु त्यांचे हेच लाड मुलांस अपायकारक होतात. खरोखर पाहूं गेलें असतां गरिबांपेक्षां श्रीमंतांचीं मुलें अधिक सशक्त व निरोगी असलीं पाहिजेत. परंतु आईस आरोग्यरक्षणाचे नियम ठाऊक नसल्यामुळें, ती स्वतःच अशक्त बनत जाते, मग मुलांची गोष्ट तर लांबच राहिली!

कित्येक स्त्रिया असमंजसपणामुळें आपल्या सुनांना अति क्रूरपणानें वागवीत असतात; त्यामुळें ‘संत सखुबाई’ सारख्या कित्येक सुशील सुनांनीं देखील सासरीं महत् दुःखें भोगीत असल्याचीं शेकडों उदाहरणें पुराणांतरीं आढळून येतात. व हल्लींही असलीं खडतर दुःखें भोगीत असल्याचीं बरींच उदाहरणें नजरेस येत आहेत. पैकीं २।३ वर्षांपूर्वीं एके गांवीं एक घडून आलेलें उदाहरण खालीं दिलें आहे. त्यावरून माझ्या प्रिय भगिनींची खात्री होईलच.

त्या गांवीं ९।१० वर्षांच्या सुनेच्या शरीरावर अठ्ठावीस ठिकाणीं डागल्यामुळें, तिच्या सासूस व नणंदेस या अमानुष क्रौर्याबद्दल प्रत्येकीस ७ वर्षें काळेपाण्याची शिक्षा ठोठावण्यांत आली आहे. भगिनींनो! विचार करा कीं, नऊ दहा वर्षांची बालिका ती काय? अशा अल्पवयी व अजाण बालिकेचे हातून असा कोणता महदपराध घडला असावा कीं, त्याबद्दल सासूनें व नणंदेनें मिळून तिच्या सर्वांगावर निर्दयपणें ठिकठिकाणीं तप्त डाग देऊन सबंध शरीर भाजून काढायची कठोर शिक्षा अमलांत आणावी! असल्या मांगहृदयी सासूचें हें अमानुष कृत्य पाहून जगांत असा कोणता

पाषाणहृदयी मनुष्यप्राणी आहे कीं, त्याचें सर्वांग थरारून त्याला कंप सुटणार नाहीं! खरोखर, बहुतेक स्त्रियांना एकदां कां सासूपणा प्राप्त झाला म्हणजे त्या आपण देखील एकवेळ सुना होतों, हें साफ विसरून जातात. तसेंच कित्येक स्त्रियांचा असा संकल्प असतो कीं, आपण सुना असतांना आपल्या सास्वांनीं आपणांस जितका त्रास दिला असेल त्याच्या दुप्पट त्रास आपण आपल्या सुनांना देऊं; परंतु त्यांना हें समजत नाहीं कीं, आपलें भाग्य थोर म्हणून ईश्वराच्या कृपेनें आपणांस सासूपणाचा हक्क प्राप्त झाला. सबब सुनांना स्वतःच्या पोटच्या मुलीप्रमाणें सुखसमाधानानें वागविणें हा आपला धर्म होय. परंतु असा सुविचार एकाही सासूच्या डोक्यांत येत नाहीं. उलट सून कितीही शांत स्वभावाची मिळाली असली तरी तिला कडक रीतीनें वागविण्याचा जणूं काय आपणांस जन्मसिद्ध हक्कच आहे अशी दुष्ट भावना त्यांच्या अंतःकरणांत वास करूं लागते व त्यामुळें त्या आपल्या सुनांना नाहक त्रास देण्यास प्रवृत्त होतात. परंतु परक्याची मुलगी आपण आपल्या मुलाकरितां व आपल्या कुळाचा उद्धार करण्याकरितां आणिली आहे, सबब तिला प्रेमानें वागविणें हें आपलें कर्तव्य आहे, याची जाणीव त्यांच्या अंतःकरणांत केव्हांही उत्पन्न होत नाहीं.

बहुतकरून आपल्या हिंदु लोकांत सासूसुनांमध्यें विशेष कलह होत असतात. ह्यास मूळ कारण सासूचा असमंजसपणा व सुनेचा अशिक्षितपणा हेंच होय. हा स्त्रियांचा अज्ञानपणा नाहींसा करण्यासाठीं त्यांना सुशिक्षण देण्याची अत्यंत जरूरी आहे. परंतु आमच्या लोकांचें स्त्रीशिक्षणाकडे जितकें लक्ष जावयास पाहिजे तितकें तें जात नाहीं ही मोठी खेदाची व दुःखाची गोष्ट आहे. असो. सासूसुनांमध्यें कलह न माजतां, उभयतांमध्यें एकी नांदावी म्हणून सासू व सून यांनीं परस्परांशीं कसें वागावें ह्याविषयीं दोन शब्द खालीं दिले आहेत; त्याकडे माझ्या प्रियभगिनी जरूर लक्ष देतील अशी आशा आहे.

सासूनें सून घरीं येतांच असें समजावें कीं, सून ही एक आपली मुलगीच आहे. जसें आपण आपल्या स्वतःच्या मुलीवर प्रेम करितों तसेंच किंबहुना त्याहूनही जास्त प्रेम तिजवर करावें. तिजकडून एकादा अपराध घडल्यास त्याची तिला क्षमा करावी व सौम्यपणानें तिची समजूत घालून पुनः असें न करण्याविषयीं ताकीद द्यावी. परंतु निष्ठुरपणानें बोलून तिजवर अधिकार गाजवूं नये. कित्येक सास्वांना अशी दुष्ट संवय जडलेली असते कीं, सुनेच्या माहेरच्या घरची थोडीशी जरी रीतभात चुकली म्हणजे त्या सुनेला अपशब्द बोलून बोलून नकोसें करून सोडतात व तिच्या आईबापाच्या उखाळ्या पाखाळ्या काढून त्यांच्या सात पिढ्यांचा उद्धार करण्यास देखील माघार घेत नाहींत. तेणेंकरून तिचें मन कलुषित बनतें व तिला अत्यंत वाईट वाटतें. शिवाय तिच्या मनांत सासूविषयीं आदरभाव न वाटतां उलट वैमनस्य उत्पन्न होतें. सबब सासूनें सुनेला केव्हांही अपशब्द बोलूं नये, तसेंच तिच्या पतीजवळ तिचें गाऱ्हाणें पण करूं नये. उलट तिचा पति तिजवर कांहीं कारणावरून रागावला असला तर आपण त्याची समजूत घालून द्यावी. थोडक्यांत सांगायचें म्हणजे जशी आपण आपल्या मुलीला आपल्या जांवयाकडून सुख मिळण्याची इच्छा बाळगतों तशीच इच्छा धरून सुनेला आपल्याकडून जितकें सुख देववलें जाईल तितकें देण्याचा झटून प्रयत्न करावा.

तसेंच सुनेनें सासरीं येतांच सासू ही आपली जन्मदाती जरी नसली तरी ती आपली पालनकर्ती आईच आहे असें समजून, आपल्या जन्मदात्या आईप्रमाणेंच तिच्या आज्ञेंत वागावें व तिच्याविषयीं आपल्या मनांत पूज्यभाव बाळगावा. सासू जरी आपणास कांहीं अपशब्द बोलली तरी तीस उलट जबाब केव्हांही देऊं नये. उलट अशा वेळीं अंगीं नम्रता धारण करावी. नम्रता धारण केल्यानें अंगीं मोठेपणा येतो हें केव्हांही विसरूं नये. कदाचित् सासूचे शब्द आपल्या कानांनीं ऐकवले जात नसले तर सासुपासून आपण चार पावलें दूर जाऊन उभें राहावें, म्हणजे आपणास तें

शब्द ऐकूं येणार नाहींत. व जर आपण तेथेंच उभे राहिलों आणि ते शब्द आपल्या कानावर पडले तर आपणास उलट जबाब देण्याची इच्छा झाल्या-बांचून केव्हांही राहणार नाहीं व एकदां का ही इच्छा बळावली म्हणजे भांडण होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. सबब सुनेनें आपणास सासुच्या हाताखालीं नांदावयाचें आहे हें लक्षांत घेऊन तिच्या उत्तरास प्रत्युत्तर देण्याचें धाडस केव्हांही करूं नये. केल्यास त्याचा परिणाम विपरीत होऊन त्याचें प्रायश्चित्त आपणांसच भोगावें लागेल. सबब सुनेनें सासूशीं केव्हांही भांडूं नये व तिचें गाऱ्हाणें आपल्या पतीजवळ करूं नये. कारण आपलें ऐकून जर आपला पति तीस कांहीं शब्द बोलला तर तें ऐकून तिच्या मनास वाईट वाटेल व तेणेंकरून तिच्या मनांत आपल्या विषयीं वांकडे-पणा उत्पन्न होईल. सबब सुनेनें सासूच्या आज्ञेंत वागून ती जें जें काम सांगत जाईल तें तें आपण करीत जावें. घरांतील क्षुल्लक कामें तर परवान-गीचीही वाट न पाहतां आपण पुढें होऊनच करीत जावीं. अशाप्रकारें धोरणाधोरणानें जी सून आपला संसार चालवील तिच्या कर्तबगारीविषयीं सासूस एकप्रकारचा अभिमान वाटून तिला ती ममताळूपणानें वागविल्या-बांचून केव्हांही राहणार नाहीं हें सुनेनें खास समजावें.

अशा प्रकारें उभयतांनीं वागून आपला संसार उत्तम रीतीनें चालवावा. परंतु ज्या भगिनी सासुपणाचा अधिकार प्राप्त होतांच, केवळ अधिकाराच्या मदांत धुंद बनून, अविचारीपणानें गरीब बिचाऱ्या सुनांचा नाहक छळ करावयास प्रवृत्त होतील त्यांनीं हें पूर्ण लक्षांत असूं द्यावें कीं, काळ हा सर्वांचा केव्हांतरी पालटत असतो. त्याप्रमाणें '**चार दिवस सासुचे तर चार दिवस सुनेचे**' या म्हणप्रमाणें तुमचा चार दिवसांचा काळ निघून जातांच, तुम्हांस त्याच सुनांच्या हाताखालीं चार दिवस राहण्याची जेव्हां पाळी येईल, तेव्हां तुमचे काय हाल होतील याची यत्किंचितही कल्पना तुमच्या डोक्यांत आली तर तुमच्या हातून असलें अविचारी-पणाचें कृत्य केव्हांही घडणार नाहीं असें मला वाटतें.

सासूनें सून घरीं येतांच असें समजावें कीं, सून ही एक आपली मुलगीच आहे. जसें आपण आपल्या स्वतःच्या मुलीवर प्रेम करितों तसेंच किंबहुना त्याहूनही जास्त प्रेम तिजवर करावें. तिजकडून एकादा अपराध घडल्यास त्याची तिला क्षमा करावी व सौम्यपणानें तिची समजूत घालून पुनः असें न करण्याविषयीं ताकीद द्यावी. परंतु निष्ठुरपणानें बोलून तिजवर अधिकार गाजवूं नये. कित्येक सास्वांना अशी दुष्ट संवय जडलेली असते कीं, सुनेच्या माहेरच्या घरची थोडीशी जरी रीतभात चुकली म्हणजे त्या सुनेला अपशब्द बोलून बोलून नकोसें करून सोडतात व तिच्या आईबापाच्या उखाळ्या पाखाळ्या काढून त्यांच्या सात पिढ्यांचा उद्धार करण्यास देखील माघार घेत नाहींत. तेणेंकरून तिचें मन कलुषित बनतें व तिला अत्यंत वाईट वाटतें. शिवाय तिच्या मनांत सासूविषयीं आदरभाव न वाटतां उलट वैमनस्य उत्पन्न होतें. सबब सासूनें सुनेला केव्हांही अपशब्द बोलूं नये, तसेंच तिच्या पतीजवळ तिचें गाऱ्हाणें पण करूं नये. उलट तिचा पति तिजवर कांहीं कारणावरून रागावला असला तर आपण त्याची समजूत घालून द्यावी. थोडक्यांत सांगायचें म्हणजे जशी आपण आपल्या मुलीला आपल्या जांवयाकडून सुख मिळण्याची इच्छा बाळगतों तशीच इच्छा धरून सुनेला आपल्याकडून जितकें सुख देववलें जाईल तितकें देण्याचा झटून प्रयत्न करावा.

तसेंच सुनेनें सासरीं येतांच सासू ही आपली जन्मदाती जरी नसली तरी ती आपली पालनकर्ती आईच आहे असें समजून, आपल्या जन्मदात्या आईप्रमाणेंच तिच्या आज्ञेंत वागावें व तिच्याविषयीं आपल्या मनांत पूज्यभाव बाळगावा. सासू जरी आपणास कांहीं अपशब्द बोलली तरी तीस उलट जबाब केव्हांही देऊं नये. उलट अशा वेळीं अंगीं नम्रता धारण करावी. नम्रता धारण केल्यानें अंगीं मोठेपणा येतो हें केव्हांही विसरूं नये. कदाचित् सासूचे शब्द आपल्या कानांनीं ऐकवले जात नसले तर सासुपासून आपण चार पावलें दूर जाऊन उभें राहावें, म्हणजे आपणास तें

शब्द ऐकूं येणार नाहींत. व जर आपण तेथेंच उभे राहिलों आणि ते शब्द आपल्या कानावर पडले तर आपणास उलट जबाब देण्याची इच्छा झाल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं व एकदां का ही इच्छा बळावली म्हणजे भांडण होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. सबब सुनेनें आपणास सासुच्या हाताखालीं नांदावयाचें आहे हें लक्षांत घेऊन तिच्या उत्तरास प्रत्युत्तर देण्याचें धाडस केव्हांही करूं नये. केल्यास त्याचा परिणाम विपरीत होऊन त्याचें प्रायश्चित्त आपणांसच भोगावें लागेल. सबब सुनेनें सासूशीं केव्हांही भांडूं नये व तिचें गाऱ्हाणें आपल्या पतीजवळ करूं नये. कारण आपलें ऐकून जर आपला पति तीस कांहीं शब्द बोलला तर तें ऐकून तिच्या मनास वाईट वाटेल व तेणेंकरून तिच्या मनांत आपल्या विषयीं वांकडेपणा उत्पन्न होईल. सबब सुनेनें सासूच्या आज्ञेंत वागून ती जें जें काम सांगत जाईल तें तें आपण करीत जावें. घरांतील क्षुल्लक कामें तर परवानगीचीही वाट न पाहतां आपण पुढें होऊनच करीत जावीं. अशाप्रकारें धोरणाधोरणानें जी सून आपला संसार चालवील तिच्या कर्तबगारीविषयीं सासूस एकप्रकारचा अभिमान वाटून तिला ती ममताळूपणानें वागविल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं हें सुनेनें खास समजावें.

अशा प्रकारें उभयतांनीं वागून आपला संसार उत्तम रीतीनें चालवावा. परंतु ज्या भगिनी सासुपणाचा अधिकार प्राप्त होतांच, केवळ अधिकाराच्या मदांत धुंद बनून, अविचारीपणानें गरीब बिचाऱ्या सुनांचा नाहक छळ करावयास प्रवृत्त होतील त्यांनीं हें पूर्ण लक्षांत असूं द्यावें कीं, काळ हा सर्वांचा केव्हांतरी पालटत असतो. त्याप्रमाणें **'चार दिवस सासुचे तर चार दिवस सुनेचे'** या म्हणीप्रमाणें तुमचा चार दिवसांचा काळ निघून जातांच, तुम्हांस त्याच सुनांच्या हाताखालीं चार दिवस राहण्याची जेव्हां पाळी येईल, तेव्हां तुमचे काय हाल होतील याची यत्किंचितही कल्पना तुमच्या डोक्यांत आली तर तुमच्या हातून असलें अविचारीपणाचें कृत्य केव्हांही घडणार नाहीं असें मला वाटतें.

आतां कोणतेंही कार्य करण्यापूर्वीं त्या कार्याच्या मानानें थोडीफार तरी विचारशक्ति लढवावी लागते. परंतु ही विचारशक्ति लढवावयास ज्ञानाची अत्यंत जरूरी लागते व तें ज्ञान ईश्वरानें स्त्री व पुरुष यांना सारखेंच दिलें आहे. मात्र तें प्राप्त करून घेण्यास प्रत्येकानें विद्याध्ययन अवश्य केलें पाहिजे. मुलांमुलींना शिक्षण देणें किंवा न देणें हें घरांतील वडील माणसांच्या हातीं असल्यामुळें, ते मुलांना भरपूर शिक्षण देत सुटतात. परंतु मुलींना मुळींच शिक्षण देत नाहींत. त्यांची अशी कल्पना असते कीं, मुलगी ही परक्याची ठेव म्हणून तिला शिक्षण देऊन तरी काय उपयोग? परंतु त्याच-प्रमाणें आपणांसही परक्याची मुलगी आपल्या मुलाकरितां आणावी लागते हें ते साफ विसरून जातात. स्त्री ही पतीची अर्धांगी म्हटली आहे. अर्थात् अर्धांगी म्हणजे पतीचें अर्धशरीर. मग शरीराच्या एकाच भागाची विशेष जोपासना करून दुसऱ्या भागाची जर आपण अशाप्रकारें हयगय करूं लागलों तर तो दुसरा भाग उत्तम काम करूं शकेल काय? अर्थात् केव्हांही करूं शकणार नाहीं? मग मुलांनाच आम्हीं शिक्षण देत सुटलों व मुलींना तशाच अक्षरशून्य ठेवूं लागलों तर देशाची कधींकाळीं तरी भरभराट होईल काय? अशी कोणाची कल्पना असल्यास ती साफ चुकीची समजावी. कारण '**यथा वृक्षस्तथा फलं**' या न्यायानें मंद मतीची प्रजा मंदच निपजणार व तेजस्वी मतीची प्रजा तेजस्वीच निपजणार हें पूर्ण लक्षांत असूं द्यावें.

स्त्रियांना अशिक्षित ठेवण्यास मूळ कारण पुरुषच होत. कारण स्त्री ही जात्याच केव्हांही परतंत्र असते. कित्येक पालकांना वाटतें कीं, मुलींना शिक्षण दिल्यास त्या पुढें पुरुषांची मर्यादा ठेवणार नाहींत. परंतु ही त्यांची समजूत अगदीं चुकीची आहे. कारण **ज्ञान ही अशी कांहीं अजब वस्तु आहे कीं, तिच्या योगानें मूळ भांडवल दिवसानुदिवस वृद्धिंगत होत जातें व नफाच पदरांत विशेष पडतो, परंतु तोटा मुळींच होत नाहीं.** तद्वत् स्त्री सुशिक्षित, चतुर व धर्मशील असली

म्हणजे त्या घरांत तंटा भांडण न होतां, उलट ती आपल्या अमोल सद्गुणांनीं सर्वांच्या प्रेमास पात्र होते; एवढेंच नव्हे, तर आपला पति दुर्व्यसनीं असला तर त्याच्या स्वैरमनोवृत्तींना आपल्या नीतियुक्त मधुर भाषणानें आळा घालून, त्याला ताळ्यावर आणते. त्यामुळें त्याचे दुराचारसंपन्न चाळे हळु हळू नाहींसे होत जातात व पुढें पुढें तर ते सपशेल बंद होतात. आणि असें झालें म्हणजे तीं दोघेंही परस्परांच्या कल्याणाविषयीं सतत काळजी वहात जाऊन, परस्परांचीं मनें दुखविण्यास केव्हांही तयार होत नसतात. अशा प्रकारें त्यांचा सर्वकाळ सतत आनंदांत जात असतो. त्यामुळें त्या घरांत शांततादेवीचा वास होऊन, मनूच्या सिद्धान्तानुसार त्यांच्या येथें सत्पुरुष जन्मास येत असतात व तेणेंकरून त्या कुळाची कीर्ति वृद्धिंगत होत जाऊन, तें कुळ लवकरच प्रसिद्धीस येतें.

एकंदरींत पाहूं गेलें असतां समाजाच्या, देशाच्या व राष्ट्राच्या उन्नतीची गुरुकिल्ली ईश्वरानें ज्या प्रतापशाली स्त्रियांच्या हातांत ठेविली आहे, अशा परम भाग्यशाली स्त्रियांना शिक्षण देऊन आपली सर्वतोपरी उन्नति करून घेणें चांगलें, का त्यांना अक्षरशून्य ठेवून आपली सर्वतोपरी राखरांगोळी करून घेणें चांगलें ? मत्प्रिय बंधुजनहो ! अहंपणाच्या धुंदीनें अविचारशून्य बनून सत्तेचा असा दुरुपयोग करूं नका, इतके दिवस तुम्हीं स्त्रीशिक्षणाची हयगय केली ती पुरे झाली, परंतु ह्यापुढें ती केल्यास, देशास कोणती हीनावस्था प्राप्त होईल याची कल्पनाच करवली जाणार नाहीं !

स्त्रिया जन्मतःच बलहीन असतात. शिवाय त्यांना कोठें नोकरी करावयाची नसते, मग त्यांना शिक्षण देऊन तरी काय उपयोग ? हल्लीं पाश्चात्य लोकांच्या अनुकरणानें आपल्या हिंदुस्थानांत जिकडे तिकडे स्त्रीशिक्षणाचें प्रस्थ दिवसेंदिवस विशेष माजत चाललें आहे. प्राचीनकाळीं हें प्रस्थ मुळींच नव्हतें. कारण इंग्रजी राज्यांत विद्येचा प्रसार होऊन खेडोपाडीं देखील शाळा स्थापन करण्यांत आल्या. मोठमोठ्या शहरीं मुलींकरितां

हायस्कूलें व कॉलेजें उघडण्यांत आलीं असें कित्येकांचें म्हणणें आहे, परंतु हें त्यांचें म्हणणें अगदींच निरर्थक दिसतें. कारण प्राचीनकाळीं जर स्त्री-शिक्षण नसतें तर श्रीकृष्णास 'माझें अमुक दिवशीं हरण कर' अशा आशयाचें पत्र रुक्मिणीला कसें लिहितां आलें असतें? तसेंच सुलोचनेलाही जर तिच्या आईबापांनीं लिहिण्या वाचण्यास शिकविलें नसतें, तर इंद्रजिताच्या हातानें लिहून दाखविलेलें पत्र तिला वाचतां येणें शक्य तरी होतें काय? अर्जुनानें देखील सुभद्रेचें हस्ताक्षर ओळखूनच संन्यास घेतला व सुभद्रेचें हरण केलें. अशीं बरींचशीं उदाहरणें आपल्या महाभारतांत आढळून येतील.

आतां प्राचीनकाळीं हल्लींप्रमाणें मुलींकरितां शाळा, हायस्कूलें व कॉलेजें नव्हतीं, ही गोष्ट निर्विवाद असून त्या काळच्या परिस्थितींत व हल्लींच्या परिस्थितींत महदंतर पडलेलें अगदीं स्पष्ट दिसून येत आहे. त्याकाळीं हिंदुस्थान देश हा हल्लींच्या भूगोलांत दिलेल्या सर्व राष्ट्रांपासून अलग असून, तो निर्धास्तपणें स्वातंत्र्याचा पूर्ण सुखानुभव घेत स्वस्थ घोरत पडला होता. त्या काळीं हिंदुस्थान देशाचा इतर कोणत्याही परराष्ट्राशीं राज-कारणाचा संबंध नव्हता. त्यामुळें हिंदुस्थानचें राजकारण विशेष गुंतागुंतीचें नसून अगदीं सरळ होतें. म्हणून प्रजा देखील राजावर पूर्ण विश्वास टाकून निर्धास्त व सुखी राहात होती. त्याकाळीं आगगाड्या, आगबोटी, विमानें तारायंत्रें इत्यादि साधनें मुळींच नसल्यामुळें, हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत व्यापार करण्याची देखील मारामार पडत होती. तसेंच हिंदुस्थानांत भागा-भागांतील लोकांचें शिक्षणदेखील आपापल्या भागापुरतेंच होत असे. व जें शिक्षण पुरुषांना तेंच शिक्षण मुलींना आपल्या आईबापांच्या खास देख-रेखीखालीं घरींच मिळत असे.

त्याकाळीं स्त्रियांच्या शिक्षणांत सर्वग्रंथ वाचून घेण्याचा नाद विशेष असल्यामुळें, मुलींच्या आया त्यांना अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदो-दरी, गांधारी, अनसूया, लोपामुद्रा, सावित्री, शकुंतला, दमयंती इ०

साध्वी स्त्रियांच्या चरित्रांतील ठळक ठळक बोधप्रद गोष्टी बारंबार कथन करीत असत. तसेंच सीतास्वयंवर, रुक्मिणीस्वयंवर, रामवनवास, पांडववनवास, नलदमयंती इत्यादिकांचीं चरित्रमय सुबोध गाणीं शिकवून, त्यांचा भावार्थ त्यांना उत्तमप्रकारें समजावून देत असत. त्यामुळें त्यांचे मनावर योग्य परिणाम घडून, त्यायोगें संसारांत प्रसंगानुसार येणारी कष्टमय स्थिति व नानातऱ्हेचीं दुःसह दुःखें सहन करण्याचें मनोधैर्य त्यांच्या अंगीं येत असे. तेणेंकरून त्या काळच्या मुली पतिनिष्ठ, धर्मनिष्ठ व गृहकृत्यास योग्य अशा गृहदेवता बनून, आपल्या सद्वर्तनानें व मधुर भाषणानें पतीस कशा अंकित करून घेत असत, ह्याचा अनुभव हिंदुधर्मास अनुसरून चालणाऱ्या प्रत्येक हिंदुबांधवास आहेच.

यावरून स्पष्ट दिसून येतें कीं, स्त्रीशिक्षण हें पाश्चात्य लोकांच्या अनुकरणानें आपल्या भरतखंडांत शिरलेलें नसून, ते आमच्या धोरणी आर्यपूर्वजांनींच हजारों वर्षांपासून ठेवलेल्या दूरदृष्टीचें मधुर फळ होय. '**स्त्रियांना शिक्षण देऊन सुसंस्कृत बनवावें**' हें मत पुरातन काळापासून तों वर्तमान काळापावेतों सुज्ञजनांस मान्य आहे. मात्र '**स्त्रीशिक्षण कसें असावें?**' याविषयीं काळ, वेळ व परिस्थित्यनुरूप विचार करणें हें आपलें कर्तव्य आहे.

सारांश, संसार सुखाचा व्हावा, रात्रंदिवस सर्वकाळ आनंदांत जावा, अशी सदिच्छा असल्यास नवराबायको हीं दोघेंही सद्‌गुणी पाहिजेत. नाहींतर संसारांत खरें सुख लाभणें शक्य नाहीं. कारण संसारांत नानातऱ्हेचीं दुःखें, विघ्नें व अडचणी हीं सर्वांस प्राप्त व्हावयाचींच. त्यांतून जे विद्वान् व सुशिक्षित असतील तेच पार पडतील. संसारांत पुरुषांना जशी दूरदृष्टि ठेवावी लागते, तशीच स्त्रियांना पण ठेवावी लागते. **स्त्री स्वभावतः कितीही चांगली असून, जर ती अशिक्षित असेल तर तिला आपल्या पातिव्रत्यादि गुणांचें रक्षण करण्यास अति**

**अडचण पडेल. आपण कोठेंही फसूं नये, ह्यासाठीं अंगीं केवळ चांगुलपणा असून चालणार नाहीं, तर त्याला तितकीच शहाणपणाची जोड अवश्य पाहिजे.** ह्यास्तव एका कवीनें म्हटलें आहे कीं, **" विद्यतेहि नृशंसेभ्यो भयं गुणवतामपि "** स्त्री सुशिक्षित, धार्मिक व नीतिवान् असली तरच ती प्राप्त झालेल्या परिस्थितींत सुख मानून पतीस व मुलांबाळांस सुख देईल.



## प्रकरण २० वें.

# स्त्रीशिक्षण कसें असावें ?
## व त्यापासून होणारे फायदे.

भूतदया, शांति व कोमलता हे गुण स्त्रीचे अंगीं पूर्ण वसत आहेत. ह्यामुळें ती एक करुणेची मूर्तिच भासते असें एका कवीनें म्हटलें आहे. हें स्त्रीचें वर्णन यथायोग्य आहे. परंतु या गुणांचा विकास व्हावयास कांहीं बाह्य कारणांची अपेक्षा असते, तें कारण शिक्षण हेंच होय. वरील गुण स्त्रियांच्या हृदयमंदिरांत अगदीं अंधारकोठडींत लपून बसलेले आहेत. सबब ते शिक्षणरूप दीप उजळून हुडकून काढिले पाहिजेत. ज्याप्रमाणें आकाशांत मेघ उत्पन्न झालेले असतात, परंतु त्यांना अनुकूल परिस्थिति प्राप्त झाल्याशिवाय त्यांचा प्रभाव कोणासही दिसून येत नाहीं, त्यापूर्वी ते आकाशांत राहून गडगडाट मात्र करीत असतात; तसेंच मोत्यें समुद्राच्या अगदीं तळाशीं असतात; परंतु ज्याप्रमाणें तीं पानबुड्यांची योजना केल्याशिवाय हस्तगत होत नाहींत; त्याचप्रमाणें स्त्रियांना उपयुक्त शिक्षण दिल्याखेरीज त्यांचे गुण कोणासही दिसून येणार नाहींत.

स्त्री व पुरुष यांचें जगांत एकच कर्तव्य नाहीं. स्त्रीचें निराळें तर पुरुषाचें निराळें असें आहे. ह्यास्तव पुरुषांस जें शिक्षण दिलें जातें तेंच स्त्रियांना उपयोगीं पडेल असें नाहीं. कित्येक गोष्टी पुरुषांना अवश्य शिकाव्या लागतात, त्या स्त्रियांना मुळींच शिकविल्या नाहींत तरी त्यापासून स्त्रियांचें काडीइतकेंही नुकसान होणार नाहीं. ह्यासाठीं मनूनें स्त्रियांच्या कर्तव्याविषयीं जें थोडक्यांत वर्णन केलें आहे, तेवढें तरी शिक्षण प्रत्येक स्त्रीला अवश्य मिळालेंच पाहिजे.

**सदा प्रहृष्ट्या भाव्यं गृहकार्येषु दक्षया**
**सुसंस्कृतोपस्करया व्ययेचा मुक्त हस्तया**

**अर्थ**—स्त्रीनें सर्वदा आनंदी असावें. गृहकार्यांत दक्ष असावें. घरांतील सामान नीटनेटकें ठेवावें व घरखर्च अगदीं काटकसरीनें करावा.

मनूनें स्त्रियांना हीं जीं मुख्य चार कर्तव्यें सांगितलीं आहेत, त्यांपैकीं प्रत्येक कर्तव्याविषयीं स्त्रीला जर उत्तमप्रकारें शिक्षण देण्यांत आलें तर ती तें कर्तव्य उत्तम रीतीनें सहज पार पाडील. नाहींतर तिला या संसारांत मोठमोठ्या यातायाती सोसाव्या लागून, पशुप्रमाणें तिचा जन्म व्यर्थ वायां जाईल. '**स्त्रीनें सर्वदा आनंदी असावें**' या तिच्या पहिल्या कर्तव्यासाठीं तिला धर्म व नीति यांचें शिक्षण अवश्य दिलें पाहिजे. '**गृहकार्यांत दक्ष असावें**' या तिच्या दुसऱ्या कर्तव्यासाठीं तिला मुख्यतः स्वयंपाक वगैरे सर्वप्रकारची उत्तमोत्तम पाकसिद्धि करितां येणें अत्यंत जरूरीचें आहे. '**घरांतील सामान नीटनेटकें ठेवावें**' या तिच्या तिसऱ्या कर्तव्यासाठीं तिला आरोग्यशास्त्राचें संपूर्ण ज्ञान मिळालें पाहिजे. '**घरखर्च अगदीं काटकसरीनें करावा**' या तिच्या चौथ्या कर्तव्यासाठीं तिला उजळणी, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादि विषय अवश्य शिकविले पाहिजेत.

या दृष्टीनें पाहूं जातां प्रथम मुलींना प्राथमिक शिक्षण देण्याची अत्यंत जरूरी आहे. प्राथमिक शिक्षण चालू असतां त्यांना मधून मधून **नीति-शिक्षण, गृहशिक्षण शिवणकाम, कशिदा, व्यवहारज्ञान,** व **गायनकला** इत्यादि विषय अवश्य शिकवीत जावें. प्राथमिक शिक्षणांत विशेषतः **उजळणी, बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, तोंडीहिशेब, लेखन, वाचन, इतिहास, भूगोल** व **आरोग्यशास्त्र** इत्यादि विषय चांगले शिकवावे.

**उजळणी** उत्तमप्रकारें शिकविली असतां, त्यायोगें त्यांना तोंडीहिशेब भराभर करितां येतील. बेरीज, बजाबाकी, गुणाकार व भागाकार इत्यादि

विषय शिकविल्यापासून हिशेब करितांना त्यांची चांगली मदत होते. शिवाय व्यवहारांत त्यांचा नित्य उपयोग होतो.

**अक्षर** चांगलें व वळणदार असणें हें एकप्रकारचें भूषण आहे.

**वाचन** उत्तम असलें तर आपण स्वतः काय वाचलें हें सहज कळतें व तेणेंकरून बुद्धीची वाढ होऊन मन सुसंस्कृत बनतें. मन सुसंस्कृत बनून त्यांत प्रगल्भ विचारांची भर पडली म्हणजे मनाचा कुत्सितपणा आपोआप नाहींसा होतो. स्त्रीचें आचरण जितकें शुद्ध असेल तितकें तें अधिक उत्तम समजावें. यासाठीं तिला प्रगल्भ मनाची अत्यंत अवश्यकता आहे, व त्याची वाचन, सत्संगति आणि सुविचार यायोगें तत्काळ प्राप्ति होते.

**इतिहास** शिकविल्यापासून त्यांतील थोर थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें वारंवार वाचण्यांत येतात. व त्यायोगें मनावर उत्तमोत्तम सद्गुण जडून अंगांत एकप्रकारचें तेज चमकूं लागतें. शिवाय देशाभिमान जागृत होतो.

**भूगोल** शिकविल्यापासून निरनिराळ्या देशांची व त्यांतील व्यापार व उद्योगधंदे इत्यादिकांची चांगली माहिती होऊन, कोठेंही प्रवास करण्यास अति सुलभ पडतें.

**आरोग्यशास्त्र** शिकविल्यापासून गर्भावस्थेंत स्त्रियांनीं कसें वागावें ? बाळंतपणांत पथ्यपाणी कोणतें करावें ? पथ्य न ठेविल्यास त्यापासून कोणकोणते अपाय घडून येत असतात ? शिशुसंगोपन कसें करावें ? आजारीपणांत मुलांच्या, स्वतःच्या व कुटुंबांतील इतर माणसांच्या शरीरप्रकृतीस कसें जपावें ? त्यावर कोणकोणते उपचार करावे ? अशाप्रसंगीं घरांत टापटीप व स्वच्छता कशी ठेवावी ? शरीरप्रकृतीच्या मानानें नियमित आहार कसा ठेवावा ? हवामान, ऋतुमानपरत्वें खाण्यापिण्यांत, वस्त्रप्रावरणांत व राहणींत फेरबदल कां करावा ! इत्यादि संसारोपयोगी उपयुक्त ज्ञान प्राप्त होतें.

**नीतिशिक्षण** या विषयावर सर्व विषयांत विशेष भर द्यावी. व तें देत असतांना त्यांचेकडून **रामविजय, पांडवप्रताप, शिवलीलामृत, भक्तिविजय, महाभारत** वगैरे धर्मग्रंथ वारंवार वाचून घेत जावें. व

त्यांचें वाचन सुरू असतांना त्यांतील भावार्थ त्यांना उत्तमप्रकारें समजावून देत जावा. असें केल्यानें सुनीति, सुविचार, धर्मपालन, सत्यभाषण पतिनिष्ठा, परोपकार, कर्तव्यजाग्रति वगैरे अनेक उत्तमोत्तम गुण त्यांचे मनांवर उत्तमप्रकारें बिंबतील व त्यायोगें प्राचीन काळच्या स्त्रियांनीं जसा कीर्तिध्वज उभारला त्याप्रमाणेंच भावी स्त्रियांही आपला कीर्तिध्वज खात्रीनें उभारतील.

**गृहशिक्षण** या विषयांत मुख्य शिक्षण म्हटलें म्हणजे पाकशास्त्र हें होय. म्हणून स्त्रियांना पाकशास्त्राची वैद्यकीय दृष्टया माहिती असणें फारच उत्तम होय. कारण पाकसिद्धीवरच मनुष्याचें जीवित अवलंबून आहे. व त्यावरून आपणांत '**अन्नमय प्राण व प्राणमय पराक्रम**' ही सुप्रसिद्ध म्हण प्रचारांत अगदीं रूढ होऊन बसली आहे. ही सर्वांत महत्त्वाची कामगिरी स्त्रियांवर सोंपवली असल्यामुळें, प्रत्येक आईनें आपल्या मुलींना पाकशास्त्राची संपूर्ण माहिती करून द्यावी. परंतु कित्येक आया आपल्या मुलींना बाळपणीं ही कला पूर्णपणें शिकवीत नसल्यामुळें, त्या मोठेपणीं सासरीं गेल्यावर एकादे दिवशीं सर्रास तेलकट पदार्थ करितात, तर एकादे दिवशीं झणझणीत तिखट पदार्थ करितात, तर पुनः एकादे दिवशीं सर्व गोडच गोड पदार्थ करितात, तर एकादे दिवशीं कुटुंबांतील लहानथोर अशा सर्वांची प्रकृति बिघडविणारे पदार्थ करितात; त्यामुळें कुटुंबांतील मंडळीचे आरोग्यास धक्का बसण्याचा विशेष संभव असतो. सबब प्रत्येक आईनें आपल्या मुलींना पाकशास्त्राची शक्य ती माहिती करून द्यावी. तसेंच मुलींनींही आई स्वयंपाकास बसली असतांना तिच्या प्रत्येक हालचालीकडे विशेष बारकाईनें लक्ष पुरवीत जाऊन, ती कालवण कसें करिते? मीठ कशास किती घालते? मसाला कसा तयार करिते? वगैरे गोष्टींकडे वारंवार लक्ष देत जाऊन स्वयंपाकाचे सर्व प्रकार हस्तगत करून घ्यावे. व अशाच प्रकारें नेहमींच्या प्रचारांतील पाकनिष्पत्ति खेरीज करून इतर मिष्ट पक्वान्नांचीही हळुहळु माहिती करून घेत जावी. ज्याप्रमाणें पुरुषांना संसारशकट

चालवावयासाठीं ज्ञान हें कणाकणानें संपादन करावयाची अत्यंत जरूरी असते; तद्वत् स्त्रियांना घरीं श्रीमंती असो वा गरिबी असो, परंतु कुटुंबांतील लहानथोर मंडळींच्या शारीरिक उन्नतिसाठीं नानाप्रकारचे खाद्य पदार्थ तयार करण्याची पूर्ण माहिती असणें अत्यंत जरुरीचें आहे. **स्वयंपाक उत्तम होण्यास घरांत पदार्थ विपुल किंवा उंची उंची लागतात असें नाहीं. ईश्वरानें अगदीं सामान्य पदार्थांतही असे गुण ठेविले आहेत कीं, त्यांची योजना गृहिणीनें कुशलतेनें केल्यास ते यत्किंचित् पदार्थ देखील अत्यंत रुचकर बनतात व म्हणूनच कोंड्याचा मांडा करून खाऊं घालण्यांतच स्त्रीचें विशेष चातुर्य दिसून येतें.** ह्यास्तव प्रत्येक आईनें आपल्या मुलींना पाकशास्त्राची शक्य तितकी माहिती देण्यास मुळींस आळस करूं नये. तसेंच मोठेपणीं मुलीनें आपणांस जे जे पदार्थ येत नसतील ते ते पदार्थ शेजारीपाजारी अगर आपल्या जिवलग मैत्रिणीकडून शिकून घ्यावे. आपणास सर्व कांहीं येतें अशी खोटी घमेंड मुळींच बाळगूं नये, किंवा माहिती घेण्यास लाजूं नये. **ज्ञान हें सर्वत्र भरलेलें आहे. मात्र तें संपादन करून घेण्यासाठीं आपण आपले डोळे व कान सतत उघडे ठेविले पाहिजेत.**

**शिवणकाम** शिकविल्यापासून तान्ह्या मुलांच्या साध्या आंगड्या-टोपड्यासाठीं हल्लीं जी बाजार पहावयाची पाळी येत आहे ती मुळींच येणार नाहीं, शिवणकाम फारसें कठिण असतें असें नाहीं. मात्र तें शिवण्यासाठीं कापड फाडण्याचें काम कांहींसें कठिण असतें. सबब तें प्रत्येक आईनें आपल्या मुलींस अवश्य शिकवून द्यावें. आईस येत नसल्यास मुलींनीं शेजारीपाजारी बाया अगर जिवलग मैत्रिणीकडून शिकून घ्यावें. **मुलींना शिवणकामांत मुख्यतः बायांचे कपडे घालण्याचे जेवढे प्रकार असतील तेवढे प्रथम अवश्य शिकवावे. कारण अशा पुष्कळ अडाणी बाया मी पाहिल्या आहेत कीं त्यांना आपल्या स्वतःच्या चोळया कापण्याकरितां लोकांच्या दारो-दार हिंडावें लागतें व जराशा कामाकरितां लोकांचे उगीच**

**आर्जव करावे लागतात. ही लाजिरवाणी स्थिति ज्यांना टाळावयाची असेल त्यांनीं वेळींच सावध झालेलें विशेष बरें!** आतां ज्यांना ऐपत असेल त्यांनीं मशिन्‌वरील शिवणकाम अवश्य शिकावें. मशिन्‌वरील शिवणकाम येत असल्यास त्यांना फावल्या वेळांत कुटुंबांतील माणसांचे कपडे घरचे घरींच शिवतां येतील व त्यामुळें अनायासेंच पैशांची बचत होत जाऊन शिवाय काटकसरीचीही संवय लागेल.

**कशिदा** काढावयाचें विणकाम शिकविल्यापासून हातरुमालासारख्या लहान लहान उपयुक्त वस्तु विणतां येतील, व त्यायोगें वेळ उद्योगांत जाऊन शिवाय मनोरंजनही चांगलें होत जाईल.

**व्यवहारज्ञान** हें व्यवहारांत शिरून अनुभवानें आपोआप मिळवितां येतें. व्यवहारांत शिरल्यानें जगांतील अनेक कटु अनुभव वारंवार येत जाऊन, त्यायोगें अंगीं एकप्रकारची दक्षता व प्रसंगावधान येतें. आजकाल व्यवहारज्ञान व प्रसंगावधान अंगीं असणें अत्यंत महत्वाचें होय.

**गायनकला** शिकविल्यापासून संसारांतील अनेक कारणांनीं वैतागलेलें व त्रस्त झालेलें मन गाणीं गाऊन शांत करितां येतें. मन शांत झालें म्हणजे मुखावर एक प्रकारचा टवटवीतपणा येतो. शिवाय तान्ह्या बालकांस गाणीं गाऊन रंजवितां येतें व श्रम करीत असतांना गाणीं गाऊन श्रमाचा परिहार करितां येतो.

ह्या सर्वांवरून पाहूं जातां प्रत्येक मुलीस निदान एवढें जरी शिक्षण आईबापांकडून मिळालें तरी त्यामुळें तिला एकप्रकारचा हुरूप वाटून संसाराची गोडी वाटेल व त्यायोगें ती आपलीं गृहकृत्यें दक्षतेनें व नीटनेटकेपणानें सहज करूं लागेल व थोडक्या उत्पन्नांत देखील आपल्या नवऱ्याचा गरिबीचा संसार उत्तम रीतीनें व सुखसमाधानानें चालवील आणि उभयकुळांस भूषवील ह्यांत संशय नाहीं.

## प्रकरण २१ वें.

# उच्च स्त्रीशिक्षणानें स्त्रियांवर होणारे दुष्परिणाम.

'**मुलींना उच्चशिक्षण देऊन सुशिक्षित करावें**' हें जरी खरें आहे, तरी त्याची योग्य दिशा ठरवून प्रथम नीतिशिक्षणानें त्यांचीं मनें पूर्ण सुसंस्कृत बनवावीं. नंतर त्यांना उच्च शिक्षण देण्यास प्रारंभ करावा. नाहींतर मोठेपणीं त्याचे दुष्परिणाम इतके भोंवतात कीं, त्यायोगें त्यांच्या संसाराची माती झाल्याबांचून केव्हांही राहात नाहीं. वास्तविक असें जरी आहे तरी त्यांना उच्च शिक्षण ( **इंग्रजी शिक्षण** ) देऊं नये असा मात्र नियम केव्हांही घालून देतां येणार नाहीं. कारण '**गुणाः पूजास्थानं गुणिषु नच लिंगं नच वयः**' या तत्त्वानुसार ज्ञानप्राप्तीची इच्छा तृप्त करून घेण्यास प्रत्येक इसम जसा स्वतंत्र आहे, तशाच स्त्रियांही स्वतंत्रच आहेत. सबब ज्या भगिनींना उच्च शिक्षण घेऊन आपणही पदवीधर बनावें अशी सदिच्छा असेल त्यांनीं तें बेलाशक घ्यावें. मात्र त्या शिक्षणानें अभिमानप्रेरित होऊन, धर्माचें व नीतिचें उल्लंघन आपले हातून केव्हांही होऊं देतां कामा नये. तसेंच शाळा व कॉलेजें सोडल्यानंतर त्यांनीं आपले विचार व वाचन सतत चालू ठेवावें. विचार, वाचन व वर्तन या तिन्हीं बाबतींत जर त्यांनीं स्वातंत्र्याचा दुरुपयोग केला तर समाजाला **मुलींना शिक्षण दिल्यास त्या अशाप्रकारें वागतात** असें म्हणण्यास सबळ कारण सांपडतें. सबब सुशिक्षित मुलींनीं आपणांस नांवें ठेवण्याजोगतें निंद्य वर्तन केव्हांही आचरूं नये. शेंकडा नव्वद स्त्रियांचें ध्येय केवळ ज्ञानप्राप्ति करून घेऊन, आपण स्वतंत्रतेनें रहावें हेंच कांहीं नसतें. कारण त्यांना गृहिणी होऊन पुरुषांबरोबर संसार थाटावयाचा असतो. सबब स्त्रियांना गृहिणी

बनवावयाचें योग्य सामर्थ्य जोंपर्यंत या उच्च शिक्षणांत येऊं शकत नाहीं, तोंपर्यंत सर्वसाधारण स्त्रियांना तें निरुपयोगीच समजलें पाहिजे. फार तर काय परंतु पुष्कळ बाबतींत तें अहितकारक आहे असेंही दिसून येईल. त्यांपैकीं कांहीं बाबती मुद्दाम पुढें दिल्या आहेत.

**१ ली बाबत—मुलींना उच्चशिक्षण द्यावयाचें झाल्यास, तें मुलींच्या स्वतंत्र असलेल्या हायस्कुलांतून अगर कॉलेजांतून द्यावें. परंतु वयस्क मुलांच्या सहवासांत हें शिक्षण केव्हांही देऊं नये.** कारण स्त्रियांना परपुरुषांच्या सहवासांत ठेवणें हें आपल्या धर्मांत महादूषणास्पद मानिलें आहे. परंतु हल्लीं उच्च शिक्षण घेणाऱ्या वयस्क मुलींना परपुरुषांचा सहवास अगोदर घडतो. ह्या नित्य सहवासानें मुलींच्या चित्तवृत्ति चंचल होऊन त्या बिघडण्याचा विशेष संभव असतो.*

**२ री बाबत**—पुरुषांच्या पौरुष गुणांस ज्या **कोमल गुणांची जोड** मिळाल्यानें संसारास एक प्रकारचें रमणीय स्वरूप प्राप्त होतें, त्या गुणांचा लोप होत जाऊन, मुलांच्या सतत सहवासानें मुलींच्या अंगीं पौरुष गुण जडतात. त्यामुळें त्यांचें अर्धें सौंदर्य नष्ट पावतें.

**३ री बाबत**—उच्च शिक्षणानें मुली शेंफारल्या जाऊन त्यांचे अंतःकरणांत बिंबलेली **धर्म व नीति** यांचा हळुहळु ऱ्हास होत जातो. त्यायोगें त्या पुढें आपल्या जन्मदात्या आईबापांचें देखील ऐकेनाशा होतात. बरें, सासरीं ह्या शिक्षणाचा कांहीं उपयोग होतो म्हणावा तर तसेंही कांहीं आढळून येत नाहीं. उलट शिक्षणानें तोऱ्यांत येऊन सासरच्या माणसांचा मान कसा ठेवावा ह्याचें त्यांना मुळींच भान राहात नाहीं.

**४ थी बाबत**—त्यांना माहेरीं **स्वतंत्र व छानछोक** राहण्याची व बाहेर हवा खावयास जाण्याची नेहमीं संवय जडलेली असते; त्याप्रमाणें

---

*मुलांच्या सहवासांत शिक्षण घेणाऱ्या मुलींनीं 'तीन आणे मालें'चा वसंत पंचमी' हा अंक जरूर वाचावा.

वागण्याची सासरीं परवानगी मिळत नसल्यामुळें, त्यांचें मन नाराज होतें व त्यामुळें त्यांचें चित्त उदास बनून, कुटुंबांतील कोणत्याही व्यक्तीवर त्यांचें प्रेम जडत नाहीं; एवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष आपल्या प्राणपतीशीं त्यांनीं जसें मोकळ्या मनानें वागावयास हवें तशा त्या मुळींच वागत नाहींत. त्यामुळें त्यांच्या प्राणपतीचेंही मन कलुषित बनतें.

**५ वी बाबत–सडासारवण करणें, भांडींकुंडीं घासणें, लुगडीं धुणें** इत्यादि गृहकृत्यें मुलींनीं अगदीं उल्हासवृत्तीनें केलीं पाहिजेत. परंतु तीं करण्याची माहेरीं संवय नसल्यामुळें, व उच्चशिक्षणानें अभिमानप्रेरित होऊन, त्यांचे मनांत त्याविषयीं एक प्रकारचा तिरस्कार उत्पन्न होतो. आणि त्यामुळें असलीं कामें हलक्या प्रतीचीं वांटून, तीं करण्याची त्यांना लाज वाटूं लागते.

**६ वी बाबत—अभ्यासाचा बोजा** मेंदूवर अतिशय पडत असल्या-मुळें त्यांची शरीरप्रकृति दिवसेंदिवस अशक्त बनत जाते. त्यामुळें शरीर कृश बनून, त्या बाळंतपणासारख्या स्थितीस पूर्ण असमर्थ बनतात. हल्लींच्या पदवीधर स्त्रियांच्या फिक्कट चेहऱ्याकडे पाहिलें म्हणजे हें मत चुकीचें आहे असें कोणासही वाटणार नाहीं.

**७ वी बाबत—** उच्चशिक्षणानें मनांत **चैनीचें खूळ** माजून प्रत्येक बाबतींत डोळ्यांपुढें **फॅशन** दिसूं लागते. या फॅशनपायीं विदेशी वस्तु घेण्याची चटक लागून खर्चाची बेसुमार उधळपट्टी सुरू होते. त्यामुळें उत्पन्नापेक्षां खर्च अधिक होत जाऊन सुखाचें स्थान काळजी पटकावून बसते. इत्यादि अनेक अपायकारक परिणाम हल्लींच्या उच्च स्त्रीशिक्षणांत दाखवितां येतील.

एकंदरींत या शिक्षणापासून स्त्रियांची सुधारणा न होतां उलट त्या दुराचारसंपन्न कशा बनतात हें मुंबईपुण्यासारख्या शहरीं लोकांच्या सतत अनुभवास येत आहे. ह्यावरून गृहिणीपदास उच्चशिक्षण अगदींच निरुप-योगी आहे, हें कोणीही प्रांजलपणें कबूल करील. स्त्रियांना उच्चाशिक्षणा-

पासून फक्त ' ज्ञानप्राप्ति ' हाच काय तो फायदा होतो. परंतु त्या फायद्याचा देखील सुपरिणाम कित्येक भगिनींचे मनावर झालेला दिसून येत नाहीं. रबरी चेंडू हातांत दाबून ठेविलेला असतो तों पावेतों तो हातांत राहातो. परंतु त्याला हातांतून जमिनीवर फेकतांच तो जसा फेंकणाराच्या डोक्यावर बसण्यास देखील कमी करीत नाहीं, तशा या अर्धवट ज्ञानप्राप्तीचा फायदा घेतलेल्या मुली पालकाच्या किंवा नवऱ्याच्या डोक्यावर बसावयास मुळींच चुकत नाहींत. ह्यास्तव प्रत्येक आईबापानें असलें घाणेरडें शिक्षण आपल्या मुलींना न देतां स्त्रीजातीला उचित असेंच शिक्षण देणें केव्हांही योग्य व फलदायक आहे. स्त्रिया स्वभावतः प्रेमळ, दयाळु, श्रद्धाळु व भावनाप्रधान असल्यामुळें, त्यांच्या नैसर्गिक गुणांची माती होणार नाहीं असेंच शिक्षण देणें केव्हांही योग्य आहे. व असलें शिक्षण म्हटलें म्हणजे तें नीतिशिक्षण हें होय. या नीतिशिक्षणानें स्त्रियांचीं कोमल मनें सुसंस्कृत बनवितां आलीं, तर आपल्या या भरतखंडास पुनः पूर्वींचे ते सोन्याचे दिवस उगवावयास कितीसा अवकाश लागणार आहे ?



## प्रकरण २२ वें.

# स्त्रीपुरुषांच्या घातक संवयी.

प्राचीनकाळीं पुष्कळशा सदाचारसंपन्न स्त्रिया होऊन गेल्या. त्यांत कित्येक राजकन्या असून, त्या आपल्या आईबापांच्या अति लाडक्या होत्या. तरी देखील त्यांच्या आईबापांनीं त्यांचे फाजील लाड मुळींच केले नाहींत. त्यांनीं बाळपणापासून त्यांना बाळकडू पाजून स्त्रीधर्मास उचित असें संपूर्ण शिक्षण दिलें व त्यांचे मनावर धर्म व नीति यांचा उत्तम ठसा ठसविला. त्यामुळें त्या सासरीं येतांच स्त्रीधर्मास अनुसरून माहेरचें राजैश्वर्य मनांत न आणितां, घरांतील केरपोतेरें, सडासारवण, भांडीं घासणें, दळणें, कांडणें, लुगडीं धुणें, शेण वळणें, स्वयंपाक करणें, कपडेलत्ते व भांडींकुंडीं हीं स्वच्छ आणि नीटनेटकीं ठेवणें, पूजेची सर्व तयारी करून देणें, सासूची व पतीची सेवा करणें वगैरे जे स्त्रीधर्म आपल्या धर्मग्रंथांत कथन केले आहेत, त्याप्रमाणें आचरण ठेवण्यास त्या मुळींच आळस करीत नसत. रिकामे वेळांत गप्पा मारीत न बसतां शिवणकाम अगर कशिदा काढीत असत. त्या शरीरानें जरी अति नाजुक होत्या तरी कोणतेंही गृहकृत्य करितांना आपला नाजुकपणा केव्हांही दिसूं देत नसत. ह्या सर्वांस मुख्य कारण त्यांना त्यांच्या आईबापांनीं दिलेलें नीतिशिक्षण हेंच होय.

ह्या नीतिशिक्षणामुळें त्या सद्‌गुणशाली निपजून, त्यांचे पोटीं येणारी संततिही अर्थात् तशीच सद्‌गुणसंपन्न निपजत असे. हल्लीं बहुतेक आईबाप आपल्या मुलींना लिहिणें वाचणें देखील शिकवीत नाहींत. मग नीतिशिक्षण तर दूरच राहिलें. कांहीं सुशिक्षित लोक आपल्या मुलींस नीतिशिक्षण मुळींच न देतां, धर्म व नीति यांचा ऱ्हास करविणारें उच्चशिक्षण देत

असतात. या शिक्षणानें मुलींस घातक अशी स्वतंत्र व छानछोक राहण्याची दुष्ट संवय अंगवळणी पडते. त्यामुळें घरांतील लहानसान कामें करण्याची त्यांना लाज वाटूं लागते. प्राचीनकाळीं ज्या सदाचारसंपन्न स्त्रिया होऊन गेल्या, त्यांना प्रसंगानुसार जी जी स्थिति प्राप्त होत गेली त्या त्या स्थितींत त्यांनीं सुख मानून घेतलें; एवढेंच नव्हे तर पतिबरोबर अरण्यवास पत्करण्यास देखील माघार घेतली नाहीं. त्याच हल्लींच्या ए. बी. सी. डी. शिकलेल्या मुली पतिकडून यत्किंचित् अशा गोष्टीची कमतरता पडतांच ताबडतोब रागानें फुगून उठतात व प्रसंगीं पतीस उलट जबाब देण्यास देखील प्रवृत्त होतात. ह्यावरून उच्चशिक्षणापेक्षां नीतिशिक्षणाची योग्यता किती श्रेष्ठ दर्जाची आहे हें स्पष्ट दिसून येतें.

आजकाल स्त्री असो वा पुरुष असो, एकाचें वर्तन पाहून दुसराही तसेंच वर्तन करूं लागतो. परंतु त्यापासून आपला फायदा आहे किंवा तोटा आहे याचा तो जराही विचार करून पहात नाहीं. मनुष्यप्राणी हा ज्ञानी असूनही एकाद्या पशुप्रमाणें अक्कलशून्य बनत चालला आहे. तो तात्कालिक समाधान अथवा तृप्ति ह्यांस भुलून पूर्ण नादावतो व त्यामुळें त्यास नानाप्रकारचीं व्यसनें कायमचीं चिकटतात. तात्कालिक जें समाधान त्यास भुलून तीं व्यसनें अखेरीस संवयीनें बलवत्तर होऊन मनास हिरावून घेतात. अशाप्रकारें मनुष्य व्यसनांच्या आधीन होतो व असें झालें म्हणजे हळुहळु नीतिभ्रष्टता व शरीरऱ्हास होत जाऊन, अखेरीस तो यमसदनास जाऊन पोहोंचतो. हल्लीं व्यसनांचें प्रस्थ भयंकर माजल्यामुळें त्यांनीं फारच कहर उडवून दिला आहे असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. कारण या दुष्ट व्यसनांनीं सुशिक्षित म्हणविणाऱ्या लोकांवरसुद्धां आपला पूर्ण पगडा बसविला आहे. या व्यसनांचें प्राबल्य अलीकडेच इतकें माजण्याचें मूळ कारण **छानछोकपणा** हेंच होय. ह्या छानछोकपणाचे भरीस पडून, प्रत्येक मनुष्य हल्लीं विकारवश व स्वातंत्र्यप्रिय बनून नष्टदृष्टि बनूं लागला आहे. **व्यसन कोण-**

**तेंही कां असेना? व्यसन येथून तेथून तें वाईटच. एकदां कां कोणत्याही व्यसनाचा पगडा मनुष्यावर बसला म्हणजे तो पुढें इतका बलवत्तर होऊन बसतो कीं, मनुष्याचे लगाम त्याच्या ह्यातांत सांपडतात व त्यामुळें मनुष्य त्याचा बंदा गुलाम बनतो. अशाप्रकारें मनुष्य आपलें अमोल स्वातंत्र्य व्यर्थ गमावून बसतो.** ह्यासाठीं प्रत्येक मनुष्यानें कोणतेंही व्यसन अंगीं लावून न घेतां, प्रथमपासूनच त्यापासून अलिप्त राहावें. आपल्या पवित्र अंतःकरणांत त्याचा केव्हांही रिघाव होऊं देऊं नये. कोणतेंही व्यसन मनुष्यास प्रथम जडतें तें हौसी, रंगेल व दुष्ट लोकांच्या संगतीपासूनच जडतें. अशा लोकांच्या अड्ड्यांत निर्व्यसनी मनुष्य सांपडला म्हणजे ते त्यास म्हणतात कीं, ' घ्या हो, ह्यानें हो काय होतें ? आजपर्यंत आम्हीं घेत आलों तर आमचें हो काय बिघडलें ? अहो, या जगांत आहोंत तों पावेतों घ्यावी चैन मारून ? उद्यां आपलें काय होणार याचा भरंवसा कोणी सांगावा ? अहो, आपण आहों तोंपर्यंत सर्व कांहीं आहे. मेल्यावर सर्वच कारभार आटोपला. हं. घ्या तर मग ? " असा सर्वांचा एकच आग्रह पडलेला पाहून त्या ऐन मैत्रीच्या रहस्यभरांत त्याच्यानें मग नाहीं कसें म्हणवेल ? ' बरं तर आणा बुवा,' असें म्हणून तो बिचारा व्यसनाधीन होतो. अशा प्रकारें कोणतें ना कोणतें तरी व्यसन प्रत्येक मनुष्यास सहज जडतें. परंतु त्यायोगें त्याचा पुढें किती भयंकर तोटा होत जातो ह्याची कल्पना वाचकांनींच करावी. काय ही मैत्री ? कोण ही सुखाची कल्पना !! काय ही कर्तव्यजागरूकता !!! यावरून मित्र म्हणविणाराच आपला वैरी आहे, हें थोड्याशा विचाराअंतीं कळून येईल !

आजकाल प्रत्येकाचे डोळ्यापुढें **फॅशन** खेळूं लागल्यामुळें, जो तो तिचा भक्त बनून तिच्या आधीन होतो. या फॅशनपायीं पुरुषांना ज्याप्रमाणें महा घातक अशा दुष्ट व्यसनांची संवय जडली आहे; तद्वत्च स्त्रियांना छांनछोक व नटवेपणानें राहण्याची दुष्ट व्यसनांची संवय जडली आहे. त्यामुळें आजकाल स्त्रियांना भांडीं घासणें, लुगडीं धुणें, दळणें, कांडणें

इत्यादि कामें मजुरीनें करून घ्यावीं लागत आहेत. एवढेंच नव्हे तर कित्येक मोठ्या घराण्यांत स्वयंपाकासाठीं देखील आचारी मागेल तो पगार देऊन ठेवणें भाग पडत आहे, ह्यापेक्षां अधिक कमाल ती कोणती? नाजुक व छानछोकपणामुळें जाड पोताचीं टिकाऊ लुगडीं हल्लींच्या अशक्त-नव्हे, सुकुमार बायांना सोसवत नसल्यामुळें, झिरझिरीत पोताची आरपार काया दिसणारीं महेश्वरी फॅन्सी लुगडीं अगर रंगीबेरंगी पातळें घ्यावीं लागत आहेत. ज्या स्त्रियांकडून नाजुकपणामुळें जाडींभरडीं लुगडीं नेसाविलीं जात नाहींत अशा स्त्रिया पतिसेवा कितपत करीत असतील याची कल्पना वाचकांनींच करावी? तसेंच हल्लीं स्त्रियांना पूर्वींच्या स्वस्त व टिकाऊ बांगड्या आवडेनाशा होऊन, त्याऐवजीं फॅन्सी व विदेशी बांगड्या विशेष आवडूं लागल्या आहेत. दोन वर्षांचीं मुलें होईपर्यंत जुन्या लुगड्यांचीं आंगडीं-टोपडीं शिवण्याची चाल साफ नाहींशी होऊन, बाजेवर लोळणाऱ्या तान्ह्या मुलांच्या आंगड्याटोपड्याकरितां बाजार पहावा लागत आहे. पूर्वींच्या बाया लहान मुलांच्या औषधांच्या बाबतींत घरच्याघरींच कांहीं तरी तजवीज करीत होत्या, परंतु आतां तर पडसें खोकल्यावरही डाक्टरचें घर बघावें लागतें, वेणी घालण्याऐवजीं बुचडा घालण्याची संवय जडल्यामुळें, गंगावनाचें प्रस्थ अधिक माजूं लागलें आहे, सौभाग्यचिन्ह जें कुंकू तें मोठें लावण्याऐवजीं बारीक टिकली विशेष पसंत पडूं लागली आहे. सीतास्वयंवर, द्रौपदीस्वयंवर, रामवनवास, पांडवनवास, नलदमयंती इत्यादिकांचीं धर्मनीतिपर गाणीं आवडेनाशीं होऊन, नाटकांतील छचोर गाणीं अधिक कर्णमधुर होऊं लागलीं आहेत. कित्येक सुशिक्षित स्त्रिया तर आपण उच्चगुणसंपन्न ओळखून यावें म्हणूनच कीं काय पायांत बूट घालून हातांत नाजुक व फॅन्सी छत्री धारण करितात व मनगटावर रिस्टवॉच बांधून, डोळ्यावर घोड्याप्रमाणें चष्म्याची झापडी बसवितात. डोकीस फुगीर केसांचा बांकडा भांग पाडून पायघोळ लुगडीं नेसतात. येणेंप्रमाणें नखशिखान्त विदेशी नटवा शृंगार करून व लाजमर्यादा पार झुगारून समाजांत निर्धास्तपणें

बावरत असतात. एकंदरींत पूर्वींच्या साधेपणाच्या चाली साफ नाहींशा होऊन, छानछोकपणानें राहण्याची स्त्रियांना दुष्ट संवय जडत चालली आहे. ह्यामुळें कित्येक स्त्रियांना खाण्यापिण्यास वर्षाकाठीं जितका पैसा लागत असेल त्यापेक्षांही जास्त पैसा या सुशिक्षित म्हणविणाऱ्या स्त्रियांचा केवळ फॅशन म्हणून नटण्यामुरडण्यांत खर्च होऊं लागला आहे.

पुरुषांना तर या फॅशननें अगदीं खुळें बनवून सोडिलें आहे, त्यामुळें ती बहुतेक सर्वांनाच प्रिय वाटूं लागली आहे. परंतु तिजपासून आपलें हित आहे किंवा अहित आहे ह्याचा कोणीही फारसा विचार करून पहात नाहीं. केवळ ८।१० आणे रोज मिळविणाऱ्या मनुष्याला देखील आपण फॅशनेबल राहून खूप चैन करावी असें वाटतें. मनुष्य एकदां चैनींत शिरला म्हणजे त्याच्या मनांत नानाप्रकारचे कुविचार रात्रंदिवस घोळूं लागतात; त्यायोगें मनुष्याचें मन मलिन होऊन तें दुर्व्यसनाकडे अधिकाधिक धांव घेत सुटतें. कोणत्याही दुर्व्यसनांची उत्पत्ति कुसंगतीपासून होते. या कुसंगतीपासून मनुष्यास प्रथम बिडीचें व्यसन जडतें. नंतर त्यास जसजसा कुसंगतीचा लाभ घडत जातो तसतसें त्यास चहा पिण्याचें, सिगारेट ओढण्याचें, नाटक सिनेमा वगैरे पाहण्याचें, अप टु डेट पोषाख करून पोकळ ऐट मिरविण्याचें व्यसन जडत जातें. अशा प्रकारें हळुहळु तो ह्या संभावित व्यसनांच्या जसजसा आधीन होत जातो तसतसा त्याचा आद्यापेक्षां जास्त खर्च होत जातो. मनुष्याचा आद्यापेक्षां जास्त खर्च होऊं लागला म्हणजे त्यास दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येऊन ठेपते. मनुष्यास दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येणें ह्यासारखी अत्यंत लाजिरवाणी गोष्ट दुसरी कोणतीही नाहीं. सबब ज्यास आपला मोठेपणा वाढवावयाचा असेल त्यानें दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी आपणावर केव्हांही येऊं देऊं नये. व ह्यास रामबाण उपाय म्हटला म्हणजे प्रत्येक मनुष्यानें निर्व्यसनी राहून आद्यापेक्षां जास्त खर्च केव्हांही न करणें हा होय. आतां **कोणत्याही व्यसनाचा अगर वस्तूचा प्रारंभीं निषेध करून मनोनिग्रह करणें कडु वाटेल ही**

**गोष्ट खरी, परंतु औषध घेतेवेळीं कडू लागतें पण त्यापासून होणारा फायदा फार महत्त्वाचा असतो. तसेंच प्रारंभीं कोण-त्याही पदार्थांचा निषेध करणें कडु वाटेल पण त्याचा परि-णाम फार उत्तम होईल.** परंतु अविचारानें तो जर नानाप्रकारच्या व्यस-नांच्या अगर मोठेपणाच्या भरीस पडून आपल्या योग्यतेच्या बाहेर खर्च करीत सुटेल, तर खात्रीनें त्याची वाईट दशा झाल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं. **कारण हातभर पाया घालून जर त्यावर चार मजली इमा-रत चढविली तर तिची जशी थोडेच काळांत भयंकर दुर्दशा होते; तशीच आयापेक्षां अधिक खर्च करणाराची दुर्दशा होते.** सबब प्रत्येक मनुष्यानें कोणतेंही व्यसन अंगीं मुळींच जडवून घेऊं नये. व ज्या वस्तूची आपणास जरुरी नसेल त्यावेळीं ती वस्तु स्वस्त मिळत असली तरी खरेदी करूं नये. तसेंच कोणतीही वस्तु खरेदी करितांना ती आपल्या योग्यतेची आहे किंवा नाहीं याचा स्वतःशींच शांतपणें दूरवर विचार करून, नंतर ज्याप्रमाणें आपलें मन ग्वाही देईल त्याप्रमाणें वर्तन करणें हें सर्वांत उत्तम होय.

आपण यत्किंचित् भासणाऱ्या विडीचेंच उदाहरण घेऊं या! आपल्या हिंदुस्थानांत २५।३० वर्षांपूर्वीं पुण्यास **बाळाराम पुलुय्या** यांचाच फक्त विडीचा कारखाना होता. परंतु दिवसेंदिवस विडीचें प्रस्थ बेसुमार वाढत जाऊं लागल्यामुळें, त्या मानानें विडीचे कारखानेही हिंदुस्थानांत भराभर वाढूं लागले. व सर्व कारखानदार आपापल्या विड्या रजिस्टर करून घेऊन त्या गिऱ्हाइकांस तत्काळ ओळखतां याव्या म्हणून प्रत्येक बंडलावर शहाजी, शिवाजी, संभाजी, सिंह, उंट, गाय, बैल इत्यादि नानाप्रकारचे छाप देऊं लागले आहेत. कित्येक तर बंडलावर स्वतःचा फोटो देऊन आम्हीं विडीचे जंगी कारखानदार आहोंत असें लोकांस उघड दर्शवूं लागले आहेत.

अशाप्रकारें विडीचें प्रस्थ दिवसेंदिवस अधिक वाढूं लागल्यामुळें, आज पंधरा सोळा वर्षांचा मुलगा होत नाहीं तोंच तो मोठ्या चैनीनें विडी ओढूं

लागतो. विडीचें व्यसन दिसावयास जरी संभावितपणाचें दिसतें तरी त्यापासून मनुष्याच्या शरीरांत नानाप्रकारचे रोग उद्भवतात. **विडी ओढण्यापासून तोंडास एक प्रकारची घाण सुटते, कफ दाटतो, दमा लागतो, दृष्टि मंदावते, वीर्य पातळ बनतें, संतति अशक्त निपजते, खयां खयां तर नित्य सुरूच राहते, काळिज जळतें, शेवटीं फुप्फुसास धक्का पोंचून त्यायोगें आयुष्याची वाढ खुंटते. शिवाय विडी ओढणारांचे कित्येक वेळां कपडे जळतात. एकादे प्रसंगीं तर घरादाराची राखरांगोळी होण्याचीही वेळ येऊन ठेपते.** ह्यापैकीं बहुतेक अनुभव मी विडी ओढीत असतांना स्वतः मला येऊन चुकले आहेत. त्यांपैकीं एका अनुभवाचें उदाहरण मी खालीं दिलें आहे. त्यावरून माझे वाचकबंधु सावध होऊन या दुष्ट व्यसनापासून अलिप्त राहतील अशी आशा आहे.

१९१६ सालची गोष्ट. मी मुंबईस राहात असतांना नित्य पन्नास साठ विड्या ओढण्याचा माझा क्रम सुरू होता. या बेसुमार धूम्रपानामुळें एके दिवशीं माझ्या शरीरांत एकप्रकारचा रोग उद्भवून, त्यायोगें माझ्यानें या कुशीचें त्या कुशीवर देखील निजवलें जाईना. फार तर काय, परंतु जरा का हालचाल करूं लागलों कीं, खासीमुळें मला प्राणांतिक वेदना होत असत. अशी कठिणावस्था पाहून माझी पांचाबर धारण बसली व मी लागलींच माझे बालमित्र **डॉक्टर के. के. भालेदे** यांना बोलावण्याविषयीं मंडळीस सूचना केली. हे माझ्या घरापासून नजीकच असलेल्या उमरखाडी जेलांत आपल्या बंगल्यावर राहात असत. निरोप पोहोंचतांच ते तत्काळ निघून आले व त्यांनीं प्रथम माझी नाडी वगैरे पाहून, नंतर माझा कोठा अति सूक्ष्मपणानें तपासून पाहिला. त्यावरून त्यांना बेसुमार धूम्रपानामुळें माझ्या फुप्फुसास जबरदस्त धक्का पोहोंचल्याचें कळून चुकलें. सबब त्यांनीं मला आपल्या बंगल्यावर नेऊन तेथेंच स्वतःच्या देखरेखीखालीं औषधोपचार करावयाचें ठरवून लगेच एक व्हिक्टोरिया मागविली. परंतु जेव्हां इतर

मंडळी मला व्हिक्टोरियामध्यें घेऊन जाऊं लागली तेव्हां मला ज्या प्राणांतिक वेदना झाल्या त्या मला किंवा त्या जगन्नियंत्या परमेश्वरालाच ठाऊक! बंगल्यावर पोहोंचतांच त्यांनीं प्रथम माझी निजावयाची उत्तमप्रकारें व्यवस्था लावून दिली. नंतर थोड्याच वेळांत एका बाटलींत औषध तयार करून आणून, त्यांपैकीं एक भाग त्यांनीं मला प्यावयास दिला. येणेंप्रमाणें त्यांनीं वारंवार शरीरप्रकृति पाहून, शरीरप्रकृतीच्या मानानें मला स्वतः औषधी देण्याचा क्रम चालू ठेविला. या त्यांच्या रात्रंदिवसाच्या दीर्घ परिश्रमामुळें मला तीन दिवसांत बराच आराम पडला. मात्र खासीचें प्रमाण जराही कमी झालें नाहीं. सबब त्यांनीं हवापालट करण्यासाठीं मला देशांत निघून जाण्याची सूचना केली. रेल्वेंतून स्वतंत्रपणें प्रवास करण्याची अंगांत शक्ति नसल्यामुळें, मी माझे वडिलांस तार देऊन मुंबईस बोलावून घेतलें. नंतर दुसरे दिवशीं सकाळीं आम्हीं बोरीबंदरहून निघून सायंकाळचे सुमारास **सावदा** स्टेशनवर येऊन पोहोचलों. येथून आमचें गांव पांच मैलांवर एक लहानसें खेडें असल्यामुळें व तेथें औषधपाण्याची व्यवस्था होणें शक्य नसल्यामुळें, आम्हीं सावद्यास माझे मामा **हेमा लक्ष्मण पाटील** यांच्या येथें राहण्याचें ठरवून टांग्यांत बसलों व थोड्याच वेळांत मुक्कामास येऊन पोहोंचलों. खासीमुळें माझे होत असलेले भयंकर हाल पाहून, मामानें लागलीच तेथील **वैद्यराज लक्ष्मण नारायण महाजन** यांना बोलावून माझी शरीरप्रकृति दाखविली. त्यांनीं नाडी वगैरे पाहून सांगितलें कीं, 'भिण्याचें मुळींच कारण नाहीं. उद्यांपासून औषधी सुरू करूं!' नंतर मी स्वतःच त्यांना म्हटलें कीं, 'ह्या खासीमुळें चार पांच दिवसांपासून माझा जराही डोळा लागला नाहीं. सबब प्रथम खासीचा बंदोबस्त कराल तर फार उत्तम होईल! नंतर त्यांनीं मला दोन गोळ्या देऊन निजतांना त्या पाण्याबरोबर घेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी त्या गोळ्या घेतल्या व बाजेवर लवंडलों. नंतर कांहीं वेळानें मला गाढ झोंप लागली. ती इतकी कीं,

रात्र केव्हां संपली हें सुद्धां मला समजलें नाहीं; त्यामुळें मला अवर्णनीय आनंद प्राप्त झाला. ईश्वरकृपेंकरून त्यांचे औषधीपासून मला अल्पावधींतच गुण येऊन माझी प्रकृति साफ बरी झाली. नंतर पुनः मी मुंबईस जाऊन पूर्ववत् माझा कामधंदा करूं लागलों. मुंबई हें छानछोकीचें व चैनीचें माहेरघर असल्यामुळें, माझ्या दुर्दैवानें पुनः उचल खाऊन, पूर्ववत् विड्या फुंकण्याची मला दुर्बुद्धि आठवली. त्यामुळें एक वर्ष लोटत नाहीं तोंच पूर्वीचा विकार पुनः उद्भवला. भीतिस्तव घरीं वाडिलांस हें वर्तमान कळविण्याचें मला धैर्य होईना. तसेंच दुर्दैवेंकरून माझे बालमित्र **डॉ. के. के. भालेराव** यांचीही बदली नुकतीच झालेली असल्यामुळें, ह्यावेळीं मला अत्यंत हाल सोसावे लागले. परंतु आयुष्यमर्यादा बलवत्तर असल्यामुळें, पुनः या त्रिकट परिस्थितींतून मी कसा तरी पार पडलों व तेव्हांपासून या अनर्थकारक बिडीस कायमची रजा देऊन, तिजपासून उद्भवणाऱ्या सर्व रोगांपासून मी सर्वथैव मुक्त झालों.

प्रिय बंधुजनहो ! हा बिडीचा प्रताप अगदीं स्वानुभविक असल्यामुळें तो मी तुम्हांस अक्षरशः निवेदन केला आहे. मात्र तो सत्य मानणें अगर असत्य मानणें हें तुमच्या स्वाधीन आहे. कारण व्यसनाधीन व अविचारी मनुष्यास उपदेश हा औषधापेक्षांही कडु वाटत असतो. परंतु तो कोठपर्यंत ? जोंपर्यंत त्यास स्वतः ठेंच लागत नाहीं तोंपर्यंत. ह्यास्तव ठेंच लागण्यापूर्वींच 'पुढच्यास ठेंच, मागचा शहाणा' या म्हणीस अनुसरून जर तो वेळींच सावध झाला तर 'सोन्याहून पिवळें.' नाहींतर दुर्दैवेंकरून त्यास केव्हांतरी त्यांचीं कटुफळें खात्रीनें चाखावीं लागतील हें त्यानें पूर्ण लक्षांत असूं द्यावें.

तशीच परदेशांतून इकडे चहा येऊन, तिनें प्रथम मुंबईपुण्यासारख्या मोठमोठ्या शहरीं आपला तळ दिला व तेथील प्रजाजनांत हळुहळु आपले गुण प्रगट करून, तिनें आपलें प्रस्थ इतकें माजविलें कीं, श्रीमंतांपासून गरिबापर्यंत लहानथोरांस आपले भक्त बनवून सोडिलें. नंतर तेथून आपला

मोर्चा हळुहळु इतर गांवाकडे वळवून, खेड्यापाड्यांतील लोकांनासुद्धां आपल्या गुणानें मोहित करून वेडें बनवून सोडिलें व आतां तर हिंदुस्थानांतील कोन्याकोपऱ्यांत देखील कोणीही पाहुणा घरीं आला असतां, त्याची प्रथम या काळीज जाळणाऱ्या गरमागरम चहानें व ख्यां ख्यां करावयास लागणाऱ्या कडक बिडीनें 'आदर ऊर्फ चहा' होऊं लागली आहे. अहाहा! चहानें लोकांची चहा होऊं लागल्यामुळें, परस्परांच्या प्रेमाला जणूं काय एक प्रकारचा ऊत येऊं लागला आहे. बरें शारीरिक दृष्ट्या पाहूं जातां, या दोहोंपासून शरीरास काडीइतका तरी फायदा आहे असें म्हणावें तर तसेंही कांहीं आढळून येत नाहीं. उलट रोगांनीं शरीरांत कायमची वस्ती केल्यामुळें, शरीराचा खोका अधिकच जर्जर बनूं लागला आहे. त्यायोगें डॉक्टर लोकांच्या दवाखान्यांचे उंबरठे झिजवावयाची पाळी येऊं लागली आहे. आज जी दवाखान्यांची संख्या बेसुमार वाढत असलेली दृष्टीस पडत आहे, तिला मूळ कारण हीं दुष्ट व्यसनेंच होत. मुंबईपुण्यासारख्या गजबजलेल्या शहराकडे दृष्टि फेंकली असतां, तुम्हांस अगदीं थोडथोडक्या अंतरावर बिडीचीं दुकानें, चहाचीं हॉटेलें व रोग्यांचे दवाखाने इतके दिसून येतील कीं, तुम्हीं आश्चर्यानें थक्क झाल्यावांचून केव्हांही राहणार नाहीं. कित्येक आईबाप तर मोठ्या आवडीनें आपल्या आवडत्या लहान अर्भकांना देखील चहा पाजतात व मोठ्या आढ्यतेनें लोकांना सांगतात कीं, आमच्या बाबूला एकवेळ खायाला नसलें तर चालेल, परंतु चहा मात्र अगोदर पाहिजे. अहाहा! जेथें प्रत्यक्ष बापच मुलांना चहाचें व्यसन लावून, त्यांच्या स्पष्ट दिसत असलेल्या दुर्गुणांचे आनंदानें गोडवे गाऊं लागतात; त्या घरांतील मुलें दुर्व्यसनी निपजल्यास आश्चर्य तें काय मानायचें?

बिडीचें किंवा चहाचें व्यसन दिसावयास कांहींच वाटत नाहीं; परंतु आज हिंदुस्थानांत दरवर्षी केवळ बिडीपायीं ७१२५०००० रुपये *

---

* हा आंकडा 'ज्ञानमित्र' मासिकांतून घेतला आहे.

खर्च होत आहेत. म्हणजे जवळ जवळ विडीपायीं नित्य वीस लाख रुपये खर्च होत आहेत. या मानानें पाहूं गेलें असतां चहापायीं नित्य किती लाख रुपये खर्च होत असतील याची कल्पना वाचकांनींच करावी. शिवाय तन मन धन आकर्षण करून कुळास व नांवास कायमचा कलंक लावून मुखास काळिमा फासविणाऱ्या वारयोषिता, ज्या केवळ आपल्या धंद्यावर प्रतिवर्षी सरकारास ६६ कोट रुपये+ इन्नकम् टॅक्स् भरीत आहेत, मग त्यांचें वार्षिक उत्पन्न किती होत असेल? तसेंच गटारगंगेंत स्नान घालून दुष्कीर्तीनें अपवित्र बनविणाऱ्या दारूपायीं व सर्वस्वावर पाणी सोडावयास लावून अखेर कफल्लक बनवून सोडणाऱ्या जुगारापायीं रुपयांचा कितपत चुराडा होत असेल हें त्या जगन्नियंत्या परमेश्वरालाच ठाऊक! शिवाय नाटकें, सिनेमा, सर्कशी, तमाशे वगैरे ख्यालीखुशालींत व अफू, गांजा, भांग, चरस इत्यादि मादक पदार्थांपायीं नित्य लाखों रुपये खर्च होत असतील तें निराळेंच!

वरील विवेचनावरून पाहूं जातां, आपल्या हिंदुस्थानास पूर्वी जें सुवर्णभूमि म्हणून नांव पडलें होतें तें अगदीं यथार्थ होतें. कारण नानाप्रकारच्या फॅशनपायीं व व्यसनापायीं शोकी लोकांचे वर्षाकांठीं आज जितके रुपये खर्च होत असतील तितके रुपये जर त्यांनीं शिल्लक टाकण्याचा निश्चय केला व त्या रुपयांचें धान्य खरेदी केलें तर सबंध हिंदुस्थानांतील लोकांस तें धान्य कमींतकमी ५।६ वर्षें तरी खात्रीनें पुरेल यांत तिळमात्र शंका नाहीं. परंतु ही सुबुद्धि आम्हांस कोठून आठवणार?

अशाप्रकारें या फॅशनपायीं व व्यसनापायीं खर्च बेसुमार वाढत जाऊं लागल्यामुळें, कित्येकांचा पगार हातीं पडतांच तो आठपंधरा दिवसांत चट-दिशीं खलास होऊन जातो. व त्यामुळें त्यांना पुढचा पगार हातांत पडे-पावेतों मित्रजनांकडून पैसे उसनवार काढावयाची पाळी येऊन ठेपते; तरी-

---

+ हा आंकडा 'मनोवांच्छित संतति' या पुस्तकांतून घेतला आहे.

देखील हें असें कां होतें ह्याचा कोणीही फारसा दूरवर विचार करून पहात नाहीं. एवढा पगार कसा पुरत नाहीं असा कोणी प्रश्न केल्यास, त्यावर त्याचें अगदीं ठराविक उत्तर असतें कीं, मी पुष्कळ बारकाईनें खर्च करीत असतों, तरी देखील वारंवार पैसे उसनवार काढावयाची पाळी येते, त्याला मी तरी काय करूं? परंतु त्यास पाठीमागें लागलेल्या या फॅशनचा व व्यसनांचा ससेमिराच कारणीभूत आहे हें त्याच्या मुळींच लक्षांत येत नाहीं. मनुष्यास वारंवार उसनवार पैसे काढावयाची संवय जडत गेली व ते तो वक्तशीर परत न देत गेला म्हणजे अर्थातच चोहोंकडून सर्वांचे सक्त तगादे सुरू होतात. अखेरीस त्यांना कंटाळून त्यास कर्ज काढण्याची इच्छा होते. मनुष्यास कर्ज काढण्याची दुष्ट संवय एकदां कां अंगवळणी पडली म्हणजे त्यास कर्जाविषयीं कांहींच दिक्कत वाटेनाशी होऊन तो अधिकाधिक कर्ज काढीत सुटतो व अखेरीस तो एकप्रकारचा निगरगट्ट बनतो. अशा प्रकारें मनुष्यास दारिद्र्यदशा प्राप्त झाली म्हणजे त्यास कांहींएक सुचेनासें होऊन प्रथम लोकांत त्याची पत नाहींशी होते. मनुष्याची पत नाहींशी झाली कीं, तो मग कवडी मोलाचा बनलाच म्हणून समजावें.

मनुष्यास दारिद्र्य हेंच चिंतेचें घर होय. व जेथें दारिद्र्य तेथें त्याची जुळी बहीण चिंता ही हटकून असावयाचीच. दुसरें असें कीं, दारिद्र्यामुळें त्यास लोकांशीं वारंवार भांडणतंटे करण्याचा प्रसंग येत असतो. कारण निर्धनाशीं भांडण करण्यास कोणीच भीत नाहीं. तिसरें असें कीं, केवळ दारिद्र्य म्हणून एवढ्याचमुळें लोक त्याचा तिरस्कार करूं लागतात. दारिद्र्य हा एक हृदयांत कायमचें ठाणें देऊन राहिलेला शोकाग्नि होय. हा शरीर तप्त करून सोडतो. परंतु विस्तवाप्रमाणें जाळीत मात्र नाहीं. शिवाय दरिद्री मनुष्य हा आपला आप्त आहे हें कबूल करावयास बहुतेक लोक अगदीं नाखुष असतात.

चिता चिंता समानैव बिंदुमात्र विशेषतः ॥
सजीवं दहते चिंता निर्जीवं दहते चिता ॥ १ ॥

ह्यास्तव विचारी मनुष्यानें अविचारीपणानें छानछोकपणांत व व्यसनांत पैसा खर्च करून कर्जबाजारी केव्हांही होऊं नये. **कारण कर्ज हें एक जलाल विष आहे. हे विषारी पदार्थ फक्त खाणारांचेच प्राण हरण करितात; परंतु कर्ज हें मुलांच्या मुलांचे देखील प्राण हरण करावयास चुकत नाहीं** हें प्रत्येकानें पूर्ण लक्षांत ठेवून, उत्पन्नापेक्षां अधिक खर्च केव्हांही न होऊं देण्याची शक्य तितकी काळजी घेऊन आपलें वर्तन शुद्ध ठेवण्याचा सतत प्रयत्न चालू ठेवावा. नानातऱ्हेच्या दुष्ट विकारांस पळवून लावून आत्मा सुविचारसंपन्न बनवावा. असें करण्यास स्वतःच्या मनाची स्वतःस ओळख झाली पाहिजे. परंतु ही गोष्ट फार काठिण आहे. कारण **कित्येक वेळां आपल्या दोषांकडे आपलें लक्षच जात नाहीं. व गेलेच तर त्याचें फारसें महत्त्व वाटत नाहीं. व तें वाटलेंच तर दोष काढून लावण्याचा प्रयत्न आपणाकडून होत नाहीं व केलाच तर तो सतत राहत नाहीं.** ह्या साठीं प्रथमतः स्वभावाची ओळख करून घेतली पाहिजे. सूक्ष्म व सतत विचारानें मनांतील दोष बिष्करण झाले पाहिजेत, म्हणजे बरेंच काम होईल. व नंतर त्यांना हाकून लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. व तो उपाय म्हणजे संवय हाच होय. जे ज्याचे स्वाभाविक दोष अथवा बिकार ते प्रसंग आला कीं, उचल खाणारच. हें जरी निर्बिवाद आहे, तरी पण त्यांनीं वर डोकें काढलें कीं, सावधागिरीनें त्यांचें ताडण हें झालेंच पाहिजे. त्यांची मगरमिठी सुटणें फार कठिण असतें. ती सुटतां सुटत नाहीं व सुटली तर पुनः बसते. परंतु जर सतत व दीर्घ प्रयत्न चालू असेल तर ती हळुहळु सैल होऊन सुटते. पण मोठ्या नाखुशीनें सुटते. प्रथमतः विकारांचा प्रातिकार करणें फार काठिण पडतें. परंतु पुढें सतत प्रयत्नानें व संवयीनें ते उचल खाईनासे होतात व नंतर क्षीण होत होत अखेरीस नष्ट होतात. असो. **जो सूक्ष्म दृष्टीनें आपल्या दोषांचें अवलोकन करून त्यांना संवयीचें अंजन घालील तो हटकून दोषमुक्त झालाच पाहिजे. संवयीनें जर ते जडले तर संवयीनें कां जाऊं**

**नयेत. मात्र प्रयत्न दीर्घ व सतत चालू ठेविला पाहिजे.** ईश्वर संकटें तर याचकरितां धाडीत असतो. एरव्हीं मनुष्य आपल्या स्वभावाची ओळख करून घेण्याच्या खटपटींत पडत नाहीं. प्रसंग आला म्हणजे दोष विष्करण होऊन ते साहजिकच समजतात. व मग सुधारणा होते.

बहुतेक लोक बड्या लोकांचें अनुकरण करीत असतात. परंतु तें कोणत्या बाबतींत करावें व कोणत्या बाबतींत करूं नये, ह्याचा विचार करावयास नको काय? कारण सदाचरणाचे बाबतींत आपण त्यांची तंतोतंत बरोबरी करूं शकूं. परंतु खर्चाचे बाबतींत त्यांची बरोबरी आपण केव्हांही करूं शकणार नाहीं. सबब '**ऋण काढून सण केव्हांही करूं नये.**' या म्हणीस अनुसरून प्रत्येकानें आपली ऐपत व उत्पन्न पाहून खर्च करीत जाणें हें सर्वांत उत्तम होय. व एवढ्याचसाठीं प्रत्येकानें निर्व्यसनी असणें व सदाचरणानें वागणें अति श्रेयस्कर होय. **बड्या लोकांनीं कांहींही केलें तरी त्यांना तें शोभूं शकतें. परंतु गरीब मनुष्यांनीं तसें केलें असतां त्यांना तें केव्हांही शोभूं शकत नाहीं.** हें प्रत्येकानें पूर्ण लक्षांत असूं द्यावें. आपल्या धर्मांत व आचारविचारांत असलेली सुव्यवस्था इतर कोणत्याही देशांतील धर्मांत आढळून येत नाहीं. ह्याचा उलट आपणांस अभिमान असावयास पाहिजे. परंतु ज्यास आपल्या धर्माचा, राष्ट्राचा, आचारविचाराचा व चालीरीतींचा अभिमान नाहीं, त्यास राष्ट्रघातक कुपुत्र समजावा. **परदेशांत येऊनही जर ते विदेशी लोक आपला धर्म, आचारविचार, चालीरीति व पोषाख यांत यत्किंचित्‌ही फरक न होऊं देतां, आपल्या देशाचा स्वाभिमान पूर्ण जागृत ठेवितात व तुमच्या धर्माचें, आचारविचारांचें व चालीरीतींचें जर ते स्वप्नींही अवलंबन करूं इच्छित नाहींत; तर मग तुम्हींच कसे स्वाभिमानशून्य बनून, त्यांचें अंधानुकरण करीत सुटतां? हिंदु पोषाख केलेला एकादा युरोपियन स्वप्नीं तरी तुमच्या नजरेस पडतो काय?** हें धडधडीत त्यांच्या चालीरीतीचें

उदाहरण तुमच्या डोळ्यासमोर सदैव दिसत असतां, तुम्हांलाच त्यांच्या चालीरीति कशा गोड वाटतात? जसें तुम्हीं इतरांच्या दुर्वर्तनाचें अंधानुकरण करीत सुटतां; तसेंच या विदेशी लोकांच्या या सद्वर्तनाचें अवलंबन कां करीत नाहीं? खरोखर ज्याला देशाभिमान व धर्माभिमान नाहीं तो नर नव्हे पण अक्कलहीन व पुच्छहीन असा द्विपाद पशु जाणावा.

दुर्वर्तन करणारीं माणसें आपल्या देशांत पाहूं गेलें असतां, इतकीं असंख्यात दिसून येतील कीं, त्यांची गणति करणें बहुतांशीं बरेंच अशक्य होईल. परंतु सद्वर्तन करणारीं माणसें बोटानें मोजण्याइतकीं तरी सांपडतील किंवा नाहीं याची शंकाच आहे. **दुर्वर्तनाचें अनुकरण करण्याची मनुष्यास जशी दुर्बुद्धि होते; तशीच जर सद्वर्तनाचें अनुकरण करून दुर्वर्तनापायीं होणारा खर्च बचत करण्याची सुबुद्धि होईल, तर देशांत निष्कारणी होणारा खर्च वांचून, अल्पकाळांतच संपत्तीचा सुकाळ होऊन संपत्तिसंपन्न मनुष्यें सर्वत्र दिसूं लागतील व त्यायोगें दारिद्र्य हीं काय वस्तु आहे व ती कशी असते हें देखील पहावयास सांपडणार नाहीं!**

आजकाल जसा फॅशनपायीं व व्यसनापायीं पैशांचा निष्कारण खर्च होत आहे; तसाच किंबहुना त्यापेक्षांही जास्त पैसा आजकाल लग्नाचे बाबतींत प्रत्येक जातींत खर्च होऊं लागला आहे. या बाबतींत कांहीं अंशीं तरी आळा असावा म्हणून खालील सद्गृहस्थांनीं लोकांस जो आदर्शनीय धडा घालून दिला आहे; त्या धड्याचा आदर्श पुढें ठेवून, प्रत्येक तालुक्यांतील किंवा गांवांतील पुढारी व श्रीमंत लोक जर या धड्याचें अनुकरण करून, स्वतःच्या मुलामुलींच्या लग्नकार्यांत प्रत्यक्ष कृतीनें आपल्या अज्ञ बांधवांस आचरून दाखवितील, तर त्यांना अज्ञजनांस दारिद्र्यदशेंतून वांचविल्याचें व खरें देशहित साधल्याचें श्रेय मिळून, ते खात्रीनें लोकप्रिय झाल्याशिवाय केव्हांही राहणार नाहींत.

## लग्न आणि खर्च.

ता. २ माहे जून सन १९२७ रोजीं **कोल्हापूर** येथें **रा. गोविंदराव शासने मास्तर** यांच्या मुलीचा **रा. नामदेवराव सूर्यवंशी** यांच्याशीं विवाह झाला. या विवाहसमारंभांत वधूपक्षानें व वरपक्षानें अनेक बाबतींत इतरांना उदाहरण घालून देण्यासारख्या अनेक गोष्टी केल्या. या विवाहामध्यें वाजंत्री, मंडप, मिरवणूक, ग्यासच्या बत्त्या, अहेरांची देवघेव इ. गोष्टींस अजिबात फांटा देण्यांत आला होता. व एकंदर लग्नविधि अगदीं साधेपणानें उरकून घेण्यांत आला. या विवाहासंबंधीं लिहितांना '**विजयी-मराठाकार**' म्हणतात—

"या विवाहसमारंभास सुमारें हजार दीड हजारापर्यंत जनसमूह हजर होता. हा समारंभ पाहण्याकरितां मुद्दाम बायकामंडळींना आमंत्रणें देण्यांत आलीं होतीं. कारण लग्नविधीमध्यें निष्कारण हट्ट धरून पैशांचा नाहक चूर उडविण्यास आमचा स्त्रीवर्गच विशेष उत्सुक असतो, वधूवरांच्या पोषाखांतील साधेपणाही अति अनुकरणीय होता. लग्नखर्चानें शेतकऱ्यांचीं कैक घराणीं धुळीस मिळाल्याचीं उदाहरणें आपण नेहमीं पाहात असतों. कांहीं गोष्टी रूढि सांगते म्हणून व बऱ्याचशा गोष्टी बायकामंडळीच्या दुराग्रहामुळें आपण करितों. **परंतु लग्नांतील दोन दिवसाच्या दिवाळींत उडवलेली मौज निस्तरण्याकरितां माणसाच्या नाकीं नव येतात. कर्ज काढून हौसेनें लग्न करावयाचें व पुढें नवराबायकोनें या कर्ज फेडींकरितां घर किंवा शेत विकून जन्मभर मरमर मजुरी करून पोट भरावयाचें, अशीं शेंकडों उदाहरणें आपल्या परिचयाचीं आहेत.** असली दरिद्री हौस पूर्ण करण्याकरितां कोणीही शहाणा मनुष्य आपल्या संसारावर तुळशीपत्र ठेवण्यास तयार होणार नाहीं. शास्त्रोक्त लग्नविधीला माणसांनीं आपल्या मूर्खपणानें चिकटविलेल्या बेगडी आचारांची मुळींच जरूरी नाहीं.

**महात्मा गांधींच्या** धाकट्या मुलाचा विवाह नुकताच **साबरमती**

आश्रमामध्यें साजरा करण्यांत आला. या विवाहास एकंदर ७ रुपये खर्च आल्याचें नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. दुसरें उदाहरण महात्माजींचे शिष्य **शेट जमनालाल बजाज यांनीं अमदाबाद** येथें आपल्या भगिनीचा विवाह फक्त दहा पंधरा रुपयांत उरकून घेतला. **शेट जमनालाल बजाज** हे अत्यंत धनिक गृहस्थ असून, त्यांनीं आजपर्यंत निरनिराळ्या संस्थांना केवळ मदत म्हणून लाखों रुपये खर्च केले आहेत. शासने मास्तर यांना देखील आपल्या मुलीच्या विवाहाकरितां हजार दीड हजार रुपये खर्च करणें मुळींच अशक्य नव्हतें. परंतु हा विवाह अत्यंत साध्या रीतीनें उरकून घेऊन त्यांनीं जातिसमाजासच नव्हे तर देशांतील प्रत्येक समाजांतील जातींस उत्कृष्ट उदाहरण घालून दिलें आहे.

**विविधवृत्त ता. १२-६-२७**

मत्प्रिय बंधुजनहो! कोणत्याही बाबतींत बड्या लोकांचें व विदेशी लोकांचें जसें तुम्हीं अंधानुकरण करीत सुटतां; तसेंच तुम्हीं त्यांच्या सद्वर्तनाचें अनुकरण इतर बाबतींत करावयास नको काय? खरोखर, **महात्मा गांधी, शेट जमनालाल बजाज, व गोविंदराव शासने मास्तर** यांनीं जसे आपल्या मुलांमुलींचे विवाह अगदीं साध्या रीतीनें उरकून घेऊन, देशास एक आदर्शनीय कित्ता घालून दिला, तोच कित्ता लग्नप्रसंगीं डोळ्यांपुढें ठेवून, जर प्रत्येक मनुष्य आपल्या मुलांमुलींचे विवाह साध्या रीतीनें करावयाचें मनांत आणील व बाळपणापासून कोणतेंही व्यसन अंगीं लावून न घेतां, पूर्वकालीन चालीरीतीस अनुसरून तो जर आपलें आचरण गंगाजलाप्रमाणें पवित्र ठेवील तर अनायासेंच त्याच्या पैशांची भयंकर बचत होत जाईल व त्यास कर्ज काढावयाची पाळी केव्हांही येणार नाहीं. परंतु जर तुम्हीं या दुष्ट फॅशनचें व व्यसनांचें अंधानुकरण सतत असेंच चालूं ठेवाल तर तुमचींही मुलें तोच कित्ता गिरवून त्याचें अंधानुकरण करूं लागतील व त्यायोगें तुमच्यावर लवकरच भिकेचा वरवंटा फिरून, तुम्हांस निश्चयेंकरून अन्नान्नदशा प्राप्त होईल हें ब्रह्मवाक्य तुम्हीं आपल्या हृत्पटलावर सोनेरी ठळक अक्षरांनीं कोरून ठेवा.

---

## प्रकरण २३ वें.

# आईबापांचीं मुलांविषयीं कर्तव्यें.

आईबापांचीं मुलांविषयीं मुख्य दोन कर्तव्यें होत. त्यांपैकीं पहिलें कर्तव्य म्हटलें म्हणजे मुलांचें उत्तम रीतीनें पालनपोषण करणें व त्यांना योग्य शिक्षण व वळण लावणें हें होय. पैकीं पालनपोषण हें प्रत्येक आईबापाच्या हातून कसें तरी पार पडत असतें. परंतु शिक्षण व वळण जसें द्यावयास हवें तसें तें मुळींच दिलें जात नाहीं. यास मुख्य कारण त्यांचा अज्ञानपणा हेंच होय. मूल पाळण्यांत टाकल्यापासून त्यास शिक्षण देऊन योग्य वळण लावणें, हें आईचें मुख्य कर्तव्य होय. कारण उत्तम गुण अंगीं जडण्यास घर हीं मुख्य शाळा होय. प्रत्येक मुलास नीतीचें किंवा अनीतीचें वळण लागतें तें प्रथम घरींच लागतें. कारण मुलांना परक्याबरोबर वागण्याचा प्रसंग येण्यापूर्वीं घरच्या माणसाबरोबर वागण्याचा प्रसंग अगोदर येतो. यास्तव घरांत त्यास ज्याप्रमाणें चांगलें किंवा वाईट वळण लागेल त्याप्रमाणें तो पुढें लोकांत वागेल हें निराळें सांगावयास नकोच.

मुलगा कितीही हुशार असला तरी लहानपणीं त्याला ज्या ज्या माणसांचा सहवास घडतो; त्या त्या माणसाप्रमाणें कांहीं तरी गुणावगुण त्यामध्यें आल्याखेरीज केव्हांही राहात नाहीं. कारण **पाणी हा जसा एकप्रकारचा प्रवाही पदार्थ आहे, परंतु तापवून लाल केलेल्या लोखंडावर जर पाण्याचे थेंब टाकल तर ते एका क्षणांत नाहींसे होतात. तेच पाण्याचे थेंब कमळपत्रावर पडल्यास, मोत्यांच्या दाण्याप्रमाणें चमकतांना दृष्टीस पडतात. स्वातीजलाच्या बिंदूंनीं शिंपाचा आश्रय केला तर त्याचे साक्षात् मोतीं**

**बनतात. कोणत्याही रंगांत पाण्याचे थेंब टाकले तर त्या त्या रंगाप्रमाणें त्याचें रूप तत्काळ बदलतें. अशाच प्रकारचीं मुलांमुलींच्या अंतःकरणाची दशा आहे. मुलांना ज्या ज्या मुलांचा जसजसा संपर्क घडेल तसतसा त्यांना संगतिगुण घडेल. पवित्र गंगाजल अमृतांत मिसळलें तर त्याच्या अंगांत तारक गुण उत्पन्न होतो. तेच सोमलाच्या अर्कांत मिसळलें तर तें मारक गुणसंपन्न होतें. कापूर कस्तूरीसारखे सुगंधी पदार्थ वस्त्रांत ठेविले तर त्यांना उत्तम सुवास लागतो; परंतु त्यांचे ऐवजीं जर तेथें घाणेरडे पदार्थ ठेविले तर दुर्गंधीनें नाकांतील केंस जळूं लागतात. हा त्यांचा सहवासजन्य गुण होय.**

यावरून मूल जन्मतें तेव्हां तें चांगलें किंवा वाईट नसतें, तर त्याचा चांगुलपणा किंवा वाईटपणा जे त्याचें पालनपोषण करितात किंवा त्यास शिक्षण देतात त्यांचे आचरणावर अवलंबून असतो. अर्थात गृहशिक्षण चांगलें किंवा वाईट मिळणें हें घरांतील मुख्य माणसांच्या आचरणावर अवलंबून आहे. जर घरांतील मोठीं माणसें प्रेमानें, सदाचरणानें, प्रामाणिकपणानें व नीतीनें वागणारीं असलीं; तर त्या घरांतील मुलेंही अर्थात् सुस्वभावी, सदाचारी, प्रामाणिक व नीतिमान् निपजल्याखेरीज राहणार नाहींत. परंतु घरांतील माणसांनीं आपलें आचरण चांगलें न ठेवितां, त्यांनीं मुलांस कितीही धाक दाखविला, तरी त्याचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं. कारण वाईट अक्षराचा कित्ता बळवून, चांगलें अक्षर केव्हांही काढतां येणार नाहीं. तसेंच घरांतील माणसें मूर्ख, स्वार्थी, चोरटीं व दुर्गुणी असलीं तर त्यांचे गुण मुलांचे वर्तनांत आल्याखेरीज केव्हांही राहणार नाहींत.

चांगलें मूल निपजण्यास त्यास चांगला कित्ता लावून देणें अवश्य आहे. मुलांचा पहिला कित्ता त्यांची आई हा होय. सबब हा कित्ता घालून देणारी आई जितकी सद्गुणसंपन्न असेल तितकें सद्गुणयुक्त वळण ती आपल्या मुलांना सहज लावून देईल. **एक आई आपल्या मुलांना**

**प्रेमळ शब्दांनीं जितकें शिकवूं शकते, तितकें भाड्याचे शंभर शिक्षक नव्हे तर प्रत्यक्ष त्यांचा बापसुद्धां शिकवूं शकत नाहीं.** शिवाय मूल आईचें जितकें अनुकरण करितें; तितकें दुसरें कोणाचेंच करीत नाहीं. मुलांवर आईचा जसा अंमल असतो तसा दुसरा कोणाचाच असूं शकत नाहीं. रात्रंदिवस तिची मूर्ति त्यांच्या अंतःकरणांत असते; त्यामुळें तीं तिचें एकसारखें अनुकरण करीत असतात. मुलांस सहज इजा झाली तरी त्यांचे मुखांतून '**आई, आई**' हा शब्द आपोआप बाहेर पडतो, इतकें आईचें व मुलांचें ऐक्य आहे.

मुलें ज्या ज्या गोष्टी ऐकतात किंवा पाहतात त्यांचेंच तीं अनुकरण करीत सुटतात. अनुकरण हेंच त्यांचें प्रथम शिक्षण होय. आईबापांना या अनुकरणाचें विशेष महत्त्व वाटत नाहीं. परंतु मुलांवर याचा परिणाम जन्मभर राहतो. कारण लहानपणीं मुलांचा जो स्वभाव बनतो, तो पुढेंही जन्मभर तसाच कायम राहतो. तो पालटाविण्यासाठीं मोठेपणीं कितीही उपदेश करीत सुटलें तरी लहानपणचा स्वभाव पालटूं शकत नाहीं. '**जो गुण बाळा तो जन्मकाळा**' हें त्यांनीं केव्हांही विसरूं नये. गाढवाला कितीही कौतुकानें शृंगारिलें तरी तें कांहीं केल्या घोडें का होणार आहे? त्याचा तो जन्मस्वभावच असल्यामुळें त्याला इलाज नाहीं. तद्वत् मुलांचा बाळपणचा स्वभावधर्म कांहीं केलें तरी पालटूं शकत नाहीं. **पोलाद भट्टींतून काढलें म्हणजे तें लाल आहे तोंच त्यास हवा तसा आकार द्यावयाचा असला तरी देतां येतो. परंतु एकदां का तें थंड होऊन कडक झालें म्हणजे लोहाराच्या बापानेंही त्यास मनाजोगा आकार देववला जाणार नाहीं. मुलांचीही गोष्ट अशीच आहे. त्यांची बुद्धि कोमल आहे तोंच त्यांना सन्मार्गाकडे वळविणें इष्ट असून शक्यही असतें. पण एकदां कां त्यांना खोटें बोलण्याची व चोरी करण्याची वाईट संवय पूर्ण जडली म्हणजे त्यांना पुनः सन्मार्गाकडे वळविणें ब्रह्मदेवालाही दुरापास्त होतें. बागेतील**

कमानीजवळ लावलेल्या वेलींना त्या कोंवळ्या असतांनाच वळवून कमानदार करावयाचें असतें; परंतु जर तसें न करितां त्यांच्या कोंवळेपणामुळें त्यांना मोकळे मनानें वाढूं दिलें, तर त्या पुढें जून झाल्यावर त्यांना वळवून कमानीवर घालवितां येणें त्याला कधीं तरी शक्य होईल काय? तसेंच बाळपणीं मुलांचीं मनें हीं आरशाप्रमाणें अगदीं स्वच्छ असतात. त्यावेळीं त्यांत सद्गुणांचें अगर दुर्गुणांचें प्रतिबिंब जसें उठवाल तसें त्यांच्या हातून पुढील आयुष्यांत आचरण घडेल हें त्यांनीं पक्कें लक्षांत असूं द्यावें.

ह्यास्तव स्त्रीपुरुषांनीं मुलांच्या समक्ष कोणतीही वाईट गोष्ट, वर्तणूक अगर शिवीगाळ केव्हांही करूं नये. कारण अशा बाबतींत लहान मुलें स्वभावतःच बारीक नजरेचीं व विशेष चौकस असतात. ह्यासाठीं आपलें मूल जसें सद्वर्तनी निपजावें अशी आपल्या मनांत इच्छा असेल; तद्वत् आपण आपली वर्तणूक अमलांत आणून दाखविली पाहिजे. व अशींच उदाहरणें त्यांच्या डोळ्यांपुढें सतत ठेविलीं पाहिजेत. आतां मूल मोठेपणीं कसें निपजणार हें बहुतांशीं आईच्या कृतीवर अवलंबून असतें. कारण बापापासून एकादी गोष्ट शिकण्यास मूल कंटाळा करितें. परंतु तीच गोष्ट आई त्यास गोडीगुलाबीनें सहज शिकविते. बापाच्या धाकानें जें काम होणार नाहीं तेंच काम आईच्या मधुर भाषणानें सहज होतें. बाप मुलांस विद्या शिकवितो, पण सदाचरणाचें शिक्षण आईच शिकविते. शिवाय बापापेक्षां आईच्या वर्तनाचा परिणाम मुलांवर विशेषेंकरून होतो. जन्मापूर्वीं बालक गर्भवासी असतांनाही आईच्या आचारविचाराचाच परिणाम गर्भावर कसा होत असतो हें खालील उदाहरणावरून वाचकांना सहज कळून येईल.

प्रल्हाद या नांवाचा एक मुलगा होता. तो बाळपणीं शाळेंत शिकत असतांना, त्यानें एकदां आपल्या शाळेंतील बरोबरीच्या मुलांना फारच

उत्तम उपदेश केला. तेव्हां सर्व मुलें आश्चर्यचकित होऊन त्यांनीं प्रल्हादास प्रश्न केला कीं, तुझ्या अंगीं असा उत्तम उपदेश करण्याची अद्भुत शक्ति कशी प्राप्त झाली? तेव्हां प्रल्हादानें उत्तर केलें कीं, माझ्या अंगीं उत्तमोत्तम गुण जडण्यास माझ्या परमपूज्य मातेची कृपा होय. प्रल्हादाच्या जन्मापासूनच त्याची आई त्यास उत्तम शिक्षण देत होती. एवढेंच नव्हे तर प्रल्हाद गर्भवासांत असतांना त्याची आई ऋषींच्या आश्रमांत जाऊन, तेथें सत्कथा श्रवण करीत असे. त्यांचाच सुपरिणाम प्रल्हादाचे मनावर विशेष झाला.

ह्यास्तव स्त्रीनें गर्भवती असतांना निदान भावी संततीच्या कल्याणासाठीं तरी फारच सावधगिरीनें वागलें पाहिजे. मनांत कोणत्याही प्रकारचे दुष्ट विकार शिरूं न देतां, त्यांचेपासून सदा अलिप्त राहिलें पाहिजे. हे विकार म्हटले म्हणजे क्रोध, अभिमान, ईर्ष्या, द्वेष, निंदा, भय, लज्जा, शंका, लोभ, मोह, हट्ट, पक्षपात, स्वार्थ, चिंता, आळस, असत्य, मत्सर, चोरी, छळ, असावधानता, नाजुकपणा, खुशामत, आतुरता हे होत. विशेषेंकरून भय, शंका व लज्जा उत्पन्न करणारे विचार व कर्में यांपासून नेहमीं दूर राहिलें पाहिजे. कारण ह्यापासून गर्भावर भीतीचा विशेष परिणाम होऊन, त्याचें रूप बिघडण्याचा विशेष संभव असतो.

मुलांना बाळपणीं सुमारें वीस वर्षांच्या वयांपावेतों जे दुर्गुण जडतात ते त्याच्या सर्व जन्माचें अगदीं मातेरें करून सोडतात. कारण ते दुर्गुण पुढें गुरु कितीही उत्तम लाभला असला तरी बहुतांशीं नाहीसें होत नाहींत. आईबाप दुराचारी, व्यसनी, आळशी, तंटेखोर, हेकेखोर असे असले म्हणजे मुलें सद्गुणी कोठून निपजणार? अशा आईबापांच्या पोटीं जन्म घेणें, हें एक मुलांचें मोठें दुर्भाग्यच समजलें पाहिजे.

एकंदरींत नीति व पावित्र्य यांचे ठसे बाळपणापासून मुलांचे पवित्र अंतःकरणांत बिंबविणें हें तत्काळ कोणाचेंही लक्षांत आल्यावांचून राहणार

नाहीं. ह्यास्तव प्रत्येक आईबापानें आपलीं मुलें लहान असतांनाच त्यांच्या मनाचा कल, सद्धर्माचरण, सद्वर्तन व विद्याभ्यास इ. सद्‌गुणांकडे वळविण्याचा सतत प्रयत्न करावा. व ह्यासाठीं त्यांना सुशील व पवित्र अशा थोर थोर स्त्रीपुरुषांचीं चरित्रें सतत वाचावयास देत जावीं. कारण **वाचनापासून जे अनेक फायदे होतात ते इतरत्र कशानेंही होत नाहींत.** त्यांपैकीं मुख्य मुख्य फायदे खालीं दिले आहेत. वाचनापासून मनरंजन होऊन बुद्धि सतेज होते. सत्पुरुषांचा अनुभव मिळून त्याचा आपणास फायदा होतो. मन आळशी न राहतां उद्योगांत गुंतलेलें राहतें. विचारशक्ति जागृत होऊन, ज्या गोष्टींचें आपणांस ज्ञान नसतें, तें आपोआप प्राप्त होत जातें. दुष्ट लोकांविषयीं मनांत तिरस्कार उत्पन्न होतो. सत्समागमाचा लाभ होऊन आपलें वर्तन सुधारतें. आपले अंगचे नैसर्गिक दुर्गुण नाहींसे होतात. अंगीं विनय व नम्रता येते. असत्याचा द्वेष व सत्याविषयीं प्रीति उत्पन्न होते. विवेक उत्पन्न होऊन आपणांस आपली खरी योग्यता कळते. भूतदया अंगीं येते. इहलोकीं सुख मिळून परलोकीं सद्गति मिळते. इत्यादि अनेक फायदे वाचनापासून होतात. मात्र मुलांच्या हातीं शृंगारिक नाटकें व टाकाऊ कादंबऱ्या केव्हांही देऊं नये. शक्य तो पावेतों ऐतिहासिक पुस्तकें व सत्पुरुषांचीं आत्मचरित्रें वाचावयास देत जावीं. कारण कोट्यावधि मनुष्यें जन्मतात व प्रसंगानुसार मृत्यु पावतात. त्या सर्वांचीं चरित्रें लिहिण्यासारखीं असतात असें मुळींच नाहीं. तर आपल्या अंगच्या विशेष विद्वत्तेनें किंवा सद्‌गुणांनीं जगांतील इतर साधारण मनुष्यापेक्षां अलौकिक कृत्यें करून आपलीं चरित्रें संस्मरणीय आहेत, असें जे जगाच्या प्रत्ययास आणून दाखवितात अशांचींच चरित्रें लिहिलीं जातात. अशा सत्पुरुषांचीं चरित्रें मुलांना वाचावयास दिलीं असतां, त्यांतील चरित्रनायकांवरील प्रसंग, त्यांनीं भोगलेल्या हालअपेष्टा, त्यांचें मनोधैर्य, त्यांची धर्मश्रद्धा, त्यांचा दृढनिश्चय, त्यांची विद्वत्ता, त्यांची इतर जनांविषयीं कळकळ वगैरे अनेक गुण वाचण्यांत येतील व त्यायोगें त्यांच्या मनावर फारच चांगला ठसा

उमटेल. तेणेंकरून आपणही तसें व्हावें व आपलें जीवनचरित्र संस्मरणीय करून सोडावें असें त्यांना वाटेल. चरित्रनायक हा प्रथम आपल्या सारखाच असून, पुढें तो आपल्या अंगच्या अद्वितीय गुणांनीं जसा उदयास आला तसेंच आपणही प्रयत्न केला असतां, खात्रीनें उदयास येऊं, अशी क्षणभर त्याच्या मनाला खात्री वाटेल. सबब ' चरित्रें ' वाचणें, हें अत्यंत श्रेयस्कर असल्यामुळें, तीं लहानथोरांनीं, स्त्रियांनीं व पुरुषांनीं मिळून सर्वांनीं अवश्य वाचीत जावीं. कारण तीं आपणांस उत्तमोत्तम अशा सत्पुरुषांची ओळख करून देतात. व हे महात्मे स्वप्रयत्नानें श्रेष्ठपद पावले आहेत, त्यांच्या अगदीं जवळ आणून सोडतात. आतां ज्यांना दुर्दैवेंकरून विद्येचा गंध नाहीं अशा लोकांकडून काळाचा अपव्यय झाल्यास त्यांत त्यांचा फारसा दोष नाहीं. परंतु जे आपणांस सुशिक्षित म्हणवितात, वेळेची किंमत ज्यांना पूर्ण माहीत आहे अशा लोकांनीं वेळेचा दुरुपयोग करणें त्यांना अगदीं लाजीरवाणें होय.

हल्लीं बहुतेक खेडोपाडीं देखील आपल्या दयाळु इंग्रज सरकारनें प्राथमिक शिक्षणाच्या शाळा स्थापन केल्या आहेत. त्यामुळें बहुतेक आईबाप आपलीं मुलें पांच सहा वर्षांचीं होतांच त्यांना शाळेंत घालतात. तीं शाळेंत जाऊन थोडें फार वाचूं व लिहूं लागलीं म्हणजे तीं मार्गाला लागलीं असें कित्येक आईबापांना वाटतें. परंतु तीं बरोबर अभ्यास करितात किंवा नाहीं, त्यांचें लक्ष अभ्यासाकडे आहे किंवा खेळण्याकडे आहे, ह्याकडे कोणीही फारसें लक्ष देत नाहीं. ह्यामुळें बहुतेक मुलें निष्काळजीपणानें वागूं लागतात. व तेणेंकरून तीं आळशी बनून अभ्यासाकडे दुर्लक्ष करितात. हल्लीं शाळांतून जितकीं मुलें शिकून तयार होतात, त्यांपैकीं किती मुलांचीं अक्षरें सुरेख, सुवाच्य व वळणदार असतात ? अक्षर वळणदार व सुवाच्य असणें हल्लीं किती अत्यावश्यक आहे हें निराळें सांगावयास नकोच. आपली जन्मभाषा आरंभापासून शेवटच्या इयत्तेपर्यंत जाऊनही किती मुलांना शुद्ध व सरळ

लिहितां बोलतां येते? साधें पत्र लिहावयास सांगितलें असतां, तें शुद्ध, पद्धतशीर व स्वच्छ लिहिणारीं मुलें किती निघतील? एकादी पावती लिहिण्यास अगर एकाद्या रकमेचें कांहीं मुदतीचें व्याज आकारण्यास सांगितलें असतां, तें किती मुलें पटकन् व बरोबर आकारून देतील? प्राचीनकाळीं जे जे पुराणप्रसिद्ध व इतिहासप्रसिद्ध थोर थोर स्त्रीपुरुष होऊन गेले, त्यांचीं बोधपर चरित्रें वाचून किंवा ऐकून तरी किती मुलांना ठाऊक असतील? शिवाय आजकाल व्यवहारज्ञानाचें महत्त्व अतिशय वाढल्यामुळें मुलें कॉलेजांत जाऊन कितीही शिकलीं व त्यांना व्यवहारज्ञान अवगत नसलें तर त्या शिक्षणाचा त्यांना व्यवहारांत व्हावा तसा उपयोग मुळींच होत नाहीं. कारण **नुसता हिरा नेत्रास आनंददायक होत नाहीं, त्याला त्याचेपेक्षांही कमी किंमतीच्या सोन्याच्या दागिन्यांत बसविला तर तो विशेष खुलून उठतो, व त्याची किंमतही जशी वाढते; तद्वत् सुशिक्षित मुलांमुलींस जर व्यवहारज्ञानाची जोड मिळाली तर तीं जास्त योग्यतेस चढतात**. मात्र व्यवहारज्ञान हें शाळांतून किंवा कॉलेजांतून मुलांनीं कितीही शिक्षण संपादन केलें तरी त्यांना तें मिळवितां येत नाहीं. तर तें प्रत्येकास व्यवहारांत शिरून व ठिकठिकाणीं प्रवास करून अनुभवानेंच मिळवितां येतें. **मनुष्यास जगाचा जितका अधिक अनुभव असेल तितका तो अधिक शहाणा समजावा**. कारण या जगांत प्रत्येकास नित्य निरनिराळ्या मनुष्यांशीं व्यवहार करावा लागतो. परंतु तो करीत असतांना कोणता मनुष्य कसा आहे हें ठरविण्यास अति अनुभव असावा लागतो. व तो अधिक व्यवहार व अधिक प्रवास केल्यानें प्राप्त होतो. कारण एके ठिकाणीं बसून जितकें स्वभाववैचित्र्य दिसतें त्याहून अधिक तें ठिकठिकाणीं फिरल्यानें व व्यवहार केल्यानें दृष्टोत्पत्तिस येतें. एवढेंच नाहीं तर व्यवहार व प्रवास हें मनुष्यस्वभावाची ओळख पटविणारें एक सूक्ष्मदर्शक यंत्रच होय. नुसत्या डोळ्यांनीं अस्पष्ट दिसणारी किंवा मुळींच न दिसणारी वस्तु सूक्ष्मदर्शक

यंत्रांतून पाहिली असतां, ती स्पष्ट दिसते; तद्वत् घरीं बसून प्राप्त झालेलें मनुष्यस्वभावाचें सूक्ष्मज्ञान व्यवहारानें व प्रवासानें विस्तृत होतें. म्हणून आपणांत अति व्यवहारज्ञ मनुष्यास **'बारा बंदरचें पाणी प्यालेला मनुष्य'** असें म्हणण्याचा परिपाठ आहे. ह्यावरून व्यवहारज्ञानाचें महत्त्व किती थोर आहे हें सहज कळून येईल.

सारांश, प्रत्येक आईबापानें आपल्या मुलास शक्य तों पावेतों संपूर्ण प्राथमिक शिक्षण द्यावें. नंतर जशी आपली शक्ति असेल तसें त्यास उच्च शिक्षण देण्याची व्यवस्था करावी. मात्र मुलांचें शिक्षण चालू असतांना, ज्याप्रमाणें आपण त्यांच्या खाण्यापिण्याविषयीं सर्वतोपरी काळजी वाहतों; त्याचप्रमाणें शाळेंत जात असलेल्या मुलांचें शिक्षण बरोबर चाललें आहे किंवा नाहीं ह्याकडे सतत लक्ष पुरवीत जावें. मधून मधून व्यवहारज्ञानाचें व धार्मिक बाबतींचें शिक्षण जरूर देत असावें.

दुसरें असें कीं, शिक्षणकला जशी आज बहुतेक आईबापांना प्रिय होऊन बसली आहे; तशीच **धंदेशिक्षणकला** जर त्यांना प्रिय होईल तर याहीपेक्षां फार उत्तम होईल. परंतु आजकाल जो तो आईबाप आपल्या मुलास तात्पुरतें शिक्षण देऊन, उच्चशिक्षण देण्याच्या भरीस पडतो. त्यामुळें उच्चशिक्षणकलेंत प्रवीण झालेल्या मुलांना नोकरी मिळायची मोठीच मारामार पडूं लागली आहे. आणि इतकें शिक्षण मिळवून व पाण्यासारखा पैसा ओतून देखील **'कसें करूं काय करूं'** या अष्टाक्षरी मंत्राचा अहोरात्र जप करितां करितां नाकीं नव येऊं लागलीं आहेत. तरी देखील त्यांचें धंदेशिक्षणाकडे अद्याप जावें तसें लक्ष जात नाहीं. ह्यास मुख्य कारण हेंच कीं, आजकाल उच्चशिक्षणापुढें धंदेशिक्षण ही कला एकप्रकारें हलक्या दर्जाची आहे, असाच बहुतेकांच्या मनाचा समज होऊन बसला आहे. परंतु वास्तविक विचार करून पाहिलें असतां, उच्चशिक्षणापेक्षां धंदेशिक्षण हें केव्हांही श्रेष्ठ आहे. कारण उच्चशिक्षणानें अखेर नोकरी

करायची पाळी येऊन, मनुष्य परवश बनतो. परंतु धंदेशिक्षणानें स्वतःचे पायांवर स्वतंत्रपणें धंदा उभारतां येऊन, मनुष्यास स्वतंत्र राहतां येतें व शिवाय उत्पन्नही पुरेसें होतें. शिवाय या धंदेशिक्षणांत शिरलेल्या लोकांचे जसे आर्जव करावे लागतात; तसें या शिक्षणकलेंत शिरलेल्या लोकांचे मुळींच करावे लागत नाहींत. एकाद्या ऑफिसांत एकादा कारकून हवा असल्यास, वर्तमानपत्रांतून एकादी जाहिरात फडकाविली म्हणजे त्या ऑफिसांत सर्टिफिकेटासह शेकडों उमेदवारांचे अर्ज येऊन थडकतात. मग त्यांतून जो उमेदवार उत्तम ठरेल, त्यासच ती जागा देण्यांत येते. परंतु या धंदेशिक्षणांत शिरलेल्या लोकांची गरज लागल्यास ते केव्हांही मिळूं शकत नाहींत, हें कोणीही प्रांजलपणें कबूल करील. बरें! उत्पन्नाच्या दृष्टीनें पाहूं गेल्यास, सुतार, लोहार, गवंडी, पेन्टर इत्यादि लोकांना त्यांच्या कामाच्या लायकी प्रमाणें निदान एक रुपयापासून चार पांच रुपये दररोज सहज मिळूं शकतात, तसें बऱ्याचशा कारकुनांना देखील मिळूं शकत नाहींत. मग शिक्षणकलेपेक्षां धंदेशिक्षणकला हलक्या दर्जाची कां मानावी? धंदेशिक्षणकलेंत माझ्यामतें एकच दोष दिसून येतो. तो हा कीं, तींत मनुष्यास एकाद्या कारकुनाप्रमाणें फॅन्सी पोषाख करून ऐट मिरवितां येत नाहीं व एवढ्याचसाठीं जे या कलेचें महत्त्व कमी समजत असतील त्यांना काय म्हणावें हेंच मला कळत: नाहीं. भपके बाज पोषाक केल्यानें मनुष्यास मोठेपणा मिळतो असें मुळींच नाहीं परंतु कोणताही गुण अंगीं पूर्ण असला तर त्यायोगें मनुष्यास खरा मोठेपणा आहे हें कोणीही विसरूं नये.

इंग्रजी शिक्षण ज्यांना द्यावयाचें असेल त्यांनीं तें जरूर द्यावें. हें शिक्षण मुलांना देऊंच नये असें मात्र कोणी समजूं नये. मात्र हें शिक्षण देणें झाल्यास पूर्ण द्यावें. अर्धवट शिक्षण देऊन त्यास शाळेंतून उठवून घेणें हें मात्र फारच वाईट. कारण मुलाचीं तितकीं वर्षें फुकट घालविल्यासारखीं होऊन, पैशापरी पैसा खर्च होतो व अखेर त्यास तोंडघशीं पडण्याचा

प्रसंग येतो. परंतु तितकींच वर्षें जर एकाद्या धंदेशिक्षणांत घालविलीं, तर त्यास स्वतंत्र राहूनही पुष्कळ पैसा सहज मिळवितां येईल. सबब प्रत्येक आईबापानें आपल्या मुलास परावलंबी न बनवितां, स्वतःचे पायांवर उभें राहतां येईल, अशाच तऱ्हेचें शिक्षण देणें हें त्यांचें पहिलें आद्यकर्तव्य होय.

आईबापाचें दुसरें कर्तव्य म्हटलें म्हणजे मुलांचा शरीरसंबंध जोडून व विवाह करून देऊन, त्यांना संसारास लावून देणें हें होय. हा शरीरसंबंध जोडण्यापूर्वीं पूर्वींचे लोक वधूवरांचें वय, रूप, गुण व स्वभाव परस्परांस अनुकूल आहेत किंवा नाहींत, त्यांच्यांत परस्परांबद्दल आत्यंतिक प्रेमैक्य उत्पन्न होईल किंवा नाहीं इत्यादि स्वभाववैचित्र्यादि गुण पाहण्यासाठीं, प्रथम वधूवरांची पत्रिका पाहून, तींत जर वधूवरांचे छत्तीस गुण जमलेले दिसून आले, तरच त्यांचा शरीरसंबंध जुळवून लग्न करीत असत. परंतु हल्लीं बहुतेक जातींतील लोक शास्त्राधारें शरीरसंबंध न जुळवितां, केवळ तुटपुंजा ज्ञानावर कशीतरी लटपटपंची करून शरीरसंबंध जुळवीत असतात. परंतु त्यामुळें पुढें लग्न झाल्यावर पतिपत्नीच्या छत्तीस गुणांऐवजीं छत्तीसचा आंकडा मात्र दृष्टीस पडतो. असें होऊं नये म्हणून सुख, समृद्धि, शांति, कल्याण व सुसंततीची मनापासून इच्छा करणाऱ्या आईबापांनीं प्रथम कुळ, नंतर विद्या, नंतर वय, नंतर स्वभाव, रूप, धन, राहण्याचें स्थळ इ. गोष्टींचा बारीक रीतीनें तपास करून, सुयोग्य अशाच वधूवरांचीं शरीरसंबंध घडवून आणावा. **घोड्यासारखें सामान्य जनावर देखील खरेदी करितांना जर आपण त्यांचीं उत्तम लक्षणें पाहून खरेदी करीत असतों; किंवा एक पैशाची मातीची हंडी घेतांना, तीस नीट तपासून व वाजवून घेत असतों, तर मग वधूवरांचे शरीरसंबंध जुळविण्याचे बाबतींत हलगर्जीपणा करून कसें चालेल?** सबब हा शरीरसंबंध जोडतांना विशेषतः खालील गोष्टी लक्षांत घेऊन, नंतर शरीरसंबंध जोडावा. वधूवरांचे वयांत कमींत कमी आठ वर्षांचें अंतर ठेवावें व त्यांचीं परस्पर कुळें शक्य तितक्या दूर संबंधाचीं असतील तितकीं

उत्तम जाणावीं. पितृगोत्रांतील किंवा मातापित्यांच्या सहा पिढ्यापर्यंत परस्पर संबंध नसावा. शिवाय वधूवरें शक्य तितक्या लांब अंतरावरचीं असतील तितकीं विशेष चांगलीं जाणावीं. एकाच रक्ताच्या जोडप्यापासून झालेली संतति मानासिक व शारीरिक शक्तीनेंही दुर्बळ निपजते. ह्यास्तव अगदीं परक्या घराण्याशीं शरीरसंबंध जोडावा. समान गुणकर्मांच्या योजनेंत खालील दहा कुळें धनधान्यादिकांनीं समृद्ध असलीं तरी तीं वर्ज्य करावीं. ( १ ) हीनाक्रिया म्हणजे ज्या कुळांत उत्तम पुरुष नसतात. ( २ ) निष्पुरुष म्हणजे ज्या कुळांत पुरुषार्थी पुरुष नसतात. ( ३ ) ज्या कुळांत वेदविद्या नसते. ( ४ ) ज्या कुळांत सर्वांच्या शरीरावर मोठमोठे केंस असतात. ( ५ ) ज्या कुळांत मुळव्याधि रोग असतो. ( ६ ) ज्या कुळांत क्षय किंवा दमा रोग असतो. ( ७ ) ज्या कुळांत आमवाताचे आमांशादि रोग असतात. ( ८ ) ज्या कुळांत अपस्मार रोग असतो. ( ९ ) ज्या कुळांत श्वेतकुष्ठ ( पांढरें कोड ) असतें. ( १० ) ज्या कुळांत गलितकुष्ट (रक्तपिती ) असते. असे एकंदर दहा दोष मानलेले आहेत. ह्यांपैकीं कोणताही दोष ज्या कुळांत आढळून येईल, त्या कुळांत शरीरसंबंध केव्हांही करूं नये. अर्थात् ज्यांचीं मातापितरें अशा एकाद्या रोगानें पीडित असतील, त्यांचा त्याग करून इतर उत्तम कुळांशीं शरीरसंबंध जुळवावा.

प्राचीनकाळीं योग्य वयांत स्वयंवरें अथवा लग्नें करावयाची चाल होती. व ती फार उत्तम होती. कारण त्यायोगें योग्य वयांत त्यांचीं लग्नें होऊन स्त्रीसंगही योग्यकाळींच घडत असे. तेणेंकरून त्यांची संतति निरोगी व सुदृढ अशीच निपजत असे. परंतु हल्लीं योग्य वयांत लग्नें करावयाची चाल बहुतेक नष्ट होऊन, बालवयांतच लग्नें होऊं लागलीं आहेत. त्यामुळें वधूवरांच्या वयोमानांत अंतर फारच कमी घेऊं लागलें आहे. शिवाय मुलापेक्षां मुलींची वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें, मुलांचें बीज पक्व होण्यापूर्वींच त्यांचेकडून स्त्रीसंग घडतो. तेणेंकरून दोहोंच्या शरीरप्रकृतींत अनेक

प्रकारचे रोग उद्भवून, त्यायोगें अंगांत एकप्रकारची अशक्तता येऊं लागते. अशा अशक्ततेंत निर्माण होणारी संतति पण तशीच रोगसंपन्न व निर्बळ निपजते. **लहानपणीं मुलांमुलींचे विवाह करण्याची हौस विशेषतः पुरुषांपेक्षां स्त्रियांनाच अधिक असते. म्हणून स्त्रियांनीच ही बालविवाहाची पद्धत नाहींशीं करून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे.**

शिवाय बाळपणीं मृत्युसंख्या विशेष होत असल्यामुळें, बालविवाह करणें केव्हांही इष्ट नाहीं. कारण लग्न केल्यानंतर कांहीं दिवसांनीं, महिन्यांनीं, अगर वर्षांनीं वधूवरांपैकीं कोणीही मृत्यु पावल्यास, मुलापरी मूल जातें व दोहोंपक्षांकडील लग्नाप्रीत्यर्थ झालेला खर्च बिनाकारण दोहोंच्या मस्तकीं पडतो. रात्रंदिवस काबाडकष्ट करून पैसा मिळवावा व त्याचा बिनियोग अशा तऱ्हेनें करून कर्जबाजारी होऊन बसणें हें फारच वाईट. पैसा मिळविण्यास किती श्रम पडतात किंवा एकादा रुपया हरवला असतां, मनुष्याच्या मनास किती हुरहुर वाटते याचा अनुभव प्रत्येकास आहेच. मग अकस्मात् एवढा दुहेरी घाला पडलेला पाहून कोणास बरें वाईट वाटणार नाहीं! परंतु हा दैवयोग समजला जात असल्यामुळें, त्याबद्दल कोणासही फारसें वाईट वाटत नाहीं. स्वतः जाणून बुजून चूक करून, तिचा दैवाकडे दोष देणें, हें ज्ञानी मनुष्याला उचित दिसतें काय? हीं सर्व कारणें ताबडतोब घडून न येतां पर्यायानें घडून येत असतात, म्हणून तीं फारच थोड्या लोकांच्या लक्षांत येतात. हीं सर्व कारणें लक्षांत घेऊन **बडोदें सरकार** यांनीं आपल्या राज्यांत वधूवरांच्या वयांत कमींतकमी ८ वर्षे अंतर ठेवून शरीरसंबंध जुळवावा असा सक्त कायदा करून ठेविला आहे. तसेंच मुलीचा लग्नविधि १२ वर्षांचे वर व १६ वर्षांचे आंत करावा. व मुलाचा लग्नविधि २० वर्षांचे वर व २५ वर्षांचे आंत करावा, असे कडक नियम घालून ते कायद्याच्या रूपानें अंमलांत आणले आहेत. हे कायदे मोडून जे गुन्ह्यास पात्र होतील, त्यांना राज्यांतून हाकून लावून, पुढें तीन

वर्षेंपावेतों त्यांनीं राज्यांत केव्हांही पाऊल टाकूं नये, अशा प्रकारची कडक शिक्षा ठेविली आहे. अशाच प्रकारचे कायदे **कोल्हापूर, म्हैसूर व भरतपूर** या संस्थानचे महाराजांनींसुद्धां अमलांत आणले आहेत. खरोखर केवढें हें मंगलकार्य वरील संस्थानिकांनीं केलें आहे बरें? अशाच प्रकारचे कायदे हिंदुस्थानांत जर सर्वत्र अमलांत येतील तर खरोखरच हिंदुस्थानांतील दारिद्र्य कांहींअंशीं तरी नाहींसें होईल; शिवाय भावी प्रजा सशक्त व तेजस्वी निपजेल, तेणेंकरून हिंदुस्थान हां हां म्हणतां उन्नतीच्या अत्युच्च शिखरावर जाऊन आरूढ होईल यांत तिळमात्र शंका नाहीं. सबब पुढारी म्हणविणाऱ्या सर्व देशभक्तांनीं मिळून बालविवाहप्रतिबंधक कायदा अमलांत आणण्याचा झटून प्रयत्न करावा. व एवढें कार्य त्यांनीं तडीस नेल्यास त्यांना खरें देशहित साधल्याचें श्रेय मिळेल व तेणेंकरून ते लोकप्रिय व जगमान्य झाल्यावांचून केव्हांही राहणार नाहींत.

---


## इकडे लक्ष द्या.

हिंदुधर्माभिमानी बांधवांनो, आपल्या अज्ञ समाजाची जुलमी धर्मपाशांतून सुटका करावयाची असल्यास व त्यांच्या हृदयांत वसत असलेली अयोग्य अशी अंधश्रद्धा नाहींशी करावयाची असल्यास आजच खालील पुस्तकें मागवून धर्मोन्नति करा.

| | |
|---|---|
| वारकरी सत्यशोधक संवाद | किं. ४ आणे. |
| सत्यसुबोध अभंग | किं. ३ आणे. |
| शिमग्याचा हट्ट सोडा | किं. ३। आणे. |
| विषययुक्त पुराण | किं. अर्धा आणा. |

**श्रीजोतीराव प्रासादिक ग्रंथमाला**
पो. हिंगोणा, व्हा. फैजपूर, पूर्व खानदेश.

# प्रकरण २४ वें.

## स्त्रियांनीं बलात्कारप्रसंगीं आपलें शील कसें रक्षावें ?

प्रिय भगिनींनो! आजकाल धर्मनीति हीं अस्तास चाललीं आहेत. त्यामुळें एकादा कामांध नरपशु एकाद्या सती स्त्रीवर कोणते वेळीं कशी झडप घालून, तिचें पातिव्रत्य भ्रष्ट करील याचा मुळींच नेम राहिला नाहीं. अशा प्रसंगीं कुलीन स्त्रियांनीं आपल्या पातिव्रत्यरक्षणार्थ कशा रीतीनें वागावें? प्रसंगानुसार योग्य प्रसंगावधान राखून, समयसूचकतेनें त्या नरराक्षसाच्या पंजांतून आपली सुटका कशी करून घ्यावी? आणि अशा आणीबाणीच्या प्रसंगीं खऱ्या सती स्त्रीरत्नांना आपल्या तेजानें, अकलेनें व समयसूचकतेनें भगवान् कसें सामर्थ्य देतात? ह्याविषयीं कलियुगांत प्रत्यक्ष घडलेल्या कांहीं बोधपर गोष्टी खालीं दिल्या आहेत. त्या माझ्या सुशील भगिनींनीं वारंवार वाचून त्यांतील मुख्य वर्म चांगलें लक्षांत ठेवावें व पुनः अशाच प्रकारचीं सती चरित्रें जीं जीं तुमच्या वाचण्यांत येतील किंवा कानीं पडतील तीं तीं तुम्हीं पूर्ण लक्षांत ठेवावीं. कारण वेळप्रसंगीं त्यांचा तुम्हांस अत्यंत उपयोग होईल.

### गोष्ट १ ली *

### प्रसंगावधान.

एक तरुण स्त्री एका खिंडींतून एकटीच जात असलेली एका हत्यारबंद शिपायानें पाहिली. तत्काळ तो चांडाळ तेथेंच तिजवर बलात्कार करावयास सिद्ध झाला. कोणी त्राता तर नाहीं व प्रसंग तर अति कठिण, असें पाहून

*पहिल्या तीन गोष्टी 'मनोवांच्छित संतति' या पुस्तकांतून घेतल्या आहेत.

तिनें लागलीच त्यास अनुकूलता दर्शविली. आणि त्याला विश्वास यावा म्हणून स्वतः चोळीचाही त्याग करून, त्याला तेथें जागा साफ करावयास सांगितलें. त्या तरुणीच्या त्या उन्नत पयोधराकडे दृष्टि जातांच तो शिपाई उल्लू बनला. व आपल्या हातांतील तरवार बाजूला ठेवून, दोन्हीं हातांनीं ती जागा तो साफ करूं लागला. इतक्यांत त्या बहाद्दर स्त्रीनें झटकन त्याची तीच तरवार उचलून, एका घावांत त्याची गर्दन घडापासून वेगळी केली, आणि त्याच्या पापाचें योग्य प्रायःश्चित्त त्याला देऊन आपलें पातिव्रत्य रक्षण केलें.

---

## गोष्ट २ री.

## विलक्षण मनोधैर्य.

एक सद्गुणी स्त्री आपल्या एका दीड वर्षाच्या मुलासह पतीच्या चुकामुकीमुळें, बंगाल-नागपूर रेल्वेच्या एका खेडवळ स्टेशनावर रात्रीची उतरून पडली. स्टेशन-मास्तरनें तिला निद्रेकरितां एक स्वतंत्र खोली दिली. तरुणीच्या सौंदर्याला मोहित होऊन, एक दीड तासांत जाणारी येणारी गाडी नाहीं असें पाहून स्टेशनमास्तर रात्रौ बाराचे सुमारास त्या तरुणीच्या खोलीमध्यें शिरला. मास्तर आपल्या खोलींत आलेला पाहून ती तरुणी चपापली. तत्काळ उठून ती उभी राहिली. मास्तरानें आपला नीच हेतु प्रगट केला. तरुणीनें कठिण प्रसंग पाहून, न डगमगतां ' बरें ' म्हणून उत्तर दिलें. पण अगोदर मी बाहेरून जाऊन येतें, बाळ येथेंच आहे, आपण बाळाला सांभाळा. असें म्हणून ती जाऊं लागली. मुलामुळें खात्री पावलेला मास्तर मुलाजवळ जाऊन बसला. तरुणी खोलबाहेर पडतांच, तिनें खाडकन् दाराला बाहेरून कडी घातली. दार बंद झालेलें पाहून मास्तर घाबरला. त्या स्त्रीनें दार उघडण्याचें साफ नाकारलें. शेवटीं त्या निर्दय

मास्तरानें खरोखरच त्या अर्भकाचीं बोटें कापून खिडकींतून तिच्यापुढें टाकलीं. तरी ती जेव्हां दार उघडीना, तेव्हां त्यानें अर्भकाचा हात कापून बाहेर फेंकला. तेव्हां तिनें तो रक्तभरित हात उचलून, मोठ्या प्रेमानें त्याचें चुंबन घेऊन तो पोटाशीं लाविला. आणि गद्गद् होऊन ती म्हणाली, 'बाळा तूं धन्य आहेस! आज तूंच माझ्या पातिव्रत्याचें रक्षण केलेंस. तूं आज खचित वैकुंठाचा अधिकारी झाला आहेस. देवा! असा सुपुत्र तूं आम्हांला दिलास, पण तो काळाचे पुढें (हंबरडा फोडून ती रडूं लागली) पण देवा, तुझी कृपा असल्यावर व माझा पतिदेव सुखी असल्यावर हा बाळ पुनः माझे उदरीं खचित जन्मास येईल. पतिदेव सुखी असो!' इतक्या अवधींत तेथें एक मालगाडी येऊन ठेपलीच. ताबडतोब तिनें सर्व वृत्तांत गार्डला कळविला. गार्डनें तो हृदयद्रावक देखावा पाहून तिच्या पातिव्रत्याची फारच प्रशंसा केली. तिला त्यानें मोठ्या आदरानें वंदन करून, स्टेशनमास्तरास तत्काळ बंदिवान केलें. आणि त्याला बुटांचा व वेतांचा बेदम मार दिला. पुढें त्या नीच मास्तराला परस्त्री-अभिलाषाच्या घोर पापाबद्दल व बाळहत्येबद्दल जन्मठेप कांळेपाण्याची कडक शिक्षा ठोठावण्यांत आली.

---

## गोष्ट ३ री.

# विलक्षण धारिष्ट्य.

पूर्वीं रजपूत स्त्रिया आत्मसंरक्षणार्थ स्वतःजवळ नेहमीं जंबिया (खंजीर) बाळगीत असत. हल्लींही कित्येक सद्गुणी स्त्रिया स्वतःजवळ अहर्निश चाकू बाळगीत असतात. लखनौ जिल्ह्यांतील चंद्रप्रभा नांवाच्या एका रूपवती सुंदरीनें, पातिव्रत्यावर घाला घालूं पहाणाऱ्या एका कोतवालाचा तर त्याच्याच तरवारीनें खून पाडला. कोर्टांतूनसुद्धां तिला कांहींएक शिक्षा न होतां, ती पूर्ण निर्दोष अशी ठरली. एवढेंच नव्हे, तर सरकारतर्फे बहु-

मानपुरःसर तिला तिच्या शौर्याबद्दल चारशें रुपये बक्षीस देण्यांत आले. ही गोष्ट इ० स० १८९९ मध्यें घडली. त्यावेळीं ती कित्येक वर्तमानपत्रांतून देखील प्रसिद्ध झाली होती.

---

## गोष्ट ४ थी.

## राणी दुर्गावती.

दुर्गावती नांवाची एक राणी होऊन गेली. तिनें ५०० हत्ती व ७०० घोडेस्वार घेऊन अकबराचा सरदार असफखान याशीं निकराची लढाई केली. लढाईमध्यें तिचा स्वतःचा मुलगा ठार झाला, तरी तिनें माघार घेतली नाहीं. 'ठीक आहे. कुमारास तंबूंत येऊन जा. मी मात्र येथून हलावयाची नाहीं.' असें तिनें आपल्या सरदारास सांगितलें. खरोखर, अर्जुनास देखील आणीबाणीच्या प्रसंगीं व्यामोह झाला होता. परंतु स्त्रीचें हृदय असूनही तें किंचितूही डगमगलें नाहीं. पुढें लढतां लढतां शत्रूचा बाण लागून ती मूर्च्छित पडली. सावध झाल्याबर तिला आपण शत्रूच्या हातीं सांपडणार अशी खात्री वाटल्यावरून जवळच्या सरदारास तिनें आपल्या पोटांत बर्चीं मारण्यास सांगितलें. परंतु तसें करण्याचें सरदारास धैर्य होईना. तेव्हां तिनें अखेर शीलसंरक्षणास्तव आत्महत्या करून घेतली. सरदारांनीं तिच्या प्रेतास देखील शत्रूच्या हातीं लागूं दिलें नाहीं.

---

## गोष्ट ५ वी.

## अर्गळची राणी.

एका धार्मिक व्रताकरितां रात्रीच्या अंधःकारांतून अर्गळची राणी शत्रूच्या मुलखांतून गंगास्नानाकरितां मैत्रिणीसह गेली असतां, अयोध्येच्या सुभेदारास ही बातमी लागून, तिजवर हात टाकण्याकरितां मार्ग रोखून

तो टपून बसला. व परत येते वेळीं तिला घेरून, तो आपल्या सरदारांस म्हणाला, “ सरदारहो! आपली हिरावून नेलेली अब्रू परत मिळवावयाची असेल तर राणीला पकडा व कैद करून घेऊन चला. ” हे शब्द ऐकतांच राणीची बिकट प्रसंगांत पडल्यासारखी स्थिति झाली, परंतु तिनें धैर्य सोडलें नाहीं. त्यावेळीं तिच्या मुखांतून जे उज्ज्वल शब्द बाहेर पडले, ते ऐकून वाचकांच्या अंगांवर रोमांच उभे राहिल्यावांचून केव्हांही राहणार नाहींत. राणी आवेशानें म्हणाली, “ शौर्यसागर अर्गलाधिप जो माझा पति, त्याच्या पुढून पळ काढून इथं आम्हां बायकांशीं लढण्याइतका नीचपणा आचरणारे तुम्ही नामर्द व बेशरम लोक माझ्यासमोर आलां आहांत काय? धिक्कार! धिक्कार असो तुमच्या पौरुषाला आणि शिपाईबाण्याला!! ”

असें म्हणून ती तत्काळ जवळच असलेल्या एका उंच खडकावर उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसणारा निश्चय, अभिमान व आवेश पाहून शत्रूचे लोक कचरले. राणी पुनः त्वेषानें म्हणूं लागली, “ माझा महा प्रतापी पति गौतमसिंह हा रजपूत कुळांतील असून, त्याची मी पट्टराणी आहें. माझा पति अद्याप कोणासही हार गेला नाहीं व मीही जाणार नाहीं. तुमच्यासारख्या शेंदाड व मुर्दाड शिपायांनीं जरी मला वेढलं तरी मी तुमच्या हातांत सांपडणार नाहीं व पळून जाण्यासारखं नीच कृत्य मी प्राणान्तींही करणार नाहीं. माझ्या शूर व प्रिय पतीसाठीं मी मरावयास देखील तयार आहें. पण मी आधीं असें विचारतें कीं, एवढ्या सैन्यांत रजपूत माउलीचा एकही पूत नाहीं काय? असेल तर त्यानें माझ्यासारख्या रजपूत माउलीचें पातिव्रत्य व लज्जा रक्षण करण्याकरितां ताबडतोब पुढें व्हावें. नामर्दांनो! तो मग एकटा असला तरी माझ्या आशीर्वादानं तुम्हां सर्व अधमांचे कंठनाळ चराचर कापण्याइतकं सामर्थ्य त्याच्या एकट्याच्या समशेरीस खात्रीनं येईल. ” काय चमत्कार पहा! राणीच्या मुखांतून हे शब्द बाहेर पडतात न पडतात तोंच ‘ हर हर महादेव ’ असा शब्दघोष

शत्रूच्या सैन्यांतून ऐकूं आला; व लागलीच अभयचंद व निर्भयचंद या नांवाचे दोन रजपूत सरदार आपल्या थोड्याशा लोकांनिशीं नबाबाच्या सैन्यावर तुटून पडले. मग काय? दक्षकन्या जी पार्वती, तिच्या अपमानानें क्रुद्ध झालेल्या शंकराच्या जटेंतून निर्माण झालेल्या वीरभद्राप्रमाणें प्रत्येक रजपूत वीराला आवेश चढला. व मोठ्या गर्जनेनें त्यांनीं आपल्या तरवारी उपसल्या आणि शत्रूचीं शिरें चेंडुप्रमाणें उडवीत ते ज्या ठिकाणीं राणी आपल्या दासींसह उभी होती तेथें येऊन पोहोंचले. आपल्या साह्यास दोन हिंदूवीर आलेले पाहून राणीसही आवेश चढला. व त्यांच्या साह्यानें शत्रुसैन्याची फळी फोडून दासीजनांसह ती सुरक्षितपणें बाहेर पडली. या युद्धांत बिचारा निर्भयचंद शौर्यानें लढतां लढतां जबरदस्त जखम लागून मृत्यु पावला. अभयचंद सारखा लढत होता. दैवयोगें ही बातमी पसरत जाऊन गौतमसिंहास कळली. तेव्हां तो कांहीं निवडक सैन्यानिशीं त्यांच्या मदतीस धावून आला. हें नवीन आलेलें सैन्य पाहून, नबाबाच्या सैन्याची अगदीं गाळण उडून गेली. व ते आपला जीव घेऊन सैरावैरा पळत सुटले. राणीच्या पातिव्रत्याच्या जोरानें अभयता व निर्भयता या दोघींस प्रभुनें तिच्या साह्यार्थ पाठवून दिलें. व तिच्या पातिव्रत्याचें अशा तऱ्हेनें रक्षण केलें. मग तिचें कोण काय करणार? अभयचंदाचा अतुल पराक्रम पाहून राणी इतकी खुष झाली कीं, तिनें गौतमसिंहाच्या संमतीनें आपल्या प्रिय कन्येचें त्याचेबरोबर लग्न लावून दिलें.

---

## गोष्ट ६ वी.

## गनोरची राणी.

मध्यहिंदुस्थानांत भोपाळ शहरानजीक गनोर या नांवाचें एक लहानसें पण स्वतंत्र हिंदुराज्य होतें. मोंगलांनीं हिंदुस्थानांत शिरून पठाण लोकांस दिल्लींतून हांकून लाविल्यामुळें, ते साऱ्या हिंदुस्थानभर पसरले. व त्यांनीं

लहानमोठीं हिंदुराज्यें खालसा करण्याचा सपाटा चालविला. गनोरचें राज्य खालसा करण्याच्या हेतूनें एक पठाण आपल्या सैन्यानिशीं धांवून आला. पठाण लोकांनीं हल्ला करितांच गनोरचा राजा मोठ्या त्वेषानें त्यांच्याशीं लढूं लागला. त्यानें पराक्रमाची शर्थ केली. पण पठाणांचें दैव जोरावर असल्यामुळें गनोरचा राजा लढतां लढतां मृत्युवश झाला.

हें वर्तमान राणीस कळतांच तिनें आपलें सर्व दुःख गिळून व सैन्याची नवीन भरती करून पठाणांच्या सैन्याला किती दिवस तरी रोखून धरिलें. परंतु शत्रूला बरचेवर पाठबळ मिळत गेल्यामुळें, त्यांची सरशी होत गेली. तरी देखील तिनें त्या लोकांस युद्धावांचून एक पाऊलहीं पुढें टाकूं दिलें नाहीं. तिचा नर्मदातीरीं एक किल्ला होता. त्यांत ती शिरते न शिरते तोंच त्या किल्ल्यास पठाणांनीं वेढा दिला. आतां राणीला शरण गेल्यावांचून गत्यंतर नसल्यामुळें, तिनें आपल्या दूताकरवीं मुख्य पठाणास सांगून पाठविलें कीं, मी किल्ला आपल्या ताब्यांत देतें, परंतु आधीं लढाई बंद करा. राणीचा असा निरोप ऐकतांच पठाणसाहेबास परमानंद झाला. त्यानें राणीच्या अत्युत्तम सौंदर्याची कीर्ति ऐकिली असल्यामुळें, त्यास तिच्या प्राप्तीचा मोह उत्पन्न झाला. व त्या भरांत जराही विचार न करतां त्याच दूतांकरवीं त्यानें बेशरमपणानें राणीस आपली महाराणी होण्याविषयीं निरोप पाठविला. निरोप ऐकतांच राणीस त्याचा अत्यंत राग आला. परंतु स्पष्ट नकारार्थी उत्तर दिल्यास, आतांच आपला प्राणान्त होईल व त्याचें म्हणणें मान्य केल्यास, आपलें पातिव्रत्य नष्ट होऊन आपल्या नांवास कायमचा कलंक लागेल, अशा दुहेरी पेचांत पडल्यामुळें, तिला **एकीकडे आड व दुसरीकडे विहीर**, असें झालें. तरीपण तिनें स्वगत कांहींसा विचार करून, खानाचा कपटानें गळा कापून आपला सूड उगवावा असें ठरविलें. व खानास उत्तर पाठविलें कीं, 'आपला अतुल पराक्रम पाहून मलाही आपली पट्टराणी होण्याची इच्छा झाली आहे. सबब मी अल्पवेळांत माझ्या

व आपल्या वैभवास योग्य अशी तयारी करितें व लागलीच मी आपणास तसा पुनः निरोप देतें.

राणीचें प्रत्युत्तर ऐकतांच खानाच्या आनंदास पारावार उरला नाहीं. खान आपल्या भावी सुखाच्या विचारतरंगांत तरंगत असतां, राणीकडून लग्नाची पहिली भेट म्हणून जालीम विषाच्या रंगानें रंगविलेला एक रत्न-जडित पोषाख त्याचेकडे पाठवून दिला. तो पाहून खानसाहेब तर आनंद-सागरांत मग्न झाला व लागलींच त्यानें तो पोषाख चढवून, राणीच्या सौंदर्यामृताचा घोट घेण्याच्या आशेनें तिच्या आमंत्रणाची मार्गप्रतीक्षा करीत बसला.

कांहीं वेळानें राणीचें बोलावणें येतांच खान तत्काळ लग्नसमारंभाचे जागीं येऊन दाखल झाला. खान येतांच राणीनें त्याला पलंगावर बसण्याची आज्ञा केली. राणीच्या आज्ञेप्रमाणें खान पलंगावर बसला. थोडावेळ संभाषण करण्यांत लोटला नाहीं तोंच खानाच्या अंगाची तलखी होऊं लागली. त्याचा चेहरा काळा ठिक्कर पडला. जीभ जड झाली. व मृत्युवेदनेनें तो जमिनीवर गडबडा लोळूं लागला. आपला कार्यभाग सिद्धीस गेलेला पाहून राणी पलंगावरून उठली व अत्यंत कठोरवाणीनें खानास म्हणाली, "नीचा, भोग आपल्या कर्माचीं फळें. माझ्या पातिव्रत्याचें संरक्षण करण्याचा अन्य मार्ग न उरल्यामुळें, मला हा निंद्य मार्ग स्वीकारावा लागला. हें वर्तमान इतर पठाणांस समजतांच, ते कांहीं हालचाल करणार तोंच राणीनें तेथून एकदम खालीं नर्मदेंत उडी टाकली. तेव्हां ते अधिकच चवताळून जाऊन त्यांनीं इतर स्त्रियांच्या अंगावर चाल केली. पठाण लोक आतां आपली अब्रू घेणार या भीतीनें त्यांनीं आपल्या हातांतील दिवट्यांनीं त्या किल्ल्यांत मुद्दाम रचून ठेवलेल्या दारूंच्या पोतड्यांना आग लावून दिली. त्या दारूच्या स्फोटानें तो सर्व किल्ला पायासकट हदरून गेला, व त्यांत कित्येक स्त्रिया व पठाण जळून खाक झाले. अशा रीतीनें त्या तेजस्वी राणीनें व इतर दासीजनांनीं आपल्या अमोल पातिव्रत्याचें संरक्षण केलें.

———

## प्रकरण २५ वें.

# स्त्रीधर्मास उपयुक्त नियम.

१ गृहराज्यांत पुरुषांचे व स्त्रियांचे हक्क जरी समसमान आहेत, तरी बाळपणीं, तरुणपणीं व वृद्धपणीं स्त्रीनें स्वतंत्रपणें कोणतेंही काम करूं नये.

२ स्त्रीनें बाळपणीं आईबापांच्या तंत्रानें वागावें. तरुणपणीं पतीच्या तंत्रानें वागावें व वृद्धपणीं पति नसेल तर मुलाच्या तंत्रानें वागावें; परंतु पुत्रही नसेल तर आप्तेष्टांच्या तंत्रानें वागावें, पण स्वतंत्र केव्हांही वागूं नये.

३ स्त्रीनें पाकशास्त्रांत अगदीं निपुण असावें व प्रत्येक गृहकृत्यांत दक्षता बाळगावी.

४ भांडींकुंडीं, कपडालत्ता इ० सामान स्वच्छ व व्यवस्थित ठेवावें.

५ सासुसासऱ्यांच्या आज्ञेंत वागून त्यांची सेवा करावी.

६ सासु, दीर, नणंदा व जावा इत्यादिकांना उणें उत्तर देऊं नये किंवा त्यांचा मत्सर करूं नये.

७ आप्तजनांचा व वडील माणसांचा मान ठेवून, त्यांच्यांशीं मर्यादेनें वागावें.

८ नेहमीं आनंदी वृत्तींत राहून सर्वांबरोबर मधुर भाषण करावें.

९ पतिव्रता स्त्रियांची संगत धरावी परंतु नीच स्त्रियांच्या वाऱ्यासही उभें राहूं नये.

१० कुळाची मर्यादा मोडेल किंवा उभयकुळांस बट्टा लागेल असें निंद्य वर्तन केव्हांही करूं नये.

११ एकाद्याचा मत्सर करणें किंवा निंदा करणें, एकाद्याचा हेवा करणें, व एकाद्यास कटुवचन बोलून त्याचें मन दुखविणें हें महत्पाप असून अति लाजिरवाणें कृत्य होय.

१२ नेहमीं साधें पण नीटनेटकें राहावें, परंतु उंची कपडे व दाग-दागिने यांचा हव्यास केव्हांही बाळगूं नये.

१३ पंक्तिप्रपंच करूं नये. सर्वांना सारखें लेखावें आणि स्वभाव मन-मिळाऊ व गोड असावा.

१४ नोकरमाणसांनीं कामचुकारपणा करूं नये, म्हणून त्यांचेवर बारीक रीतीनें लक्ष असूं द्यावें.

१५ आपलें उत्पन्न काय व खर्च काय ह्याचा हिशेब ठेवून खर्च करीत जावा. अविचारीपणानें उधळमापें खर्च करीत सुटूं नये.

१६ कोणत्याही कामांत आळस करूं नये. व उद्योगास सोडूं नये. म्हणजे आपणास परक्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी केव्हांही येत नाहीं.

१७ कोणत्याहि गोष्टीचा अभिमान नसावा, मात्र पतिव्रताधर्मास उचित अशा गोष्टींचा जरूर अभिमान असावा.

१८ सुख भोगल्यानें सुख मिळत नाहीं तर दुःख भोगल्यानें सुख मिळतें. कारण देवपण येण्यासाठीं प्रथम टाकीचे घाव सोसावे लागतात.

१९ उगीच हंसणें, फार हंसणें, फार रागावणें, दारांत वरचेवर उभें राहणें, परगृहीं फारवेळ बसणें, अगर निजणें, कुटुंबांतील माणसांचा मत्सर करणें, कुटुंबांतील गाऱ्हाणीं माहेरीं सांगणें, परपुरुषाकडे टक लावून पाहणें, परपुरुषाशीं भाषण किंवा थट्टामस्करी करणें, खोटें बोलणें इत्यादि गोष्टींस स्त्रियांनीं अजिबात फांटा द्यावा.

**समास.**

# आश्रयदात्यांची यादी.

फैजपूर ता० यावल. पू. खा.

११ खुशाल हरी चौधरी
११ प्रेमचंद इच्छाराम अँड कं.
११ देवीदास रूपचंद शेट
११ शा० शामजी कानजी
११ शिवराम हरी चौधरी
५ गणपत दगडू चौधरी
५ दिगंबर हुना महाजन
५ तोताराम बधु महाजन
५ नरसीदास कन्हयालाल
५ परकीदास कन्हयालाल
५ तुळशीराम परशराम
५ लक्ष्मण काशीराम सराफ
३ चुडामण विठू चौधरी
२ इच्छाराम दुला चौधरी
२ नारायण महारू चौधरी
२ जयराम पुंजो पाटील
२ शंकर पुंजो पाटील
२ अनंत रामचंद्र कुळकर्णी
२ आप्पाजी परशराम नाईक
२ शा० केशवजी माणेकजी
२ डॉ० कि. द. सावखेडकर
२ शंकर गोविंद भावसार
२ चांदमल केसरीमल
२ गुलाबचंद छगनमल
२ भिमाशंकर माणक
२ शंकर जानोबा भावसागर
२ वामन माधव सराफ
२ भोजू जयराम सराफ
२ शिवराम मिठाराम भंगाळे
२ लहानु मोतीराम चौधरी
२ भानजी भगवान चौधरी
२ देवराम दशरथ चौधरी
२ श्रावण सोमा चौधरी
२ मोहन दारकू चौधरी
२ सेनू सोमा पाटील
२ रंगू कौतकि पाटील
२ चावदस गिरधर महाजन
२ लोटू दोधू महाजन
२ रुपा आनंदा महाजन
२ हिरामण नारायण महाजन
२ निंबा परशराम महाजन
२ रामचंद्र सखाराम बोरले
२ तुकाराम सोना बोरले
२ गणेश रामजी बोरले
२ माणक राघो तळेले
२ उखा शिवराम इंगळे
२ कृष्णा ओंकार भिरूड
१ नारायण सुपडू पाटील
१ ओंकार माणक शेट

१ होलु ओंकार भावसागर
१ गुलाबचंद ताराचंद भावसार
१ भिकारी सोना चौधरी
१ तुकाराम खुशाल चौधरी
१ यशवंत व्यंकू चौधरी
१ देवराम केशव चौधरी
१ दुला लहानू चौधरी
१ नारायण सदू चौधरी
१ मिठाराम मोतीराम चौधरी
१ मनसाराम हुना चौधरी
१ शंकर बापू चौधरी
१ यादव सांडू चौधरी
१ जयराम सदू चौधरी
१ दुला लहानू चौधरी
१ दिगंबर मिठाराम भंगाळे
१ तुकाराम आसाराम भंगाळे
१ तोताराम बारसू वाघुळदे
१ बुलाखी सखाराम भारंबे
१ क्रिसन सखाराम नेमाडे
१ विठ्ठल ओंकार नेमाडे
१ लोटू रामचंद्र भिरूड
१ लाहनू पांडु भिरूड
१ महारू गणू महाजन
१ विठू लहानू महाजन
१ आनंदा लहानू महाजन
१ सोनू पुंजो महाजन
१ ओंकार चिंधू महाजन
१ लालू विष्णा इंगळे
१ तुकाराम मनसाराम फिरके

१ कन्हयालाल गबाजी शिंपी
१ रुपा पांडू भारंबे
१ तानू देवचंद किरंगे
१ चिंधु लालजी नेहते
१ गोविंदा तोताराम चौधरी

**जळगांव जि० पूर्व खानदेश.**

११ डॉ० भीमराव गुरुराव चिकेरूर
११ लक्ष्मण शिवराम चौधरी, वकील
२ गोविंदराव भिरूड, वॉच रिपेरर

**सावदा ता० रावेर. पू. खा.**

२५ प्रेमचंद इच्छाराम पाटील
१५ विष्णू हरी पाटील
१५ भिका दुर्गा पाटील
१५ जगन्नाथ विठ्ठल पाटील
१५ भागवत नारायण पाटील
११ काशीराम केशव पाटील
५ रंगू तुकडू पाटील
५ धोंडू विठ्ठल पाटील
५ लक्ष्मण नारायण महाजन
२ पंढरीनाथ रामभाऊ शेट
२ रामकृष्ण दत्तात्रय चौधरी
२ नागो सखाराम चौधरी
२ भगवान जानू चौधरी
२ भादू शिवराम चौधरी
२ हेमराज माणीक दलाल
२ उखा हुना वाणी
२ हुना व्यंकू पाटील
२ वना मुरार पाटील
२ रुपा यादव पाटील

२ किसन सुपडू पाटील

२ { रामदास हेमा पाटील<br>तुकाराम हेमा पाटील

२ { तुकाराम जिवाजी बेंडाळे<br>पुरुषोत्तम जिवाजी बेंडाळे

२ मोतीराम गंगाराम बेंडाळे

२ मंगू पुना बेंडाळे

२ पुना ओंकार बेंडाळे

१। रामचंद्र यादव धांडे

१ भानजी मोहन बेंडाळे

१ हेमा दोधू बेंडाळे

१ वामन खुशाल झोपे

१ मुरलीधर दामोदर शेट

१ दामू देवाजी चौधरी

१ दिगंबर मोहन चौधरी

**आमोदें ता० यावल पू. खा.**

५ सुपडू श्रावण चौधरी

५ घनश्याम काशीराम चौधरी

५ दौलत तिमा पाटील

५ इच्छाराम तुकाराम महाजन

२ भुरा मुरार पाटील

२ विष्णू मोतीराम पाटील

२ जयराम दुला पाटील

२ हेमा जयराम पाटील

२ विष्णू श्रीपत पाटील

२ रामू जयराम पाटील

२ मुरार शंकर महाजन

२ गणपत चिंधु महाजन

२ विठू पुना महाजन

२ रामदास रावजी महाजन

१ रामू शंकर महाजन

१ कौतीक रावजी पाटील

१ कानजी नथू पाटील

१ वामन सुका पाटील

१ देवचंद सखाराम पाटील

१ नामदेव महिपत पाटील

१ देवराम गणपत पाटील

१ मकडू आत्माराम चौधरी

१ नथू विठू न्हावी

१ सोनू श्रीपत शेटी

१ काशीराम शिवराम तळेले

१ तुकाराम गंगाराम लोखंडे

**पिंपरूड ता० यावल. पू. खा.**

५ नथू देवाजी महाजन

५ पोपट मोतीराम महाजन

५ होना सखाराम पाटील

५ गंगाराम टिकाराम पाटील

५ मनसाराम हेमा पाटील

२ दुला सोना पाटील

२ धनु तोताराम पाटील

२ ठाकूर टिकाराम पाटील

२ सिताराम रघू पाटील

२ भोजू रघू पाटील

२ सोमा जयराम पो. पाटील

२ धोंडू रेणको चौधरी

१। श्रावण बुधो जंगले

१ दामू टिकाराम पाटील

१ नामदेव टिकाराम पाटील
१ नथू देवाजी पाटील
१ सुपडू रावजी पाटील
१ भादू महादू महाजन
१ यादव महादू महाजन
१ श्रीपत नागो महाजन
१ दत्तू भगवान महाजन
१ रामू सखाराम महाजन
१ चिंतामण नरसो महाजन
१ रामदास हिरामण चौधरी
१ कृष्णा केशव चौधरी
१ नथू केशव चौधरी

**चांगदेव ता० भुसावळ. पू. खा.**

११ मनसाराम भिकू पाटील
५ मारुती गणू पाटील
५ तुकाराम गणू पाटील
५ पांडू लक्ष्मण चौधरी
२ बळीराम सोमा महाजन
२ मारुती खुशाल चौधरी
५ विठ्ठल सदाशिव पाटील
१ कांगडू विठोबा पाटील
१ खंडू विष्णा चौधरी
१ सिताराम धना चौधरी
१ मांगो तोताराम पाटील

**न्हावी ता० यावल. पू. खा.**

११ चापा चावदस महाजन
३ शिक्षकमंडळ
२ जयराम खुशाल महाजन
२ मोतीराम खुशाल महाजन
२ पुंजो बुधो बढे
२ नामदेव श्रावण भोळे
२ नारायण तुकडू कोलते
२ निंबा लालू महाजन
२ दयाराम शामा चौधरी
१ सखाराम खुशाल महाजन
१ श्रावण खंडू तळेले
१ हेमा घना फिरके
१ रामा कृष्णा फिरके
१ गणपत शामा फिरके
१ सिताराम हरी चौधरी

**हिंगोणें ता० यावल. पू. खा.**

५ रामू गणपत महाजन
५ शिवराम डिवू महाजन
३ दशरथ रामचंद्र महाजन
२ दिगंबर रावजी महाजन
२ कौतीक शिवराम भंगाळे
२ एस्. रामचंद्र राणे
२ लाला धर्मा गाजरे
१ पेंमा तोताराम गाजरे
१ टिकाराम हरी कुरकुरे
१ हरी टिकाराम कुरकुरे
१ नामदेव जयराम पाटील
१ अनाजी बारसू पाटील
१ नीलकंठजी श्रीपादजी पाटील
१ नामदेवराव दगडू पाटील
१ देवराम खुशाल पाटील
१ गिरधर महिपत चौधरी

**भालोद ता० यावल पू. खा.**

१ पुरुषोत्तम हिरा चौधरी
१ तोताराम तापीराम चौधरी
१ खेमा गणू चौधरी
१ चांगो धना चौधरी
१ माधव ओंकार चौधरी
१ सांडू काळू चौधरी
१ पोपट आनंदा चौधरी
नारायण बुधो चौधरी
१ चिंधू महादू महाजन
१ हरी कनाशी जावळे
१ श्रीपत काळू जावळे
१ अंकात उखा चोपडे
नारायण गोविंद चोपडे
१ बारसू घमा पिंपळे
१ गंभीर रुपला बारी
१ दयाराम भादू चौधरी

**डांभुर्णी ता० यावल. पू. खा.**

५ ढेमू सखाराम चौधरी
५ खंडू कृष्णा चौधरी
२ सोमा नथू महाजन
१ भगवान मोहन महाजन
१ विठोबा ओंकार महाजन
१ काळू सोमा महाजन
१ माधव सुपडू महाजन
१ जयराम मोतीराम चौधरी
१ आनंदा काशीराम चौधरी
१ जिवराम ओंकार फालक
१ बारसू नारायण वाणी
१ मोहन सुका राणे
१ सोनू शिवराम नेहते

**खिरोदें ता० रावेर पू. खा.**

५ काशीराम काळू चौधरी
२ हिरामण रामजी चौधरी
२ विष्णू [illegible] चौधरी
२ भावडू सदाशिव चौधरी
२ खुशाल परशराम चौधरी
१ मुरार रावजी चौधरी
१ ओंकार भादू चौधरी
१ महारू बापू चौधरी
१ हुना भिका चौधरी

**पाडळसें ता० यावल. पू. खा.**

५ धनजी चिमण पाटील
२ हरी रामजी बऱ्हाटे
१ विठू गणू पाटील
१ भिकू सोंदू पाटील
१ दामू दुला पाटील
१ हरी सेनफडू चौधरी
१ नारायण तोताराम चौधरी
१ केवजी सोमा चौधरी
१ देवराम सखाराम भारंबे

**कोळवद ता० यावल. पू. खा.**

५ केशव हुना महाजन
२ घनश्याम सखाराम महाजन
२ हिरामण गणपत चौधरी
१ शिवराम बापू चौधरी
१ बेनीराम हरी चौधरी
१ पुरुषोत्तम हरी वारके

१ शामजी अंकात नेमाडे
१ मिठाराम मनसाराम तळेले
१ सुनाटू महारू राणे

**यावल पू. खानदेश.**

५ रुपा हुना महाजन
२ शंकर कचरू राणे
२ विठ्ठल रघुजी राणे
२ लौटू कामा महाजन
१ दयाराम आसाराम फेगडे
१ अनंत दशरथ चौधरी
१ गोपालसिंह एस. चव्हाण

**खामगांव जि॰ बुलडाणा.**

५ रामबकस लक्ष्मणदास
५ नवमानभाई कुरबानहुसेन
५ महादु सखाराम जिनगर
३ गोविंद पुंजाजी माने, पेन्टर
२ चंदुलाल केवलराम मेहता
२ आसाभाई भिकाभाई कापडिया
२ वासुदेव रामकृष्ण पुरेकर
२ जे. यु. पटेल
२ शंकर तुकाराम दळी
२ पांडुरंग देवराम कासार

**सांगवी ता॰ यावल. पू. खा.**

५ त्र्यंबक शामजी चौधरी
२ लोटू दोधू चौधरी
२ आत्माराम सोमा पाटील
१ तोताराम पुना अत्तरदे
१ हरी मोतीराम बोरले
१ लक्ष्मण तोताराम नमाड

**साकळी ता॰ यावल. पू. खा.**

२ मि. एच्. एस्. तडवी, बी. ए.
२ परशराम धांगो अँड कंपनी
२ शंकर विष्णु मुजुमदार
२ उखर्डू सुपडू वाणी
१ ओंकार कामा धोबी

**शिरसाड ता॰ यावल. पू. खा.**

२ दत्तात्रय रामराव इखे
२ विनायकराव नारायणराव सोले
२ विठू जयराम न्हावी

**दोंडाईचा प. खानदेश.**

२ माधवराव दिवाण जि. फॅक्टरी
२ नेमीचंद अमुलकचंद
२ मेघराज लादुराम
१ जुगराज चंपालाल
१ चुनीलाल ओंकारमल
१ सदाशिव हिरालाल
१ किसनलाल लक्ष्मीनारायण

**डोंगर कठोरें ता॰ यावल.**

१। आनंदा दगडू बेंडाळे
१। लहू जयराम राणे
१। मनसाराम बापू झोपे
१। विठ्ठल केवजी भिरुड
१। सिताराम त्र्यंबक पाटील

**हंबर्डी ता॰ यावल. पू. खा.**

२ तुकाराम रावजी महाजन
१ दशरथ श्रावण टोके
१ हरी रावजी टोके
१ शंकर चांगो पाटील

**रुलसपूर ता० रावेर. पू. खा.**

१ जगन्नाथ बुलाखी वाणी

१ विश्वनाथ सदाशिव वाणी

१ जयराम मोतीराम नाईक

१ खेमचंद सखाराम कोष्टी

१ चिंधु बुला लोहार

**चिनावल ता० रावेर. पू. खा.**

२ घनश्याम सुपड्डू पो. पाटील

२ रामू लहू पाटील

१ ना. भ. पाटील

१ मोतीराम लक्ष्मण ठोंबरे

१ गिरधर काशीराम बोंडे

**आकोला ( वऱ्हाड. )**

२ हरलाल गणपतलाल शेट

२ गंगाराम रोडाजी पाटील

२ नामदेव सदाशीव पाटील

२ आत्माराम मारुति वैराळे

**बामणोद ता० यावल. पू. खा.**

२ दोधू सखाराम जावळे

१ चुडामण बारसू जावळे

**थोरगव्हाण ता० रावेर. प.खा.**

१। हरी विठ्ठल नारखेडे

१ शेनफड्डू केवजी कोल्हे.

**विवरें ता० रावेर. प. खा.**

२ गणेश लक्ष्मण राणे

१ श्रीपत रावजी राणे

**कोचूर ता० रावेर. पू. खा.**

२ देवचंद आर. पाटील

२ नथू उखा परदेशी

२ तेजमल लालमन परदेशी

**अट्रावल ता० यावल. पू. खा.**

२ लालजी हरी चौधरी

२ पंचमंडळी, अट्रावल

१ किसन उंदरू चौधरी

**राजोरें ता० यावल. पू. खा.**

१। धोंडू बुधो बोरले

१ दुला कालु पाटील

**मस्कावद ता० रावेर. प. खा.**

१ कृष्णा सखाराम पाटील

१ मिठाराम दगडू फालक

**भादली ता० जळगांव. पू. खा.**

२ शंकर टिकाराम अत्तरदे

१ टिकाराम धोंडू राणे

११ रुपाजी गंगाराम बेंडाळे, इ. सब इन्स्पेक्टर, **सोलापूर.**

११ डॉ० कौतीक काशीराम भालेदे, **करमाळें.**

५ बॅरिस्टर विठ्ठल नथू पाटील, **यवतमाळ.**

५ धनाजी नाना चौधरी, पो. सब् इन्स्पेक्टर, **नाशिक.**

५ गुलाबचंद हिरालाल, **धुळें प. खानदेश.**

५ भास्कर जयराम पाटील, **वड्री, ता० यावल. पू. खा.**

५ हिरालाल बालमुकुंद शेट, **रणगांव अटवाडें ता० रावेर.**

५ किसनलाल दयाल शेट, अटवाडे ता० रावेर. पू. खा.
५ भादू औसू कुरकुरे सर्कल इन्स्पेक्टर, जामनेर पू. खा.
५ दुलभदास माणकचंद पटेल, बऱ्हाणपुरकर, मुंबई.
५ हरी महादू पाटील, शेलगांव-बाजार जि० बुलढाणा.
५ मि० कर्णिक सुपरवायझर ऑफ सिंगर कंपनी, भुसावळ.
३ मि० भिकू सिताराम पाटील, दानापूर जि० आकोला
३ मि० बिहारीलाल वर्मा, वकील, दानापूर जि० आकोला
२ हरी धांगो पाटील मो. ड्रायव्हर, मलकापूर जि० बुलढाणा
२ लक्ष्मण हिरामण फालक पो. क्लार्क, जामनेर पू० खा०
२ बळीराम नामदेव पाटील, कळंब ता० जि० आकोला.
२ टिकाराम झेंडू पाटील, वढोदें ता० यावल पू. खा.
२ जयाराम विष्णु सुपे, वाघोदें बुद्रुक ता० रावेर पू. खा.
१ श्रावण आसाराम महाजन, रोझोदें ता० रावेर. पू. खा.
१ कृष्णा माधव पाटील, अंजाळें ता० यावल पू. खा.
१ आनंदा गोविंदा चौधरी, विरोदें ता० यावल पू. खा.

REFBK-0003128

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 3128